31 DEC 2020

पक्ष्यांचे उडणे

मला अनेकदा असे वाटते की बरेच पक्षी निष्कारणच उडत असतात. खाण्यापिण्यासाठी वगैरे ठीक पण उगीचच का उडत असतील ? अजूनही मला हे कळलेले नाही. पण, म्हटले आंतरजाल  काय म्हणते यावर ते पाहू. तर ते शोधताना आणखीनच अजब माहिती मिळाली ! काही पक्षी जवळजवळ आयुष्यभर स्थलांतरातच असतात. स्वित्झरलंड ते आफ्रिका जा-ये करत असतात. विशेष म्हणजे दहा-दहा महिने ते सतत उडत असतात. जमिनीवर वा झाडावर उतरतच नाहीत ! उडता उडताच त्यांना झोपही घेता येते ! काही पक्ष्यांना काही सेकंदांचीही झोप पुरते म्हणे !

गंमत म्हणजे हे असले नुसतेच उडते किंवा उडत उडत संपणारे आयुष्य असूनही ते पक्षी त्याला निरर्थक वा गधडे जगणे म्हणत नाहीत. हवेत उडणारे किडे हेच त्यांचे जाता जाता मिळणारे अन्न असते. पाण्या ऐवजी बाष्प पीत असतील ते वेडे ! माहीत नाही. मग माणूसच का meaninglessness, absurdity यांचे घोळ घालत असेल ? जे आहे ते माणसाला, मजेत जाऊ द्या, हेच जगणे, असे तरी का जगता येत नसेल ? म्हणजे भौतिक प्रगतीबरोबरच विचाराने माणूस अधिकाधिक मूर्ख होत गेला असेल का ? वैज्ञानिक ठीक पण बाकीचा बराच विचार हा माणसाने स्वत:च ओढवून घेतलेला शाप तर नसेल ?

--- 000 ---

आपमतलबीपणा आणि बेफिकीरी

आहारविहाराचे नियम पाळणे, व्यायाम करणे हे सगळे काहींना भांडवलशाहीतल्या आपमतलबीपणाचे वाटते. काहींना हे असे शिस्त पाळणे हे लाजिरवाणेही वाटते. आपण अगदीच कारकुनी , मध्यमवर्गीय बूर्ज्वा झाल्यासारखे वाटते. त्यापेक्षा बेफिकिरीत राहावे आणि जनतेच्या हिताचा विचार प्राधान्याने करत जगावे, असे त्यांना वाटते.  पण दिवसभर सिगरेटी फुंकणे हा स्वला खुश करणारा आपमतलबीपणा त्यांना चालतो. काहीजण आळशीच असतात तर काहींना अतिआत्मविश्वास असतो की कुछ नही होता. काहीजण म्हणतात की पटतेय हो पण वेळच नाही मिळत. तरीही, एकूणात या स्पर्धेच्या जगात नोकरीधंदा करणे, कार्यक्षमता टिकवणे हे सामान्यत: सर्वांनाच गरजेचे असते. संसार, मुलेबाळे, शाळा-कॉलेज प्रवेश वगैरेंतून कुणाचीही सुटका नसते. त्यामुळे एका मर्यादेबाहेर बेफिकिरी करणे हे महागात पडू शकते. या निर्दयी स्पर्धेच्या युगात मानसिक ताणतणाव, काळज्या, नैराश्य वगैरे प्रश्न येऊ शकतात. त्यांची पुढे वाढ होऊन काही मानसिक रोगही मागे लागू शकतात. त्याचबरोबर, वारंवार उद्भवणारे पण कायमचा इलाज नसलेले असे बीपी, मधुमेह, दमा, हृदयरोग, अर्धांगवायू असले पाहुणेही वास्तव्याला येऊ शकतात. हे सर्व टाळण्यासाठी नियमित व्यायाम आणि ध्यान यांची अटळ गरज असते. ध्यान हा काही हिंदू धर्मातला उपचार आहे, हे डोक्यातून काढून टाकायला हवे. एखाद्याला कम्युनिस्टांचा राग असू शकतो पण म्हणून रशियात तयार झालेली कोव्हिड लस मला नको, असे म्हणणे हे मूर्खपणाचे ठरू शकते. कारण इथे विचार, मते, श्रद्धा यांचा प्रश्न नसतो – हे विज्ञानाचे क्षेत्र असते. आजच्या या गळेकापू स्पर्धेच्या आणि प्रचंड ताणाच्या जगात ध्यान शिकणे आणि ते जगण्यात असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या बाबतची वैज्ञानिक माहिती सर्वत्र सहज उपलब्ध आहे. एखादी गोष्ट विज्ञानाने सिद्ध झालेली असेल तर ती पूर्ण मानवजातीची झाली, असे समजायला हवे. हे सर्व समजून घेऊन व्यायाम आणि ध्यान यांचा सर्वांनीच अंगीकार करायला हवा, असे सुचवावेसे वाटते.

--- 000 ---

नैराश्य

वाढत चाललेला नैराश्य रोग आणि आत्महत्या हा एक जागतिकच प्रश्न आहे, असे म्हणायला हरकत नाही असे दिसते. एक फ्रांझेन नामक लेखकआहेत , त्यांचे ' गुड फॉर नथिंग ' नामक एक पुस्तक आहे. त्यात त्यांनी नैराश्याच्या स्वानुभवावरून या समस्येची चर्चा केलेली आहे. ते एक अत्यंत महत्त्वाचे विवेचन वाटते. त्यांचे म्हणणे या रोगाची जबाबदारी व्यक्तीवर ढकलणे ही भांडवलशाहीची रीतच आहे. पण खरे तर, व्यक्तीच्या गुणदोषांबरोबरच खूप मोठ्या प्रमाणात राजकीय-आर्थिक जग हे त्याचे कारण आहे. कुणी म्हणते की समाज असे काही नसतेच, फक्त व्यक्तीच असतात -- हे त्यांना मान्य नाही.
नैराश्या चे एक प्रमुख कारण ते असे सांगतात की आता
भांडवलशाहीला पर्यायच नाही असे जग निर्माण झालेले आहे -- असे होणे हे आहे मुख्य कारण ! आनंदात जगायचे की दु :खी होऊन जगायचे ही व्यक्तीची निवड असते, असे म्हणणे बरोबर नाही, असे ते म्हणतात.
नुसते सत्तेवर कुणी यावे एवढ्यापुरतीच या प्रश्नाची व्याप्ती नसून पूर्ण मानवी जगणेच पंजात पकडणारी ही समस्या आहे.
आपण सर्वांनी मिळून निर्माण केलेले हे जग आहे ! अशा परिस्थितीत काय सुचतात यावर उपाय ?
नेटवर उपलब्ध लेखाची लिंक --
https://lareviewofbooks.org/.../future-no-future.../
--- 000 ---

क्रोध आणि द्वेष
मनात सतत क्रोध आणि द्वेष या भावना बाळगणे, त्यांची जोपासना व संवर्धन करणे आणि आचरणातून सतत त्यांना अभिव्यक्त करत राहणे यांमुळे आरोग्याचे  गंभीर प्रश्न निर्माण होतात असे शास्त्र सांगते. शास्त्र म्हणजे धर्मशास्त्र नव्हे तर विज्ञान सांगते. सध्याच काय, अलीकडे म्हणू, जिकडेतिकडे राजकीय आखाडे आणि चर्चा यांचा आस्वाद घेण्याचे प्रमाण वाढत चाललेले आहे. त्यातून क्रोध आणि द्वेष यांचे सार्वत्रिकच उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत आहे. याला सर्वच पक्ष, प्रवक्ते, नेते आणि उत्साही कार्यकर्ते जबाबदार आहेत. जनतेलाही रोजच्या व्यापतापातून  थोडे बाहेर काढणारी ही एक बरी करमणूक वाटत असावी असे दिसते. याला अमुक जास्त जबाबदार, तमुक कमी जबाबदार असा विषय घेऊनही त्याच मालाचे आणखी उत्पादन घेता येईल. पण, एकूणात पूर्ण देशाचेच आरोग्य धोक्यात आणणारा असा हा अजेंडा सर्वत्र मोठ्या प्रमाणावर अंमलात आणला जात असलेला दिसतो. ज्यांची उपजीविकाच या उत्पादनक्षमतेवर अवलंबून आहे त्यांचा इलाजच नाही, पण, बाकीच्यांना आपापल्या आरोग्याची काळजी कशी घेता येईल हा प्रश्न आहे -- की असे असे असल्यावर तसे तसे होणारच या विचारात राहून आहे ते तसेच चालवत राहावे ?
--- 000 ---

विचारस्वातंत्र्य म्हणजे काय रे भाऊ ?
एकदा डॉ. श्रीराम लागू आणि विजय तेंडुलकर यांच्या जाहीर गप्पांचा कार्यक्रम झाला होता. त्यात ' नियती ' हा विषय आला होता. लागू म्हणाले की ते नियतिबियती काही मानत नाहीत तर तेंडुलकर म्हणाले की ते मानतात. दोघेही तसे पुरोगामी म्हणावेत असेच, मग हा फरक कसा काय ? मग, दोघेही वैज्ञानिक दृष्टिकोण मानत होते की नव्हते ? श्रद्धावान लोक तेंडुलकरांमुळे खुश झाले असले तरी पुरोगामी लोक डिस्टर्ब होणे साहजिक होते. पण, विचार करता असे दिसते की लागूंचा यातला पुरोगामीपणा हवेतला होता आणि तेंडुलकरांच्या नियतिवादाला वैज्ञानिक पाया होता. विज्ञानाची पायाभूत गृहीतके काय असतात, तर ती अशी आहेत –
१ निसर्ग हा शिस्तबद्ध असतो आणि निसर्गाचे नियम ते दाखवत असतात.

२ आपाल्याला निसर्गाची माहिती होऊ शकते.
३ घडणाऱ्या सर्व गोष्टींना नैसर्गिक कारणे असतात.
४ स्वयंभू असे काही नसते.
५ अनुभवातून ज्ञान मिळू शकते.
६ ज्ञान हे अज्ञानापेक्षा श्रेष्ठ असते.

-- थोडक्यात जे आहे ते सर्व कारण-परिणाम साखळीतच असते. यामुळेच पूर्वी कुणी कर्मविपाक सिद्धांत काढला असेल किंवा स्वर्ग-नरकाच्या कल्पनाही निघाल्या असतील. चांगल्याचे चांगले फळ, वगैरे ( पण, चांगले म्हणजे काय ते मी सांगणार, ही त्यातली, कारणांनीच जन्माला आलेली, हलकट मानवी मखलाशी वेगळी ). आपल्याकडे जसे कफ, वात, पित्त यांपैकी काही एक प्रधान असलेली माणसे सांगितली गेली तशीच तिकडे चार प्रकारची माणसे सांगितली गेली. या सर्व प्रकारच्या माणसांचे स्वभावविशेष वगैरेही सांगितले गेले. उदाहरणार्थ कफप्रधान माणसे जास्त रोमँटिक असतात, वगैरे. यातले बरेचसे आपण विवाद्य समजलो तरी वैज्ञानिक दृष्टिकोणातली कारण-परिणाम साखळी कशी टाळणार ? म्हणजेच एखादा माणूस कम्युनिस्ट व्हायला किंवा भांडवलवादी व्हायला काही ना काही कारणे असणार. स्वयंभू काहीच नसते ! हे सर्व पाहता, लागू हवेत गप्पा मारत होते आणि तेंडुलकरांना मानवी जगण्याची अधिक सखोल जाण होती, असेच म्हणावे लागते.

कालच्या माझ्या पोस्टमध्ये, विचारसरणीवर जनुकरचनेचा प्रभाव असतो या संशोधनाचा उल्लेख होता. तो, स्वतःला स्वयंभू समजणाऱ्या पुरोगाम्यांना आवडणार नाही, हे मला माहीत होते. पण यावर ‘ वैज्ञानिक ‘ मटेरियल आहे नेटवर – हा काही अंधश्रद्धेचा भाग नाहीय.

माणसाचा स्वभाव, विचार हे सर्वच जर कारण-परिणामांनी नियंत्रित असेल तर साहजिकच विनम्र उत्सुकतेने हा प्रश्न विचारावाच लागतो की – विचारस्वातंत्र्य म्हणजे काय रे भाऊ ?

--- ००० ---

ग्रेट मुलाखत

परवा संगीतविषयक एक पोस्ट दिली आणि मग त्या निमित्ताने नेटवर काही पाहिले -- कौशिकी चक्रवर्ती या महान गायिकेची ही महान मुलाखत त्यामुळे समोर आली ! इतकी गंभीर चिंतनात्मक मुलाखत फार क्वचितच ऐकायला मिळते ! " धर्म नव्हे, आध्यात्मिकता ", " संगीतातला सर्वात महत्त्वाचा क्षण म्हणजे गायला सुरुवात करण्यापूर्वीची शांतता " ! ग्रेट ! ज्यांचे आधीच काही पूर्वग्रह असतील त्यांनी द्या सोडून, पण बाकीच्यांनी खुल्या मनांनी ऐकावी अशी एक खास मुलाखत ! माझे तर या बाईंना दोन सॅल्यूट आहेत -- एक गायनाबद्दल आणि दुसरा या मुलाखतीबद्दल --

मन आणि राजकारण

मन अशी एखादी गोष्ट निरीक्षणाला उपलब्ध नसते त्यामुळे मानसशास्त्र हे झाले वर्तणूकशास्त्र. वर्तणुकीचा अभ्यास, निरीक्षण करून काही निष्कर्ष सापडतात म्हणून त्याला शास्त्र म्हणायचे. पण वर्तणुकीच्या मुळाशी मेंदूतल्या हालचाली, त्यांचे एकचालकानुवर्तित्व, सुरक्षेची, वर्चस्वाची, सुखाची इच्छा – हे सगळे असतेच ना ! तरीही, एकजण म्हणतो की मानसिक विकृती बऱ्या करता येतात तर टॉम ग्रीनिंगसारखा जगविख्यात मानसशास्त्रज्ञ म्हणतो की मानसिक विकृती असे काही नसतेच. माझ्यासारख्यांचा त्या शास्त्राचा सखोल अभ्यास कसा असणार ? कडेकडेने जाऊन जेवढे समजेल तेवढे समजेल, असेच असणार. पण स्वतःचे मन आणि स्वतःची वर्तणूक यांचा तर असू शकतो निरीक्षण-अभ्यास. त्यामुळे, थोडेफार बोलायला हरकत नाही. शिवाय, मानवी मन समजून घेत राहणे हे कलावंताचे मिशनच तर असते. आपण थोडेफार कलावंत आहोत असे समजून त्या आधारावरही थोडेफार चालू शकेल.

मानसशास्त्राच्या एका पुस्तकात असे एक संशोधन वाचनात आले की माणसाची विचारसरणीही त्याच्या जनुकरचनेवर अवलंबून असते ! म्हणजे बोंबला ! मानवी हिताचा प्रचंड विचार करून, बुद्धिप्रामाण्यवादाने, स्वकष्टाने आपण कम्युनिस्ट झालोय असा अभिमान एखादा माणूस बाळगतो पण ते तितकेसे खरे नसते ! यावर कुणी असेही म्हणू शकते की, येत असतात हो अशी संशोधने आणि ती खोटीही पडत असतात, ती फार मनावर घेऊ नयेत ! अरे, पण विज्ञानाच्या एका टप्प्यावर जे सापडलेय ते त्या टप्प्यावर तरी खरे धरायचे की नाही ? काय म्हणतो यावर वैज्ञानिक दृष्टिकोण ? कारण-परिणाम साखळी हे जर विज्ञानाचे एक प्रमुख वैशिष्ट्य असेल तर तुम्ही अमुक एका विचाराचे व्हायला तुम्ही हजारो वर्षांत घडत आलेला तुमचा मेंदू वापरत असता आणि तो अनेक प्रभावांनी युक्त असतो, हे मान्य व्हायला काय हरकत आहे ? तर वर्तणुकीच्या मुळाशी एक कृत्रिम केंद्रयुक्त सुख दुःख राग लोभ वर्चस्वाची इच्छा भीती सूडभावना आसक्तीचे प्रेम सहानुभूती वगैरे हे सगळे असते. हे सगळे त्या केंद्रामुळे असते आणि निरीक्षणशक्य असते म्हणजेच मर्यादित असते. आणि ही रचना एकासारखी जशीच्या तशी दुसरी असे असूच नाही शकत हेही स्पष्टच आहे. त्यामुळे साहजिकच माणूस आपण स्वतः आणि आपला प्रकार, आपला समूह, आपली टोळी आघाडीवर कशी राहील याच्या प्रयत्नात असतोच. यालाच त्याचे राजकीय जगणे असे म्हणता येते. आणि पुढे, राजकारणाशिवाय माणूस असूच नाही शकत असेही म्हणता येते, म्हटले जातेही. त्यामुळेच एका व्यक्तीला दुसरी व्यक्ती माझ्या समजुतीप्रमाणेच वागली पाहिजे असे वाटते आणि त्यातून संघर्ष घडतात तसेच समूहांचेही घडत असते. बुद्धिप्रामाण्यवाद्यांना हे मान्यच करावे लागते. याचाच अर्थ, संघर्ष, भीती, युद्धे, सूड, छळ हेही त्यांना मान्य करावे लागते. हे सर्व मान्य करून तसे जगत असतानाच, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय यांची भलावण करण्याचे ‘ विवेकी ‘ कर्तव्यही त्यांना पार पाडत राहावे लागते. सारांश, राजकारणी मन हे नेहमीच अशा दुविधेत आणि आत्मवंचनेत आणि ढोंगीपणात आणि खोटेपणात जगत असते. मग यातूनच काहीजण असे काढतात एक तत्त्व शोधून की बाबा बहुसंख्यांच्या राजकारणाप्रमाणे चालू दे गाडी म्हणजे कटकटी कमी तरी राहतील. यालाच लोकशाही म्हटले जाते. पण ‘ अपयश ‘ कुणालाच परवडत नाही, त्यामुळे मग अपयशी झालेले सगळे, आपले ‘ नमूने ‘ विचारात न घेता एकत्र येतात आणि यशस्वी समूहाला हरवू पाहतात ! हा एक वेगळाच घोटाळ्याचा गुंताडा तयार होतो. असे वारंवार घडताना दिसते. निवडणुकीची गणिते आणि डावपेचही बरेच चालतात आणि एकूणात बहुसंख्यांच्या मतांनी चालू दे, हे मागे पडते !

राजकारणाशिवाय माणूस जगूच नाही शकत असे म्हणणाऱ्यांना हे सर्व मान्य असते ! इथे प्रश्न असा आहे की कलाप्रक्रिया किंवा सर्जकता हीही याच चक्रात बद्ध असते का आणि असावी लागते का ? आणि तसे असेल तर सर्जकता असे काही नसतेच, असे नाही होणार ? सर्जकता म्हणजे असते तरी काय मग ?

--- ००० ---

धर्म

मधून मधून मी संगीत ऐकत असतोच पण कालपासून माझा संगीत समारोहच चालू आहे. काल बराच वेळ किशोरी आमोणकर ऐकल्या, आज बडे गुलाम अलि खान, अब्दुल करीम खान आणि आत्ताच कौशिकी चक्रवर्ती ! शिवाय इकडचे आपले भीमसेन जोशी, कुमार गंधर्व, वसंतराव देशपांडे हेही असतातच. अशा अत्युच्च भानाच्या कलावंतांबरोबर मी अनेकदा माझे मन देतो सोडून आणि शिकू देतो त्याला कलेतले असंख्य बारकावे आणि येऊ देतो फिरून असंख्य शिखरांवरून. ही सगळी संतमंडळी आहेत ! यांना धर्म आणि विचारसरण्या बांधून नाही ठेवू शकत. हे सर्वजण, कोणतेही नाव नसलेला पण पूर्ण मानवासाठी असलेला असा एक अगाध धर्मच व्यक्त करत असतात. अनाम पण प्रत्यक्ष धर्म ! याच्या संपर्कात जर जास्तीत जास्त माणसे राहतील तर जगातली सर्व युद्धे थांबतील. शास्त्रज्ञ किंवा कारखानदारच महत्त्वाचे असे मुळीच नाही. राजकारणी तर सोडूनच द्या. मनुष्य प्राणी टिकेल तर तो यांच्यामुळेच टिकेल.

तर कौशिकी चक्रवर्ती ! संत व्यक्तीने स्त्री असू नये, सुंदर असू नये, तरुण असू नये, असे थोडेच आहे ? ही मुळात अतिसुंदर आहेच पण तिच्यातल्या गहन सर्जकतेमुळे तिच्या सौंदर्याला मर्यादाच राहिलेली नाही ! आत्ताच तिचा शुद्ध सारंग ऐकला यूट्यूबवर ( मला राग कळत नाहीत – तुम्हीही ऐकावा म्हणून तुमच्या माहितीसाठी रागाचे नाव दिलेय ). ही स्त्री म्हणजे मला एक तळपता चमत्कारच वाटते ! स्वरांचे आख्खे विश्व ती सहज फिरवून आणते आपल्याला ! अजब आहे ! तिचे साथीदारही जबरदस्त आहेत ! मधेच ती साथीदारांच्या महानतेची कदर व्यक्त करते ते खरोखर ‘ आपण सगळे एकत्र ‘ हाच भाव दाखवते.
हिच्यामुळेच माझे मन इतके विशाल होते की त्यात तीही सामावली जाते ! तिच्या सबोध मनाला ते कळायची गरजच काय ? हा तर एकतर्फी नव्हे तर एकमात्र अमर्याद प्रेमाचा मामला आहे ! जियो !!!
--- ००० ---

जुनेनवे
आपण बालकवी-केशवसुत वाचतोच ना ? काळानुरूप कलेचे रूप वेगवेगळे असते, हे मान्य ! पण, चांगले ते चांगले असतेच ! आज आठवण झाली म्हणून जुना हिंदी चित्रपट ' बात एक रात की ' यूट्यूबवर समोर आणला. त्यातली गाणीच नुसती नव्हे, वहीदाचा अभिनयही बघा. उपलब्ध परिस्थितीत किती बुद्धिमान तऱ्हांनी ही गाणी जिवंत केलीयत ते बघा. यातले ' अकेला हूं मैं ' हे तर माझे सर्वकाळ आवडते गाणे ! जुन्या लोकांनीही घडवलाय हा भारत ! त्यांनाही मधून मधून सॅल्यूट मारत चला -- लिंक देतोय --

१६ डिसेंबर २०२०.

आपल्या स्वतःच्या पोस्ट आणि कॉमेंटस
फेसबुकच्या जुन्या रचनेत आपल्या पोस्टस आणि कॉमेंटस वर्षनिहाय सलग ओळीने सापडत असत. त्या एक गठ्ठा कॉपीपेस्ट करता येत. आताच्या नव्या रचनेतही ती सोय असणार पण मला ते सापडत नाहीय. हे कसे शोधायचे याबाबतच्या ज्या सूचना सापडतात त्या जुन्या रचनेबाबतच्या आहेत. सध्याच्या या नव्या रचनेत ते शोधायची काय पद्धत आहे ? तज्ञांनी कृपया मार्गदर्शन करावे.
--- ००० ---

Champra Deshpande
December 13 at 5:36 PM · Shared with Public
Public
अडाण्याचा जाहीरनामा
अतिवास्तववादाचा जाहीरनामा असतो, न-कवितेचा असतो आणि ही माणसे काही वेगळी, महत्त्वाची समज व्यक्त करताहेत म्हणून त्यांच्याकडे लक्षही दिले जाते, आपल्या आवडीचे, आपल्या सवयीचे नाही म्हणून लगेच त्यांची हिडीसफिडीसही केली जात नाही – तसे, गेल्या कित्येक वर्षांत मराठीत काय घडले ? इथे एक तर सुधारणावादी कला किंवा व्यक्तिगत अनुभवांचे गोडवे गाणारी भावनिक कला, हे दोनच प्रकार का फोफावले ? इथे सुरुवातीलाच एक सांगून ठेवतोय की या जाहीरनाम्यातले प्रत्येक वाक्य विवाद्य असणार आहे, बरेच काही अर्धवट माहितीवर वा अज्ञानावर आधारित

असणार आहे, लोकांनी टची होऊ नये आणि लगेच हल्ले करायचे विचार करू नयेत. हा एका अडाण्याचाच जाहीरनामा असल्याने, असे बरेचसे ' चुकीचे ' घडणारच याची विवेकशील जाण बाळगावी.

हा विशेषीकरणाचा जमाना आहे. नुसते डॉक्टर म्हटले तरी पोटाचे वेगळे, दातांचे, हाडांचे वेगळे, हृदयाचे वेगळे आणि टाळक्याचे वेगळे, असे आहे. सगळ्यातले सगळ्यांना कळू शकत नाही. तसेच पदार्थविज्ञानशास्त्र वेगळे आणि राजकारण वेगळे. राजकारणातही अमुक साली तुम्ही काय करत होता किंवा तुम्ही अमुम तमुक म्हणाला होता हे असले प्रकार वेगवेगळ्या माणसांबद्दल वेगवेगळे लक्षात ठेवावे लागतात – तेही विशेषीकरणच असते. पक्ष बदलले तर याच्या आठवणी त्याच्याकडे जातात, हे पाहावे लागते. वैचारिक बोलणाऱ्या सगळ्याच लोकांनी टॉफलर, हरारी किंवा हॉकिंग्ज वाचलेले असतातच असे नाही. त्यांना कांट, हेगेल वा फुकोही माहीत नसतो. त्यातले काही असले माहीत तरी मानववंशशास्त्रातले त्यांना काही कळत नसते. २०३० साली माणसाचे जगणे कसे असणार आहे यावरची पुस्तके त्यांनी वाचलेली नसतात. यापुढे, नऊ महिने पोटात गर्भ वाढवत बसणे आणि मग कळा सहन करत मूल जन्माला घालणे, असले काही असणार नाहीय, प्रयोगशाळेतच मुले जन्माला येणार आहेत, हे आहे माहीत ? इस्पितळांची गरजच राहणार नाहीय, घरच्या घरीच सगळे होईल, हे आहे माहीत ? विनाचालक गाड्यांमुळे अपघात जवळजवळ बंदच होणार आहेत, हे आहे माहीत ? अनेक विषय आहेत, त्या सगळ्या विषयांचे वाचणे जाऊ द्या, त्यांची नावेही कुणाला माहीत नसतात. गेल्या शतकातले जगातले पन्नास महत्त्वाचे विचारवंत सांगा असे म्हटले तर बहुतेकांची बोबडी वळेल. साहित्य, कथा, कविता, कादंबरी हे सगळे म्हटले तरी जगात खूप पुस्तके असतात. " तुम्ही हे अमुक वाचलेत का, तुम्ही ते तमुक वाचाच " असे एकमेकांना माणसे सांगत असतात. खरे तर माणसाच्या समस्या या ज्ञानाच्या सर्वच क्षेत्रांशी एकत्रितपणे संबंधित असतात पण असा आवाका घेऊ शकेल असा एकही विद्वान असू शकत नाही. सगळे एका एका तुकड्याच्या अर्धवट माहितीचे बाजारबुणगे विद्वान असतात.

एखाद्या नटाची आत्महत्या होते आणि तिला निरनिराळी वळणे मिळत राहतात, राजकीय प्रभावांनी ती स्टोरी रंगवणे आणि वादाला वापरणे चालू होते, बलात्काराच्या घटना, आर्थिक गुन्ह्यांच्या घटना, वगैरेंना अनेक कंगोरे असल्याचे कानावर पडत राहते – तर हे असे सगळे प्रकार आणि त्याचबरोबर विमानखरेदीतला भ्रष्टाचार हे सगळे सारखे समजून घेत राहणे कुणाला शक्य असते ? आणि समजणे म्हणजे ' राजकीय समजणे ' असेच असल्यावर अनेकांनी त्याचा नादच सोडून दिला तर चुकीचे काय आहे ?

आमच्या काळी अकरावीनंतर, फर्स्ट इयर, इंटर आणि मग दोन वर्षे पदवीची असे होते. त्यातल्या इंटर आर्टसला आम्हाला जगाचा इतिहास होता ! साधी दोन महायुद्धे म्हटली तरी ते सगळे लक्षात राहणे मला अवघड वाटे. महायुद्धांना ' साधी ' म्हटले कारण तेवढे तरी समजायलाच हवे ना ! आता ते कुठे काय घडले हे तर आहेच, पण, ती ती ठिकाणे, ते ते देश तरी नेमके येतात का डोळ्यांसमोर ? अझरबैजान की काय म्हटल्यावर काय कळते बोंबलायला ? भूगोलही आख्खा माहीत नसतो. शिवाय जंगले, पर्वत, नद्या, अनेक संस्कृती, काहीही नसते माहीत.

हे सर्व पाहता, एखादा माणूस अमुक पुस्तक फार चांगले आहे म्हणतो आणि दुसरा म्हणतो की मलाही वाचायचेय ते, कुठे मिळेल – यासारखे विनोदी काही असू शकत नाही. काही शहाण्या माणसांना अशा ' ज्ञानाच्या ' दिशेने मेहनत न करताही, याचा काही उपयोग नाही, हे कळत होते, आता हुशार लोकांनाही हे कळायला लागले असावे, अशी शंका आहे. एकूण जगातलेच वाचन कमी होत चालले आहे असे संशोधन आहे ! तरीही काही आशावादी पढतमूर्ख म्हणताहेत की आता डिजिटल वाचन वाढत जाणार आहे ! खरे तर कोणत्याही काळातले कोणत्याही दर्जेदार ( आपल्या मते ) साहित्याचे थोडेफार वाचन केले तरी ' शहाणपण ' येणार असतेच – गेल्याच महिन्यात इटलीत प्रसिद्ध झालेले पुस्तकच वाचायला हवे, असे काही नाही. हा जाहीरनामा, ' अतिवाचन ' हा एक रोग मानतो हे इथे लक्षात घ्यावे.

तर अशा या ज्ञानी पार्श्वभूमीवर या जाहीरनाम्याची कलमे अशी आहेत –

१. आजूबाजूला, देशात वा जगात काय काय घडते आहे याची सर्व माहिती मिळवत बसण्याचा प्रयत्न मी करणार नाही.

२. इथला भूतकाळ आणि संस्कृती यांचे आपोआपच माझ्यावर काही प्रभाव असतील, तेवढे मला पुरे आहेत. मी रामायण, महाभारत, हितोपदेश, पंचतंत्र, गांधी, टिळक, शिवाजीमहाराज, आंबेडकर हे वाचत बसणार नाही किंवा शेतकरी आंदोलन, किंवा बेरोजगारीवरचे उपाय या सगळ्याचा अभ्यास करत बसणार नाही.
३. माझ्या कानावर येईल ते वा त्या त्या वेळी मी जे ऐकेन-वाचेन ते यांवर आधारित मी माझी कामचलाऊ मते बनवणार. अगदी विद्वानांची मतेही अर्धवट वा निवडलेल्या वा पूर्वग्रहयुक्त माहितीवर आधारितच असतात, हे मला समजत असल्याने, अशी तात्पुरती फुटकळ मते मी बाळगण्यात काही चूक आहे, असे मला वाटत नाही.
४. ' बहुमतवादामुळे लोकशाहीचे खूप नुकसान होते ' असे एक ज्वलंत वाक्य माझ्या वाचनात येऊन गेलेले असल्याने आता, मी म्हणतो तेच सत्य, असे म्हणायला मी लाजणार नाही.
५. माझ्या मतांच्या पुष्ट्यर्थ मी आंतरजालावरची माहिती वा उद्धृते ( कोटेशन्स ) त्यांची शहानिशा न करता वापरणार. मला कुणी त्यांचे संदर्भ विचारू नयेत. अगदी संदर्भांसह लेखन केले तरी ते माझ्या लेखनाहून फार उच्च वगैरे नसते, हे मला माहीत आहे. आणि करायचीयत काय नावे आणि संदर्भ ? ते विचार ओघात आलेले आहेत, ते अमुक कुणाचे असोत वा नसोत, असे पाहा ना !
६. साहित्याची वा कवितेची समीक्षा ही अमुक काळ, तेव्हाचे प्रभाव, वगैरे विचारात घेत साठोत्तरी, नव्वदोत्तरी अशी करायची गरज नाही. नको त्या विद्वत्तेने पाने भरू नयेत.
७. कोणत्याही साहित्यकृतीला एक कथनसलगता वा वैचारिक अर्थवत्ता वा व्यक्तिगत सुसंगती असायची गरज नाही. सुचेल तसे काहीही लिहायला हरकत नाही. असंबद्ध, वेडे लेखनही माणसाला शहाणपण देईलच, असा माझा विश्वास आहे. शहाणपण म्हणजे हेच की वैचारिक सत्य असे काही नसते.
-- अजूनही काही कलमे यात वाढू शकतील. हा फक्त एक प्रारंभिक मसुदा तयार केलेला आहे. हा जाहीरनामा ' पटणारे ' असंख्य सुजाण विचारवंत, लेखक या चळवळीला जोडले जाणार आहेत याची मला खात्री आहे. त्या वेळी वाटल्यास याहून निरर्थक काही कलमे यात वाढवता येतील.
या जाहीरनाम्याबाबत कोणतेही वाद घालून काहीच उपयोग नाही हे सर्व बुद्धिनिष्ठ, तर्कनिष्ठ, विवेकी आणि वैज्ञानिक दृष्टिकोणाच्या मानवांच्या लक्षात येईलच हीच एक माफक आशा बाळगून इथेच सध्या विराम घेत आहे.
--- ००० ---

Champra Deshpande
December 13 at 9:54 AM · Shared with Public
Public
गडहिंग्लजचा बोकड
गडहिंग्लज या गावामध्ये बोर्डच लावलेयत -- ' बोकड आहे कडक देतोय धडक ' ! विशेषतः कोणत्याही दुचाकीवर कुणी दिसला की तो भडकतोय. आणि मग एकूणच मानवजातीवर ! कुणी बेसावध असला की गेलाच समजा त्याच्या धडकेने गटारात ! टीव्हीवर ही एक गंमतीची, विनोदी बातमी म्हणून दाखवली. कुणा दुचाकीस्वाराने त्या बोकडाला धडक दिली होती, त्याचा राग त्याच्या डोक्यात आहे. सावधगिरी म्हणून त्याच्या गळ्यात लोढणे अडकवलेले आहे, पण तरीही त्याची ताकद जबर आहे, तो देतोच धडक !
पाहणारे अर्थातच हसतात. पण त्या बोकडात आणि माणसात काय फरक आहे ? अमुक धर्माच्या लोकांनी अत्याचार केले, तमुक जातीच्या लोकांनी केले, अमुक पंथ, तमुक भाषा या सगळ्या प्रकारचे रागसंताप लक्षात ठेवूनच तर जगताहेत माणसे ! शिवाय सारखे म्हणावे लागतेय, " मी जातिभेद मानत नाही, मी धर्मभेद मानत नाही " ! कोणत्या ना कोणत्या शत्रूशिवाय

एकत्र येऊच नाहीयत शकत माणसे ! एकत्र तरी कशाला यायला हवेय, हव्यात कशाला टोळ्या -- हा प्रश्नच पडत नाही कुणाला. प्रत्येकाची आपापली न्याय्य समर्थने आहेतच. हा या द्वेषाला अमानुष म्हणतोय तर तो त्या द्वेषाला ! माणुसकी हवी यावर सर्वांचे एकमत आहे, हे विशेष ! भूतकाळातले अन्याय आणि एकूणच भेदाभेद नष्ट होईपर्यंत तरी ( भूतकाळ कसा नष्ट होईल, हा आध्यात्मिक होतो प्रश्न, द्या सोडून ! ) हे थांबणार नाही, हे स्पष्ट आहे. आणि ते होईपर्यंत यातले विखार अधिकाधिक वाढतच जाणार, त्याला इलाज काय ? हिटलर कसा वाईट होता यावर सगळ्यांचे एकमत होऊ शकते, हीच यातली उदात्तता !
सारांश, तो बोकडही माणसाच्या उदात्ततेला बळी पडलेला आहे, हे लक्षात घ्यायला हवे. अन्यथा, ही रागद्वेष बाळगायची आयडिया त्याला कशी समजली असती ? भेद असू द्यात, प्रत्येक काळात या ना त्या गटाचे स्वार्थात वर्चस्व होत राहते, ते होणारच -- हे सगळे असणारच आणि चालणारच ! पण याचा अर्थ, घटनेतली स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्त्वे विसरायची, असे नव्हे. द्वेषही बाळगायचे आणि माणुसकीचा उद्घोषही करायचा, हेच तर आदर्श जगणे !
" माणूस कडक, देतोय धडक " अशी बातमी द्यायची गरजच काय ? ते तर नुसतेच रूटीन जगणे आहे !
--- ००० ---

विनंती
माझी मित्रसंख्या ५००० पूर्ण असते -- मध्येच एखाददुसरा कमी होतो तेव्हा मला नवीन मित्रविनंती स्वीकारता येते. मी स्वत:हून कुणाला निष्कारण या यादीतून कमी करत नाही. समोर दिसले नाहीत तरी ते आपले वाचत असतील असे गृहीत धरतो. तरीही बरेच लोक असे असतील की ज्यांना माझे काही वाचण्यात फारसे इंटरेस्ट नसेल -- अशांनी स्वत:हूनच मला अमित्र करून इथून निर्गमन ( exit ) करावे ही विनंती. म्हणजे मला नव्या मित्रविनंत्या स्वीकारता येतील. पण ज्यांना माझे काही वाचण्यातही इंटरेस्ट नाही त्यांनी हे सहकार्य तरी का द्यावे हा एक प्रश्न आहेच ! तरीही, वेळात वेळ काढून हे सहकार्य द्यावे अशी मी या माझ्या न-वाचकांना विनंती करत आहे.
--- ००० ---

काही सुचवणे --
माझ्या ' नातं ' चा झूम प्रयोग पाहिल्यानंतर अशा प्रयोगासाठी माझ्या काही एकांकिका सुचवाव्यात असे वाटले --
१. ' साक्ष मावळत्या सूर्याची ' -- ही एकांकिका पुणे विद्यापीठाने पुरुषोत्तमला सादर केली होती. तेव्हा ती सर्वोत्तम प्रायोगिक एकांकिका ठरली होती. दिग्दर्शन विद्यासागर अध्यापकचे होते आणि कलाकार होते आनंद आलकुंटे आणि प्रगती गोसावी. ही एक अगदी वेगळ्या धाटणीची गंभीर एकांकिका आहे.
२. ' स्थळ दिवाणखाना ' हीच एकांकिका ' मन ' या नावाने दीर्घांकरूपातही आहे. हिचा एकच प्रयोग रवींद्र लाख्यांच्या दिग्दर्शनाखाली ' मनाचे शोक ' या नावाने झाला होता. खरे तर हे एकपात्री प्रकरण आहे, लाख्यांनी आणखी आही आजूबाजूची पात्रे घेतली होती. गंभीर प्रकार आहे. एकपात्रीच व्हायला हवा. हे जो समर्थपणे करेल त्याला नटसम्राट म्हणावे, असे मी म्हणत असतो.
३. ' संसाराणुपेंडघार ' या एकांकिकेला आय एन टी मध्ये सर्वोत्कृष्ट लेखनाचे पारितोषिक होते. प्रकाश बुद्धिसागरने दिग्दर्शन केले होते. या एकांकिकेबद्दल माझ्याशी चर्चा करण्यासाठी प्रकाश मुंबईहून, मी त्या वेळी जिथे होतो त्या नगर जिल्ह्यातल्या

वाळकी या गावी आला होता. संवाद आणि कृती यांत भेद ठेवून लिहिलेली ही मराठीतली एकमेव, म्हटले तर गंमतीची एकांकिका आहे.
४. ' वेषांतर ' या एकांकिकेचा समाधानकारक प्रयोग अजून झालेलाच नाही. एक गंभीर गंमत आहे. समोर जे चाललेय ते मान्य करत प्रेक्षकांनी पाहात जायचे. मजेदार गुंता तयार करणारी एकांकिका आहे.
-- झूम माध्यमासाठी उत्सुक कलाकारांनी वरील संहिता जरूर वाचून पाहाव्यात. हे सर्व माझ्या खालील संकेतस्थळावर फ्री उपलब्ध आहे --

Champra Deshpande
December 5 at 1:34 PM · Shared with Public
Public
**नातं**
मी ७५ साली लिहिलेला माझा ' नातं ' हा दीर्घांक बरेचजण मराठीतला एक अद्वितीय खास प्रकार मानतात. सर्वप्रथम हा दीर्घांक दूरदर्शन स्पर्धेत प्रकाश बुद्धिसागरच्या दिग्दर्शनाखाली सादर झाला. त्या स्पर्धेत ८५ स्पर्धकांतून याने पहिला नंबर मिळवला. नंतर, योगेश सोमणच्या दिग्दर्शनाखाली हा पुरुषोत्तममध्येही सादर झाला आणि करंडक प्राप्त करता झाला. प्रख्यात नट-दिग्दर्शक विनय आपटे, अनिरुद्ध खुटवड, इथले आपले मित्र प्रसन्न जी. कुलकर्णी, विजय पांचाळ आणि कुमार बडगुजर यांच्याही दिग्दर्शनांखाली याचे प्रयोग झाले होते.
काही दिवसांपूर्वी स्मिता पोतनीस या मुंबईच्या व्यक्तीने हा दीर्घांक झूम वर सादर करायची परवानगी मागितली. ही ' सृजन दि क्रियेशन्स ' नामक, ख्यातनाम दिग्दर्शक राजेश देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली चालणारी संस्था आहे. हे कसे काय होणार मला माहीत नव्हते. पण आज प्रत्यक्ष पाहून मी खुश झालो ! स्त्रिया दिग्दर्शक कमी आहेत म्हणून मी मुद्दाम उल्लेख करेन की स्मिता पोतनीस या दिग्दर्शिकेने हे सगळे उत्तम जमवून आणलेले आहे. संवाद नीट पोचणे हे यात महत्त्वाचे होते. रंगमंचावर उपलब्ध असणारी नेपथ्य, संगीत, प्रकाशयोजना आणि पूर्ण अभिनय ही आयुधे इथे उपलब्ध नव्हती. या कोव्हिड काळात माझा हा दीर्घांक अशा पद्धतीने सादर झाला आहे याचे मला समाधान आहे. जरा अवजड आहे -- मेंदूला दूधबीध पाजून निवांतपणे पाहायला हवा. या टीमने हे काम उत्तम केले आहे. त्या सर्वांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. याची लिंक खाली देतो आहे -- सवडीने शांतपणे बघा असे सुचवतो. लिंक -

Champra Deshpande
December 4 at 6:09 PM · Shared with Public
Public
‘ रंगवाचा ‘ दिवाळी २०२०.
प्रथम ‘ रंगवाचा ‘ चे मनःपूर्वक अभिनंदन ! या कोव्हिडच्या वातावरणात असा संग्राह्य मजकूराने गच्च भरलेला दिवाळी अंक काढणे ही साधी गोष्ट नाही. मजकूर तर दर्जेदार आहेच, शिवाय सादरीकरणही आकर्षक आणि बिनचूक आहे. संपादक मंडळ आणि सल्लागार मंडळ हे दोन्ही अनुभवी, सर्जक आणि कार्यक्षम असल्याशिवाय हे शक्यच नसते झाले. यातले ‘ अल्काझी स्मृती ‘ आणि ‘ पडझड आणि उभारी ‘ हे दोन विशेष विभाग खास उल्लेखनीय आहेत. अल्काझींबाबतचा विभाग

विशेषतः नाट्य अभ्यासकांसाठी खूपच उपयुक्त झालेला असून, ‘ पडझड ‘ हा विभाग या कोव्हिड काळात ठिकठिकाणी नाट्यकर्मी या संकटाचा कसा मुकाबला करत आहेत याची उत्तम माहिती देणारा आहे. एकूण अंकच उत्तम झालेला आहे, तरीही, मला कमलाकर सोनटक्के, सुप्रिया विनोद, दत्ता पाटील आणि अस्मित पाठारे यांचे लेख विशेष वाटले.
पूर्ण अंकावर तपशीलवार लिहिण्याचा इथे हेतू नाही. फक्त अल्काझी विभागावर थोडे लिहितोय. या विभागात बरेचसे, महती सांगणे, गुणगान करणे आणि आदर व्यक्त करणे हेच असणार हे मान्य असले तरी, प्रत्यक्ष शिक्षण देण्याची त्यांची पद्धत, नाटक बसवतानाचे त्यांचे काही उद्गार वा विचार आणि एकूणच त्यांची दिग्दर्शनाची पद्धत यांबाबत सलग माहिती यात कुठे मिळत नाही. मग, खुद्द अल्काझींच्याच एका भाषणाचा अनुवाद असलेला लेख या दृष्टीने अधिक महत्त्वाचा ठरतो. ‘ अभिनेत्याचे प्रशिक्षण ‘ या विषयावरचा हा लेख आहे. इथे त्यांचे सलग विचार मिळतील म्हणून आपण त्यावर लक्ष केंद्रित करतो. या लेखात अल्काझींनी बऱ्याच मुद्यांना स्पर्श केलेला आहे. त्यांतले काही पाहू –
१. भारतीय रंगभूमीची सध्याची अवस्था धूसर आहे – ना परंपरेची नीट जाणीव ना बाहेरील प्रभावांना नीट आपलेसे करून घेणे. विशेष प्रकारच्या कोणत्याही अभिनयाची मागणी करणारी एखादी ठोस व्यवस्थाच अस्तित्वात नाही. -- या गोष्टी अभिनय प्रशिक्षणातले अडथळे वा कमतरता आहेत का, असा इथे प्रश्न येतो.
२. रंगभूमीला जिवंत राहायचे असेल तर तिला आधुनिक असावे लागेल. म्हणजे काय हे इथे थोडे स्पष्ट व्हायला हवे. यशस्वी व्यावसायिक रंगभूमी अभिनेत्यांना भ्रमाधारित चुकीच्या कल्पना देते, असे पुढे एका ठिकाणी ते म्हणतात. म्हणजे ग्लॅमर मिळवणारा अभिनय हा उथळ वा चीप अभिनय का ? तो वेगळा म्हणजे कसा असतो ? आधुनिक असणे आणि भ्रमांनी प्रभावित नसणे – हे जरा अधिक स्पष्ट व्हायला हवे होते, असे वाटले.
३. अभिनयाच्या कोणत्याही शैलीला तिच्या परंपरेतील समकालात अभिनीत होण्याची पद्धत म्हणून स्वीकारले पाहिजे. हा मुद्दा स्पष्ट करताना ते म्हणतात की संस्कृत नाटकांची आता होणारी सादरीकरणे पाहून ते चिंतित होतात. पारंपरिक शैलीतली नाटके आजच्या वास्तववादी शैलीत सादर होणे हे त्यांना तुटकपणा निर्माण करणारे वाटते. ते पुढे असेही म्हणतात की जुन्या संस्कृत नाटकाच्या आशयाची मोडतोड न होता ते आजच्या भाषेत बोलले जायला हवे. हे दोन्ही एकत्र कळायला जरा अवघड जाते.
४. ते एक खूप चांगला मुद्दा मांडतात की अभिनयाच्या विद्यार्थ्याला आपला भवताल समजून घ्यायला तयार केले पाहिजे. पण ते कसे, एखाद्या विचारसरणीच्या वा तत्त्वज्ञानाच्या मदतीने की कसे ?
५. विद्यार्थ्याची एक प्रकारे कोरी पाटी असण्याला ते महत्त्व देतात. आणि शेवटी म्हणतात की ‘ उचित कलात्मक दृष्टिकोण ‘ असलेल्याच्या मार्गदर्शनाखाली अभिनय शिकवला जावा – आणि हेच ते अधिक क्लियर करतात – ‘ दृष्टिकोणाला चालना द्यायची आहे ‘ असे शब्द वापरले आहेत, ‘ दृष्टिकोण थोपवायचा आहे ‘ असे नाही.  मग एका दृष्टिकोणाला चालना मिळालेला अभिनेता म्हणजे काय, हे कळत नाही. असो.
-- या लेखातले बरेच मुद्दे तज्ज्ञांनी, प्रशिक्षकांनी, दिग्दर्शकांनी आणि खुद्द अभिनेत्यांनीही चर्चा करावी, असे आहेत. तशा चर्चेतून काही अंतिम निष्कर्ष निघावेत असे नाही पण या अशा चिंतनात अंतर्भूत असणाऱ्या सर्व बाजूंचे भान तरी त्यामुळे नक्कीच वाढू शकेल.
-- असा सर्वगुणसंपन्न दर्जेदार दिवाळी अंक काढल्याबद्दल कणकवलीच्या वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठानचे पुन्हा एकदा अभिनंदन आणि त्यांना नाट्यकर्मींतर्फे धन्यवाद !
--- ००० ---

Champra Deshpande
December 1 at 8:54 AM · Shared with Public

Public
व्हाटसप वर आलेली एखादी क्लिप कुणी पाहात/ऐकत असेल तर काही वेळी, लांबूनही, बोलणारा कोण आहे, विषय काय आहे, हे काहीही न समजताही, त्या बोलणाऱ्याला काय म्हणायचे आहे ते त्याच्या आवाजावरूनच कळते – " किती मूर्ख आणि नालायक हे लोक – इतकी साधी, सोपी गोष्ट यांना दिसत नाही ? राजकारण ठीक, पण किती ते ? ! जनतेचे, देशाचे किती हे नुकसान ! पुढच्या काही पिढ्या यात बरबाद होणार आहेत ! आणि आपले लोक हे चालवून कसे घेतात ? लोकांना त्यांचा स्वार्थ तरी कळतो का ? जात, धर्म, भाषा यांच्या पलिकडे कधी जाणार आपण ? आपण साधी माणुसकीही विसरत चाललो आहोत – संवेदनशीलता तर लांबच राहिली ! ही तर अतिसहिष्णुता झाली ! एक बाँब पडायला पाहिजे अशा लोकांवर ! आरामात मिळालेय स्वातंत्र्य आपल्याला, त्याचे हे परिणाम आहेत ! खूप हिंसेतून तावूनसुलाखून निघाल्याशिवाय देशाचे हित कळूच नाही शकत, हेच खरे ! बास झाली आता शांतता आणि अहिंसा – काय व्हायचे ते होऊ दे नुकसान ! नाही तरी कुणाला कशाचे काय पडलेय ! " – असले काहीतरी असणार, हे आवाजावरूनच कळते !
--- ००० ---

Champra Deshpande
November 28 at 11:56 AM · Shared with Public
Public
आज आमच्या बँकेतला आमचा एक अत्युत्तम सहकारी, मित्र आणि दिलखुलास माणूस गेला ! तो जिथे असेल तिथे मजा आणि आनंद असणार हे नक्की, असा माणूस ! अत्यंत हजरजबाबी आणि बँकेतली कामे आणि विशेषतः अधिकारी यांच्याबाबत मजेचे किस्से सांगण्यात एक नंबरचा तरबेज ! तेवढाच हुशार आणि अभ्यासू ! आमच्या ट्रेनिंग सेंटरला एकदा तो आम्हाला शिकवायलाही होता. अत्यंत रुक्ष विषय महा इंटरेस्टिंग कसा करावा, यात त्याचा हात धरणारा कुणी असूच नाही शकत. आणि त्याचे अद्वितीय वैशिष्ट्य म्हणजे त्याच्याकडे असणारा नॉन-व्हेज ज्योक्सचा महाप्रचंड खजिना ! एकदा आमच्या मुंबईतल्या ट्रेनिंग कॉलेजला आम्ही एकत्र होतो तेव्हा, रात्री जेवण झाल्यावर आम्हा पाचसहा मित्रांत सुमारे दोन तास तशा विनोदांची एक मैफलच त्याने गाजवली होती ! उत्साहाचा धबधबाच नुसता ! आम्हा खूप मित्रांना आज वाईट वाटले -- पण, गंमत म्हणजे, आपला मित्र गेल्यावर त्याचे मित्र हसत एकमेकांशी बोलताहेत, असे क्वचितच घडू शकते, ते आज घडले ! बेश्ट माणूस !
--- ००० ---

November 27 at 9:28 AM · Shared with Public
Public
सुमारे ५० पक्षी एकत्र घिरट्या घालतात -- उंची कमीजास्त होते, वेग कमीजास्त होतो, मार्ग थोडाफार बदलतो, अंतर थोडेफार बदलते -- तरीही, कधीही ते एकमेकांवर धडकलेयत, त्यामुळे एखादा खाली पडलाय, असे कधीच होत नाही ! -- त्यांच्या या उपजत बुद्धीचे रहस्य सापडले तर आपल्या रहदारीला शिस्त लावायला त्याचा उपयोग होऊ शकेल, असे वाटते.

आई कुठे काय करते

स्टार प्रवाहवरची ही मालिका आमच्या घरात रोज पाहिली जाते. मीही मधून मधून पाहात असे. सुरुवात सरधोपट वाटली होती. पण नंतर, पुढे पुढे या मालिकेतली समस्या स्पष्ट होत गेली. पारंपरिक समाजमान्य नीतिमत्तेच्या कल्पना आणि त्या एखाद्या व्यक्तीकडून न पाळल्या गेल्यामुळे काय काय होऊ शकते, वगैरे. अमुक एक मान्यताप्राप्त नमूनाच कसा योग्य, अशा प्रकारची मांडणी दिसते. उद्दिष्ट ठरलेले असल्याने या समस्येतले सर्व गुंताडे पाहणे इथे घडणार नाही आणि पात्रेही त्या उद्दिष्टाला पूरकच असणार, हेही ठीक. त्यावर इथे बोलायचेच नाहीय. मला यातले खास आवडतेय ते म्हणजे ( अर्थात या मालिकेचा साचा दुर्लक्षून ) मधुराणीचा अत्युत्कृष्ट असा संयत आणि समजुतदार अभिनय ! सर्व बारकावे समजून घेऊन त्यातला भावनिक आणि वैचारिक भाग ती उत्तम समतोल राखत व्यक्त करतेय ! तिच्याइतकीच मला इथे स्तुती करायचीय ती मुग्धा गोडबोलेची. अशा मालिकेत इतक्या समृद्ध संवादांची उपस्थिती चकित करणारी आहे ! आहे त्या सामुग्रीतले भूत-भविष्याचे, सर्व पात्रांचे, सर्व क्रियाप्रतिक्रियांचे आणि घडणाऱ्या घटनांबद्दलच्या विविध समजुतींचे फारच अर्थपूर्ण भान बाळगत ती संवाद लिहिते आहे. टीव्ही मालिकेत असे संवाद हा एक महासुखद अपवाद आहे !

बाकी सगळेच आपापली कामे छानच करताहेत आणि रवींद्र करमरकरांचे दिग्दर्शनही खास म्हणावे असे आहे, तरीही, मधुराणी आणि मुग्धा यांचे विशेष मनःपूर्वक अभिनंदन ! तुम्हा दोघींसाठी पाहतोय मी ही मालिका !

--- ००० ---

माझ्या नावाचे पात्र

एक तर मी शिक्षक नव्हतो आणि माझी चित्रकला कधीच चांगली नव्हती, त्यामुळे, एकूणात, साम्य शून्य ! पण, एक मजा ! -- AB & CD म्हणजे, अमिताभ बच्चन आणि चंद्रकांत देशपांडे -- हा मराठी चित्रपट आज सोनीवर पाहिला. त्यातला चंद्रकांत देशपांडे हा मेनरोल विक्रम गोखले यांनी केलेला आहे. एकूण माणसे ग्लॅमरला कशी हपापलेली असतात, या कल्पनेवर असलेला हा एक मजेदार चित्रपट आहे. मीही याचा जरा उपयोग केला -- एका कार्यक्रमात विक्रम गोखले अध्यक्ष होते आणि मी प्रमुख पाहुणा होतो, तेव्हा त्यांनी माझे भाषण ऐकलेले आहे, त्याचप्रमाणे, कोल्हापूरचा सागर तळाशिकर माझा मित्रच आहे, तसेच, सीमा देशमुख हिने माझ्या एका नाटकात काम केले होते आणि शिवाय एकाच सीनमध्ये चमक दाखवून गेलेला मिलिंद शिंत्रे हा तर माझा जुना मित्रच आहे -- हे सर्व मी माझ्या दोन नातींना सांगितले. शिवाय यालाच जोडून सुबोध भावे मला ओळखतो आणि ' आई कुठे काय करते ' मधली मधुराणीही मला ओळखते, हेही सांगितले ! आणि ललित प्रभाकरने तर ' ढोलताशे ' त कामच केले होते ! नाती म्हणाल्या, " आजोबा तुम्ही ग्रेट आहात ! " यावर मी म्हणालो, " मी ग्रेट आहे, हे बरोबर आहे, पण का, कशामुळे, हे परीक्षाबिरीक्षा या जंजाळातून बाहेर पडल्यावर समजून घ्या ! " चार प्रायोगिक नाटके आणि काही कविता, हे लेखन -- तेही कुणाला फारसे माहीत नसलेले -- हे आपले कर्तृत्व -- याची जाणीव असतेच हो, उगीच एक आपली गंमत !

--- ००० ---

माझे कवितांचे अनुसर्जन

१. जागतिक कवितेचा प्रानिधिक संग्रह करावा असे मुळीच मनात नाही. मला आवडलेल्या, विशेषतः अलिकडच्या काळातल्या कविता घेतो आहे. मी ना विद्वान आहे ना शिस्तबद्ध अभ्यासक. काही कवी चांगले असूनही खूप संदर्भमयतेमुळे मला पोचले नाहीत, असे होणे शक्य आहे. ते सोडून दिलेले आहेत.

२. हे काम गुणदोषयुक्तच असणार आहे याची मला जाणीव आहे. अर्थ वा आशय पकडण्यावर लक्ष ठेवायचे आणि भाषेतही स्मूथ पोहायचे हे काम अवघडच आहे. या सर्कसकामात काही ठिकाणी ओबडधोबडपणा येऊ शकतो.

३. कवीचे चरित्र वा त्याचे पूर्ण लेखन यांचा अभ्यास मी करत नाही. पुरेशी माहिती पाहून आवडलेल्या कवितांचे काम सुरू करतो. कवितेची प्रक्रिया थोडीफार मला समजते या विश्वासावर मी हे काम करतो.
४. कवीची सामाजिक, राजकीय, धार्मिक मते काय होती, याला मी महत्त्व देत नाही. कलेची प्रक्रिया जेव्हा निष्ठेने घडत असते तेव्हा ती मताबितांना बांधील राहात नाही. जगण्याचे सर्वांगीण दर्शन ती घडवते. कुणी हिंदू धर्माच्या विरुद्ध बोलले होते वा कुणी कम्युनिस्ट होते याबाबतचे आकस मी बाळगत नाही. ग्रेट कला ही शेवटी सर्व मतमतांतरांना ओलांडणारी असते आणि एकूण माणसाचे एकत्र जगणे महत्त्वाचे मानणारी असते, असे मला दिसते.
५. आपल्याकडे जसे जातिनिहाय, प्रांतनिहाय, भाषानिहाय प्रतिनिधित्व देण्याची पद्धत असते तसे इथे काही होणार नाही.
६. जगातल्या काही महान कवींच्या आणि काही वैशिष्ट्यपूर्ण कवींच्या कविता मराठीत आणाव्यात, एवढाच हेतू आहे. कवितेबाबतच्या आपल्या अपेक्षा आणि कल्पना अधिक उदार व्हाव्यात, हाही एक हेतू आहे.
७. एखादा कवी गंभीरपणे काही करत असेल तर ते समजून घेण्याकडे कल असणे महत्त्वाचे आहे. आपल्या चाकोरीबद्ध विचारांत ते बसत नाही म्हणून आकस, पूर्वग्रह, उपरोध आणि हेटाळणी यांचा तुरंत वापर सुरू करणे हा मूर्खपणा आहे, हे ज्ञान प्रसृत करणे हाही एक छुपा हेतू आहे.
--- ००० ---

22 oct 2020

फेसबुकचे बदलते स्वरूप

फेसबुकवरचे कार्यकलाप खूप बिघडलेले आहेत. सगळे अत्यंत स्लो झालेले आहे. जुन्या ढाच्यात आपल्या पोस्ट व कॉमेंटस तारीखवार, सालवार एकत्र मिळत होत्या. सेव्ह करायला ते आवश्यक होते. ती सोय काढलेली दिसतेय. आपण एक सर्च द्यावा तर भलतेच काही समोर येतेय. आपला आपण समजून उमजून इथे वेळ घालवणे वेगळे आणि या तांत्रिक दोषांमुळे वेळ वाया जाणे वेगळे. इथे होत असलेले बदल इथल्या खातेदारांच्या सोयीचे तर दिसत नाहीयत, मग, कशासाठी, कुणासाठी चाललेय हे सगळे ?

संगणकायन

काल अनुवादाचे एक काम करता करता सध्याची चालू कवितांची फाईल उडाली. तिचे एकच कोरे पान राहिले आणि मजकूर उडाला. मग एका तज्ञ माणसाकडे ते प्रकरण गेले. यात काही करता येणार नाही, असे त्याने सांगितले. नेहमी मी अशी चालू फाईलही थोड्या थोड्या दिवसांनी पेनड्राईव्हवर घेऊन ठेवत असतो. ते काम राहून गेले होते. १९० पाने होती ! अब तेरा क्या होगा कालिया, अशी अवस्था आली. सुदैवाने सर्व कविता मी एफबीवर देत गेलेलो असल्याने त्या फाईलची पुनर्रचना करणे शक्य होते. पण, कालपासूनच एफबीचा नवा रागरंग सुरू झाला आहे. त्यात माय पोस्ट विभागात कविता सरळ गद्य रूपात येतात, ओळी रूपात येत नाहीत. पूर्वी ओळी नीट येत असत. मग, टाईमलाईनवरून एकेक कविता कॉपी-पेस्ट करत त्या फाईलची पुनर्रचना पूर्ण केली. काल तीनचार तास केलेले काम मात्र वाया गेले. आपली बुडालेली एक वही एफबीच्या सागरातून तरंगून वर आली आणि आपल्याला परत मिळाली, या आनंदात कालचा दिवस संपवला
--- ००० ---

" दर्शन मिळू शकत नसल्याने त्यांना परत परतावे लागले " !

' सुसाट ' या उत्तम नाटकाचा लेखक प्रिय मित्र अजित तात्याबा देशमुख यांनी दिलेली दि ग्रेट पोस्ट ! हा खरा धर्म --

Image may contain: 1 person

Deshmukh Ajit Tatyaba

October 17 at 9:46 AM •

स्पिनोझा यांचा देव.

(स्पिनोझा लिहितात की): देव असे म्हणेल कीः

माझी प्रार्थना करणे थांबवा.

माझी अशी इच्छा आहे की, तुम्ही बाहेरच्या जगात जावे आणि आपल्या जीवनाचा आनंद घ्यावा.

माझी अशी इच्छा आहे की, तुम्ही गायन करावे, मजा करावी आणि मी तुझ्यासाठी तयार केलेल्या प्रत्येक गोष्टीचा आनंद घ्यावा.

माझे(देवाचे) तथाकथित घर म्हणून तुम्ही स्वत:च निर्माण केलेल्या त्या काळोख्या, थंड प्रार्थस्थळांमध्ये जाणे बंद करावे.

माझे(देवाचे) घर पर्वत, जंगलात, नद्या, तलाव, समुद्रकिनारे येथे आहे. मी तिथेच राहतो आणि मी तुमच्याबद्दल असलेले माझे प्रेम तिथेच व्यक्त करतो.

तुमच्या दयनीय जीवनासाठी मला दोष देणे थांबवावे.

मी तुम्हाला कधीही सांगितले नाही...

की तुमच्या मध्ये काही न्यून आहे,

की तुम्ही एक पापी आहात,

किंवा तुमच्या लैंगिकतेमध्ये काही वाईट आहे.

लैंगिकता(सेक्स) ही एक भेट आहे,

जी मी तुम्हाला दिली आहे.

लैंगिकतेद्वारे तुम्ही तुमचे प्रेम, परमोच्च सुख, तुमचा आनंद व्यक्त करू शकता.

त्यामुळे त्यांनी(अब्राहामिक धर्ममार्तंड यांनी) माझ्या नावे तुम्हाला ज्या ज्या गोष्टी पटवल्या, त्या त्या प्रत्येक गोष्टीसाठी मला दोष देऊ नका.

माझ्याशी काही देणे-घेणे नसलेल्या त्या तथाकथित 'पवित्र ग्रंथांचे' वाचण करणे थांबवा.

जर तुम्ही मला सूर्योदयांत, निसर्गदृष्यांत, आपल्या मित्रांच्या नजरेत, आपल्या मुलाच्या नजरेत पाहू शकत नसाल तर...

तुम्ही मला कोणत्याही ग्रंथांमध्ये पाहू शकणार नाही.

"हे देवा, मी माझे काम कसे करावे ते मला सांगशील का?"... असे तुम्ही मला विचारणे थांबवा.

मला घाबरु नका.

मी तुमचा न्याय करणार नाही.

मी तुमच्यावर टीका करणार नाही.

मी तुम्हाला रागावणार नाही

किंवा मी तुम्हाला त्रास देणार नाही.

माझं प्रेम शुद्ध आहे.

माझी क्षमा मागणे थांबवा.

क्षमा करण्यासारखे काहीही नाही.

जर मीच तुम्हाला निर्माण केले आहे...

तर मीच तुमच्या मध्ये आवड, मर्यादा, आनंद, भावना, गरजा, विसंगती... निर्माण केली आहे आणि मीच तुम्हाला मुक्त स्वातंत्र्येच्छा दिली आहे.

मी तुम्हाला जे काही देऊन ठेवले आहे, त्याला जर तुम्ही प्रतिसाद दिला, तर मीच तुम्हाला दोष कसे देऊ?
तुम्ही ज्या प्रकारची माणसे आहात त्या बद्दल मी तुम्हाला कशी शिक्षा करू? जेंव्हा मीच तुमचा निर्माता आहे.
तुम्हाला खरंच असं वाटतं की, वाईट वागणाऱ्या माझ्या सर्व मुलांना अनंत काळापर्यंत जाळण्यासाठी मी जागा तयार करू शकेन? कोणत्या प्रकारचा देव असे करू शकेल?
आपल्या आजूबाजूच्या लोकांचा आदर करा आणि तुमच्या बाबतीत जे घडू नये असे तुम्हाला वाटते, ते तुम्ही देखील करू नका.
मी एवढेच सांगतो की तुम्ही तुमच्या आयुष्याकडे लक्ष दिले पाहिजे.
तुमची सतर्कता हीच तुमची मार्गदर्शक आहे.
माझ्या प्रिय बाळांनो,
हे जीवन म्हणजे काही एखादी परीक्षा नव्हे,
कोणत्यातरी वाटेवर पडणारे एखादे पाऊल नव्हे,
एखादी तालीम नव्हे,
किंवा स्वर्गाची वा नंदनवनाची पूर्वावस्था नव्हे.
या ठिकाणी आणि या क्षणी अस्तित्वात असलेली एकमेव गोष्ट म्हणजे 'हे जीवन' आणि तेव्हढेच तुम्हाला आवश्यक आहे.
मी तुम्हाला पूर्णपणे मुक्त केले आहे.
बक्षिसे किंवा शिक्षा नाही,
पाप किंवा पुण्य नाही,
कोणावरही कोणत्याही खाणाखुणा दिलेल्या नाहित,
कोणीही कोणाची दैनंदिनी लिहीन ठेवत नाही आहे,
तुम्ही तुमचे आयुष्य निर्माण करण्यास पूर्णपणे मुक्त आहात.
आयुष्यात स्वर्ग निर्माण करा किंवा नरक निर्माण करा.
या जीवनानंतर काही आहे की नाही, हे मी तुम्हाला सांगू शकत नाही.
परंतु मी तुम्हाला एक टिप देऊ शकतो.
या जीवना नंतर पुढे काहीही नाही आहे असे म्हणून जगा.
जणू आनंद घेण्याची, प्रेम करण्याची, अस्तित्वात असण्याची ही तुमची एकमेव संधी आहे.
म्हणजे समजा, जीवना नंतर काहीही नसले तरी,
मी तुम्हाला दिलेल्या संधीचा तुम्ही आनंद घेतलेलाच असेल.
आणि समजा, जीवना नंतर तेथे काहीतरी असले तरी,
याची खात्री बाळगा की मी तुम्हाला हे विचारणार नाही की तुम्ही योग्य वर्तन केले किंवा चुकीचे वर्तन केले?
मी एव्हढेच विचारेल की
तुम्हाला जीवन आवडले का?
तुम्हाला आनंद मिळाला का?
तुम्ही सर्वात जास्त काय मजा केली?
तुम्ही काय शिकला?
माझ्यावर विश्वास ठेवणे थांबवा.
विश्वास ठेवणे म्हणजे अंदाज लावणे, अनुमान काढणे, कल्पना करणे होय.
तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवावा अशी माझी इच्छा नाही. तुम्ही तुमच्यावर विश्वास ठेवावा अशी माझी इच्छा आहे.

जेंव्हा तुम्ही तुमच्या प्रिय व्यक्तीचे चुंबन घेता,
जेंव्हा तुम्ही तुमच्या लहान मुलीला छातीशी कवटाळता,
जेंव्हा तुम्ही तुमच्या कुत्रीला सांभाळत समुद्रात आंघोळ करता,
तेंव्हा तुमच्या स्वतःत तुम्ही मला पहावे अशी माझी इच्छा आहे.
माझी स्तुती करणे थांबवा, तुम्हाला मी कोणत्या तरी प्रकारचा अहंमानीक देव आहे असे वाटते का?
प्रशंसा ऐकून मी कंटाळलो आहे.
धन्यवाद स्वीकारून मी थकलो आहे.
तुम्हाला कृतज्ञ वाटत आहे?
मग तुमच्या स्वतःची काळजी घेऊन,
तुमच्या आरोग्याची काळजी घेऊन,
तुमच्या नातेसंबंधांची काळजी घेऊन,
जगाची काळजी घेऊन ते सिद्ध करा.
आपला आनंद व्यक्त करा.
माझी स्तुती करण्याचा हाच मार्ग आहे.
(अब्राहामिक धर्ममार्तंड यांनी) माझ्याबद्दल जे काही शिकवले आहे, त्या गोष्टींची गुंतागुंत करणे आणि पोपटपंची करून पुन्हा पुन्हा सांगणे थांबवा.
आपल्याला एव्हडया चमत्कारांची आवश्यकता का आहे? आणि इतके स्पष्टीकरण कशासाठी?
फक्त एकच एक गोष्ट खरी आहे ती म्हणजे,
तुम्ही येथे आहात,
तुम्ही जिवंत आहात,
आणि हे जग आश्चर्यांनी भरलेले आहे.
- स्पिनोझा
'बार्च दे स्पिनोझा' हे डच तत्वज्ञ होते.
17 व्या शतकातील तत्वज्ञानविश्वात डेस्कार्ट्स इत्यादी तर्कज्ञां बरोबरीचे स्थान स्पिनोझा यांना आहे.
जेव्हा अलबर्ट आइन्स्टाईन हे अमेरिकेतील विद्यापीठांमध्ये व्याख्याने देत असत, तेव्हा त्यांना विद्यार्थ्यांकडून एक प्रश्न वारंवार विचारला हात असे.
- तुमचा देवावर विश्वास आहे का?
आणि आइन्स्टाईन नेहमी उत्तर देत असत की,
- मी 'स्पिनोझाच्या देवा'वर विश्वास ठेवतो.

घट्ट, रुतलेल्या नीतिकल्पनांचे उदात्तीकरण आणि प्रचार करणे हे कलेचे एक महत्त्वाचे काम प्रत्येक काळात चालू असते -- तशा एखाद्या मालिकेच्या प्रेक्षकाची ही कविता -- तीन वर्षांपूर्वीची आहे पण आणखी शंभर वर्षांनंतरही ही अशीच फ्रेश असेल --

3 Years Ago
See Your Memories

Champra Deshpande
October 17, 2017 •
Shared with Public
Public
मी तुला अनेकदा सांगितले
मला तुझे आयुष्य जगायचे नाहीय
माझेच ठीक आहे ते कसेही
असले तरी बारा गावचे निरर्थक
तुझे पॉश संताप मला झेपणार नाहीत
लघवीच्या जागा ठरलेल्या
असण्याची मला सवय नाहीय
हेवा वाटतोच मला नो डाऊट तुझा
तुझे कपडे पाहूनही माझे विचार
एक तर थरथरतात किंवा गारठतात
नेमका त्याच वेळी तू सिगरेट ओढत
असलास तरी मला ती ऊब नाही मिळत
इतक्या प्रेयस्या असणे म्हणजे
किती ही प्रतारणा असे विचार
करत मी मत्सरग्रस्त होतो
जरी मी स्त्रियांचीच बाजू घेऊन
तुझ्याच हातात निखारे ठेवायला
उत्सुक असतो
चांगले वागणे म्हणजे काय
हे माझे ठरलेले असले तरी
त्याविरुद्ध वागायला माझी ना नसते
पण गुप्त राहायला हवी माझी टूथपेस्ट
तुझ्या ऐवजी मी असणे मला चालू शकेल
--- ००० ---

■ 'काळोखाच्या कविता' – नामदेव कोळी
वर्णमुद्रा पब्लिशर्स
□ या कवितांतला अनुभवाचा परिसर म्हणजे शेतमजुराचे आणि त्याच्या कुटुंबाचे जगणे. त्यातला काच, अन्याय, अभाव आणि अनेक दुःखांचे सततचे सान्निध्य. ही तर विद्रोही कवितांचीच भूमी. इतक्या अभावग्रस्त जगण्यात कसली कला आणि कसली संस्कृती? आणि असे वाटणे अर्थात योग्यच आहे. मनात सतत एक अन्याय सहन करत असल्याची भावना असल्यावर क्रोध आणि विद्रोह येणारच. याच कल्पनेने हा संग्रह वाचू लागलो तर वेगळेच लक्षात येऊ लागले. मुख्य म्हणजे या विद्रोहाच्या कविता नाहीत. यांत आक्रस्ताळेपणा, संघर्षमयता, काही समूहांना वा एकूण समाजालाच शत्रू समजणे, असे काही जाणवत नाही. त्यामुळे या कविता अधिक मोठ्या वाचकवर्गाला पोचतील आणि या जगण्याबाबतची सार्वत्रिक

संवेदनशीलता वाढवतील, असे मला वाटते. विद्रोहाइतकाच प्रभावी असा हाही एक मार्ग आहे परिवर्तनाचा. या कवितांची कुवत आणि आवाका अधोरेखित करणारी पान ७१ वरची ही कविता, 'तुमचं मन' मला विशेष लक्षणीय वाटली. ती अशी आहे –

● तुमचं मन

तुम्ही आदळले जाता जिवंत सापळ्यांवर
आत-बाहेरून होत जाता खिळखिळे
तुमचा देहही हाती लागेल अंत्यविधीसाठी
याची नाहीये कुठलीच शाश्वती
तुम्ही करू शकत नाही प्रेम कुणावर
नपुंसकत्व वाढत जातं भयाण वेगानं
कुणाकडून प्रेमाची अपेक्षाही ठेवणं व्यर्थ
तुम्ही निगराणीत असता छुप्या डोळ्यांच्या
तुमची कैद भोगत असता तुम्ही निमूटपणे
तुमची हालचाल राहात नाही नैसर्गिक
तुम्ही बनत जाता मशीन
जिची सूत्रं असतात तिसऱ्याच हाती
अन मेंदूतली तबकडीही
घासून घासून होत जाते रिकामी
तुम्ही कुठे बोलू शकता पूर्वीसारखं
तुमची बोलती बंद झालेली गोंगाटात
तुमचं मनही नसतं आसपास
ते तर पोखरत असतं भूतकाळ
भटकत राहतं राना-वनात
जाऊन बसतं डोहाच्या खोल तळाशी

○○○

- ही कविता एक प्रकारच्या दूरीभावातून लिहिली गेलेली आहे. जगण्यातल्या स्वातंत्र्याचा पूर्ण नाश हा प्रत्येक वाचकाला पोचावा इतक्या बारकाईने आणि तीव्रतेने इथे व्यक्त झालेला आहे. 'तुमची हालचाल राहात नाही नैसर्गिक' ही तर जबरदस्त अर्थवत्तेची ओळ आहे. या कवितेला कलात्मकतेचे वा अर्थसंपृक्ततेचे वावडे नाही. अशा गोळीबंद अभिव्यक्ती या संग्रहात अनेक ठिकाणी आहेत. सुखाचे मरण ( पान २२ ), 'तिला अंगवळणी पडला / इथला मोहमयी बंदिवास' ( २९ ), 'खरं तर तोंडपाठ आहे त्याला अख्खं जंगल' ( ३९ ), ' स्वतःमध्येच मेलेला' ( ४१ ), 'बापाला घरोबा सोडायचा नव्हता / आणि पाटलाला माझ्यातला मजूर' ( ४७ ), 'जिंदगीची माटी झालेल्या / या मातकट चेहऱ्याच्या बाया' ( ४८ ), 'शहरातल्या सरकारी दवाखान्यात भरती झालंय गाव' ( ५५ ), 'ती कविता शहरात हरवलेल्या दिवसांत वाचलीय' ( ७० ), अशा संपृक्त अभिव्यक्ती अनेक ठिकाणी आहेत.

□ या कवितेत सामूहिकतेचा आक्रोश नसून एकाकीपणाचे जडत्व आहे. या कवीने अभिव्यक्तीचा हा त्याचा स्वाभाविक मार्ग निवडणे हे खरोखरच काहीसे स्तिमित करणारे आहे. ही ग्रामीण, दलित, विद्रोही अशा कोणत्याही विभागवारीतली कविता नाही. माणसाचे अन्यायग्रस्त जगणे, माणसाच्या जगण्यातली परतंत्रता यांची ही कविता आहे. इथे नुसते तपशील महत्त्वाचे राहात नाहीत. त्यामुळे, या कवितेला एक सार्वत्रिकतेचा आयाम प्राप्त होतो.

□ डॉ. भरतसिंग पाटील यांचे प्रास्ताविक आणि दा. गो. काळे यांचे अंतपान दोन्ही अतिशय समर्पक आहेत. खास विद्रोहाच्याच म्हणाव्या अशा भूमीतून हे एक वेगळेच झाड उगवून यावे ही मराठीच्या दृष्टीने एक लक्षवेधी घटना आहे.
■■
Champra Deshpande□

‘ काळोखाच्या कविता ‘ – नामदेव कोळी – वर्णमुद्रा प्रकाशन.
या कवितांतला अनुभवाचा परिसर म्हणजे शेतमजुराचे आणि त्याच्या कुटुंबाचे जगणे. त्यातला काच, अन्याय, अभाव आणि अनेक दुःखांचे सततचे सान्निध्य.  ही तर विद्रोही कवितांचीच भूमी. इतक्या अभावग्रस्त जगण्यात कसली कला आणि कसली संस्कृती ? आणि असे वाटणे अर्थात योग्यच आहे. मनात सतत एक अन्याय सहन करत असल्याची भावना असल्यावर क्रोध आणि विद्रोह येणारच. याच कल्पनेने हा संग्रह वाचू लागलो तर वेगळेच लक्षात येऊ लागले. मुख्य म्हणजे या विद्रोहाच्या कविता नाहीत. यांत आक्रस्ताळेपणा, संघर्षमयता, काही समूहांना वा एकूण समाजालाच शत्रू समजणे, असे काही जाणवत नाही. त्यामुळे या कविता अधिक मोठ्या वाचकवर्गाला पोचतील आणि या जगण्याबाबतची सार्वत्रिक संवेदनशीलता वाढवतील, असे मला वाटते. विद्रोहाइतकाच प्रभावी असा हाही एक मार्ग आहे परिवर्तनाचा. या कवितांची कुवत आणि आवाका अधोरेखित करणारी पान ७१ वरची ही कविता, ‘ तुमचं मन ‘ मला विशेष लक्षणीय वाटली. ती अशी आहे –

तुमचं मन
तुम्ही आदळले जाता जिवंत सापळ्यांवर
आत-बाहेरून होत जाता खिळखिळे
तुमचा देहही हाती लागेल अंत्यविधीसाठी
याची नाहीये कुठलीच शाश्वती
तुम्ही करू शकत नाही प्रेम कुणावर
नपुंसकत्व वाढत जातं भयाण वेगानं
कुणाकडून प्रेमाची अपेक्षाही ठेवणं व्यर्थ
तुम्ही निगराणीत असता छुप्या डोळ्यांच्या
तुमची कैद भोगत असता तुम्ही निमूटपणे
तुमची हालचाल राहात नाही नैसर्गिक
तुम्ही बनत जाता मशीन
जिची सूत्रं असतात तिसऱ्याच हाती
अन मेंदूतली तबकडीही
घासून घासून होत जाते रिकामी
तुम्ही कुठे बोलू शकता पूर्वीसारखं
तुमची बोलती बंद झालेली गोंगाटात
तुमचं मनही नसतं आसपास
ते तर पोखरत असतं भूतकाळ
भटकत राहतं राना-वनात
जाऊन बसतं डोहाच्या खोल तळाशी

-- ही कविता एक प्रकारच्या दूरीभावातून लिहिली गेलेली आहे. जगण्यातल्या स्वातंत्र्याचा पूर्ण नाश हा प्रत्येक वाचकाला पोचावा इतक्या बारकाईने आणि तीव्रतेने इथे व्यक्त झालेला आहे. ‘ तुमची हालचाल राहात नाही नैसर्गिक ‘ ही तर जबरदस्त अर्थवत्तेची ओळ आहे. या कवितेला कलात्मकतेचे वा अर्थसंपृक्ततेचे वावडे नाही. अशा गोळीबंद अभिव्यक्ती या संग्रहात अनेक ठिकाणी आहेत. सुखाचे मरण ( पान २२ ), ‘ तिला अंगवळणी पडला / इथला मोहमयी बंदिवास ‘ ( २९ ), ‘ खरं तर तोंडपाठ आहे त्याला अख्खं जंगल ‘ ( ३९ ), ‘ स्वतःमध्येच मेलेला ‘ ( ४१ ), ‘ बापाला घरोबा सोडायचा नव्हता / आणि पाटलाला माझ्यातला मजूर ‘ ( ४७ ), ‘ जिंदगीची माटी झालेल्या / या मातकट चेहऱ्याच्या बाया ‘ ( ४८ ), ‘ शहरातल्या सरकारी दवाखान्यात भरती झालंय गाव ‘ ( ५५ ), ‘ ती कविता शहरात हरवलेल्या दिवसांत वाचलीय ‘ ( ७० ), अशा संपृक्त अभिव्यक्ती अनेक ठिकाणी आहेत.
या कवितेत सामूहिकतेचा आक्रोश नसून एकाकीपणाचे जडत्व आहे. या कवीने अभिव्यक्तीचा हा त्याचा स्वाभाविक मार्ग निवडणे हे खरोखरच काहीसे स्तिमित करणारे आहे. ही ग्रामीण, दलित, विद्रोही अशा कोणत्याही विभागवारीतली कविता नाही. माणसाचे अन्यायग्रस्त जगणे, माणसाच्या जगण्यातली परतंत्रता यांची ही कविता आहे. इथे नुसते तपशील महत्त्वाचे राहात नाहीत. त्यामुळे, या कवितेला एक सार्वत्रिकतेचा आयाम प्राप्त होतो.
डॉ. भरतसिंग पाटील यांचे प्रास्ताविक आणि दा. गो. काळे यांचे अंतपान दोन्ही अतिशय समर्पक आहेत. खास विद्रोहाच्याच म्हणाव्या अशा भूमीतून हे एक वेगळेच झाड उगवून यावे ही मराठीच्या दृष्टीने एक लक्षवेधी घटना आहे.
--- ००० ---

गेला काही काळ मी मधून मधून परभाषिक कवितांचे मराठीत अनुवाद करतो आहे. त्या कामाबद्दलची एक पोस्ट मी आधी दिली होती. त्यात आणखी काही मुद्यांची भर घालावी असे वाटल्याने, आता पुन्हा, त्या मूळ पोस्टसह वाढीव मजकूर खाली देत आहे --

माझे परभाषिक कवितांचे अनुवाद

गेल्या काही वर्षांत मी मधून मधून मला आवडलेल्या वा काही कारणाने विशेष वाटलेल्या अशा परभाषिक कवितांचे अनुवाद करत आलेलो आहे. ज्या कविता मुळात इंग्रजीतूनच लिहिल्या गेल्या आहेत त्यांचा त्या मूळ रूपांतून आणि ज्या अन्यभाषिक कवितांचे इंग्रजीत अनुवाद उपलब्ध आहेत त्यांचे त्या अनुवादांवरून असे मी अनुवाद केलेले आहेत. या प्रक्रियेत अनेक प्रश्न असतात, जसे की मूळ इंग्रजीत असलेली कविता तरी मला कितपत समजलेली आहे इथपासून ते मी अनुवादाला घेतलेला अनुवाद कितपत विश्वासार्ह आहे, इथपर्यंतचे, असे अनेक प्रश्न असतात. मुळात लिखित कविता हीच प्रत्यक्ष सत्य नसून सत्याची अभिव्यक्ती असते असे म्हटले तर ती मूळ कविता हाच सत्याचा पहिला अपलाप असतो. तिचा अनुवाद हा दुसरा अपलाप म्हटला तर अनुवादाचा अनुवाद हा तिसरा अपलाप म्हणावा लागतो. तर, सारांशाने मी कोणत्याही कवितेचा दुसरा वा तिसरा अपलाप करत असतो.

हे अनुवाद करावेतच कशासाठी मुळात, असा एक प्रश्न अनेकांच्या मनात येऊ शकतो. इथल्या मातीतली कला वगैरे बडेजाव माजवणारे आपण लोक आहोत. इथली माती म्हणजे काय ? फक्त शेतकरी, शेतमजूर, दलित वा कामगार यांच्या जगण्याचे वास्तव ? तसे म्हणता येत नाही. कुणाचेही कोणतेही अनुभव कलेची सामुग्री होऊ शकतात. त्यामुळे, इथली माती म्हणजे कुणाच्याही मनाची कोणतीही माती, हे आधी लक्षात घ्यायला हवे. मराठी भाषिक कवींचीही एकमेकांची माती वेगवेगळीच असते. परमातीच असते. तरीही एकमेकांच्या कविता थोड्याफार, अपलाप होत का असे ना, एकमेकांपर्यंत पोचू शकतात. लकबी, सवयी, चालीरीती, श्रद्धा, नीतिकल्पना, आदर्श, अस्मिता हे सगळे जरी वेगवेगळे असले तरी – सुख, दुःख, मानापमान, प्रेम, असूया, हेवा, सूड, महत्त्वाकांक्षा, वर्चस्वाची इच्छा अशी ही माती सगळीकडे जगभर सर्व माणसांत तीच -- एकच असते. त्यामुळेच तर कलेतून होणारी अभिव्यक्ती आणि संपर्क हे सर्वच माणसांना प्रस्तुत असू शकतात.

काहीजणांना वाटते की त्या त्या संस्कृतीत आपापले कलाशास्त्र, साहित्यशास्त्र असते आणि ती परंपरा जपत, विकसित करतच सर्वांनी चालले पाहिजे. मला ही धारणा मूर्खपणाची वाटते. ही धारणा मातीच्या वेगवेगळेपणाला महत्त्व देणारी असून तिच्यातल्या समावेशकतेकडे दुर्लक्ष करणारी आणि म्हणून संकुचित आहे. कोणत्याही कलेचा अनेकांशी संपर्क होतो तो मातीच्या वेगळेपणामुळे नव्हे तर तिच्यातल्या समानतेमुळे, समावेशकतेमुळे, हे लक्षात घ्यायला हवे. अशा या आकलनामुळेच, परभाषेतल्या कलाकृती अनुवादित होणे मला आवश्यक, महत्त्वाचे आणि समर्थनीय वाटते. जगातल्या कोणत्याही साहित्यविचारप्रणाली मला महत्त्वाच्याच वाटतात.

याच कारणामुळे अनुवाद हा नुसताच शाब्दिक प्रक्रियेबरोबर जाणारा वा नुसताच शाब्दिक असून चालत नाही. अनुवादकाची आकलनप्रक्रिया ही त्या कवितेच्या समावेशकतेकडे लक्ष देणारी असावी लागते. अनुवादकाच्या आकलनाला अशी एकसंधतेची पार्श्वभूमी नसेल तर तो अनुवाद नुसताच शाब्दिक, तुकड्यातुकड्यांचा, ओबडधोबड आणि मूळ कलाकृतीला ठार करणाराच होईल. त्यामुळे, अनुवादाला घेतलेल्या कवितेत आकलनाच्या या एकसंधतेचे दर्शन अनुवादकाला झालेले असणे महत्त्वाचे ठरते. अनुवाद करताना अनेक पर्यायी शब्दरूपे सुचत असतात, त्यांतले नेमके शब्दरूप निवडताना वा काही वेळी नव्याने घडवतानाही ती आकलनाची एकसंध प्रक्रियाच अबाधित राहायला हवी, अशीच योजना स्वीकारावी लागते. या एकूण दृष्टिकोणामुळेच मी असे म्हणतो की उदाहरणार्थ समजा एका फ्रेंच कवितेच्या इंग्रजीतल्या अनुवादावरून मी मराठी अनुवाद केलेला असला तरीही त्या इंग्रजी रूपापेक्षा माझा मराठी अनुवाद हा मूळ कवितेशी अधिक निष्ठावान असू शकतो. आणि त्याच्याही पुढे जाऊन मी असेही म्हणेन की मूळ कवितेतले पहिले अपलापत्व कमी झाल्यामुळे माझा मराठी अनुवाद हा मूळ कवितेहूनही अधिक सकस व सशक्त झालेला असू शकतो. यात कुणाचा मानापमान वा श्रेष्ठकनिष्ठत्व नसून या प्रक्रियेचेच ते वैशिष्ट्य असते. हे सर्व लक्षात घेता अनुवादाला नवनिर्मितीचेच महत्त्व द्यायला हवे, असे मला वाटते. या सर्व प्रक्रियेत व्यक्तिमाहात्म्य वा विभूतिमत्व हे महत्त्वाचे नसून कवितेचा आशय म्हणजे त्यात अंतर्भूत असलेली जगण्याचे भान घेण्याची प्रक्रियाच महत्त्वाची असते, असे मला म्हणायचे आहे.

माझी माती, माझी भाषा, माझी संस्कृती, माझ्या विचारपद्धती, सवयी, लकबी, कल्पना, आदर्श, चालीरीती वगैरे हेच जगात सर्वोच्च महत्त्वाचे असते, असे मी समजत नाही. या बाबींमधील भेदांमुळे एकमेकांच्या कविता समजण्यात येणाऱ्या व्यावहारिक अडचणी वा अडथळे मान्य असले तरी. जगातले कोणतेही कवी मी त्याच आत्मीयतेने वाचू शकतो ज्या आत्मीयतेने मी आरती प्रभू वा गुरुनाथ धुरी वाचेन. आणि इंटरनेटमुळे प्रचंड खजिनेच आपल्यासाठी खुले आहेत ! मी लहर लागली तर, आज रशियातले वा इंग्लंडमधले वा फ्रान्समधले कवी काय लिहिताहेत, हे पाहात बसतो. कधी ओळीने अतिवास्तववादी कवीच वाचतो किंवा प्रतिमावादी कवी. यात विद्वत्ता जमा करणे हा हेतूच नसतो. याची मी ना टिपणे ठेवतो ना ते लक्षात ठेवायचा आटापिटा करतो. वाचले, जमेल तेवढे समजले की संपले. त्यांतले काही कवी मला महत्त्वाचे वाटतात. त्यांचे मी जरा अधिक वाचतो आणि थोडेफार अभ्यासतोही. त्याचीही विद्वत्ता माझ्याकडे नसते. किंबहुना मी अनुवादासाठी निवडलेल्या कविताही नंतर माझ्या सामान्य ज्ञानाच्या कक्षेत राहतीलच असे नाही. अनुवाद करताना माझ्या कुवतीप्रमाणे मी शंभर टक्के प्रामाणिक असतो पण नंतर ते काहीही लक्षात ठेवायची जबाबदारी मी घेत नाही. त्या त्या क्षणी त्या त्या कलात्मक समृद्धीतून जाणे और बादमे भूल जाओ, असे ते असते. नाटकाच्या बाबतीत बोलताना काहीजण असे म्हणतात की ते पाहून प्रेक्षक अस्वस्थ झाला पाहिजे, त्याने ते नाटक सोबत घरी नेले पाहिजे, आयुष्यभर डोक्यात बाळगले पाहिजे – असल्या बावळट कल्पना मी त्याज्य समजतो. त्या त्या वेळी ती ती सर्जक प्रक्रिया झाली की संपले – त्यातून येणारे भान म्हणजे ते नाटक वा ती कविता नसते. सारांश, मी अनुवाद केलेल्या कविता वा त्यांचे कवी यांबद्दल नंतर मला काहीही विचारू नये.

मला वाटते माझ्या अनुवाद-प्रक्रियेतले बरेच मुद्दे आणि माझे त्याबाबतचे जे असेल ते आकलन स्पष्ट करण्याचे काम या पोस्टमधून पुरेसे झालेले आहे. काही मुद्दे राहिले असतील तर त्यांवरही यातून प्रकाश पडू शकेल. कवितेचे माध्यम हे जगणे समजून घेण्याचेच एक सर्जक माध्यम आहे. ते काम जगात असंख्य पद्धतींनी चालू असते. असे सगळे समोर येत राहिल्याने

आपल्याही अभिव्यक्तीच्या शक्यता, कुवती आणि तऱ्हा वाढू शकतात – या हेतूनेही मी थोडेफार हे काम करत असतो. सारखेच करत राहीन असेही नाही. जगण्यातली अनिश्चितता इथेही असणारच ना !

--- ००० ---

या संदर्भात कवितेचा आशय आणि अभिव्यक्तीचे तंत्र, हा एक महत्त्वाचा प्रश्न येतो. आशयच तंत्र घेऊन येतो, आशय आणि तंत्र एकत्रच असतात, असेही म्हटले जाते. यावर थोडे बोलायला हवे. रॉबर्ट फ्रॉस्ट म्हणतो की अनुवादात मूळ कविता आहे तशी राहूच नाही शकत आणि या अर्थाने ती नष्टच होते. यालाच जोडून, वाचनात आलेले एक उदाहरण म्हणजे, ड्रायडेन आणि वर्डस्वर्थ या दोघांनी केलेले व्हर्जिलचे अनुवाद वेगवेगळे झालेले आहेत. आपल्याकडेही ' मेघदूता ' चे चारपाच अनुवाद झालेले असून प्रत्येक अनुवादाची काही वेगळी वैशिष्ट्ये आहेत. याचा अर्थ, एकच कुठला तरी अनुवाद ( त्यातल्या त्यात ) बरोबर आणि बाकीचे चूक असे म्हणता येते का ? तर मला तसे वाटत नाही. कोणताही अनुवाद हा प्रामुख्याने आशयानुगामीच असतो किंवा असायला हवा, असे आपण म्हणू शकतो. मग काय असतो कवितेचा आशय ? यावर बोलण्यासाठी थोडी फोड करून घ्यावी लागेल. कवितेत व्यक्त झालेला अनुभव म्हणजेच आशय असतो का ? काही कवितांत तसे असू शकते. म्हणजे उदाहरणार्थ, आई वारल्यामुळे कवीला झालेले दुःख – ते व्यक्त करणे हेच समजा त्या कवितेचे उद्दिष्ट आहे. ते दुःख जसे च्या तसे, मुळातल्या तीव्रतेने वाचकाला पोचणे-जाणवणे असे झाले की पोचला आशय, असे कुणी म्हणू शकेल. अनेक कवितांच्या बाबतींत ते खरेही असू शकेल. त्यामुळे, अशा कवितांचे आशय वेगवेगळे आहेत, असे म्हणता येते. सुख, दुःख, चीड वगैरे भावभावना हेच आशय असणे. पण काही कवी, एखादा अनुभव व्यक्त होताना त्याच्याकडे पूर्ण मानवी जगण्याच्या संदर्भात पाहतात. त्या अनुभवाची पूर्ण रचना पाहतात. हे जाणीवपूर्वक वा त्या कवीच्या मोठ्या आवाक्याच्या कुवतीमुळे त्याच्या नकळतही घडू शकते. या प्रकारात तो अंतर्भूत असलेला अनुभव हा कवितेचा आशय नाही राहात – त्या अनुभवाचे एकूण मानवी जगणे म्हणून व्यक्त झालेले भान हा होतो आशय त्या कवितेचा. कवितेतला अनुभव कोणताही असो, हे भान, ही चिंतनशीलता, हा आवाका सगळीकडे तोच – एकच -- असतो. इथे अनुभव ही निमित्ते होत असतात. अशा समावेशक आणि मोठ्या आवाक्याच्या कविता सर्व माणसांना, त्यांच्या जगण्याला प्रस्तुत ठरतात कारण अनुभव-वैविध्याची मर्यादा त्यांनी ओलांडलेली असते. अशा कवितेच्या बाबतीत, जगातल्या कोणत्याही भागातल्या वा परिस्थितीतल्या कवीने लिहिलेली कविता जगातल्या इतर कुठल्याही भागातल्या वा परिस्थितीतल्या माणसासाठी प्रस्तुत आणि महत्त्वाची ठरते. नुसत्या अनुभवाचा प्रश्न असेल तर तो जसा च्या तसा, मूळ रंगरूपासह पोचणे कदाचित अवघड होऊ शकेल पण हे भान पोचवू इच्छिणाऱ्या कवितेत वैविध्यापेक्षा समावेशकता, समग्रता महत्त्वाची असल्याने, ते सहज घडू शकते. अर्थात त्यासाठी ती कविता तशी असायला हवी आणि अनुवादकर्त्याला, ते समग्र भान हाच आशय याची जाणीव असायला हवी. असे झाले तर भाषेच्या परंपरा, कवीच्या वा अनुवादकर्त्याच्या सवयी, लकबी, स्वभाव यांच्यामुळे येणारे वैविध्य लक्षात घेऊनही आशय स्वच्छपणे, अबाधितपणे पोचू शकतो. जगभर असंख्य तऱ्हांनी माणूस हे भान घेत असतो – या अर्थाने तो निव्वळ क्रियाप्रतिक्रियांच्या जंजाळातून मोकळाही होत असतो, स्वतंत्रही होत असतो. यालाच जगण्यातली सांस्कृतिकता वा परिपक्वता म्हणता येते. धर्म वा तत्त्वज्ञान यांच्या नादी न लागता कलेतून हे भान कुणालाही प्राप्त होऊ शकते. या भानाचा आशय व्यक्त होण्याच्या असंख्य तऱ्हा समोर येत राहणे यालाच सांस्कृतिक देवाणघेवाण म्हणायला हवे. या आशयाकडे लक्ष देऊन होणारे अनुवाद दोन संबंधित भाषांच्या वेगळ्या स्वभावांमुळे वा ढाच्यांमुळे, मुळापासून ढळलेले वाटले तरी काही फारसे बिघडत नाही. कारण तो आशय पोचण्यात बाधा येणार नसते. हे लक्षात घेता, आता हे स्पष्ट होईल की वरील विवेचनात असे का म्हटले आहे की अपलापांच्या बाबतीत पहिल्याहून दुसरा वा तिसरा अपलापही अधिक चांगला असू शकतो. अनुवादाच्या प्रक्रियेत मूळ कवितेचा कस कमीच होतो किंवा ती तिची ताकद थोडीफार गमावूनच बसते, असे समजायचे कारण नाही.

आता थोडे कामाच्या प्रक्रियेबद्दल. दोन भाषांची घाटणी वेगवेगळी असते. इंग्लिशमधून मराठीत येताना कधी एकाची दोन वाक्ये करावी लागतात, कधी शब्दांचा क्रम थोडाफार बदलावा लागतो. त्यामुळे आशयाच्या अभिव्यक्तीला फारशी बाधा येत

नसेल तर तसे करायला हरकत नाही. पण, काही वेळी ते आहे तसे एका ओघातच आले पाहिजे असे अनुवादकाला वाटते, तेव्हा थोडा ओबडधोबडपणा येऊ शकतो – मूळ भाषेची धाटणी अनुवाद-भाषेवर आक्रमण करतेय, असे होऊ शकते. अशा वेळी ते स्वीकारावे, असे मला वाटते. असे प्रश्न कथा-कादंबरी यांच्या अनुवादापेक्षा कवितेच्या अनुवादात अधिक येऊ शकतात कारण कवितेत अर्थसंपृक्तता तुलनेने अधिक असते. दुसरा मुद्दा म्हणजे, प्रतिशब्दांची निवड हाही एक महत्त्वाचा प्रश्न असतो. उदाहरणार्थ, light या शब्दाला प्रकाश म्हणावे की उजेड असा प्रश्न येऊ शकतो. त्या वेळी मूळ कवितेतली अर्थवत्ता लक्षा घेऊन आणि अनुवाद भाषेतल्या अर्थवलयांचे भान बाळगून अनुवादकाने निर्णय घ्यायचा असतो. मला नुक्ताच एक गंमतीशीर प्रश्न आला होता. तो सांगतो. फर्लिंघेट्टीच्या ‘ अंडरवेयर ‘ या कवितेतली ही ओळ बघा –

The Pope wears underwear I hope

इथे पोपबरोबर होप हा शब्द योजण्यात नादसाधर्म्याची थोडी गंमत करून पोपचे वजनच कमी करणे हे आहे. आय होप चे ' मला आशा आहे ' – यात ते येणार नाही. मी असे केले –

पोपलासुद्धा मोप गरज असते तिची

आता असा एकमेव मार्ग असतो असे काही नाही. आणखी एखाद्याला वेगळे काही सुचू शकते. मूळ कवितेच्या पृष्ठस्तरीय रचनेशी आणि बारकाव्यांशी संधान ठेवत आशयावरचे लक्ष ढळू न देणे यातच कवितेच्या अनुवादकाचे सर्जकत्व असते, असे मला वाटते. त्यामुळे, इंग्लिशमधल्या transcreation ला अनुलक्षून मराठीत ‘ अनुसर्जन ‘ हा शब्द वापरणेच योग्य वाटते. अनुवाद हे एखादे ‘ लमाण ‘ काम नसून मूळ कवीइतकेच ते सर्जकतेचे काम आहे, असे म्हणायला हरकत नसावी.

--- ००० ---

माझा मोबाईल चार्जिंग होत नसल्याने दुरुस्तीला पाठवला आहे -- त्यामुळे, सध्या फोन घेतला जाणार नाही.

पुष्पा भावे

विचारवंत, अभ्यासक, विशेषतः नाट्यसमीक्षक पुष्पा भावे गेल्या ! माझी अनेक नाटके त्यांनी पाहिली होती. ' साधना ' च्या नाट्यसंमेलनासाठी पुण्याहून आम्ही एकत्र गप्पा मारत नाशिकला गेलो होतो. त्या आणि मी तिथे गोपूंच्या बीजभाषणावर बोललो. त्या सौम्य स्वभावाच्या पण स्पष्टवक्त्या होत्या. कलावंत, लेखक यांच्याबद्दल त्यांना विशेष आस्था होती.

त्यांच्या स्मृतीस आदरपूर्वक नमन !

--- ००० ---

चांदोबा

आपल्यापैकी अनेकांचे लहानपण ' चांदोबा ' या मासिकाने व्यापलेले होते. इतकी भरपूर आणि इतकी सुंदर रंगीत चित्रे असलेले मासिक त्या वेळी तरी ते एकमेव होते. ' विक्रम आणि वेताळ ' असो की आणखी शेकडो कथा असोत, त्यांची रंगीत चित्रे हे एक कायमचे आकर्षण होते. त्या वेळी फारसा विचार नसे -- ही सगळी चित्रे त्या गोष्टींसह आपोआप येतात असे मन गृहीत धरे. ते प्रत्येक चित्र प्रत्यक्षात काढावे लागते याचे भान नसे. तर ती खजिनास्वरूप चित्रे काढणारे महान चित्रकार के सी शिवशंकर हे गेल्या २९ तारखेला ९७ व्या वर्षी वारले. त्या मासिकाची किमया -- जादू अशी होती की ते पुढे भारतातल्या बहुतेक सर्व महत्त्वाच्या भाषांतून निघू लागले ! ' चांदोबा ' हा शब्द वेगळ्याच अर्थाने भाषेत समाविष्ट झाला. जी ए कुलकर्णी यांच्या कथांची ज्यांना टर उडवायची असते ते महाभाग म्हणतात की जीए म्हणजे मोठ्यांचा चांदोबा होते !

कै शिवशंकर यांनी आपले बालपण सजवून दिले ! त्याबद्दल मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करायलाच हवी ! दरमहा ही अशी भरजरी रंगतदार ग्रेट चित्रे !
ग्रेट कलाकार ! त्यांच्या स्मृतीस सादर अभिवादन !
--- ००० ---

आज हृदयदिन ( हार्ट डे ) आहे म्हणे. तर विचार असा आला की या कोरोना काळात लोकांचे हॉटेलिंग, चमचमीत खाणे बरेच कमी झाले असणार -- त्यामुळे, हृदयविकारापासून काहीजण वाचले असतीलच ना ! म्हणजे कोरोनाने दिलेले जीवदानच की हे ! पण लगेच कुणी म्हणेल की कोरोनामुळे लोकांचे फिरणे, व्यायाम हे बरेच कमी किंवा बंदच झालेय -- त्यामुळे वाढलाही असेल हृदयविकार ! होय, पण, शांत, रिकामा वेळ मिळाल्याने ध्यान ( ज्यांना या शब्दाचीही ॲलर्जी आहे ते सोडून ) तरी चांगले करता आले असेल ! म्हणजे कोरोनाचे उपकारच की ते, हृदयविकारापासून वाचवणारे !
तर ते काय असेल ते असो, आहारनियंत्रण, व्यायाम आणि ध्यान ही त्रिसूत्री नुसती हृदयविकार टाळण्यासाठीच नव्हे तर आहे ते चांगले जगण्यासाठीही गरजेची आहे. आपल्या इथल्या लोकांचे जाऊ द्या, डीन आर्निश या परदेशी डॉक्टराने प्रयोग करून सिद्ध केलेय की ध्यान ही एक जीवनसंजीवनी आहे !
--- ००० ---
"There are no hard distinctions between what is real and what is unreal, nor between what is true and what is false. A thing is not necessarily either true or false; it can be both true and false."
― Harold Pinter
"It's very difficult to feel contempt for others when you see yourself in the mirror."
― Harold Pinter

Lonliness, Aloneness and Solitude ( **एकाकीपणा, एकटेपणा आणि एकांत** )

सतत सामूहिक, सामाजिक, राजकीय असणे तसेच सर्जकतेच्या, कलेच्या क्षेत्रातही टोळीबहाद्दर असणे हेच नुसते महत्त्वाचेच नव्हे तर अटळ मानणारे काही लोक दिसतात. या विषयावर आणि याच्या आजूबाजूचे आणखी काही असे कुणी कलावंत, चिंतक काही बोलले आहेत का ते पाहावे, असे वाटले. सहजच हा चाळा थोडाफार पार पडला. टोळीबहाद्दरांना लगेच यावर वादाचे काही मुद्दे सवयीने सुचतीलच. पण, ते ठीक आहे. हे इथे चर्चा आणि वाद यांसाठी देत नसून, वाटल्यास, आपापल्या विचारासाठी, चिंतनासाठी समोर असावे म्हणून देत आहे --
Real love is not an escape from loneliness, real love is an overflowing aloneness. One is so happy in being alone that one would like to share.
-- Rajneesh
"If you're lonely when you're alone, you're in bad company."
― Jean-Paul Sartre
"The more powerful and original a mind, the more it will incline towards the religion of solitude."
― Aldous Huxley

“A man can be himself only so long as he is alone; and if he does not love solitude, he will not love freedom; for it is only when he is alone that he is really free.”
— Arthur Schopenhauer, Essays and Aphorisms
“Orlando naturally loved solitary places, vast views, and to feel himself for ever and ever and ever alone.”
— Virginia Woolf, Orlando
“I was a man who thrived on solitude; without it I was like another man without food or water. Each day without solitude weakened me. I took no pride in my solitude; but I was dependent on it. The darkness of the room was like sunlight to me.”
— Charles Bukowski, Factotum
“The best thinking has been done in solitude.” ~ Thomas A. Edison
“Without great solitude no serious work is possible.” ~ Pablo Picasso
Writing is utter solitude, the descent into the cold abyss of oneself.” ~ Franz Kafka
“We carry about us the burden of what thousands of people have said and the memories of all our misfortunes. To abandon all that is to be alone, and the mind that is alone is not only innocent but young — not in time or age, but young, innocent, alive at whatever age — and only such a mind can see that which is truth and that which is not measurable by words.” ~ Jiddu Krishnamurti
I hold this to be the highest task for a bond between two people: that each protects the solitude of the other.
-- Rainer Maria Rilke
Solitary trees, if they grow at all, grow strong. (Winston Churchill)
It's easier to be me than someone else. But just like most famous people, I just want to be left alone most of the time. (Bob Dylan)
Often whole days pass without my speaking to anyone. (Vincent van Gogh)
The only thing that could spoil a day was people. People were always the limiters of happiness except for the very few that were as good as spring itself. (Ernest Hemingway)
Solitude is independence. (Hermann Hesse)
-Aloneness Is Not Loneliness / The Book of Life
Aloneness is obviously not isolation, and it is not uniqueness. To be unique is merely to be exceptional in some way, whereas to be completely alone demands extraordinary sensitivity, intelligence, understanding. (Jiddu Krishnamurti)
A career is born in public - talent in privacy. (Marilyn Monroe)
Aloneness is the presence of oneself. Aloneness is very positive... You are so full of presence that you can fill the whole universe with your presence and there is no need for anybody. (Osho)

If you cannot live alone, you were born a slave. (Fernando Pessoa)
He who does not enjoy solitude will not love freedom. (Arthur Schopenhauer)
"You are in no man's land. Which never moves, which never changes, which never grows older, but remains forever, icy and silent."
— Harold Pinter, No Man's Land
Every true man, sir, who is a little above the level of the beasts and plants does not live for the sake of living, without knowing how to live; but he lives so as to give a meaning and a value of his own to life.
-- Luigi Pirandello
"Solitude seems to oppress me. And so does the company of other people."
— Eugène Ionesco
"Every word is like an unnecessary stain on silence and nothingness."
— Samuel Beckett
"You're safe only when you can't see anybody."
-- Gao Xingjian
The feeling of loneliness is unique to humans. A tree or a bird may seem to be lonely, but this is an attribute bestowed by the person making the observation. The tree or the bird is incapable of perceiving loneliness. This feeling occurs when a person is alone, and, moved by his emotions, associates his own circumstances with those of the bird or the tree that he sees before him. Since this feeling entails an element of self-examination, it is not a purely objective observation. The feeling of loneliness produced is thus a form of aesthetics, in that while observing one's external environment, one is at the same time examining the self that is located within it, and to a certain extent this is an affirmation of one's own personal worth.
GAO XINGJIAN,
Loneliness is a prerequisite for freedom. Freedom depends on the ability to reflect, and reflection can only begin when one is alone.
GAO XINGJIAN
Apply yourself to solitude. One who is given to solitude knows things as they really are.
-- Buddha.

"There are no hard distinctions between what is real and what is unreal, nor between what is true and what is false. A thing is not necessarily either true or false; it can be both true and false."
— Harold Pinter
"It's very difficult to feel contempt for others when you see yourself in the mirror."

— Harold Pinter

Mahesh Pawar यांच्या पोस्टवर मी दिलेली कॉमेंट --
माझ्या आयुष्यात विभूती एकच, म्हणजे मी सत्तेवर आलो तर एखाद्या विद्यापीठाला नक्कीच त्यांचे नाव देईन -- आदरणीय श्री. नीलीमकुमार खैरे ! शंभर विषारी सापांच्या सान्निध्यात बाहत्तर तास बसण्याचा चमत्कार त्यांनी बी जे मेडिकलच्या मैदानावर केला होता ! मनात कायमच सापाची दरदरून भीती असल्याने मी त्यांचा तो धाडसी उद्योग बघायला गेलो होतो ! साप दिसला की आता फक्त खैरे खैरे म्हणतो की झाले !

राजकारण या व्हायरसवरची लस कधीच तिसऱ्या टप्प्यात आलीय पण तिच्या चाचणीला एकही स्वयंसेवक पुढे येत नाहीय !

न जाणो, काही दिवसांनी, आयपीएल वरचे लक्ष हटवण्यासाठी, कोरोना आणि बेरोजगारी यांच्यावरही चर्चा सुरू करतील साले !

आता कंगना आणि रिया यांच्यावरचे लक्ष हटवण्यासाठी आयपीएल सुरू केलेय !

सध्या दोन वाक्यांची चलती दिसते --
१. एवढी साधी गोष्ट त्यांना कळू नये ? !
२. त्यांचेच लोक त्यांच्यावर नाराज आहेत !

सहा महिन्यांनंतर आज घराबाहेर पडलो. दातासाठी. फारसे गंभीर नव्हते पण नको कटकट म्हणून दाखवून आलो. कुठेही काहीही बदललेले नाही. कालच तर मी येऊन गेलोय इकडे, असे वाटले. वातावरणातल्या अदृश्य भयाकडे दुर्लक्ष केले तर ऊन नेहमीसारखे रूटीन वाटले.

पुरुष आणि स्त्रिया
फेसबुक हे एक मिनि जग आहे असे म्हटले तर सहजच एक असे दिसते की स्त्रियांच्या पोस्ट अधिक मानवी, समजुतदार, सौहार्दपूर्ण, जगण्यातल्या महत्त्वाच्या बाबींना महत्त्व देणाऱ्या, अधिक हितचिंतक, मैत्रीपूर्ण, दुष्टावा नसलेल्या, अहिंसक आणि संघर्षा ऐवजी समन्वयाला महत्त्व देणाऱ्या असतात. त्यावरून असा एक मुद्दा मांडून पाहावा असे वाटले की जसे -- विचारसरणीचा मृत्यू, लेखकाचा, समीक्षेचा, उपपत्तीचा, धर्माचा, आदर्शांचा, वगैरे मृत्यूंच्या घोषणा होऊन गेलेल्या आहेत, त्याचप्रमाणे आता राजकारण व शासनयंत्रणा पुरुषांनी चालवण्याच्या काळाचा मृत्यू झालेला आहे, असे घोषित करावे. पुरुषांना राजकारण झेपत वा पेलत नाही, असेच दिसते. ते सगळीकडे द्वेष आणि हिंसाच पसरवतात. पुरुषांच्या राजकारणातून भल्या ऐवजी बुरेच जास्त निर्माण होताना दिसते आहे. या दृष्टीने नेटवर पाहिले असता, असा विचार झालेलाही दिसतो आहे. एकूणच स्त्रियांनी आणि समंजस पुरुषांनी पुरुषांना राजकारणातून पूर्ण हद्दपारच करून पाहायला हवे आहे. एकूणच जगभरचे भंगार वातावरण कदाचित स्त्रियाच रुळावर आणू शकतील. माणसांना द्वेषा ऐवजी प्रेमाचे जगणे शिकवू शकतील. हे क्षेत्र खूप वर्षे पुरुषप्रधानच राहिलेले आहे आणि या पद्धतीने ते फक्त विध्वंसकपणाकडेच जात आहे. मानवी जगण्याच्या सगळ्या दोऱ्या स्त्रियांच्या हातीच द्यायला हव्यात.

ही पोस्ट निव्वळ विचारार्थ दिलेली आहे. हे माझे ठाम मत नव्हे. सध्याचे एकूणच जगणे आणि त्याची प्रत सुधारण्यासाठी दिसणारा हा एक आशादायक मार्ग वाटतो आहे. धर्म, जात, पक्ष यांच्या मर्यादा ओलांडून यावर चर्चा व्हावी.
--- ००० ---

ट्रोल
माझ्या दृष्टीने, माझ्या सोयीसाठी मी ट्रोलची व्याख्या केलेली आहे, ती अशी -- दिलेल्या पोस्टचा विषय सोडून, पोस्टकर्त्यावर द्वेषमूलक अशा व्यक्तिगत कॉमेंट देतो तो ट्रोल.
मी स्वतः इथे फेसबुकवर माझ्या कोणत्याही राजकीय विचारांचे प्रदर्शन वा प्रचार करण्यासाठी वावरत नाही. परंतु, माझ्या पोस्टमुळे किंचित जरी शंका आली किंवा ते स्वमताच्या विरोधी वाटले तरी काही ट्रोल इथे त्यांचा धंदा सुरू करतात, असे अनेकदा दिसून येत आहे. मी सहसा कुणाला अनफ्रेंड वा ब्लॉक करत नाही. वस्तुतः माझी ५००० ची मर्यादा संपलेली आहे, तरीही, नवीन फ्रेंड घेता यावे म्हणून मी कुणाला उडवत नाही. परंतु, आता, यापुढे, माझ्या पोस्टवर कुणी, वरील व्याख्येप्रमाणे ट्रोलगिरी केली तर त्या व्यक्तीला कोणतीही पूर्वसूचना न देता रामराम करायचे मी ठरवलेले आहे. कारण त्या ट्रोलांच्या दृष्टीने माझी फ्रेंडशिप ही ' वाईट ' च असणार आहे.
असे करावे लागत आहे त्याबद्दल तशा ट्रोलांची आधीच माफी मागून ठेवतो.
धन्यवाद !
--- ००० ---

राजकारणात गधडेपणा खूप असतोच हो, पण इतका ? एखाद्या राज्य सरकारने स्वतःविरुद्धच बंदोबस्त करणे ? !

आमचे घराणेच शिक्षकी पेशाचे आहे --
आम्हाला काही येवो न येवो,
लोकांना शिकवण्याचे व्रत आम्ही कटाक्षाने पाळतो !

Memory मधून...
****************************
Champra Deshpande देशपांडे यांच्या wall वरून ....
वेड्यांची संख्या खूप प्रचंड असली की त्यांना वेडे म्हणता येत नाही -- हा शहाण्यांचा प्रॉब्लेम असतो !
शहाणे म्हणजे संख्येने कमी असणारे वेडे !

Pravin Kamble is with Niranjan Malode and Purushottam Kadam.
August 30 ·
रंगमंच - सादर केलेले प्रयोग
निर्मिती - मयुरी थिएटर,नाशिक
नाटक - " ट्रेलर"
लेखक - च .प्र. देशपांडे
दिग्दर्शन - प्रविण कांबळे
ठिकाण - यशवंतराव चव्हाण माटुंगा,मुंबई.

प्रकाश योजना - प्रविण कांबळे

कविता म्हणजे काय ( रे भाऊ ) ?

आजच सकाळी मी ‘ कलेचे दिवस ‘ ही माझी कविता इथे फेसबुकवर पोस्ट केली. त्यावर, कोल्हापूरपासूनचे माझे मित्रवर्य प्रा. बाळकृष्ण कवठेकर यांची अशी कॉमेंट आली – “ चं प्र, क्षमस्व. ही कविता नाही, छोटा निबंध वाटतो, कोणालाही कमी जास्त करता येईल असा. “ त्याला माझे उत्तर असे होते – “ माझा काहीही दावा नाही -- दिसले ते लिहिलेय – “ नंतर माझ्या असे लक्षात आले की हा विषय फ्रेंडसमध्ये चर्चा व्हावी असा आहे. जगात कवितेच्या शेकडो व्याख्या होत आलेल्या आहेत आणि आता अगदी न-कविता किंवा स्वयंचलित कविताही लिहिल्या जातात, हे आपल्याला माहीत असले तरीही, आपण आपापल्या आकलनानुसार यावर बोलावे, असे वाटले. या निमित्ताने कवितेबाबतच्या आपापल्या कल्पना घासूनपुसून स्पष्टपणे मांडल्या जातील आणि गरज वाटल्यास आपल्याला सर्वांनाच आपापल्या कल्पना बदलून, वाढवून, दुरुस्त करून वा अधिक समावेशक वा कवितेचा नेमका प्रदेश रेखून देणाऱ्या अशा करता येतील, असे वाटले. एखादे औषध वा लस तयार करताना जसे काही लोक स्वेच्छेने त्याच्या जरूरीच्या चाचणीसाठी पुढे येतात, त्याचप्रमाणे, या कामाला आपली ही कविता वा मजकूर उदाहरण म्हणून देऊ करता येईल, हे माझ्या लक्षात आले. तरी, फ्रेंडसना माझी अशी विनंती आहे की निर्भीडपणे त्यांनी हा मजकूर कविता आहे की नाही यावर लिहावे. या मजकूराची कशीही चिरफाड वा चिकित्सा करावी. वाटल्यास आशयावरही हल्ला वा त्याचे कविता म्हणून समर्थन करावे. मुख्यतः हा एक निबंधात्मक गद्य मजकूर आहे का, यावर सकारण मते द्यावीत. यातून, अमुक बरोबर वा तमुक चूक असा निष्कर्ष काढणे हा हेतू नाही. या निमित्ताने या एका महत्त्वाच्या विषयावर आकलन-घुसळण व्हावी, हीच एक मर्यादित अपेक्षा आहे. हे उद्बोधक ठरू शकेल. ही इथली चर्चा जर चांगली झाली तर आपले कुणी संपादक मित्र पुढे ती प्रसिद्धही करू शकतील. या चर्चेत, अर्थातच, कवठेकर सरांनी त्यांचे मत जरा सविस्तर मांडावे, अशी विनंती आहेच. इथे निकाल देणारे कुणी न्यायाधीश नसतील, हे लक्षात घेऊन फ्रेंडसनी खुलेपणाने बोलावे, ही विनंती.

संदर्भासाठी, सकाळी मी कविता म्हणून दिलेला मजकूर असा आहे –

कलेचे दिवस

मुंग्या लागून मेले की वाळवी लागून
असा श्रेयाचा सामना रंगणार हे दिसताच
अनेक चित्रकार हजर झाले
आधी सत्य पाहून मग ते अमूर्त करायला --
नुसते अमूर्तही आपल्याला माहीत असलेल्या
झुंबरांच्या आणि कोळिष्टकांच्या आपल्या
मनांतूनच येते हे त्यांना माहीत होते
पण हाती असलेल्या कौशल्यातून
त्यांना मसिहा म्हणून गाजायचेच होते
आणि जगाच्या संस्कृतीचा व्हायचे होते
एक अविभाज्य पाणीपुरवठा डबल फिल्टर्ड
वाचनसंस्कृतीचे उपटसुंभ भक्त गौरव माजवत
आपल्या प्रगल्भ डबक्यांचा प्रसंगी
हजार सर्प पोसून धाक निर्माण करणाऱ्या
होते हजर त्यांचेही आत्मसंवर्धन साधायला

रात्रीच्या अपॉइंटमेंटसपूर्वी प्रेयसींशी ठरलेल्या
ज्या त्यांच्या प्रगल्भतेच्या जाहिरातींत
हमखास असत अर्धनग्न आकर्षक हुशार मॉडेल्स
हल्ली लोक वाचत नाहीत दृश्यकला तर
फक्त लिलावांतच दिसतात काळ्या
पैशांच्या उत्तुंग आणि सखोल व्यवहारांत
संपले दिवस एकूणच कलेचे
हे समजून काहीजण शांतपणे पाहात वेफर्स खात होते

--- ००० ---

-- हा मजकूर आधाराला घेऊन चर्चा होत असल्याने नुसत्याच औपपत्तिक कल्पना न येता त्यांचे स्पष्टीकरणही येईल, अशी आशा आहे.

--- ००० ---

गणिताचा बादशहा

शेयर बाजारात मी कधी फारसे लक्ष दिले नाही. पण, मुलामुळे कधी कधी झी बिझिनेस हे चॅनेल थोडा वेळ पाहिले जाते. त्याचा मॅनेजिंग एडिटर अनिल सिंघवी हा एक अजब माणूस आहे. पैशांच्या या बाजारात सहज हसत खेळत वावरणारा, त्यात विनोदही करू शकणारा माणूस म्हणून मला त्याच्याबद्दल आदर आहे. आज त्याने नीलकंठ भानू प्रकाश हा एक अजब गणिती त्या चॅनेलवर आणला होता. हा फक्त २१ वर्षांचा एक विद्यार्थी आहे. याने शकुंतला देवींचाही विक्रम मोडलेला असून भारतासाठी गणितातले जागतिक सुवर्णपदक मिळवलेले आहे ! त्याने करून दाखवलेले गणितातले चमत्कार प्रत्यक्ष पाहिले ! ग्रेटच !!! ( वीज सारखी जात असल्याने पोस्ट अर्धी देऊन आता पूर्ण करत आहे -- ). त्याचे म्हणणे यात परमेश्वरी देन वगैरे काही नाही. ही एक कला असून कुणीही हिचा सराव करून निष्णात होऊ शकतो. लोक त्याला म्हणतात, आता संगणक आहेत, तुझ्या या कौशल्याचा उपयोग काय ? तो म्हणतो, कार्स आल्या तरी पळण्याच्या स्पर्धा असतातच ना -- तसेच हे समजावे. आणि मानवी मेंदूच्या शक्ती टिकवणेही महत्त्वाचेच आहे ! अजब आणि ग्रेट !!!

हजार लाईक्समध्ये आपल्या लाईकचा काय तपास लागणार आहे ? सौंदर्य बघा आणि पुढे चला --

' जय आत्मनिर्भर भारत ' असे म्हणून, हातात कात्री आणि कंगवा घेऊन, पाच मिनिटांत कोरोना कट मारून टाकला ! आता दोन महिने निश्चिंत !

यानंतर फक्त निवडक पोस्ट घेतलेल्या आहेत. कवितांच्या पोस्ट वगळलेल्या आहेत.

22 August 2020
Yesterday

मूड

पावसामुळे माझा एक मूड तयार होतो
मग सर्दी होते मग घसा पकडतो
म्हणजेच ऍलर्जी होते
हे पाहून मला वाटले आपला तो मूड
पावसाला विरोध करतो आणि त्या लढाईत
तो मूड खूपच कमी पडतो

समजा मी तो मूड तयारच नाही होऊ दिला
तर माझा पावसाला विरोध असणार नाही
आणि मला ऍलर्जी नाही होणार

हे जर खरे असेल तर
या विचाराने मी घाबरलो
मग तर मनातले सगळेच विरोध
असे काही ना काही बिघाड
घडवतच असणार आणि मला ते
कळत नसणार ते अजून व्यक्त न झाल्याने

वाईटाला विरोध करावाच लागणार ना
माझे मन एक साधे सत्य सांगते

च्यायला म्हणजे जगण्यात
ऍलर्जी
ही कंपल्सरीच असेल का काय

आता या विचाराचा मूड नको तयार व्हायला
--- ००० ---

August 20

ग्रेट म्हणजे काय रे भाऊ ?

मुळात ग्रेट असे काही नसतेच, वैश्विक वा सखोल असे काही नसतेच, सगळे उथळच असते – असे आकलन असणारे काही लोक आहेतच. जे आहे त्यातच जमेल ती मजा करा, असे म्हणत ते कलाभिव्यक्तीत रूटीन अनुभव, लोककला, लोकप्रिय कला, गाणी, चावटपणाचे प्रकार, असे सगळेच एकत्र हाताळत, ग्रेट होण्याची चिंता न बाळगता, विस्तृतपणा,

बहुश्रुतता हीच समृद्धी दाखवत खुश राहतात. पण, हे सगळ्यांना पटते, असे नाही. कलेत काही मूल्यात्मकताच नसते हे तत्त्व समोर आले तर भांबावून जाणारेही काही असतात. विद्रोही टाईप लोक तर, या अशा विचाराने आपण पुन्हा एकदा देशोधडीला लागू, ही शक्यता पाहून अधिकच आक्रमक होतात. या विषयातले प्रश्न सर्वांप्रमाणेच मलाही पडत असतात आणि ते सतत माझ्या चिंतनात असतात. त्या बाबतीतली ही पोस्ट आहे. विषयाचा आवाका शून्यापासून ते अनंतापर्यंत ओपन असल्याने सर्व फ्रेंडसनी यावर बिनबिचकतपणे आपले विचार मांडावेत, अशी इथे अपेक्षा आहे.

स्वच्छंदी कविता, भावकविता, अतिवास्तववादी कविता, अ-कविता असे काही प्रकार आपल्याला माहीत आहेत. नुसतेच सुखदुःखाचे वास्तवच चितारण्यात रस न घेणारी बरीच कविता वाचनात येत असते. वास्तवाचा सांधा सोडणाऱ्या कवितेत दोन प्रकार असतात – एक म्हणजे वास्तव हे गोडगुलाबी करण्यात रस असलेले आणि वास्तवाची विरूपता, विद्रूपताही व्यक्त व्हावी असा दृष्टिकोण असलेले. वास्तवाची कास सोडणाऱ्या बऱ्याच कविता शाब्दिक स्तरावर आगापिछा नसलेल्या आणि त्यामुळे दुर्बोध वाटू शकतात. असतातही दुर्बोध कारण त्यांना रूटीन एकरेषीय अभिव्यक्तीहून अधिक काही ‘ म्हणायचे ‘ असते. मला अनेकदा असा अनुभव येतो की अशा दुर्बोध कवितेतही एखादी ओळ वा एखादा शब्दसमुच्चय असा येतो की सदर कवी खूप खोलातून चिंतनशील आहे, हे जाणवते. तशा दुर्बोध कथेत वा कादंबरीतही तशा जागा असतात. आणि मग त्या अनुषंगाने त्या एकूण कलाकृतीच्या आकलनाच्या शक्यता वाढतात.

तसे चित्रकलेत होऊ शकते का ? वास्तववादाचा हात सोडलेली बरीच चित्रे गोडगुलाबी असतात. त्यांना स्वतःची शैलीही असते. ते सर्व पाहून आपण चकित होतो आणि उत्स्फूर्तपणे ‘ ग्रेट ‘ म्हणतो. पण, एक प्रकारे ते ओळखता येणारे वास्तवच असते. आणि सरळ सरळ वास्तवच चितारणारी अनेक चित्रे अशी असतात की त्यांतले तपशीलांचे बारकावे आणि छायाप्रकाशाचे खेळ पाहून आपण त्यांना ‘ ग्रेट ‘ म्हणतो. अशा बाबतीत वर्षानुवर्षे असा एक विचार चालू असतो की फोटोग्राफीत येतेच की हे सगळे, तेही सहज, एका सेकंदात, मग कशाला हे चित्रकार एवढे कष्ट घेत बसतात ? कशाला इतका वेळ वाया घालवतात ? नुसत्याच, कमावलेल्या कौशल्याला ग्रेट का म्हणावे ? आणि ‘ अ-वास्तव ‘ चित्रकलेत ‘ वाह ‘ म्हणावे अशा जागा असतात का ? त्या कशा प्रकारच्या असतात ? अमूर्त चित्रकलेत असे अनेकदा वाटते की ‘ वाह ‘ म्हणणारे लोक त्या संबंधित चित्रकाराची माहिती मनात जोडून त्या चित्राला ग्रेट म्हणताहेत. म्हणजे असे की उदाहरणार्थ, भारतीय तत्त्वज्ञानातल्या ‘ बिंदू ‘ या कल्पनेचा त्यांनी सखोल धांडोळा घेतलेला आहे, त्यामुळे त्यांची बिंदूचित्रे ग्रेट आहेत – असे. मग या पद्धतीने एखाद्याचे साधे रंगांचे पट्टेही ग्रेट ठरताना दिसतात. किंवा अनेकरंगी वा एकरंगीही भौमितिक रचनांची चित्रेही ग्रेट म्हटली जाताना दिसतात. ही अशी चित्रे तर थोडेफार कौशल्य कमावलेला कोणताही चित्रकार काढू शकेल, असे पाहणाऱ्याला वाटते. वास्तववादी चित्रात निदान चकित करणारे कौशल्य तरी असते, इथे तेही दिसत नाही. इथे नुसताच एक प्लेन रंग दिलेला चौकोन जेव्हा ग्रेट म्हटला जात असलेला दिसतो तेव्हा मात्र, प्रामाणिकपणे चित्रे समजून घेण्याची इच्छा असलेल्याचा धीर खचतो !

कवितेतही ‘ अ-वास्तव ‘ लिहिणाऱ्यांत काही शैली-उस्ताद असतात. ते रूटीन सुखदुःखांनाच एका मोहक शैलीतून अभिव्यक्ती देत राहतात. जरा ढोबळ भाषेत म्हणजे ते वास्तवच पण आकर्षक वेष्टनातून सादर करत असतात. म्हणजेच, शैलीचे कमावलेले कौशल्य सोडले तर ते वास्तवालाच टाळ्या घेत असतात. वास्तवातली मोहकता सोडणारे कवीही बऱ्याचदा ‘ वास्तवाला येणाऱ्या त्यांच्या प्रतिक्रियांचे वास्तव ‘ हेच मांडत असतात. प्रतिक्रियांच्या वास्तवाचा दर्जा, असे काही असते का ? हे सगळे पाहता, कलाभिव्यक्तीत, या ना त्या प्रकारचे कौशल्यच शेवटी महत्त्वाचे ठरते का, असा प्रश्न येतो.

तर, या सगळ्याची एकच सारांशरूप ‘ कॅप्सूल ‘ म्हणजे अवगुंठित गोळी करायची झाली तर प्रश्न असा सापडतो – आपण जी कला कला म्हणतो ती फक्त वास्तव अधिक कौशल्य यांची बेरीज किंवा नुसतेच कौशल्य किंवा जाणूनबुजून वाढवलेली ढोंगबाजी, इतकेच असते का ? कौशल्यामुळे करमणुकीचा चांगला आनंद मिळू शकतो हे मान्य केले तरी याहून अधिक काही असते का कलेत ? असू शकते का ? असू शकत असल्यास ते काय असते ? म्हणजेच आपला टायटल-प्रश्न – ग्रेट म्हणजे काय रे भाऊ ?

हा विषय खूपच खुला असल्याने, कुणीही, यावर काही बोलावेसे वाटल्यास, न लाजता बिनदिक्कतपणे बोलावे, ही विनंती.

--- ००० ---

August 19

चंद्र

वस्तूंच्या जगात राहतोयस
तर वस्तूंच्या भाषेत बोल
माणसाच्या मनातून येणाऱ्या
घुसमटीला इहवादात अर्थ नाही
असे चंद्र म्हणाला तेव्हा
घराच्या भिंती पाहात होत्या
दयाळूपणे आणि चिंतेने

आता काय घडेल याची
रात्रीला मुळीच उत्सुकता नव्हती
इहवादाची बकवास करणारा हा प्राणी
प्रेम करणेच विसरत चालला होता

समुद्राच्या वाळूत इतस्ततः
बागडणारे खेकडे
आपण फार आनंदात आहोत
असेही सत्य नव्हते माजवत

वाळूवर पडलेल्या चांदण्याने
ना वाळू रोमँटिक होत होती
ना खेकड्यांना हवा होता
रात्रीचा अमरपणा

वस्तूंच्या भाषेत कसे बोलायचे
इहवादी मौनातून की वस्तुरूप घुसमटीतून

या प्रश्नावर चंद्र फक्त हसला

--- ००० ---

Champra Deshpande's photo.
छायाचित्र दिवस --

August 18

माझे परभाषिक कवितांचे अनुवाद

गेल्या काही वर्षांत मी मधून मधून मला आवडलेल्या वा काही कारणाने विशेष वाटलेल्या अशा परभाषिक कवितांचे अनुवाद करत आलेलो आहे. ज्या कविता मुळात इंग्रजीतूनच लिहिल्या गेल्या आहेत त्यांचा त्या मूळ रूपांतून आणि ज्या अन्यभाषिक कवितांचे इंग्रजीत अनुवाद उपलब्ध आहेत त्यांचे त्या अनुवादांवरून असे मी अनुवाद केलेले आहेत. या प्रक्रियेत अनेक प्रश्न असतात, जसे की मूळ इंग्रजीत असलेली कविता तरी मला कितपत समजलेली आहे इथपासून ते मी अनुवादाला घेतलेला अनुवाद कितपत विश्वासार्ह आहे, इथपर्यंतचे, असे अनेक प्रश्न असतात. मुळात लिखित कविता हीच प्रत्यक्ष सत्य नसून सत्याची अभिव्यक्ती असते असे म्हटले तर ती मूळ कविता हाच सत्याचा पहिला अपलाप असतो. तिचा अनुवाद हा दुसरा अपलाप म्हटला तर अनुवादाचा अनुवाद हा तिसरा अपलाप म्हणावा लागतो. तर, सारांशाने मी कोणत्याही कवितेचा दुसरा वा तिसरा अपलाप करत असतो.

हे अनुवाद करावेतच कशासाठी मुळात, असा एक प्रश्न अनेकांच्या मनात येऊ शकतो. इथल्या मातीतली कला वगैरे बडेजाव माजवणारे आपण लोक आहोत. इथली माती म्हणजे काय ? फक्त शेतकरी, शेतमजूर, दलित वा कामगार यांच्या जगण्याचे वास्तव ? तसे म्हणता येत नाही. कुणाचेही कोणतेही अनुभव कलेची सामुग्री होऊ शकतात. त्यामुळे, इथली माती म्हणजे कुणाच्याही मनाची कोणतीही माती, हे आधी लक्षात घ्यायला हवे. मराठी भाषिक कवींचीही एकमेकांची माती वेगवेगळीच असते. परमातीच असते. तरीही एकमेकांच्या कविता थोड्याफार, अपलाप होत का असे ना, एकमेकांपर्यंत पोचू शकतात. लकबी, सवयी, चालीरीती, श्रद्धा, नीतिकल्पना, आदर्श, अस्मिता हे सगळे जरी वेगवेगळे असले तरी – सुख, दुःख, मानापमान, प्रेम, असूया, हेवा, सूड, महत्त्वाकांक्षा, वर्चस्वाची इच्छा अशी ही माती सगळीकडे जगभर सर्व माणसांत तीच -- एकच असते. त्यामुळेच तर कलेतून होणारी अभिव्यक्ती आणि संपर्क हे सर्वच माणसांना प्रस्तुत असू शकतात. काहीजणांना वाटते की त्या त्या संस्कृतीत आपापले कलाशास्त्र, साहित्यशास्त्र असते आणि ती परंपरा जपत, विकसित करतच सर्वांनी चालले पाहिजे. मला ही धारणा मूर्खपणाची वाटते. ही धारणा मातीच्या वेगवेगळेपणाला महत्त्व देणारी असून तिच्यातल्या समावेशकतेकडे दुर्लक्ष करणारी आणि म्हणून संकुचित आहे. कोणत्याही कलेचा अनेकांशी संपर्क होतो तो मातीच्या वेगळेपणामुळे नव्हे तर तिच्यातल्या समानतेमुळे, समावेशकतेमुळे, हे लक्षात घ्यायला हवे. अशा या आकलनामुळेच, परभाषेतल्या कलाकृती अनुवादित होणे मला आवश्यक, महत्त्वाचे आणि समर्थनीय वाटते. जगातल्या कोणत्याही साहित्यविचारप्रणाली मला महत्त्वाच्याच वाटतात.

याच कारणामुळे अनुवाद हा नुसताच शाब्दिक प्रक्रियेबरोबर जाणारा वा नुसताच शाब्दिक असून चालत नाही. अनुवादकाची आकलनप्रक्रिया ही त्या कवितेच्या समावेशकतेकडे लक्ष देणारी असावी लागते. अनुवादकाच्या आकलनाला अशी एकसंधतेची पार्श्वभूमी नसेल तर तो अनुवाद नुसताच शाब्दिक, तुकड्यातुकड्यांचा, ओबडधोबड आणि मूळ

कलाकृतीला ठार करणाराच होईल. त्यामुळे, अनुवादाला घेतलेल्या कवितेत आकलनाच्या या एकसंधतेचे दर्शन अनुवादकाला झालेले असणे महत्त्वाचे ठरते. अनुवाद करताना अनेक पर्यायी शब्दरूपे सुचत असतात, त्यांतले नेमके शब्दरूप निवडताना वा काही वेळी नव्याने घडवतानाही ती आकलनाची एकसंध प्रक्रियाच अबाधित राहायला हवी, अशीच योजना स्वीकारावी लागते. या एकूण दृष्टिकोणामुळेच मी असे म्हणतो की उदाहरणार्थ समजा एका फ्रेंच कवितेच्या इंग्रजीतल्या अनुवादावरून मी मराठी अनुवाद केलेला असला तरीही त्या इंग्रजी रूपापेक्षा माझा मराठी अनुवाद हा मूळ कवितेशी अधिक निष्ठावान असू शकतो. आणि त्याच्याही पुढे जाऊन मी असेही म्हणेन की मूळ कवितेतले पहिले अपलापत्व कमी झाल्यामुळे माझा मराठी अनुवाद हा मूळ कवितेहूनही अधिक सकस व सशक्त झालेला असू शकतो. यात कुणाचा मानापमान वा श्रेष्ठकनिष्ठत्व नसून या प्रक्रियेचेच ते वैशिष्ट्य असते. हे सर्व लक्षात घेता अनुवादाला नवनिर्मितीचेच महत्त्व द्यायला हवे, असे मला वाटते. या सर्व प्रक्रियेत व्यक्तिमाहात्म्य वा विभूतिमत्व हे महत्त्वाचे नसून कवितेचा आशय म्हणजे त्यात अंतर्भूत असलेली जगण्याचे भान घेण्याची प्रक्रियाच महत्त्वाची असते, असे मला म्हणायचे आहे.

माझी माती, माझी भाषा, माझी संस्कृती, माझ्या विचारपद्धती, सवयी, लकबी, कल्पना, आदर्श, चालीरीती वगैरे हेच जगात सर्वोच्च महत्त्वाचे असते, असे मी समजत नाही. या बाबींमधील भेदांमुळे एकमेकांच्या कविता समजण्यात येणाऱ्या व्यावहारिक अडचणी वा अडथळे मान्य असले तरी. जगातले कोणतेही कवी मी त्याच आत्मीयतेने वाचू शकतो ज्या आत्मीयतेने मी आरती प्रभू वा गुरुनाथ धुरी वाचेन. आणि इंटरनेटमुळे प्रचंड खजिनेच आपल्यासाठी खुले आहेत ! मी लहर लागली तर, आज रशियातले वा इंग्लंडमधले वा फ्रान्समधले कवी काय लिहिताहेत, हे पाहात बसतो. कधी ओळीने अतिवास्तववादी कवीच वाचतो किंवा प्रतिमावादी कवी. यात विद्वत्ता जमा करणे हा हेतूच नसतो. याची मी ना टिपणे ठेवतो ना ते लक्षात ठेवायचा आटापिटा करतो. वाचले, जमेल तेवढे समजले की संपले. त्यांतले काही कवी मला महत्त्वाचे वाटतात. त्यांचे मी जरा अधिक वाचतो आणि थोडेफार अभ्यासतोही. त्याचीही विद्वत्ता माझ्याकडे नसते. किंबहुना मी अनुवादासाठी निवडलेल्या कविताही नंतर माझ्या सामान्य ज्ञानाच्या कक्षेत राहतीलच असे नाही. अनुवाद करताना माझ्या कुवतीप्रमाणे मी शंभर टक्के प्रामाणिक असतो पण नंतर ते काहीही लक्षात ठेवायची जबाबदारी मी घेत नाही. त्या त्या क्षणी त्या त्या कलात्मक समृद्धीतून जाणे और बादमे भूल जाओ, असे ते असते. नाटकाच्या बाबतीत बोलताना काहीजण असे म्हणतात की ते पाहून प्रेक्षक अस्वस्थ झाला पाहिजे, त्याने ते नाटक सोबत घरी नेले पाहिजे, आयुष्यभर डोक्यात बाळगले पाहिजे – असल्या बावळट कल्पना मी त्याज्य समजतो. त्या त्या वेळी ती ती सर्जक प्रक्रिया झाली की संपले – त्यातून येणारे भान म्हणजे ते नाटक वा ती कविता नसते. सारांश, मी अनुवाद केलेल्या कविता वा त्यांचे कवी यांबद्दल नंतर मला काहीही विचारू नये.

मला वाटते माझ्या अनुवाद-प्रक्रियेतले बरेच मुद्दे आणि माझे त्याबाबतचे जे असेल ते आकलन स्पष्ट करण्याचे काम या पोस्टमधून पुरेसे झालेले आहे. काही मुद्दे राहिले असतील तर त्यांवरही यातून प्रकाश पडू शकेल. कवितेचे माध्यम हे जगणे समजून घेण्याचेच एक सर्जक माध्यम आहे. ते काम जगात असंख्य पद्धतींनी चालू असते. असे सगळे समोर येत राहिल्याने आपल्याही अभिव्यक्तीच्या शक्यता, कुवती आणि तऱ्हा वाढू शकतात – या हेतूनेही मी थोडेफार हे काम करत असतो. सारखेच करत राहीन असेही नाही. जगण्यातली अनिश्चितता इथेही असणारच ना !

--- ००० ---

वॅलेस स्टिव्हेन्स

वॅलेस स्टिव्हेन्स हा २० व्या शतकातला अमेरिकेतला एक महत्त्वाचा कवी मानला जातो. १८७९ ते १९५५ हा त्याचा जीवनकाल होता. तत्त्वज्ञान, मानवी कल्पनेची परिवर्तनक्षमता, वास्तव आणि सत्य यांचे चिंतन, विलक्षण प्रतिमा आणि गूढता ही त्याच्या कवितेची वैशिष्ठ्ये होती. मला आवडलेल्या त्याच्या दोन कवितांचे मीच केलेले अनुवाद खाली देत आहे --

१. घर होते मूक आणि जग होते शांत

घर होते मूक आणि जग होते शांत
वाचक झाला पुस्तक; आणि उन्हाळी रात्र

होती जणू सभान असणे त्या पुस्तकाचे.
घर होते मूक आणि जग होते शांत.

शब्द असे उच्चारले जात होते की जणू पुस्तक नव्हतेच तिथे,
पुस्तकाच्या पानावर वाकला होता वाचक हे वगळता,

वाकण्याची इच्छाच होती त्याची, अधिकच अधिकतम असण्याची
एक अभ्यासक ज्याला होते त्याचे पुस्तक सत्य आणि ज्याला

ती उन्हाळी रात्र अशी की एक विचाराची परिपूर्णताच.
घर मूक होते कारण त्याला तसे असणे भागच होते.

ती मूकता होती अर्थाचा एक भाग, त्याच्या मनाचा एक भाग :
त्या पानाकडे जाणारा परिपूर्णतेचा मार्ग.

आणि जग शांत होते. सत्य त्या शांत जगातले,
ज्यात त्याव्यतिरिक्त कोणताच नाही अर्थ, जे स्वतःच

आहे शांत, जे स्वतःच आहे उन्हाळा आणि रात्र आणि स्वतःच
आहे तो वाचक जागत वाकलेला आणि वाचत असलेला.
--- ००० ---

२. नुसते असण्याची कविता

मनाच्या शेवटाशी ताडीचे झाड,
अंतिम विचाराच्या पल्याड, उद्भवते

कांस्य सजावटीचे,

एक सोनपंखी पक्षी
गातो त्या झाडात, मानवी अर्थांशिवाय,
मानवी भावांशिवाय, एक दूरदेशी गाणे.

मग कळतेय ना तुम्हाला की ते नाहीय कारण
आपल्याला खुश वा नाराज करणारे.
तो पक्षी गातोय. त्याचे पंख झळकताहेत.

ते ताडीचे झाड उभे आहे अवकाशाच्या शेवटाला.
वारा वाहतोय हळुवारपणे त्याच्या फांद्यांतून.
त्या पक्ष्याचे अग्निझळाळ पंख झुकलेले खाली.
--- ००० ---

August 17

समता

शरीर आकार शक्ती मेंदूचा आकार
त्यातली रसायने त्यातले वायरिंग
आकलनाची आणि निर्णय घेण्याची पद्धत
या सगळ्यांतच असतो फरक
स्त्री आणि पुरुष यांत
तरीही हवी असते समता

कवीला एक स्त्रीच विचारते
तुला कसे कळते स्त्रीचे मन
इतके कसे ते माझेच वाटते

कवी म्हणतो
मी प्रेम करतो स्त्रीवर
म्हणजे लोपच पावतो
मग फक्त तीच उरते

कवी म्हणतो लवचिकता हवी
मुलायमता नाजुकता हवी

भोवतीच्या भिंती वितळवून टाकणारी

जगण्यात समता नाही येऊ शकत
प्रेम येऊ शकते

तू तुझ्या वेगळेपणाच्या समृद्धीत राहा
मी त्याच्या बाहेरून तुझ्याकडे पाहीन
--- ००० ---

A poem need not have a meaning and like most things in nature often does not have.
-- Wallace Stevens.

कवितेला अर्थ असायची गरज नाही आणि निसर्गातल्या बहुतेक सर्वच गोष्टींप्रमाणे तो अनेकदा नसतोच.
-- वॅलेस स्ट्व्हेन्स.

August 16

रस्त्यांच्या सावल्या

तो माणूस होता हुशार
त्याला एक तत्त्व सापडले होते
की बाबा रस्त्यांना सावल्या नसतात
मग हा एक नवाच विचार पाहून
पक्ष्यांनी आणि उंदरांनी त्यात भर घातली
ती अशी की समुद्रालाही नसते सावली
आणि इंद्रधनुष्यालाही

मुंग्यांना हे काहीच पटत नव्हते
त्या म्हणत होत्या की हे तत्त्व मान्य आहे
पण यावर आधारित पूर्ण
जगण्याची व्यवस्था नका लावू
इतर हजारो लाखो गोष्टी
यात कशा मावतील

तो माणूस म्हणाला
इथे स्वर्ग आणायला
आहेच काय दुसरे साधन

विचारांनीच तर दिशा ठरवून
ग्रहणे टाळावी लागतील
विचाराला टोक असू शकते वा धार
पण तो अमर्याद म्हणजे काहीच नसणे
नाही होऊ शकत हे समजूनच जायचे पुढे

मग मुंग्यांनी नाद सोडून दिला आणि होईल
ते होईल म्हणून त्या गेल्या ऑफिसात
--- ००० ---

August 15

पोषक

लिंबाच्या सालीत लिंबाहून अधिक पोषक द्रव्ये असतात, असे प्रसृत झाल्याने, सालीसह जीव खाऊन पिळून केलेले जरा कडवट सरबत चांगलेच म्हणून मी स्वीकारत आहे. मीही त्या पोषकतेवर विश्वास ठेवू शकतो. मला धास्ती एकच आहे की आतल्या खोबऱ्यापेक्षा नारळाच्या करवंटीतच अधिक पोषक द्रव्ये असतात, असे तर कुणी म्हणणार नाही ? !

एकच सत्य

तुझे इतके शब्द
आश्वासकतेत ओसंडणारे
त्यांचे तुझ्या मनातले अर्थ
माझ्या मनातले अर्थ
वेगवेगळे
असे काही नव्हतेच
होते फक्त तू बोलणे
आणि मी ऐकणे

दुतर्फी अर्थहीन
असण्याचे एकच सत्य
दुतर्फी व्यापून
दुतर्फी अर्थपूर्ण
गूढ आणि स्पष्ट
जणू दोघांनाही
माहीतच नसणारे

आणि दुतर्फी हवेसे
जाणीवपूर्वक
--- ००० ---

तू माझी वाट पाहा

तू माझी वाट पाहा
मी आलोच माझ्या नशिबाला हसून

तू माझी वाट पाहा
मी आलोच माझ्या आठवणींची वाट लावून

तू माझी वाट पाहा
पण आता मी तोच नाही येणार

तू माझी वाट पाहा
मी येण्याची शक्यता मावळेपर्यंत

तू माझी वाट पाहा
वाट पाहणे निरर्थक आहे हे कळेपर्यंत
--- ००० ---

बहिरा विदूषक

नर्तकीच्या नखाची
सर नाही येणार
दुभंगलेल्या विचारांच्या विदूषकाला
-- नर्तकीला नसते माहीत तिची गती
आणि विदूषक असतो मूढ
त्याच्या स्थितीबाबत

ढग येणे जाणे
ही काही घटना नसते नर्तकीला --
दुभंगलेला विदूषक येतो दबावाखाली

विदूषक थांबलेला असतो
त्याच्या चापल्यासह

त्याच्या स्वभावात
नर्तकीला असते फक्त नृत्य
तिच्या आरशातून बाहेर पडलेले

विदूषक समजून घेऊ पाहतो
नेमकी कशाने आली घटस्फोटाची वेळ
पण त्याचा स्वभाव
सर्वच सत्यांचे करतो तुकडे

समजणे म्हणजे घटनाच नसणे
हे सांगतेय नर्तकी बहिऱ्या विदूषकाला
--- ००० ---

विजय

यात विजयबिजय कसला --
माझा पराभव स्वीकारण्याचा डाव
तुला कळलाच नाही
असे दाखवण्याचा डाव
तू खेळलीस
मनातून माझा विजय स्वीकारत
इतकेच

मीही मग माझ्या
पराभवाचे ताणून नाही धरले
--- ००० ---

शम्मी कपूर

१४ ऑगस्ट २०११ ला आमचा एक आवडता हीरो वारला. शम्मी कपूर. आज त्याची पुण्यतिथी. बऱ्याच हिरॉईन्सचे पहिले काम त्याच्याबरोबर झाले होते ! त्याच्याबद्दल आदर आणि हेवा वाटण्याचे ते एक कारण होते. तो काही नृत्यनिपुण वगैरे नव्हता पण गाण्याच्या चालीबरोबर अंगाला झटके देण्याची एक त्याची विशेष स्टाईल होती. त्यामुळे, मी त्याचे नाव लचक मुरारी असे पाडले होते. अनेक चित्रपट पडल्यानंतर यश मिळत गेलेला हा नट होता. त्याच्या चित्रपटांतली खूप गाणी प्रचंड लोकप्रिय झाली होती. आताच्या मुलांना आवडणारा स्पीड असलेलीही त्याची गाणी आहेत तशीच संथ गोडवा असलेलीही आहेत. मला आवडणारे त्याचे एक गाणे देतोय – संगीतकार सदाबहार शंकर-जयकिशन आणि गायक अमर अष्टपैलू महंमद रफी – गीत हसरत जयपुरी – चित्रपट ‘ जंगली ‘ -- एहसान तेरा होगा मुझपर --

माझ्या कै. ती. काकांबद्दल एक पोस्ट मी आत्ताच दिलेली आहे. त्यांचीच आणखी एक आठवण देतोय.

नोकरीनिमित्त अहमदनगरला असताना मी डॉ. पी. पी. भागवत यांच्या इमारतीत भाड्याने राहात असे. ते डॉक्टर आयुर्वेद, योग आणि आहार यांचे तज्ञ होते. शिवाय जर्मन कुंडलीशास्त्र आणि हस्तरेषाशास्त्र यांचेही जाणकार होते. त्यांच्या आणि माझ्या फावल्या वेळात आमच्या अनेकदा गप्पागोष्टी होत. त्या वेळी ते, ' सौंदर्य, तारुण्य व आहार ' हे पुस्तक लिहीत होते. त्याचे भाग जसजसे लिहून होतील तसतसे मला ते वाचून दाखवत. मला फार तर सौंदर्याचा रसिक म्हणता येईल पण त्यातला तांत्रिक तज्ञ नाही. ते मांडताहेत तेच अधिक चांगले कसे येईल किंवा अमुक एका शंकेचे निरसन यात यायला हवे, असे उपयुक्त मी बोलत असे. एकदा त्यांनी मला विचारले की, स्त्री-सौंदर्य म्हणजे काय याचे नेमके वर्णन आपल्या संस्कृत वाङ्मयात कुठे आले आहे का आणि ते कसे आहे. त्या काळात मी शनिवारी पुण्याला घरी येणे आणि सोमवारी पुन्हा नगरला जाणे, असे करत असे. मी त्यांना म्हणालो की सोमवारी तुम्हाला नक्की सांगेन. रविवारी मी माझ्या त्याच काकांकडे गेलो आणि त्यांना ती माहिती विचारली. एका मिनिटात त्यांनी मला कालिदासाचा तो संबंधित श्लोक असलेले पुस्तक दिले. बहुतेक ' मेघदूत ' च असावे. तो श्लोक भागवतांनी त्यांच्या पुस्तकात समाविष्ट केला. ' तन्वी श्यामा – ' वगैरे वर्णन असलेला तो श्लोक आहे. भागवतांनी त्यावर असे लिहिले – ' तन्वी ( सडपातळ ), श्यामा ( अप्रसूता – नवयौवना ), म्हणजे कुमारी व नवयौवना, अणकुचीदार दातांची, पिकलेल्या तोंडल्याप्रमाणे लाल ओठांची, मध्ये ( मध्यभागी – पोट ) क्षामा ( कृश, लहान ), चंचल दृष्टी, खोल नाभी असलेली, श्रोणिभारात – नितंबभारामुळे हळूहळू चालणारी, स्तनाभ्याम स्तोकनम्रा – पुष्ट स्तनांच्या ओझ्यामुळे वाकलेली. ' पुढे त्यांनी असे म्हटले की, ' सौंदर्याचे हे वर्णन थोडे अतिशयोक्त असले तरी स्तने व नितंब पुष्ट पण पोट लहान, हे मत स्पष्ट आहे. ' त्या पुस्तकाच्या ' विषयप्रवेश ' या प्रकरणात डॉ. भागवतांनी म्हटले की, ' नाटककार सी. पी. देशपांडे यांनी विभागवार चर्चा केली, ती मोलाची ठरते. '

सारांश, माझ्या त्याच काकांच्या मदतीने त्या पुस्तकाची एक महत्त्वाची गरज मी पूर्ण करू शकलो होतो !
--- ००० ---

आठवते का अभिजितने बसवलेले माझे नाटक ?
तुझ्या वाढदिवसाच्या तुला खूप शुभेच्छा !

माझे कै. ती. काका पुण्यातल्या एसपी कॉलेजात इंग्रजीचे प्राध्यापक होते. नंतर ते कोपरगावच्या कॉलेजात प्राचार्य झाले. इंग्रजी, संस्कृत आणि मराठी या तिन्ही भाषांतल्या साहित्याचा त्यांचा अभ्यास होता. तत्त्वज्ञान, अध्यात्म आणि शास्त्रीय संगीत हेही त्यांचे गंभीर आवडीचे विषय होते. लहानपणापासून मला त्यांच्याशी अनेकदा गप्पा मारायला मिळणे हे माझ्या साहित्याच्या आवडीला खूप उपकारक झाले. याचबरोबर, आमच्या सर्व नातेवाईकांत विनोदाची उत्तम जाण असलेले आणि अगदी सहज अत्युत्तम विनोद करणारेही तेच होते. त्यांच्याबरोबर बोलणे हे कुणालाही समृद्ध करणारेच असे. त्यांनी मांडलेली ही अद्वैत तत्त्वज्ञानाची गंमत आठवली, श्रीकृष्ण, ज्ञानेश्वर या मार्गे --

खेळ खेळावा क्रिकेटू ।
मीच बॉल मीच फळकुटू ।
मीच माझियावेरी आपटू ।
मीच धावे भिरिभिरी ।।
--- ००० ---

जळमटे

हरलेले लोक जिंकलेल्यांवर
दुगाण्या झाडत बसतात
आणि अधिकच थकत जात
भविष्यातल्या शक्यताही
कमकुवत करतात

हे तिला पटत नसे
ती म्हणे मानवी जगणे
जुन्या जळमटांसारखे असते
त्याला एकच अशी पद्धत नसते

तिचा प्रश्न ब्रेकपचा होता
त्याने दिलेल्या दुःखाचा
तिला बदला घ्यायचा होता
आणि तो तर म्हणत होता
की ब्रेकपने तो दुःखीबिःखी होणार नाही

मग उपयोग काय तो धक्का देऊन
हा जास्त विचार करत बसावे
तर उलट त्यालाच मिळू शकते संधी
धक्का देण्याची आणि मग तिलाच उलट
दुःखही होऊ शकते आणि अपमानितही
वाटू शकते आणि निर्णयविलंबाची खंतही

जळमटे हाच असतो सारांश हे ज्ञान काही
शांतता देणारे नसते हे ज्ञान तिला आता होत होते
--- ००० ---

सूर्याला येतो ताप

कोणतेच आडपडदे नसलेला सूर्य
विचार करकरून काळवंडतो
रात्रीच्या सुखाचे

खरे तर घड्याळ पुढे नेणे

हे असते त्याचे काम
तर तो राहतो थांबून साकळून

निसर्गात कुठेच नसते
हे विचारांचे लफडे ही कसली
बाधा हे कुणालाच कळत नाही

सूर्याला येतो ताप त्याचे अंग
दुखू लागते तेव्हा मात्र तो
शहाणा होऊन वर्तमानात येतो
--- ००० ---

Champra Deshpande wrote on Sukhada Korde's timeline.

आमचा तुला शुभाशीर्वाद आणि तुम्हा सर्व कुटुंबियांना शुभेच्छा !

सोनी टीव्हीवर ' हास्यजत्रा ' बघतोय --
विशाखा सुभेदार आणि समीर चौगुले --
छान मजा आहे !

August 9

Champra Deshpande wrote on Aabha Velankar's timeline.

खूप शुभेच्छा !

Champra Deshpande wrote on Sudheer Rasal's timeline.

खूप शुभेच्छा, सर !

समाधी

कुणी डोळे मिटले म्हणजे
सगळे जग समाधीत गेले असे नाही
वाटाण्याच्या अक्षता
जेव्हा लपूनछपून लावल्या जातात

विवाहाची शक्यताच नसलेल्या
पावसाला
तेव्हा साहजिकच पाऊस विचारणारच

पावसाला अनुभव असतो पोकळीचा
याचे ना उत्तर येणार असते ना कबुली
पत्र्यांवर खूप आवाज केला
तरी खोट्या समाधीपुढे काही नाही चालत
हे त्याला माहीत असते

त्याला हेही माहीत असते की
अशा समस्येवर विचार करणेही
असते त्या समस्येपासून पळून जाणे

तो फक्त एक वाटाणा
हवेत उडवून दाखवतो
आणि पुढच्या मुक्कामाला निघून जातो

खोट्या समाध्या न लावणाऱ्या व्यक्तीही
असतात त्याच्या खुल्या जगण्यात

स्वतःच्या पोकळीतून बाहेर पडणे त्याला माहीत असते
--- ००० ---

स्वामित्वहक्क
आपल्यावर कुणाचा नसावा,
आपला मात्र दुसऱ्यावर असणार !

उदबत्ती

अव्याहत वाह्यातपणा करणारे
बारमधले पुजारी बाह्या सरसावून
जेव्हा सारवसरव करतात
पूजासाहित्यातल्या घोळाची
तेव्हा गिऱ्हाइके विचारत असतात
त्यांच्या मनांच्या बिळांतून

बाहेर पडलेले आध्यात्मिक प्रश्न
बिलांच्या पेमेंटची वाट पाहणाऱ्या वेटर्सना

बेटर लेट दॅन नेव्हर असे म्हणत
मनीसेव्हर प्रॅन्स सरकवले जातात हातांत
बाहेर पडण्यापूर्वी कुष्ठरोगी मातांच्या
पिऊन तर्र झालेल्या हसतमुख

प्रश्न असतातच आध्यात्मिक
हे सगळेच स्वीकारतात
पण त्यात किती वेळ घालवणार
म्हणून सगळे कुरकुरतात

दुःखाने मेलो तरी बेहत्तर असे म्हणायची
सवयच लावतात सगळे आपापल्या मुलांना
आणि यावर बारमालक खुश असतात

हातोहात मिळणारे तहहयात गिऱ्हाईक
ही या सगळ्यात त्यांची कमाई असते
उदबत्ती लावून नम्र होता होता
--- ००० ---

मथुरेचा बाजार

रात्रीच्या मोहात पडलेले अवडंबर एका कॅनॉलचे
हलकेच घुसते विद्यार्थ्यांच्या पुस्तकांत
जेव्हा पहाटेचे साडेपाच झालेले असतात

अजून कुणीच म्हणणार नसते शोकगीत
लुळ्यापांगळ्याअंधळ्या चित्रपटांचे
कारण आकाशात उडालेले कारखान्यांचे मुकुट
लक्ष ठेवून असतात कधी जाग्या होतात
रस्त्याकडेच्या सोनेरी टपऱ्या यावर

माणसाचे विचार जसे कधीही टपून असतात

संघर्षांच्या संधींसाठी तसेच स्वप्नांचे साठे
तिष्ठत असतात युगानुयुगे वाट पाहिलेल्या होकारांसाठी

आपले नसलेले असे असेल का काही बिनाकटकटीचे
यावर मग परिसंवाद भरवायचे ठरते पानटपऱ्यांचा
सापडले तर आता त्यांनाच काही सापडेल
असे वैचारिक अवगुंठन बाळगत नाइलाजाचे

विद्यार्थ्यांना यांतले काहीच नाही पटत
त्यांना वाहून जायचे असते
ॲसिडच्या कॅनॉलमधून
एकविसाव्या शतकातल्या
मथुरेच्या बाजाराला
सगळीकडे
गोपीच असतील स्मार्ट रिसेप्शनिस्ट या खात्रीने
--- ००० --
जागतिक कला

इथे फुटाणेही मिळतील आणि पिझ्झाही मिळेल
जागतिक कलेच्या चर्चा आपापल्या
टोळ्यांना अनुकूल कशा होतील
याच्या युक्त्याही चघळल्या जातील
सत्ताधारी बदलण्याचे ध्येय ठेवून

हे अनुभव येऊ द्यात ते तर हवेतच
आपापले जग दुःखे हायलाईट व्हायला हवीत
मुलांना हे वाचू द्या हे शिकू द्या
लोकलमधूनच ती ग्लोबल होतील
बघा ना नोबेल भाषणे
ते साले संपूर्ण जागतिक इतिहास
आणि स्वतःच्या देशाचे इत्थंभूत कल्चर आणि समस्या
यांना कसे भिडतात माणुसकीने

ना तत्त्वज्ञान ना खुला इतिहास ना करुणा
अभ्यासक्रमात मुलांच्या माथी बसलेले सम्राट
महान मान्यतांची वर्गवारी आणि वाटप
यांवर पोसलेले आत्ममग्न शिलेदार

मावळे वारकरी भक्त क्रांतिकारक मूल्यचक्र
फिरवणारे भांडल्याशिवाय कसली जाण
या तत्त्वाचे अभिमानी संघटक झेंडेवाले

माणसाच्या अवधानाचे तुकडे करून
इथल्या इथेही एकमेकांची फिकीर न करणारे तुसडे शत्रू
ज्ञान प्रेम माणुसकी न्याय स्वातंत्र्य या शब्दांचे पुरस्कर्ते
--- ००० ---
करियर

घरच्या घरी शांतपणे
आपली आपण कॉफी पिणे वेगळे
आणि लग्नसमारंभात मेसेजगिरी
करत बसणे वेगळे कोणत्याही कारणाने
केसगळती हा विषय निघाला
तर शाळेतले दिवस आठवणारच
पर्यायच न राहिल्याने
पडणाऱ्या सरकारप्रमाणे

बुफे जेवताना एकही डाग नाही पडत
शर्टावर असे जमत नसेल तर सरळ
आत्महत्येचे विचार घोळवत ठेवावेत
डोक्यात सूर्याची भीतीही बाळगत

तत्त्व म्हणजे एकच पाळावे
परान्न सेवन करणे रोज
हेच असावे जिवाभावाचे जंगल
वृक्षवल्ली हे गाणे म्हणत
आणि किंवा जरी मनात कण्हत
फारशी करियर न घडल्याने

अरे छोड दो क्या है जिंदगी
असे म्हणत आपले नाव छापून आलेला
कॅरम खेळल्याबाबत वीस वर्षांपूर्वीचा आपल्या
ऑफीस वार्षिकाचा अंक दाखवावा नातवंडांना
सहज बोलता बोलता तिसऱ्यांदा
--- ००० ---

आदर्श जगणे

ब्रेकपच्या घटनेचे
दुःख भोगणारा नास्तिक
हसतो धार्मिकाला
तपात एका पायावर उभ्या
समाजकार्याची घट्ट भूमिकाच
आदर्श जगणे म्हणत
--- ००० ---

त्वचा

पृथ्वीच्या त्वचेला
मुळीच इजा न करता
मी करतो हे विचार
कारण ते असतात
प्रत्यक्षात अस्तित्वातच नसलेल्या
आभासी सुखाचे

आभासी सुख सोलत राहते
माझ्या मनाची त्वचा
हे कळूनही मन करत राहते
पुन्हा पुन्हा पुनरावृत्ती

आभासी सत्य
हे आभासी नसतेच
ते प्रत्यक्षच देते
सुखाचे रक्तबंबाळ क्षण

आभासांची अशी
अब्जावधी कथानके
पाहिली असणार पृथ्वीने
सर्व सत्ये कदाचित
एकसमान समजून

सुखाची शिक्षा भोगणारी माणसे

तिला नवी थोडीच असतील

--- ००० ---

मोजूनमापून

मला हवे ते भाषेचे रूप
ते हेच हे कळते तेव्हा
मी कमी बोलतो
आणि तिलाच उद्युक्त करतो
तिचा शब्दकोश खोलायला

तिच्याकडे असतो
अजब आत्मविश्वास
माझे कोणते शब्द जाऊ द्यायचे
आऊटसाईड द ऑफ स्टंप
हे तिला सहज कळते आणि तरीही
वेगळ्याच विषयावर बोलताना नंतर
तिने माझ्या आधीच्या शब्दांवरचे
तिचे सखोल अबोल निरूपण
म्हटले तर नकळत
देऊन टाकलेले असते

भाषेचे हे रूप घडता घडताच
सहजच हे असे परिपक्व झालेय
हे येते लक्षात
तरीही मीही नम्र आणि सौम्यच
असायला हवे असे ती म्हणत नाही

मग मला कळते माझे शब्द कोणतेही असोत
मोजूनमापून असाच सूचकपणा असणार आहे
भाषेच्या या रूपात

--- ००० ---

कविता आणि कवी

नेहमी
कवीच देतो कवितेला शब्द

असेच असते कवितेचे अवतरणे
पण अचानक कधीतरी
लहर लागल्याप्रमाणे
कविता फक्त खूण करते कवीला
आणि स्वतःच देऊ लागते शब्द

कवी काहीसा चकित होत
कवितेचे हे प्रेम येऊ देतो
हे तर अधिकच अर्थपूर्ण
असे म्हणत
येणाऱ्या अर्थांवर
मुळीच ताबा न ठेवता

आता कविताच कवीचा
ताबा घेत असली तरी
अनपेक्षितपणे
किंवा खरे तर अपेक्षेप्रमाणे
कवीला हवे तेच अर्थ
आकार घेत राहतात

अंतिमतः ताबाहीनपणे
निरर्थकतेच्या बिंदूवर
स्फोट पावणारे
नेमके
--- ००० ---

'सात दिवस_सात आवडणाऱ्या_पुस्तकांची_मुखपृष्ठे या मालिकेतील आजचा माझ्यापुरता शेवटचा म्हणजे सातवा दिवस. त्यानुसार आजचे हे शेवटचे मुखपृष्ठ. खरं तर मला आवडलेली पुस्तके आणि त्यांची मुखपृष्ठे शेकड्याने भरतील. पण दिलेल्या वेळेची मर्यादा आणि मालिकेचे ब्रीद वाक्य मला इथेच थांबायला सांगते आहे. हे एक. दुसरे म्हणजे ज्या पुस्तकांनी दीर्घकाळ आपल्या स्मृतींचा क़ब्जा घेतला, ती पुस्तके साहजिकच ‘आवडती’ या श्रेणीत मोडतात. मागील सात दिवसांत ज्या पुस्तकांची मुखपृष्ठे इथे पोस्ट केली, ती कादंबरी, कविता, वैचारिक लिखाण या कॅटेगरीतील मला वाटतील अश्या प्रातिनिधिक स्वरूपाची आहेत. शिवाय मालिकेच्या थीमला धरून असण्याचं बंधन होतंच. यापलीकडे अनेक पुस्तके अशीही आहेत जी मला आशयदृष्ट्या खूप आवडतात. पण त्यांची मुखपृष्ठे तितकीशी आवडली नाहीत. म्हणून ती इथे पोस्ट केली नाहीत. असे असले तरी माझ्या संग्रहात असलेल्या प्रत्येक पुस्तकाचे आपापले मोल आहे. तसे ते असतेच. मी आज जो कुणी आहे (खरंतर मी कुणीच नाहीय, याचे भान मला या पुस्तकांनीच दिले) त्याबद्दल या पुस्तकांचा मी ऋणी आहे आणि ताउम्र ऋणी राहीन. आजचे पुस्तक ‘नाटक’ या विभागातले आहे. बुद्धिबळ आणि झब्बू नाटककार : चंद्रकांत प्रभाकर देशपांडे बुद्धीबळात असलेल्या चालींचा तिरकेपणा आणि समोरच्याला झब्बू घालतांना होणारी मानवी मनाची गुंतागुंत या

पुस्तकाच्या मुखपृष्ठात अगदी तंतोतंत पकडली आहे. मी आजवर जितक्यांदा हे नाटक वाचले आहे तितक्यांदा त्यातल्या आशयाची, त्यातल्या हस-या नाट्याची आणि मानवी नात्यांतल्या बुद्धिबळ आणि झब्बूच्या खेळातली अपरिहार्यता आणि वैश्विकता (Universality) माझ्यापूरती अधिकाधिक टोकदार होत गेली आहे. माझ्या मते, मराठीत लिहीलेले हे जागतिक दर्जाचे नाटक आहे ! पूर्णविराम. □'

सात दिवस_सात आवडणाऱ्या_पुस्तकांची_मुखपृष्ठे

या मालिकेतील आजचा माझ्यापुरता शेवटचा म्हणजे सातवा दिवस. त्यानुसार आजचे हे शेवटचे मुखपृष्ठ. खरं तर मला आवडलेली पुस्तके आणि त्यांची मुखपृष्ठे शेकड्याने भरतील. पण दिलेल्या वेळेची मर्यादा आणि मालिकेचे ब्रीद वाक्य मला इथेच थांबायला सांगते आहे. हे एक. दुसरे म्हणजे ज्या पुस्तकांनी दीर्घकाळ आपल्या स्मृतींचा क़ब्ज़ा घेतला, ती पुस्तके साहजिकच ‘आवडती’ या श्रेणीत मोडतात. मागील सात दिवसांत ज्या पुस्तकांची मुखपृष्ठे इथे पोस्ट केली, ती कादंबरी, कविता, वैचारिक लिखाण या कॅटेगरीतील मला वाटतील अश्या प्रातिनिधिक स्वरूपाची आहेत. शिवाय मालिकेच्या थीमला धरून असण्याचं बंधन होतंच. यापलीकडे अनेक पुस्तके अशीही आहेत जी मला आशयदृष्ट्या खूप आवडतात. पण त्यांची मुखपृष्ठे तितकीशी आवडली नाहीत. म्हणून ती इथे पोस्ट केली नाहीत. असे असले तरी माझ्या संग्रहात असलेल्या प्रत्येक पुस्तकाचे आपापले मोल आहे. तसे ते असतेच. मी आज जो कुणी आहे (खरंतर मी कुणीच नाहीय, याचे भान मला या पुस्तकांनीच दिले) त्याबद्दल या पुस्तकांचा मी ऋणी आहे आणि ताउम्र ऋणी राहीन.

आजचे पुस्तक ‘नाटक’ या विभागातले आहे.

बुद्धिबळ आणि झब्बू
नाटककार : चंद्रकांत प्रभाकर देशपांडे

बुद्धीबळात असलेल्या चालींचा तिरकेपणा आणि समोरच्याला झब्बू घालतांना होणारी मानवी मनाची गुंतागुंत या पुस्तकाच्या मुखपृष्ठात अगदी तंतोतंत पकडली आहे. मी आजवर जितक्यांदा हे नाटक वाचले आहे तितक्यांदा त्यातल्या आशयाची, त्यातल्या हस-या नाट्याची आणि मानवी नात्यांतल्या बुद्धिबळ आणि झब्बूच्या खेळातली अपरिहार्यता आणि वैश्विकता (Universality) माझ्यापूरती अधिकाधिक टोकदार होत गेली आहे.

माझ्या मते, मराठीत लिहीलेले हे जागतिक दर्जाचे नाटक आहे !

पूर्णविराम.

मुंबईत जोरदार पावसाची शक्यता
अत्यावश्यक असेल तरच घराबाहेर पडा
अन्यथा घरामध्ये पडू नका !
-- टीव्ही.
परका

खरे तर मी बाहेरचा परका आहे

माझ्या असण्यातली फॉरेन बॉडी
हे मी पाहिलेले असूनही
मी व्यापतोय हे घर मालक म्हणून

मालक असण्याचे ताण
व्यापतात माझे शरीर
आणि दुखू लागतात हाडे

तेव्हा मी तयार होतो
मालकी सोडायला

मला वाटते की
मालकी सोडून मी होईन
खुशाल मालक
ताजातवाना

यापेक्षा माझे परकेपण
दिसलेच नव्हते
तेच बरे होते
असे स्पष्ट कळावे
अशी होते तडफड

मी परका होण्याची नसावी ही भीती
जगच नाहीसे होण्याची असावी
--- ००० ---

घट्ट वाफ

आपल्या घरात घट्ट वाफ
जगून झालेल्या वर्षांना झाकून टाकणारी
आणि गुदमरवणारी अनुभवाच्या भाषेला
अशा क्षणाची कल्पनाही
नात्यांचे जंजाळ करते
संशयास्पद

आपण पाहिलेली तीर्थक्षेत्रे
हात जोडून उभी असल्याप्रमाणे

पराभूत आणि केविलवाणी
पण स्मृती सोडून जायला घाबरणारी

दुःखावेग आणि भीती असह्य झालेला धोंडा
स्वतःहून पडत असणार नदीत
मृत्यूत स्मृती नष्ट होणारच या खात्रीत

प्रेमाचे उत्तेजक प्रवाह
जे कधी ओलांडून गेले होते
काळाच्या सीमा
आता फक्त झालेले
एक जुने मातकट कोळिष्टक

असा क्षण घडवण्यासाठी
पूर्ण विश्वाने कामाला लागावे

इतके आपण महत्त्वाचे आहोत की काय
--- ००० ---
आज आपल्या चॅनेलवर काही
महिला भगिनी
आलेल्या आहेत --

शिल्प

अनावश्यक वाटणाऱ्या
कपच्या उडवून
मनाचे शिल्प साकारले
हे सुंदर कसे वाटणार सर्वांना
जे स्वतःच उडवले गेलेत
त्यांना वाटणाऱ्या माझ्या माणूसघाणेपणातून

हे जग काही मी घडवलेले नाही
मग माझ्या निर्णयांना जबाबदार मीच कसा

आता शिल्प म्हणून जे काही उरले आहे
तेही जडच आहे आणि कंगोरे असलेले
कधी अक्राळविक्राळ कधी अचकटविचकट

आणि कधी लोभस सुखदेवघेवी

फक्त प्रमाण खाली आणलेय जगाचे
आधी गरीब व्हा मग सत्याचे बघा
हे पटल्याने किंवा समजल्याने

आणि अंतिम म्हणजे हे शिल्पही
नष्ट होऊ शकते पूर्ण ताणशून्यतेत
हे माहीत झाल्याने मी व्यक्त करतो
व्यक्तिशून्यतेचे स्वातंत्र्य

पण लोक मला अमुक एक कवी समजतात
--- ००० ---

गुरुत्वाकर्षण

मी काही मांडणीशिल्पे केली
चित्रे तर खूपच काढली
माझ्या प्रत्येक कलाकृतीत मी
गुरुत्वाकर्षणाचे बारा वाजवले

मन म्हणजे अमुकच हे खोटे असते
हेच मला दाखवायचे होते

बघताना काहीजण तिरके होत
काहीजण जमिनीवर पडून पाहात
काहींचा तर तोलच जाई
काही म्हणत भोवळ येते हे पाहून
कहर म्हणजे काहींना
बेशुद्ध पडायचीच भीती वाटे

अभिप्राय आणि प्रतिक्रिया अनेक येत
अचंबित झालो दिङमूढ झालो
मला माझी पहिली प्रसूती आठवली
हे आरोग्यविघातक आहे
निसर्ग नाकारणे हे लोकांना
वेडे करण्याचे पहिले पाऊल आहे

काहीजण तर म्हणाले की त्यांच्या भावना दुखावल्या
मग दंगली करण्यापेक्षा जा कोर्टात मी म्हणालो
तुम्ही कलेच्या वाऱ्यालाही नका येऊ
असा त्यांना सल्लाही दिला
--- ००० ---

हात

वीस लाखांचा मोबाईल
सोन्याचा आणि सात हिऱ्यांनी मढवलेला
कसा आला होता माझ्या हातात ते नका विचारू
आकाशात उडालेले गंजलेले पत्र्याचे डबे
पक्षी समजून उड्या मारत मी
अद्वैत तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला होता
आहाराचे काही नियम पाळत

तरीही पोट दुखले तरी मी हवालदिल होत
शास्त्रीय संगीत ऐकण्याचा हट्ट धरून बसे
कारण त्याने बरे वाटते असा माझा अनुभव होता

तर माझ्या याच उजव्या हातात आला होता तो
अडीच मिनिटे म्हणून मी रोज
संध्याकाळी माझ्या या हाताला सजवून
त्याला लोकांच्या दर्शनासाठी ठेवू लागलो
तो हात शुभ आहे असे सगळीकडे पसरले
लोकांच्या अनुभवांचा एक ग्रंथच झाला

तो हात मस्तीमुळे कधी कधी माझ्याशीही
मग्रुरीने वागू लागला पण आता मला माघार घेता येई ना
खूप फायद्यासाठी थोडा त्याग करावाच लागतो ना

हे सगळे कळले एका भूखंडप्रिय राजकीय पुढाऱ्याला
तेव्हा मी हादरलो कारण निरोपच आला ना
“ ये हाथ मुझे दे दे ठाकूर ये हाथ मुझे दे दे “
--- ००० ---

झोपेवर

ॲलर्जीने जगाला खाज सुटते
जग घेते लोरिटिडीन
आणि नकळत हळूहळू
झोपी जाते

जागे झाल्यावर
तोल सावरण्यासाठी
जग घेते स्टुजेरॉन
आणि पुन्हा झोपी जाते

झोपेत जग
झोपेवर घेते स्वप्न
आणि हळूहळू जागे होते
जागेपणात ते झोप टाळत राहते
--- ००० ---

नॉर्मल जग

मने तुंबलेली माणसे
बाहेर पडतात
लोकल्स बंद असल्या तरीही

प्रचंड शहरातली
प्रचंड हॉटेल्स
आणि हॉस्पिटल्स
रुबाब सांगत राहतात
संपर्कहीन

खिशात पैसे नसलेली
आशाळभूत माणसे असतात
एकाच इच्छेत की जगात पोलीस नसावेत

तुरळक रहदारीच्या रस्त्यांवर
हरणे मोर आणि माकडे
चैनीत बागडतात

पक्ष्यांनाही आकाश
जरा अधिकच मोकळे वाटते

मास्क घातलेली माणसे
भोके पाडू पाहतात मनांना
श्वासोच्छवासासाठी भीती आवरत

चार वस्तू घेऊन पुन्हा घरी परतणे आता
भागच असते हेच नॉर्मल समजून जग
--- ००० ---

मारेकरी

कवितेत मी शब्द
पूर्ण पिळले
तेव्हाच माझे मारेकरी हजर झाले
त्यांना मी दिसलो नाही

त्यांना शंका आलीच
की मी कवितेत असणार
म्हणून त्यांनी तिला घेरले
चहूबाजूंनी कुठूनही
अर्थ निसटून सुटू नये
अशा बंदोबस्ताने

तरीही त्यांना काही कळे ना

त्यांना ऐकू जाईल असे मी बोललो
कवितेतून निःशस्त्रपणे –
तुम्हाला ही कविता न कळणे
हेच मला मारणे आहे
हे लक्षात घ्या

फक्त माझ्याबरोबर तुम्हीही मराल
त्याला आता इलाज नाही

आपण हा सोहळा

एकत्र साजरा करू या

--- ००० ---

राज कुमार के बेस्ट सीन्स - Raaj Kumar - Best Scenes Compilation - Jukebox
youtube.com
आमचे कॉलेज – इस्माईल युसुफ कॉलेज

मुंबईत जोगेश्वरी पूर्वेला हे कॉलेज आहे. तेव्हा रूपारेल कॉलेज म्हणजे सुंदर मुलींचे कॉलेज आणि हे आमचे म्हणजे मुंबईवरून ओवाळून टाकलेले कॉलेज, असे समजले जाई. पण कॉलेजचा परिसर म्हणाल तर नंबर वन. हे एका छोट्या टेकडीवर आहे – उत्तम झाडी आणि सुंदर निसर्गयुक्त ! मला एस एस सी ला उत्तम गुण होते. अंधेरी ते बोरिवली या सर्व केंद्रांत मी पहिला आलेलो होतो. त्यासाठीचे लायन्स क्लबचे पारितोषिकही मला मिळालेले होते. मला मुंबईत कोणत्याही कॉलेजात प्रवेश मिळाला असता. मला इंग्रजीत एम ए करून त्या विषयाचा प्राध्यापक व्हायचे होते. माझी ही इच्छा लक्षात घेऊन, माझ्या वडिलांच्या ओळखीच्या एका ज्येष्ठ प्राध्यापकांनी असा सल्ला दिला की याला इस्माईल मध्ये घाला. इस्माईल आणि एल्फिन्स्टन ही मुंबईतली दोन सरकारी कॉलेजेस. एल्फिन्स्टन दर्जासाठी प्रसिद्ध होते, तसे हे नव्हते. पण तिथे इंग्लिशच्या विभागप्रमुख होत्या मिस होमाई जे. श्रॉफ – ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या एम ए आणि पूर्ण आयुष्यच वाङ्मयाला वाहिलेल्या. त्या वेळी मुंबईत इंग्रजी शिकवण्यात तीन प्राध्यापक ग्रेट म्हणून ओळखले जात. एक म्हणजे प्रा. बॅनर्जी, दुसरे विंदा करंदीकर आणि तिसऱ्या या श्रॉफ बाई ! मी या श्रॉफ बाईकडून ‘ मॅक्बेथ ‘ आणि चॉसरच्या ‘ कँटरबरी टेल्स ‘ शिकलो हे माझे भाग्यच म्हणावे लागेल. या बाई तशा धिप्पाड होत्या आणि यांचा कॉलेजात खूप दरारा होता. यांच्या समोर बसून आम्ही तीन विद्यार्थी शिकू शकतो यासाठीही कॉलेजात आम्ही आदरपात्र होतो ! एखाद्या गुंड मुलाच्या पाठीत गुद्दा मारायचीही या बाईची हिंमत होती ! मी ग्रांट रोडला एकदा त्यांच्या घरी गेलो होतो. घरात जणू एक मोठे वाचनालयच होते. “ कधीही ये आणि यांतली तुला हवी ती पुस्तके वाचायला नेत जा “ असे मला त्या म्हणाल्या होत्या. कॉलेजच्या स्नेहसंमेलनाच्या दिवशी मी त्यांना सिगरेट पितानाही पाहिले होते. तेव्हा ते प्रचंड अप्रूप होते. मला एकदा त्यांनी विचारले होते की अमुक प्राध्यापिका कशी शिकवते ? मी काही बोललो नाही, तर म्हणाल्या, ते जाऊ दे, ती स्लीव्हलेस घालून येते, जवळ बसून बघायला तरी छान वाटते ना ? या असल्या संवादांचे अस्तित्वच मी कधी पाहिले नव्हते ! असो. सांगत बसल्यास त्या कॉलेजच्या बऱ्याच आहेत आठवणी. बी ए झाल्यावर, बास आता शिक्षण म्हणून मी तो मार्ग सोडला, हा भाग वेगळा. इंग्रजीचा प्राध्यापक होणे ही आपल्या बसकी बात नही, हे मला समजले होते.

हे सगळे आठवायचे कारण म्हणजे काल काही जुनी गाणी ऐकताना, माझ्या आवडीचा नट राजकुमार याच्या गाजलेल्या संवादांचा एक व्हिडियो समोर आला. तो नट डायलॉग किंग म्हणून प्रख्यात होता. तो पाहू लागलो तर पहिल्याच दृश्यात आमच्या कॉलेजचे दर्शन घडले ! परिसर सुंदर असल्याने तिथे अनेक हिंदी चित्रपटांची चित्रीकरणे होत असत. इमारत दगडाची असल्याने ती बाहेरून कोर्टाची वगैरे वाटू शकते. या दृश्यात ती तशीच दाखवलेली आहे. त्याची लिंक खाली देतोय.

या कॉलेजाचा मराठी साहित्याशीही चांगलाच संबंध आहे. इथे प्राध्यापक वा विद्यार्थी म्हणून येऊन गेलेले मराठी लेखक

--

प्राध्यापक
बा. सी. मर्ढेकर ( कवी, कादंबरीकार, समीक्षक. )
पु. शि. रेगे ( कवी, कथाकार, नाटककार, कादंबरीकार आणि समीक्षक. )
शंकर वैद्य ( कवी आणि समीक्षक. )
विद्यार्थी
पु. ल. देशपांडे ( लेखक, नाटककार, अभिनेते, संगीतकार, वगैरे – महाराष्ट्राचे हरहुन्नरी लाडके व्यक्तिमत्व. )
चं. प्र. देशपांडे ( महाराष्ट्राला फारसा माहीत नसलेला नाटककार, कवी. )

आता ही घ्या ती लिंक आणि बघा आमचे कॉलेज --

https://www.youtube.com/watch?v=rf9T18lPT5g

--- ०००---

July 2020
July 30

ते वाईट हे चांगले

भूतकाळावर बेतलेला धार्मिक द्वेष वाईट
पण तसाच जातिद्वेष चांगला

तुमचा धर्माभिमान वाईट
पण त्यांचा चांगला

देवदेवतांच्या विटंबनेने भडकणे वाईट
पण मानवी विभूतींच्या समर्थनीय

पुराणांचे दाखले वाईट
पण इतिहासाचे सारखे द्या

संतांचा गवगवा हे ढोंग आहे
पण मार्क्सचा गवगवा बुद्धिमान

योग ध्यान अद्वैत ही बकवास
पण नथिंगनेस ग्रेट

प्रत्येकाचे वास्तव वेगळे का असे ना
पण वास्तववाद महान पण फँटसी खोटी

तुला कळते ते पोरकट
पण मला कळते ते प्रगल्भ

तुला तुझे खरे वाटणे हा वेडेपणा आहे
सरळ माझे खरे सत्य स्वीकार
--- ००० ---

Akela Hoon Main Is Duniya Mein - Mohammad Rafi Hit Songs - S D Burman Hindi Songs
youtube.com
महंमद रफीच्या माझ्या अनेक आवडत्या गाण्यांपैकी हे एक --

इतिहास टाकून

कुठल्याही परिस्थितीत
आपण जगण्यातल्या अनिश्चिततेचे बळी ठरलो
असे होऊ नये म्हणून मी इतिहासाचा अभ्यास सुरू केला
हे गृहीत धरून की काही तरी शिस्त असणारच
अन्यथा बेशिस्त हा शब्दच नसता आला भाषेत

मला प्रेरणा स्फूर्ती अस्मिता असले बालिश काही नकोच होते
इतके कमकुवतही नव्हते माझे मन
की इतिहासाच्या सततच्या पाठांतरा अभावी
चेहरे पाडून मरत राहावे लागेल

सूर्याच्या आडून आणि चहा पिता पिता
एवढाच होता माझा विचार
की राजकारणात यशस्वी व्हायचा आपला विचारही नाहीय
तर हवाय कशाला आपल्याला आटापिटा लाखांचा पोशिंदा होण्याचा
किंवा अभिमान धर्माचा किंवा भाषेचा किंवा पक्षाचा किंवा गरिबांचाही

अत्यंत अप्रदर्शनीय कान पाडून निःशस्त्र जिंदगी
मान्य केली तरी पटकन चढवता येणारी वाघनखे
बाळगावीच लागतात हे एवढे एक तत्त्व एक प्रेरक धडा

म्हणून इतिहासातून आलेले मला मान्यच होते

म्हणून मी फक्त धोके कमी आणि जगणे जास्त
एवढेच शोधत होतो – मागत नव्हतो काहीच कारण देव
स्वतःच अनिश्चित आहे हे मी जाणून होतो --
माझा इतिहास टाकून मी पुरेसा नम्र राहायला तयार होतो
--- ००० ---

## चांगली कविता

"A good poem is a contribution to reality. The world is never the same once a good poem has been added to it. A good poem helps to change the shape of the universe, helps to extend everyone's knowledge of himself and the world around him."

— Dylan Thomas

" चांगली कविता ही वास्तवाला मिळालेली एक देन असते. एकदा का एखादी चांगली कविता जमा झाली की जग कधीच आहे तसे राहू शकत नाही. चांगली कविता विश्वाचा आकार बदलण्यात साहाय्य करते, प्रत्येकाचे आत्मज्ञान वाढवते आणि त्याचबरोबर भोवतीच्या जगाचेही. " – डिलन थॉमस.

हा फक्त ३९ वर्षे जगलेला एक विलक्षण कल्पक कवी. मानवी जगण्यातली एकात्मता हा त्याचा प्रमुख आशय असतो, असे एका समीक्षकाने म्हटलेले आहे. त्याला सुसंगत असेच हे त्याने उच्चारलेले वाक्य आहे. 'Light Breaks Where No Sun Shines' ही त्याची एकच कविता वाचूनही टी. एस. एलियट हा अत्यंत प्रभावित झाला होता. एका कवितेवरून कवीची योग्यता ओळखणारे आणि तसे जाहीरपणे म्हणायची हिंमत असलेले लोक इथेही जन्माला येवोत, असे आपण म्हणू शकतो.

तर डिलनचे असे म्हणणे आहे की एक चांगली कविता निर्माण झाली की ती पूर्ण जगावर प्रभाव टाकते. आपण म्हणतो की काफ्का, बेकेट यांनी जग बदलले, याचा अर्थ तोच असतो. काफ्का वाचलेले किंवा ' वेटिंग फॉर गोदो ' नुसते माहीत असलेले तरी किती लोक असतील जगात, असा प्रश्न इथे फिजूल ठरतो. आपल्या सर्वांच्या सर्व कृतींचे आपणा सर्वांवर प्रभाव पडत असतात, हे आपण पाहिले पाहिजे. जे. कृष्णमूर्ती म्हणतात की तुम्हीच जग आहात, तुम्ही बदलणे हेच जग बदलणे असते. या अर्थाने एखादी चांगली कविता वा कलाकृती ही जग बदलत असते, हे खरेच आहे. ती कविता निर्माण झाली एका मानवी भानातून इथेच जगावर प्रभाव पडलेलाच असतो. मग त्या कवितेचे वाचक कमी असोत वा जास्त.

हाच आशय व्यक्त करणारे माझे एक नाटक आहे – ‘ धागेदोरे ‘. पूर्ण नाटकभर वेगळेच काही चालू असते आणि शेवटी त्या सगळ्याचा परिणाम भलतीकडेच एका तरुणाच्या मृत्यूत होतो, असा तो कथाभाग आहे. वाटल्यास, जमल्यास वाचून पाहावे.

सारांश, चांगल्या कलाकृती म्हणजे काय याचे चिंतन घडत राहावे. चाललेल्या रटाळ, सवयीच्या, हिंसक जगण्याला धक्का देतील अशा कलाकृतींचे स्वागत होत राहावे.

--- ००० ---

खरे तर आता

तुझ्या भेटीला पर्याय म्हणून मला
पावसा आधीचे अंधारलेले आकाशही चालते
तपशीलांचे महत्त्वच पुसून टाकणे
हा तुझा आवडता चाळा
आता माझ्या आयुष्याचा भागच आहे

हे सगळे काय घडत असते
या बाबतीत तू अनभिज्ञ असतेस
सगळे विश्वच तू असल्यामुळे

खूप पाऊस पडला तरी मी भिजत नाही
आणि कंटाळा तर आता
किस चिडिया का नाम है असे झालेय
मला कळू लागण्यापूर्वी
हे सगळे होते का अस्तित्वात
हा प्रश्नही गेलाय लयाला

मला भेटण्यासाठी तुला
काहीच नाही करावे लागत
मलाच नेहमी माझे गाव सोडावे लागते

खरे तर आता आपल्या भेटीचीही गरज नाही
माझे गाव तरी कुठे राहिलेय

प्रत्यक्ष मीलनातही अघटितपणे
आपण गुंतलेले नसतोच

--- ००० ---

July 27

जनम जनम

मी क्षितिजाकडे पाहिले तेव्हा
त्याची कड किंचित दुमडली गेली
असे मला वाटले

हा अपमान समजावा की बेफिकिरी
की आपोआपच परस्पर निर्हेतुक
काही घडले असेल

एक झाड माझा मित्र होते
पण त्याला विचारून उपयोग काय
इतके पर्सनल आणि ते योग्य तरी आहे का

खिडकीचे गज मोजले उगीचच
इकडे आत तर काहीच घडले नव्हते
खरे तर तसे काहीच घडलेही नव्हते

हातात चहाचा कप आणि चहा
गार होत गेलेला वाफाही
थांबत आलेल्या

माझा पुनर्जन्मावर विश्वास नसून
आठवतेय कुठले जुने गाणे
तर ' ये है जनम जनम के फेरे '
--- ००० ---

'संसाराणूपेंडघार आणि वेषांतर''
या चंप्र देशपांडेंच्या एकांकिका करायच्या राहून गेल्या. नव्या रंगकर्मींनी त्या जरुर करुन पाहाव्यात. मराठीतल्या उत्कृष्ट एकांकिकांमध्ये वरच्या नंबरवरच्या आहेत या एकांकिका. Champralekhan.com या चंप्रंच्या साईटवर त्या उपलब्ध आहेत. कुणी करणार असेल तर मी साहाय्य करीन.

फिट

संध्याकाळ घडवते हळूहळू
प्रकाशात बदल
रस्त्याला कळते काही संपतेय
आणि अंधार तर
कुठे नेईल कोण जाणे

बदलाच्या अस्वस्थतेने
कवी लिहितात
विरहाच्या वा दुःखाच्या कविता
फिट करून टाकतात सगळीकडे
की संध्याकाळ धोक्याची

मग प्रत्येकच गोष्ट होऊ लागते
ठराविक काळाला जोडलेली
उगवता सूर्य
जणू दूतच असतो
विचाराला नवा कोंब फुटण्याचा

मग ठरतात पावसाळ्याचे अर्थ
थंडीत पांघरल्या जातात प्रेमाच्या कहाण्या
असे होत होत एकदा कळते सहजच
आता तर सगळेच फिट झालेय
मृत्यू जवळ आला असावा बहुतेक
--- ००० ---

अरे वा, विद्यासागर, छान आठवण जागवलीस ! उत्तम झाला होता तो प्रयोग ! तुम्ही सर्वांनी त्यासाठी घेतलेली मेहनत वाखाणणीयच होती ! आनंदचे होते कधीतरी फोनवर बोलणे, प्रगतीशी काही दिवसांपूर्वी इथेच फेसबुकवर झाला थोडा संवाद ! आनंद वाटला ! पुणे विद्यापीठाच्या त्या वेळच्या तुमच्या त्या पूर्ण टीमला खूप शुभेच्छा !

ॲलर्जी

बऱ्याचशा आठवणी
विस्मृतीच्या शिला होऊन
डोंगरदऱ्यांत पडल्या असल्या
तरीही त्यांच्या
सावल्या राहून गेलेल्या असतात --
आठवणी आणि त्यांच्या सावल्या

यांची फारकत हीच असते माझी
खोलातली ओळख

प्रतिक्रिया देण्याची माझी यंत्रणा
निर्दोष न्याय्य आणि नैतिक
असल्याच्या खात्रीने
मी आत्मतुष्ट हल्ले करतो
असंख्यांच्या सावल्यांवर
मला दिसणाऱ्या

त्यांच्या आणि माझ्या
दिसणाऱ्या सावल्यांची
भांडणे होत राहतात
लख्ख सूर्यप्रकाशात सरकारी नळावर

मग हळूहळू एकूणच
आमच्या आमच्यात विकसित होत राहते
आपापल्या परक्या सावल्यांची ॲलर्जी

आणि आमच्या आपापल्या ओळखी पक्क्या होत राहतात
--- ००० ---

दोन स्वर्ग

एकीकडे कुणी असणे
एकीकडे कुणीच नसणे
दोन्हीकडे माझे जाणेयणे
स्वतःला लपवून
लोकांत वावरत

दोन्हीकडे नष्टच व्हावे लागते
-- लोक काय म्हणतील
याची नकोच कटकट
म्हणून कधी मी बसून असतो
बंद दुकानाच्या फळीवर
तर कधी टाकतो सरळ
सूर्यावर चादर

नष्ट न होता
नष्ट व्हायचे असून
मी एखाद्या मैफलीला जातो
रंगतोही तिथे पण मापात
अगदीच धुंद न होता
-- एवढी काय गरज आहे --
विचित्रपणा सगळा
-- असे मी होऊ देत नाही

मी सपाट राहतो
मद्दडही राहतो
परवडते – माझ्याकडे दोन स्वर्ग असतात
--- ००० ---

नुसते ऍप डाऊनलोड करायचे असते. घरच्या घरी बेसिक चाचण्या होतात. माझे बीपी, नाडीचे ठोके ओके. आणि प्राणवायू ९८ ! चला, पुढची कविता !

" मैं तो चला जिधर चले रस्ता " असे उडता उडता गाणे गाणारे पक्षी फारसे दिसत नाहीत. त्यांचे गाणे, साद घालणे वा ओरडणे हे बुहुधा बसूनच असते. कावळे मात्र नेहमीच उडतानाही ओरडताना दिसतात -- त्या बिचाऱ्यांचा आवाजच जरा कर्कश असला तरी प्रेमाचे आणि उत्साहाचेही ते बोलत असणारच ! आत्ताच एक पोपट उडता उडता ओरडत गेला ! उडताना गाणी म्हणायचे हिंदी पिक्चर पक्ष्यांत जरा कमीच असतात का ?

पुसट आणि स्पष्ट

पावसात डोंगर गडप
इमारती झाडे पुसट
मला हव्याशा असणाऱ्या
अनेक गोष्टींप्रमाणे

मधेच इंद्रधनुष्य आलेय
तेही पुसट आणि अर्धवट

माझ्या आठवणी माझे अनुभव
हे तरी आहेत का माझ्या इच्छेत
या प्रश्नाने मी व्याकूळ

हे नेमके तुला कसे कळते
दार उघडताच पूर्ण स्पष्ट तू समोर
माझी निथळती कविता
--- ००० ---

Champra Deshpande shared a memory.

1 Year Ago
' मराठी नाटक समूह ' ने हे घडवले ! त्यांना पुन्हा एकदा धन्यवाद !

विद्वत्ता म्हणजे काय रे भाऊ ?

कलेच्या वा मानवी संबंधांच्या क्षेत्रात बुद्धिमान वा विद्वान कुणाला म्हणावे याचे दोन निकष मला दिसतात. एक म्हणजे त्याला एकास एक अशी एकरेषीय कारणमीमांसा देता आली पाहिजे आणि दुसरे म्हणजे जास्तीत जास्त बाबतींत सामान्यीकरण – generalization – करता आले पाहिजे. एकाच बाबतीत अनेक विद्वानांच्या कारणमीमांसा वा सामान्यीकरणे वेगवेगळी असू शकतात. प्रत्येक गोष्टीला हजारो, लाखो, कोट्यवधी कारणे असतात याकडे सर्वच विद्वानांना दुर्लक्ष करावे लागते. आपापले इंटरेस्ट, विचार आणि निवड यांतून ते तसे घडत असते. तुमचे विचार कसे चालावेत हेही तुमचा जनुक नकाशा, मेंदूतल्या पेशी आणि रसायने यांवर अवलंबून असते, असेही संशोधन आहे. पण, ते सोडून देऊ, कारण विद्वानांच्या जगण्याचा आधारच काढून घ्यावा, असा निर्दयपणा करणे हे माणुसकीहीनपणाचे होईल. तर, विद्वत्तेचे एक उदाहरण म्हणून हे देतोय –

“ मला म्हणायचंय असं की १८४३ मध्ये पहिल्या नाटकाचा प्रयोग झालेला आहे आणि १८१८ मध्ये शनिवारवाड्यावर युनियन जॅक फडकलेला आहे. म्हणजे सत्तांतर आणि नाटक यांत २५ वर्षांचं अंतर आहे. याचा अर्थ, ज्यांच्या हातून सत्ता गेली त्या मध्यमवर्गीय ब्राम्हणांनी नाटकाचा प्रवाह सुरू करून दिला, असे म्हटले पाहिजे. “ – गो. पु. देशपांडे, साधना, १७ डिसेंबर २०११. सत्ता गेल्यामुळे मध्यमवर्गीय ब्राम्हणाच्या जीवनात सांस्कृतिक पोकळी निर्माण झाली, त्यावर तो मार्ग शोधत होता, त्यातून भाव्यांकडून पहिले नाटक लिहिले गेले, अशी ती मीमांसा होती. गोपूंच्या त्या संबंधित बीजभाषणावर मला बोलायचे होते. यावर मी म्हटले होते की, “ त्याचप्रमाणे, राजकीय क्षेत्रातून हकालपट्टी झालेल्या लोकांनी मराठीतले सांस्कृतिक क्षेत्र गेली काही वर्षे काबीज करून ठेवलेले आहे की काय, याचेही ऐतिहासिक विश्लेषण व्हायला हरकत नसावी. “ – साधना, २४ डिसेंबर २०११.

मला कोणतेच निष्कर्ष सांगायचे नाहीयत. पण, भराभर निष्कर्ष काढत जाणे आणि आपल्याला सगळे समजलेय असा आभास तयार करणे हे मला निर्बुद्धपणाचे वाटते. आणि मग असा निर्बुद्धपणा विद्वानांनी केला काय आणि सामान्यांनी केला काय – निर्बुद्धपणाचा दर्जा तर एकच असणार ! त्यामुळे मीही एक निर्बुद्ध मीमांसा मांडतोय –

एक काळ असा आला की आपण अलग पडण्याचा धोका आहे, अशी ब्राम्हणांना भीती वाटू लागली. त्यातून, आपण, एकूण मोठ्या समूहाशी जोडून घ्यायला हवे, अशी त्यांना गरज वाटू लागली. या उद्दिष्टासाठी काही ब्राम्हणांनी अंगभूत कपटीपणातून डाव्या विचारसरण्यांचा मार्ग निवडला तर इतर काही ब्राम्हणांनी तशाच कपटीपणातून हिंदुत्ववादाचा मार्ग

निवडला. वस्तुतः पूर्ण मानवच कपटी असतो पण, बुद्धीचे आणि विचाराचे क्षेत्र स्वतःकडे ठेवणे बरीच वर्षे ब्राम्हणांना जमलेले असल्याने तो गुण त्यांच्याकडे जरा जास्त असतो, हे लक्षात घ्यायला हवे. आता त्यांची ती मक्तेदारी फारशी राहिलेली नाही, हा भाग वेगळा. दोन्हीकडे म्हणजे डावीकडे आणि हिंदुत्ववादाकडेही ब्राम्हणांना तीव्र आणि कट्टर राहणे भाग होते. जिंदगीका सवाल था ! -- प्रत्येक सामान्यीकरणात थोडे तरी तथ्य असतेच ना !

एक लक्षात येतेय ना ? सामान्यीकरण केले की प्रामाणिकपणा, सत्य, असत्य, मूल्यात्मकता, न्यायात्मकता अशा सगळ्या बाबी मातीत घालता येतात ! ( शेवटी एक गुपित सांगून टाकतो. टीव्हीवर जशा विद्वानांच्या चर्चा वा भांडणे चालू असतात ना तसे काही जमण्याची माझ्यात कवडीचीही कुवत नाहीय. त्यामुळे, विद्वत्ताच कशी कुचकामी असते, ते मांडण्याचा माझा डाव असतो ! )

--- ००० ---

साधन

हे राहिलेय ते राहिलेय
गैरसमज काढायला हवा होता
झालेला अपमान अजून तरळतोय
आणि कायद्याची नीट माहिती
घेऊन मगच तमुकशी बोलायचेय

आणि तरीही
अनेक ठिकाणांहून येणारे
परिपूर्णतेचे स्पर्श
-- खरे तर
एकाच अवकाशातून येणारे

त्या स्पर्शांचे तेव्हाच होते
असणे पूर्ण
जेव्हा तो पूर्णतेने स्वीकारला जातो
-- तेच असते त्याचे सार्थक

ते स्पर्श स्वीकारताना
काहीच राहात नाहीय

राहिलेले राहणे महत्त्वाचे
की स्पर्श

हे ठरवायला साधनच नाहीय

--- ००० ---

ढगाचे नावीन्य

खिडकीतून ढग
घरात आल्यामुळे
मनाला काहीच फरक नव्हता पडणार
एक किरकोळ नावीन्य
इतकेच घडणार होते
आणि तसेच झाले

खूप मोठे नावीन्य असेल
तर मन म्हणते वॉव
च्यायला धक्काच बसला
मग तो सुसह्य
गोड वा भयप्रद असू शकतो
इतकेच

फारच मोठा बसला धक्का
तर ते उन्मळूनच पडेल
हे मनाला माहीत असते

मन तर तेच असते नेहमीच
धक्का असो की नसो

त्याला नकोच असतो
फार मोठा धक्का
ते जिवंत असेपर्यंत

ढगाचे नावीन्य परवडते

--- ००० ---

आनंदक्षण

‘ दिनकर पुरोहितचा खून ‘ हे माझे नाटक प्रकाश बुद्धिसागरने राज्यनाट्यस्पर्धेत सादर केले. प्रयोग धूमधमाल झाला. पण, बक्षिसे शून्य मिळाली ! त्यानंतर काही मित्रांच्या डोक्यात आले की हे नाटक व्यावसायिकवर व्हावे. आणि ते घडलेही ! ‘ पोत्यातून गोत्यात ‘ या नावाने ते प्रकाशच्याच नेतृत्वाखाली व्यावसायिकवर आले ! एकदाच घडलेला मराठी रंगभूमीवरचा अनुपम्य विनोदसोहळा म्हणजे त्या नाटकात प्रमुख भूमिकांत होते माधव वाटवे आणि आत्माराम भेंडे हे दिग्गज नट ! प्रचंड धमाल येई ! एका प्रयोगाला निळू फुले आणि राम नगरकर आले होते. प्रयोगाच्या मध्यांतरात चहा पिताना माधवराव आनंदाने म्हणाले होते, “ आज ग्रेट दुक्कल आलीय प्रयोगाला ! “ सारांश काय तर निळू फुले आणि राम नगरकर यांनी मला खूप हसवलेले असले तरी मीही माझ्या नाटकातून त्यांनाही एकदा मनमुराद हसवले होते, हे या महाराष्ट्राने विसरू नये ! ( अरे सॉरी, एकदा नाही, दोनदा ! ही दुक्कल माझ्या ' ढोलताशे ' लाही आली होती. ते नाटक पाहून निळूभाऊ म्हणाले की जो ढोलताशे पाहणार नाही त्याला मोक्ष मिळणार नाही ! निळूभाऊंचे हे वाक्य माझ्या संकेतस्थळावर ' अभिप्राय ' मध्ये घेतलेले आहे ! )

--- ००० ---

संकेतस्थळ आणि निर्दयता

माझे संकेतस्थळ तयार करताना --

मानव<br>
मरणाचे स्मरण असावे<br>
राज्य<br>
पंतप्रधान येत आहेत<br>
घटना घडतात<br>
आणि<br>
‘ ट्रायल ‘ चे पहिले नाट्यरूपांतर

-- ही सहा न जमलेली अपयशी नाटके निकाली काढली. नष्टच केली. त्यांतली, ‘ पंतप्रधान येत आहेत ‘ आणि ‘ घटना घडतात ‘ ही दोन नाटके ‘ अभिरुची ‘ मध्ये आली होती, ती असतील कुठेतरी. त्यांतले ‘ राज्य ‘ हे एक रद्दड नाटक माझा मित्र कै. प्रा. अरुण पाटील याने सांगली बँकेमार्फत राज्यनाट्यस्पर्धेत सादर केले होते. कोल्हापुरातल्या आमच्या मित्रमंडळाचा प्रमुख गुण होता निर्दयपणा ! माझ्या त्या नाटकाची मित्रांनी यथेच्छ टिंगल केली होती ! यांतले गंमतीचे भाग म्हणजे, ‘ मरणाचे स्मरण असावे ‘ हे लोकनाट्य टाईप नाटक, निळू फुले पुण्यातल्या मीरा सोसायटीत राहात असताना त्यांच्या घरी जाऊन ते आणि राम नगरकर यांना माझ्यासह बोअर करत ऐकवले होते ! ते दोघे खूप दयाळू होते, हे निर्विवाद ! ‘ ट्रायल ‘ चे तेव्हा मुळीच न जमलेले नाट्यरूपांतर, माहीमला अरविंद देशपांडे यांच्या घरी जाऊन, ते, सुलभा देशपांडे आणि काकडेकाका यांना ऐकवले होते ! तेही तिघे खूप दयाळूच होते !( नंतर, बराच काळ गेल्यावर, पुन्हा केलेले आणि माझ्या मते जमलेले, ' ट्रायल ' चे नाट्यरूपांतर संकेतस्थळावर उपलब्ध आहे. )

बाकीच्या लेखनात मीच खूप निर्दयपणा केला. न जमलेल्या कविता नष्ट केल्या. काहींची काटछाट केली. निव्वळ लिहून झालेय म्हणून कसले कौतुक ? वाचकांपुढे अमुक हे सादर करावे, असे आपल्याला आधी वाटले पाहिजे.

इन ड्यू कोर्स ( स्वाभाविक ओघात )

हा एक इंग्रजीत लिहिलेल्या कवितांचा संग्रह होता. राष्ट्रीयीकरणानंतर खेड्यापाड्यांत उघडलेल्या शाखांमध्ये शाखाप्रबंधक म्हणून जाऊन काम करणाऱ्यांचे जगणे यात होते. याचा एक किस्सा आहे. एन आय बी एम मध्ये मी एका निवासी व्यावसायिक प्रशिक्षणासाठी आमच्या बँकेतर्फे गेलो होतो. ते सर्व प्रशिक्षण मानसशास्त्राधारित होते. शिकवण्यासाठी खरोखरच प्रचंड आदरणीय असे डॉ. बार्थकूर नामक, शास्त्र आणि व्यवसाय यांची उत्तम सांगड घालत शिकवणारे मास्टर प्रशिक्षक होते ! थोड्याच काळात मी त्यांचा एक आवडता विद्यार्थी झालो होतो. त्यांनी एकदा व्यंगचित्रे काढायची स्पर्धा ठेवली होती. दिवसभर त्यांचे विचार ऐकणे आणि रात्री तिथे चावणारे डास यांची सांगड घालून आमच्या टीमने ' बार्थकुरांनी सोडलेले वैचारिक डास ' असे काही चित्र काढले होते ! तर मुद्दा असा की त्या इंग्रजी कविता मी त्यांना दाखवल्या होत्या. ते फारच खुश झाले होते. एन आय बी एम ने फक्त आकडेवारीचीच पुस्तके प्रसिद्ध करावीत असे काही नाही – बँकिंगमधला हा असा मानवी भागही त्यांनी प्रसिद्ध करायला हवा, असे त्यांना वाटत होते. त्या कवितांची मांडणी कशी हवी वगैरे आमच्या चर्चाही झाल्या होत्या. पण, कामाचा रामरगाडा, माझे कामाचे ठिकाण हडपसर हे पुण्याचे एक टोक, एन आय बी एम हे दुसरे टोक आणि मी राहात होतो ते सहकारनगर हे तिसरे टोक, या गोंधळात माझ्याकडूनच ते काम काही पुढे गेले नाही. ' आता काय त्याचे ' म्हणून तेही मी संकेतस्थळावर घेतलेले नाही !

हे सगळे सांगायचे एक कारण आहे. थोडे काही लिहायला नाही जमले किंवा कुणी काही लेखनातले दोष सांगितले की नाराज, निराश आणि खट्टू होऊन लिहिणे सोडूनच द्यावे अशा मनःस्थितीत पोचणारे लोक दिसतात. खरी आच पाहिजे, मित्रांनो, पॅशन पाहिजे ! यश मिळवण्यासाठी लिहायचे हा किरकोळ हेतू सोडून पुढे जाता यायला हवे.

--- ००० ---

Champralekhan
champralekhan.com
अपडेशन

माझ्या वेबसाईटचे म्हणजे संकेतस्थळाचे अपडेशन झालेले आहे असे म्हणू की अद्ययावतीकरण की आजवरीकरण ? तर ते झालेले आहे. मुख्य म्हणजे, इतर काही वाढीव मजकूरासह, यात --

माझ्याऐवजी

हा पूर्ण कवितासंग्रह आता आलेला आहे. काही परदेशी कवींच्या उत्तम कवितांचे मराठी अनुवाद आणि माझ्या अलिकडे लिहिलेल्या बऱ्याच कविता यात आहेत.

संकेतस्थळ --

वास्तव

प्रत्येकजण जर

आपापल्या मानसिक गठ्ठ्यातूनच
जगत असेल तर याचा अर्थ
सगळीकडे चालू असते फक्त राशोमानच

मग मला खरे वाटते
तेच मी जगून तरी उपयोग काय
मला हवे ते मादक वास्तव
खरे मानूनच का नये जगू मी

मी कुठे जन्मलो वाढलो
कुठे नोकरी केली
कुणाशी भांडलो
हे हवेय कशाला सगळे

आपण अशीच घडवू आपली वास्तवे
जी एकमेकांच्या प्रेमात पडतील

वास्तव बदलतबिदलत नसते
ते फक्त घडत असते
एवढे समजले की झाले

मी सांगतोय ते माझे वास्तव
तू स्वीकारून चाल
तुझ्या ( वास्तवाच्या ) तर मी प्रेमातच आहे
--- ००० ---

July 20

Champra Deshpande updated his status.

पुण्याच्या वीजपुरवठा यंत्रणेला लाख शिव्या ! अनेकदा तक्रार करूनही काही बदल नाही. ते म्हणतात की रस्त्याच्या कामांमुळे आम्हालाही हा त्रास आहे, करणार काय ! आम्हीही तक्रारी करून थकलो आहोत ! बोंबला ! सगळेच दिङ्मूढ ! सकाळी दोन तासांत आठ वेळा वीज बंद-चालू असे घडले ! काही सेकंदांचा हा खेळ सतत चालू आहे. कोरोनाच्या वातावरणामुळे युपीएस दुरुस्ती लांबलेली आहे. या वीजयंत्रणेचे वाटोळे होवो, असा ( स्वतःच्याच पायावर धोंडा पाडून घेणारा ) शाप मी देत आहे !

मूक शब्द

तुझ्या एका हललेल्या दिव्यातून
एका कृतीतून आणि एका मूक शब्दातून
अंधार भेदणाऱ्या --
दूर समद्रात थांबलेल्या
माझ्या होडीला कळते --
हा चोरीचा माल
पुढे न्यायला हरकत नसल्याचे --
--- ००० ---

मग तर ही कविता

माझ्या डोळ्यांसमोरचे
माझा बुबुळांच्या हालचालींसह
तरळत राहणारे हळुवार काळे ठिपके
आणि मी राहून सोडलेली
अनेक घरे आणि गावे
हे काहीच मनावर न घेता
मी कीबोर्डाकडे लक्ष ठेवतो

मी माझे वा माझ्या अनुभवांचे स्तोम नाही माजवत
माझ्या आठवणींनाही मी धरून नाही ठेवत

कुणालाच माझ्याबद्दल खात्री नाही वाटत
माझा राग राग करून तरी काय उपयोग
या विचाराने सर्वजण
आपापली दुकाने गाठतात

आणि विशेष म्हणजे या सगळ्या प्रकारात
मी लिहितो कविता जी कुणालाच
कळत नाही पण अनेकांना आवडते

मग तर ही कविता अमेरिकेतल्या
वा फ्रान्समधल्या वाचकालाही आवडेल

ओझी सोडून देण्याचे मार्ग तर
सगळ्यांनाच हवे असणार

--- ००० ---

चकित होण्याचे व्यसन

सध्या मला दिसताहेत
उन्हात वितळणारे माझे विचार
आणि मी चकित होतोय
जसा काहीही पाहून मी होतोच

चित्रांचे प्रदर्शन पाहताना
काही जाणकार
काळजीत असल्यासारखे चेहरे का करतात
आणि एकमेकांशी बोलताना
शोकमग्न का दिसतात
हे खरे तर मला खरेच कळत नाही एकूणच
तरीही मी चकित होतोच

माझे विचार वितळणे
आणि ढगांच्या रचना बदलणे
वा नष्ट होणे
हे मला सारखेच वाटते आपोआप
तरीही मी चकित होतोच

मला व्यसन तर नसेल
चकित होण्याचे
जसे खूपजणांना असते
कधीच मुळीच चकित न होण्याचे

मला तर खरेच कण न कण प्रचंड
क्षणोक्षणी सतत चकितच करत असतो
--- ००० ---

उत्तेजनार्थ

उत्तेजनार्थ जगता येण्यासाठी तरी निदान
मानसशास्त्राने उपयुक्त म्हणून
जाहीर केलेल्या प्रमाणात तरी

ताणतणाव घ्यावे लागतीलच
भिंतींच्या आडून लपून
जगण्याशी चोरटे चाळे
करता येण्याइतपत

हकनाक जगणेही चालेल
हे एकदा ठरल्यावर
कुणी एक पसंत करून
संसार सुरू करावा हेच बरे

पसंतीसाठी चार्ट आणि कॉलमवाईज गुण
देण्याचा प्रयत्न राबवू नये
बुद्धीचे प्रयत्न अंधार पसरवतात

त्यापेक्षा ऍक्सिडेंट हो गया रब्बा रब्बा
हे कधीही चांगले
याने पस्तावणे तरी टळते

अशा वेळा येतातच की पक्ष
सोडावे लागतात तत्त्वे बदलावी लागतात

यातून कुठवर पोचणार हे न कळताच
उडी घ्यावीच लागणार अंधारात
--- ००० ---

## भविष्याचे विचार

चंद्र तापलेला असो
की हवेतून मुंग्या निर्माण होत राहोत
आपला स्वर्गनरक
उपस्थितच असणार
आपल्या खिडकीची नियती बनून

आपल्याला वाटते
जागा मिळाली एशियाडमध्ये
की प्रश्न नाही
हरलेल्या विचारांना

विसावा मिळेल

पण अंदाज चुकण्याचा रोग
जगभर पसरलेला आहे
तो माझा काळ कसा सोडेल

कोणत्याही उत्तरांवर
माझा विश्वास नाही
सगळे उतारावरून
घरंगळत चाललेलेच
दिसतात मला

दाढी झाल्यावर
रेझर धुताना मात्र
मी भविष्याचे विचार
थांबवून ठेवतो
--- ००० ---

एक

मोठ्या गर्दीच्या समारंभात
गुरुमाउलीने केलेल्या
जाहीर सांत्वनाने रडणारा
निर्लज्ज एकटेपणा
आणि
पूर्ण जगबुडी झाल्यावर
फक्त आपल्या सुप्त प्रेयसी
मुक्त होऊन वाचतील
आपल्याबरोबर
या स्वप्नातला एकटेपणा एकच

विषारी वायूच्या खोलीत
फडफडणाऱ्या पक्ष्याने
जगाची धारच घालवून
भयग्रस्त राहावे तसा प्रकार

गर्दी मारून टाकते

आणि एकटेपणा खाऊन टाकतो

या प्रश्नाला सामोरे जायला
ना गर्दी कामाची ना एकटेपणा

म्हटले तर ही समस्याच आहे
म्हटले तर एकट्याचीच
एक
--- ००० ---

कम्युनिझमच्या विरुद्ध जग

दुःखाचा विषाणू
कधीच नष्ट नाही होणार हे माहीत होते
त्यामुळे विचारवंत श्रीमंतांनाही सल्ले देत
मुलांचे सारखे लाड नका करू
त्यांना द्या मधून मधून
अपेक्षाभंगाच्या आणि दुःखाच्या
लशीचे माफक डोस
म्हणजे टफ होतील मुले
या जगाच्या इस्पितळात जगायला
-- मुले नाराज होत असली तरी
त्यांच्याच हितासाठी श्रीमंत लोक
हा सल्ला तंतोतंत पाळत
कारण त्यांची कारखानदारी
पुढील पिढ्यांतही
निर्वेध चालणे महत्त्वाचे होते

गरीब लोक मत्सराने आणि क्रोधाने
हे सगळे पाहात राहात
मूलभूत टफपणाने

आपल्या आणि कम्युनिझमच्या
विरुद्ध जग निर्माण करण्यासाठी
लहानपणापासून मजेत
दुःखे भोगतात भोसडीचे
असे त्यांच्या मनात येई

--- ००० ---

पोथी

कोणत्याही सत्याला
एक बौद्धिक मर्यादा असते
त्यामुळे ते एकच नाही असू शकत

समशीतोष्ण झाडाखाली
ध्यानस्थ बसलेली खार
ओळखत असते
भाषेच्या मर्यादा

उगीचच भावनावेग वाढवत नेला
म्हणजे तुम्हीच खरे
मानवतावादी असे काही नसते

पावसाळ्यात येणाऱ्या शिंका
तुमचे भविष्य नाही ठरवू शकत
जरी त्यांना
तुमचा जनुकनकाशा माहीत असला तरी

कवी कदाचित नसेलही
त्याच्या शब्दाच्या शब्दाबाहेर
पण वाचकाचे मन
स्वीकारू शकतेच
स्वच्छ पराभव

पोथीरूपात आले म्हणून
त्यात राजकारणाचे आकलन असेलच असे नाही
--- ००० ---

आयुर्वेदिक

उष्णतेचे जुने दुखणे
मूळव्याध आणि चेहरा लाल होणे
यासाठी सूर्य माझ्याकडे आला

-- वैद्यराज काहीतरी करा आयुर्वेदिक
म्हणाला

मी म्हटले तुझी सध्याची अवस्था बघून
देतो मी औषध पण करेक्ट
मिश्रणासाठी तुझी
जन्मतारीख लागेल
त्यावरून तुझा गर्भसंभव
कधी झाला असावा हे ताडून
त्या वेळी निसर्ग कसा होता
हे मला विचारात घ्यावे लागेल

सूर्याचा चेहरा पडला
तुम्ही तरी निदान
बुद्धिप्रामाण्यवादी नसाल
म्हणून तुमच्याकडे आलो होतो
म्हणाला

असे म्हणून त्याने रात्रच करून टाकली
उष्णतेमुळे तो
माथेफिरू झालेला आहे
मी स्वतःशीच म्हणालो
--- ००० ---

माहीत असणे

माहीत असणेच असते
सगळे जगणे
पृथ्वी उकरत
माहीत नसलेले
माहीत करून घेत
राहिले जाते
स्वतःला नसेल माहीत
तर होळी पेटवण्यात
वाकबगार माणसांचे सल्ले
घेतले जातात झोपेतल्या झोपेत

माहितीत व्यग्र न राहिल्यास सतत
भीतीने गारठणारी माणसे

मधेच एकजण
राहतो उभा वेड्या डोळ्यांचा
आपण शत्रू का आहोत
एकमेकांचे सतत --
हे त्याने विचारताच
अंघोळीही न करता
सगळे घरांबाहेर येतात
आणि त्याच्यावर ओरडतात
कान ताठ करत
मूर्खा गप्प बस
बस खाली
म्हणतात
--- ००० ---

मैदान

आमचे पूर्वज झाले स्थलांतरित
तेव्हापासून आमचे गाव हा विषय
कात टाकल्याप्रमाणे संपला
मग ते दाखल झाले
उंच भिंतींच्या शाळेत

त्यांनी बाळगली मने
खवल्यांच्या घाणेरड्या डिझाईनची
पण तरीही हसतखेळत
त्यांनी निर्माण केले आभास
त्यांना हव्या तशा स्वप्नांचे

लोकांना वाटले की ही आहेत
चिवट मांजरे पायांवरच पडणारी
कुठूनही टाकले चिडून तरी --
लोकांच्या या भ्रमाची त्यांना भीती वाटत राहिली
हेही जाईल की काय हातचे विद्वत्ताप्रचुर मैदान म्हणून
--- ००० ---

July 13

मित्रवर्य सचिन केतकर यांची एक महत्त्वाची पोस्ट –

--- ००० ---

१९९२ चे नोबेल मिळालेला कवी डेरेक वॉलकॉट ( १९३० – २०१७. ) याची कविता --

प्रेमानंतरचे प्रेम
-- डेरेक वॉलकॉट ( अनुवाद माझा. )

अशी येईल एक वेळ
जेव्हा अत्यानंदाने तू स्वागत करशील तुझेच
तो येऊन पोचल्यावर स्वतःच्याच दाराशी
स्वतःच्याच आरशात आणि दोघेही स्मित कराल
एकमेकांचे स्वागत स्वीकारत,

आणि तू म्हणशील, बस इथे, खा काही.
तू पुन्हा प्रेम करशील त्या परक्यावर जो तूच होता.
वाईन देशील. ब्रेड देशील. हृदय देशील परत
त्याचे त्यालाच, त्या परक्याला ज्याने तुझ्यावर प्रेम केले

तुझ्या आयुष्यभर, ज्याच्याकडे तू दुर्लक्ष केलेस
आणखी कुणासाठी जो ओळखतो तुला सरावाने.
खाली काढशील तू सगळी प्रेमपत्रे पुस्तकांच्या शेल्फमधून,

तसेच ते फोटो, ती निकराची टिपणे,
तुझी स्वतःचीच प्रतिमा तू सोलून काढशील त्या आरशातून.
मग बसशील. ताव मारशील स्वतःच्याच आयुष्यावर.
--- ००० ---

To change your language you must change your life.
-- Derek Walcott.

पलिकडचे जग

मधे काच असली
तरी पलिकडचे जग दिसतेयच ना
त्यात बदल करायचे
अलिकडचे मनसुबे
जगाला थोडेच कळणार आहेत

अलिकडेच येणार आहे मृत्यू
तरीही कशाला हे
सर्व दृश्यांच्या दुरुस्त्यांचे प्रयत्न

मला अनुकूल हवेय
सर्व हवामान
पण काच फोडण्याने
शेवटच्या क्षणी मी वेडा ठरेन

हे मात्र अजब आहे
तिकडचे ते आहे तसे असू दिले
की इकडचा मृत्यूही गायब होतो

पलिकडचे लोक समजतील
की मी पराभव पत्करला
जाऊ दे तेही
--- ००० ---

July 12

फरसाण

मध्येच लिफ्ट बंद पडली तेव्हा क्षणभर तो घाबरला
पण सावरला -- त्या पोकळ क्षणात त्याला अचानक
आठवले त्याचे फसलेले प्रेम जे त्याने न्यूनगंडामुळे
व्यक्तच नव्हते केले कधी -- हे का आठवले असावे हे कळावे
असे त्याला वाटले -- त्याच वेळी त्याला हेही आठवले की
प्रत्येक घटनेला मतभेदयुक्त हजारो कारणे असल्याने कारणमीमांसेवर
त्याचा विश्वासच नाहीय – सलग कारणांनी घडतच नाही इतिहास
आणि या त्याच्या मतामुळेच त्याच्या लक्षातच नसे राहात कोणत्याही
महायुद्धाचीही स्टोरी – पण तरी वाटत मात्र राही

की खरीखोटी कारणे ठरवता मात्र आली पाहिजेत
सुरक्षित खात्रीने अविचलित जगायचे असेल तर

पण कारणे विचारसरण्या आणि आत्मविश्वास
हे सगळे न पटण्यानेही येते एक शांतता जगण्याला
हे त्याला माहीत असल्याने सामान्यज्ञान जमा करण्याचे
त्याचे कष्ट वाचत – नात्यांच्या समस्याही
बरोबर-चूक वा न्यायदान या मार्गाने न गेल्याने
कमी त्रासाच्या होत आणि तो त्या विसरूनही जाई

तरीही इतरांचे बघून आणि आपणच एकूणात
कारणमीमांसेच्या धंद्यात मागे पडतो आणि त्यामुळे
आपण अडाणी दिसतो या न्यूनगंडामुळे त्याला वाटेच गरज
त्याच मार्गाने जाण्याची – पण तरीही --

लिफ्टमधून बाहेर पडल्यावर फरसाण विकत घ्यावे
असे आपल्याला का वाटले हे दिले त्याने सोडून
--- ००० ---

July 11

ॲन सेक्सटन
( १९२८ – १९७४. )

सिल्व्हिया प्लाथसारखीच हीही अमेरिकनच. दोघीही समकालीन होत्या. चांगल्या मैत्रिणीही होत्या. अनेक परिसंवाद, चर्चा यांच्या निमित्ताने त्यांच्या भेटीही होत असत. दोघींच्याही आवडीचा, आकर्षणाचा विषय म्हणजे मृत्यू. त्यावर त्यांचे नेहमीच बोलणे होई. सिल्व्हियाने तिच्या वयाच्या ३० व्या वर्षांनंतर आत्महत्या केली तर ॲनने ४६ व्या वर्षानंतर. कवितेच्या क्षेत्रातली ही दोन्ही दुःखद पाने. त्या जेवढे जगल्या त्यात दोघींनीही जबरदस्त काम करून ठेवलेले आहे. मला सिल्व्हियापेक्षा ॲनच्या कविता अधिक आकलनसुलभ वाटल्या. इथे काही आवडलेल्या अनेक कविता मराठीत अनुवाद करून देणे शक्य नाही. एक थोडी ओळख आणि अकादेमिक उत्सुकता जागृत करणे, एवढ्यापुरतेच, तेही जमेल तसे, हे काम आहे. ॲनवरच्या या पोस्टबरोबर स्त्री-कवींमधल्या पंचकन्यांची दखल पूर्ण होते आहे. एमिली डिकिन्सन, जॉईस मनसौर, एडिथ सिटवेल, सिल्व्हिया प्लाथ आणि ॲन सेक्सटन. खाली ॲनची एक कविता माझ्याच मराठी अनुवादात देत आहे –

अज्ञानाचा कवी
-- ॲन सेक्सटन ( अनुवाद माझा. )

कदाचित पृथ्वी तरंगतेय,
मला माहीत नाही.
चांदण्या कदाचित छोटे छोटे कागदाचे कापलेले आकार आहेत
एखाद्या अवाढव्य कात्रीने केलेले,
मला नाही माहीत.
कदाचित चंद्र हा एक गोठलेला अश्रू आहे,
मला नाही माहीत.
आणि कदाचित देव हा एक सखोल आवाज आहे
फक्त बहिऱ्यांना ऐकू येणारा,
मला माहीत नाही.

कदाचित मी कुणीच नाहीय.
जरी हे खरे असले की मला एक देह आहे
आणि त्यातून माझी सुटकाच नाहीय.
मला माझ्या मस्तकातून बाहेर उडून जायला आवडेल,
पण ते तर शक्यच नाहीय.
गोळीबंद नियतीत हे लिहूनच ठेवलेले आहे
की मी या मानवी आकारात बद्धच राहणार आहे.
हे असे असल्यामुळे
मला माझ्या समस्येकडे लक्ष वेधायला आवडेल.

माझ्यात एक जनावर आहे,
माझ्या काळजाला त्याच्या पंजात करकचून पकडून ठेवणारे,
-- एक प्रचंड खेकडा.
बोस्टनच्या डॉक्टरांनी
हात वर केलेत.
त्यांनी सुऱ्या वापरून पाहिल्या आहेत,
सुया, भुलीचे विषारी वायू आणि तत्सम सगळे.
तो खेकडा तसाच राहतो.
खूपच अवजड आहे तो.
मी त्याला विसरू पाहते, माझे उद्योग करू पाहते,
ब्रोकोली शिजवणे, बंद केलेली पुस्तके उघडणे,
दात घासणे आणि माझ्या बुटांचे बंद बांधणे.
मी प्रार्थनाही वापरून पाहिलीय
पण मी जसजशी अधिकाधिक प्रार्थना करत जाते
तसतसा तो खेकडा अधिकच करकचून पकडत जातो
आणि त्यावी वेदना विस्तारत जाते.

पूर्वी माझे एक स्वप्न होते,
बहुतेक स्वप्नच होते ते,
ते असे की तो खेकडा म्हणजे
माझे देवाबद्दलचे अज्ञान आहे.
पण मी कोण स्वप्नांवर विश्वास ठेवणारी ?
--- ००० ---

Champra Deshpande wrote on Madhav Manjrekar's timeline.

खूप शुभेच्छा !

सिल्व्हिया प्लाथ
( १९३० – १९६३. )

सिल्व्हिया प्लाथ ही अमेरिकन स्त्री-कवी म्हणजे कवितेच्या क्षेत्रातले एक दुःखद पान आहे. वयाची अवघी तीसच वर्षे पूर्ण झाल्यावर चौथ्याच महिन्यात तिने आत्महत्या केली. आत्महत्येचा हा तिचा तिसरा प्रयत्न यशस्वी झाला. एका नियतकालिकात दिनांक २० जून १९५८ ला तिने लिहिले होते की, " माझे आयुष्य हे जणू काही दोन वीजप्रवाहांनी चालणारे आहे : -- आनंदी सकारात्मक आणि दुःखमय नकारात्मक. त्या त्या क्षणी जो प्रवाह चालू असेल तो माझ्या आयुष्यावर हावी होतो आणि त्याला त्या लोंढ्यात बुडवून टाकतो. " – याला बायपोलर डिसऑर्डर म्हणतात ( द्विध्रुवीय दुःस्थिती ). एकाकीपणा आणि असुरक्षितता यांनी ती ग्रस्त असायची. तिची Edge म्हणजे ' कड ' नावाची एक कविता आहे. तिच्या आत्महत्येच्या फक्त काहीच दिवस आधी ही तिने लिहिलेली असून ही तिची शेवटची कविता मानली जाते. याच कवितेचा मला जमेल तसा अनुवाद खाली देत आहे –

कड

ती स्त्री पूर्णत्वाला पोचलेली आहे
तिच्या मृत

शरीराने धारण केले आहे ध्येयपूर्तीचे स्मित
ग्रीक गरजेचा भ्रम *

तिच्या शिराच्छादनाच्या चुण्यांतून वाहतोय
तिचे अनवाणी

पाय जणू सांगताहेत :
इथवर आलोय आम्ही, आता संपलेय ते.

दोन्हीकडून एकेक मूल वेटोळे घालून
पांढऱ्या सर्पाप्रमाणे प्रत्येक एकेका छोट्या

दूधपात्राजवळ आता रिकाम्या.
तिने गुंडाळून घेतलेय त्यांना

सामावून स्वतःच्या शरीरात पाकळ्यांप्रमाणे
गुलाबाच्या मिटणाऱ्या जेव्हा बाग

ताठरते आणि गंधांचे रक्त वाहते
गोड खोल घशातून निशापुष्पाच्या.

चंद्रकोरीला यात व्यथित होण्यासारखे काहीच नसते,
निरखत असताना तिच्या हाडाच्या छपरातून.

तिला सवय असते अशा गोष्टींची.
तिच्या सावल्या तडतडतात आणि रेटत राहतात.
--- ००० ---
* ( ग्रीक पुराणात अशी एक कथा आहे की मेडियाने तिच्या पतीच्या प्रतारणेमुळे सूड म्हणून त्यांच्या दोन मुलांसह आत्महत्या केली. )

July 10

Champra Deshpande wrote on Pawan Khebudkar's timeline.

खूप शुभेच्छा !

एडिथ सिटवेलचे एक वाक्य आहे – " कवी सर्वच माणसांशी त्यांच्या अशा जगण्याबद्दल बोलतो, जे त्यांनी दडपलेले आणि विस्मृतीत ढकललेले असते. "

हेच सांगणारी तिची ही कविता –

कविता

कविता उदात्त करते काळीज आणि डोळ्यांना,
आणि अनावृत करते अर्थ सर्वच गोष्टींचे

ज्या असतात वसतिस्थान काळीज आणि डोळे यांचे.
ती विश्वाचे रहस्यमय किरण काढते शोधून,
आणि करून देते आपल्याला पुनःप्राप्ती विस्मृत स्वर्गांची.

-- एडिथ सिटवेल. ( अनुवाद माझा. )
--- ००० ---

स्त्री-कवी आणि अतिवास्तववाद

अतिवास्तववादी कविता पाहताना एक लक्षात आले की यात स्त्रिया-कवी कुणी नाही दिसत. म्हणून त्या दृष्टीने पाहिले. तर लक्षात आले की आहेत काही स्त्रिया-कवी पण तिकडेही ‘ अनुल्लेख ‘ हे खाते बऱ्यापैकी वापरात दिसते. जॉईस मनसौर ही स्त्री-कवी लिहीत होती, आंद्रे ब्रेटन तिला वाखाणतही असे. पण ती खास प्रसिद्ध झाली नाही. इंग्लिश भाषेत ती अलिकडेच दहाबारा वर्षांत आलेली आहे. ती फ्रेंच भाषेत लिहीत होती. १९८६ साली ती वारली. दणदणीत आणि बेधडक कविता तिने लिहिलेल्या आहेत. त्यांतल्या दोन इथे तुम्हा फ्रेंडसच्या वाचनासाठी अनुवाद करून देत आहे. --

जॉईस मनसौर ( १९२८ – १९८६. )

१. शीर्षकाविना –

अजूनही आठवतो का तुला केळ्यांचा तो सुगंध
किती परक्या होतात ओळखीच्या गोष्टी निर्गमनानंतर
किती उदास अन्न
किती निर्जीव बिछाना
आणि मांजरे
आठवतात का तुला ती मांजरे कडक पंजांची
तुझी जीभ माझ्यात शिरताना छतावर किंचाळणारी
आणि उभी राहिलेली तुझ्या नखांनी मला सोलले तेव्हा
मी शरणागती पत्करली तेव्हा थरथरली ती
प्रेम कसे करायचे असते ते त्यानंतर मला समजेनासेच झाले
वेदनादायक बुडबुड्यांचा चित्तभ्रम झाला बेशुद्ध माझ्या ओठांवर
जाऊ दे तो माझा पर्णभरित मुखवटा
बिछान्याखाली प्रचंड वेदना भोगणारे गुलाबाचे रोप
आता मी माझे नितंब नाही झुलवत दगडांमध्ये
गेली ती मांजरे छत सोडून
--- ००० ---

२. मला झोपायचेय तुझ्याबरोबर

झोपायचेय मला तुझ्याबरोबर जवळ जवळ
आपले केस एकमेकांत गुंतलेले
आपली लिंगे जुळलेली
तुझे तोंड उशीकडे असताना.
मला तुझ्याबरोबर दोघांनीही पाठमोरे होऊन झोपायचेय
आपल्यांत दुरावा निर्माण करेल असा श्वासही नको
आपल्याला विचलित करणारे शब्दही नकोत
आपल्याशी प्रतारणा करणारे डोळेही नकोत
असे वस्त्रहीन.
मला तुझ्याबरोबर छातीला छाती लावूनही झोपायचेय
तणावयुक्त आणि घामेघूम होत
तळपताना हजार लाटांनी अशी
गिळंकृत केलेली उन्मादी वेड्या जडत्वाने
तुझ्या सावलीवर ताणून बसवलेली
तुझ्या जिभेच्या हातोडीने ठोकून
सशाच्या खादाड दातांमध्ये मरण्यासाठी
मस्तीत.
--- ००० ---

July 9

समाधानात झोपावे

वर्षानुवर्षांचे सूर्य
धरून ठेवावेत

वर्षांचे विभाग पाडून
वर्षे क्रम बदलून

विभागवार टाकावीत
त्यांच्या आठवणी गोंजारत

माणसांची नावे
लक्षात ठेवावीत

नेपोलियनचे सैनिक

समजून त्यांचे गोडवे गावेत

लघवीच्या पृथक्करणाचा
आलेख प्रेयसीच्या

पर्समध्ये ठेवून
त्याला उत्तर-आधुनिक म्हणावे

अंतरे आणि मोसम
परिशिष्टात घ्यावेत

आणि जग समजल्याच्या निःशंक
समाधानात आत्ममग्न झोपावे
--- ००० ---

July 8

समजून घेणे म्हणजे काय रे भाऊ ?

मी कोणत्याही विषयातला तज्ज्ञ नाही, हे आधीच कबूल करून ठेवतो. त्यामुळे, ही पोस्ट अर्धवट ज्ञान, अज्ञान, तुटपुंजा अनुभव आणि अर्थ लावण्याचे दुर्बल कौशल्य यांवर आधारित असणे भाग आहे आणि त्याबद्दल क्षमायाचनाही करून ठेवतो. जगणे समजून घेण्याचे प्रमुख मार्ग कोणते, तर, धर्म, तत्त्वज्ञान, विज्ञान आणि कला. आता, यांतले तज्ज्ञ पुरतील का जगणे समजायला ? तर, काही विद्वान म्हणतात, एकात्मिक आकलन व्हायला हवे. हे चार मार्ग तर हवेतच, शिवाय, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र, मानसशास्त्र या सगळ्यांचाही अभ्यास हवा. आहे का कुणी असा एकात्मिक तज्ज्ञ, हे मला माहीत नाही. असला तरी तो परिपूर्ण असू शकत नाही, हे स्पष्टच आहे. कारण या सर्वच ज्ञानमार्गांत अफाट ज्ञाननिर्मिती झालेली असून ते काम सतत चालूच आहे. कोणत्याही माणसाचा मेंदू, त्याची क्षमता, उपलब्ध वेळ यांत ते बसणे शक्यच नाही. मग काय, समजून घेणे म्हणजे ? निरनिराळ्या तुकड्यांतून समजून घेणे चालूच असते, ते वाढतही असते, पण ते एकूणात सगळे अपूर्णच असणार आणि एकात्म होणे शक्यच नसणार. तर करावे काय, असा माझ्यासारख्या अतज्ज्ञ माणसाला प्रश्न पडणे साहजिक आहे.

तार्किकता / बौद्धिकता आणि कला यांबाबत मी एक पोस्ट दिली होती. सध्या, जागतिक साहित्यात मराठी साहित्याचे स्थान, यावरही चर्चा चालू आहे. या विषयांचा विचार एकेका मार्गाच्या तुकड्यांची सत्ये शोधण्यातून कसा करणार ? आता, समजा मी म्हटले की सर्व माणसांच्या जगण्यातल्या प्रश्नांना प्रस्तुत असते किंवा त्यांचा आवाका घेते ते जागतिक साहित्य – तर कुणी म्हणेल की ते जगात खपते किती यावर ते जागतिक आहे की नाही ते ठरवायला हवे. म्हणजे इथूनच मतभेद सुरू

होतील. मग कुणी म्हणेल की सर्व माणसांच्या जगण्याला प्रस्तुत असे काही असूच नाही शकत. आता अशा अनेक प्रश्नांचे करायचे काय ? सारखे कोणत्या तज्ज्ञांकडे जायचे ? आणि ते तज्ज्ञही बिचारे एकात्मिक तज्ज्ञ असूच नाही शकणार ! याचा अर्थ, आपण समजून घेण्याच्या मार्गात आहोत अशा भ्रमात राहून सर्वांनी नुसती तुकडे-मेहनत करत राहणे – हेच स्वीकारायचे का – हा एक प्रकारचा पराभवच नव्हे का ?

समजून तरी काय घ्यायचे आहे ? माणसामाणसांमधल्या संबंधांच्या जगात अमर्याद, अनिर्बंध गोंधळ आणि हिंसा चालू असलेली दिसते. प्रत्येक गोष्टीवर अधिकारवाणीने बोलणारे तुकडे-विद्वानही आहेत पण त्यांचा कवडीचा काही उपयोग नाही, हे दिसते आहे. आपण विज्ञान विज्ञान म्हणतो, ते सारखे शोधही लावत असते, चंद्रावर वा मंगळावरही जाऊ शकते पण माणसामाणसांतली हिंसा या विषयात ते ढ च असते ! मद्द असते ! फिर क्या करने का ? नुसते तत्त्वज्ञान तरी एकात्म असू शकते का ? वेगवेगळ्या प्रणाल्या, विचारपद्धती, आकलनपद्धती असतात – त्यांतून एकात्म काय समजणार ? की कुणीतरी म्हणणार की यातले अमुकच बरोबर ? या या कारणांनी माणसाच्या जगण्याची बोंब झालेली आहे, त्यांत असे असे बदल करा की इथे स्वर्ग अवतरेल ! – आणि हे कोण सांगणार ? कोण असणार असा सर्वमान्य इसम ? आणि सर्वमान्य होण्यासाठी कुणाची वा कोणत्या समितीची लागेल मान्यता ?

आणि असे एकात्मिकपणे सत्य समजणे हे विद्वानांच्याही बसकी बात नसेल तर इतर सर्वसामान्य माणसांचे काय ? आपल्याला कदापीही काहीच समजू शकणार नाही या खात्रीच्या पराभूत अज्ञानंधकारातच त्यांनी जगायचे ?

तर हा समजून घेण्याचा असा विचका काही कामाचा नाही. प्रत्येक माणसाला समजू शकेल अशी जर काही शक्यताच नसेल तर, नाही तरी शक्यच नाहीय काही पद्धत, असे म्हणून अधिकच वेगाने बरबादीच्या दिशेने जावे ? कुछ तो सिंपल होना चाहिये ! नाहीतर सर्वजण एकमेकांना चुना लावत राहतील ! आता ही अशी सिंपलपणाची कल्पना बालिश आहे, अडाणी आहे, असेही कुणी म्हणू शकेल !

--- ००० ---

July 7

Champra Deshpande wrote on Avinash Gaikwad's timeline.

खूप शुभेच्छा !

All great art contains an element of the irrational.
-- Edith Sitwell
सर्व महान कलेत अतार्किकतेचा भाग असतोच ! -- एडिथ सिटवेल.

एमिली डिकिन्सन

एमिली डिकिन्सन ही अमेरिकेतली एक महत्त्वाची कवी समजली जाते. ( १८३० – १८८६. ) आयुष्यातली शेवटची तीस वर्षे तिने समाजाशी नाते तोडून एका घरात काढली. तिने एकूण १८०० च्या वर कविता लिहिल्या असल्या तरी तिच्या

हयातीत त्यांतल्या फक्त दहाच प्रकाशित झाल्या होत्या. तिच्या आयुष्यात तशी ती कुणीच नव्हती. ही तिची एक छोटीशी कविता – ( अनुवाद माझाच -- )

मी आहे कुणीच नसणे ! तू कोण आहेस ?
-- एमिली डिकिन्सन.

मी आहे कुणीच नसणे ! तू कोण आहेस ?
तूही कुणीच नसणेच आहेस का ?
मग तर आपली जोडीच जमली !
बोलू नकोस कुठे ! लोक जाहिरातबाजी करतील – माहीतच आहे तुला !

किती भयंकर आहे कुणितरी असणे !
किती सार्वजनिक – एखाद्या बेडकाप्रमाणे
सतत पावसाळा समजून स्वतःचे नाव रटत राहणे –
कौतुक करणाऱ्या दलदलीसमोर !
--- ००० ---

July 6

अकड

तुला वाटते तू आहेस
म्हणून तुला अकड आहे
तुला वाटते तू सुंदर आहेस
म्हणून तुला अकड आहे
तुला वाटते तुला एक स्वभाव आहे
म्हणून तुला अकड आहे
तुला वाटते तुझी काही तत्त्वे आहेत
म्हणून तुला अकड आहे
तुला वाटते तू अद्वितीय आहेस
म्हणून तुला अकड आहे

पण तुझे नसणे
हे माझेही नसणेच असेल
हे कसे तुला कळत नाही
--- ००० ---

July 5

लिहायचीच कशाला कविता

चांगले कवी, वाईट कवी,
स्वच्छंदी कवी, आधुनिक कवी,
आदर्शवादी आणि नकारात्मक कवी,
आशावादी आणि निराशावादी कवी,
विद्रोही आणि कलावादी कवी,
वैज्ञानिक आणि आध्यात्मिक कवी
डावे आणि धर्मवादी कवी,
ब्राम्हण आणि ब्राम्हणेतर,
तसेच मराठा आणि बहुजनवाले कवी,
मूल्ये मानणारे आणि मूल्यहीन कवी,
उत्तर-आधुनिक, अस्तित्ववादी, ऍब्सर्ड
आणि अमूर्त कवी,
हिंसक आणि अहिंसक कवी,
गांधीवादी आणि नक्षलवादी कवी,
आंबेडकरवादी आणि बौद्ध कवी
आणि इतर वगैरे कवी
आहेत समजा, तर एकूणच
असली फुटकी आणि फुटकळ
कविता लिहावीच कशाला ?

की या प्रत्येक समूहाचे वाचक
वेगवेगळे असावेत किंवा
जरा इकडचे-तिकडचे पाहून
समूह बदलू शकतील असे
पण कोणत्या ना कोणत्या समूहाला
अनुकूल असणारे ?

प्लेटो म्हणाला की कवी भोसडीचे
भ्रम पसरवतात आणि
भावना चेतवून नासाडी करतात
यांना आधी हाकलून लावा
किंवा आता पटत असेल तर नष्टच करा ना

आधी एक ठरवले पाहिजे
की बाबा माणसाची मने
शांत, अहिंसक, पूर्ण मानवजातीची
हितचिंतक आणि रक्षक होणे शक्य नाही
-- हे मान्य करूनच पुढे जायला हवे

खूप इझम्स होऊन गेले
विद्वान म्हणतात की ते
त्या त्या काळापुरते होते --
आता नवे इझम्स लागतील
पण त्या च्यूत्यांना हे नाही कळत की
प्रत्येक माणूस हा एक इझम असतो
आणि जुने-नवे सगळे काळ
सतत चालू असतात माणसाच्या स्मृतीत.
आणि हे नसेल समजा समजत तर
मग सध्याच्या तरी तात्पुरत्या क्षणभंगूर
तुकड्यांसाठी कशाला हवीय कविता ?

कविता ही काळाने नियंत्रित असते
कविता ही समाजाने नियंत्रित असते
असे म्हणणाऱ्यांना तर
पडलाच पाहिजे हा प्रश्न
की बाबा मग कविता लिहायचीच कशाला ?
काळात आणि समाजात आहेच ना सगळे ! ?

तसे तर काहीजण म्हणताहेत
की चळवळी बोंबलल्या आहेत
आणि सामाजिक काय की आर्थिक काय
कोणत्याच पायावर लोक संघटित नाही होत
त्यामुळे, बघा ना, विद्रोही कविताही
हळूहळू लुप्त होत चाललीय
कारण वीस वीस वर्षे त्याच त्याच कविता
एक तर लिहून उपयोग नाही
आणि रटाळपणाचा रोग लागत चाललाय
आणि ऍब्सर्डिटीला मरण आहे
तर विद्रोही कवितेला का नाही ?

मराठी जगेल की मरेल
हा विषय काढलेला
नवशिक्षितांना, ग्रामीणांना आणि मागासांना
नाही आवडत – उलट, ते म्हणतात,
खूप लोक लिहू लागलेत, उपेक्षित जीवन
आत्ता कुठे येऊ लागलेय कवितेत !
यांची दुःखे त्यांना माहीत व्हावी
यासाठीच तर असायला हवी कविता
नाही तर लिहायचीच कशाला कविता ?

निसर्गवाला म्हणतोय
की त्याला काही वेगळेच दिसतेय
प्रेमवाला म्हणतोय
की त्याला खूप मजा येतीय
ते सांगू द्या ना सगळे --
आणि विरह आणि निसर्गप्रकोप
यांनाही मिळू द्या ना स्थान –
यांना का नको ?
आणि लगेच कुणी म्हणतेय
की भुकेचे, आरोग्याचे, शिक्षणाचे
आणि रोजगाराचे प्रश्न सोडून हे कशाला
नुसते उपभोगाचे आणि चैनबाजीचे ?

कवी म्हणजे हळवे, कमकुवत मनाचे,
अव्यवहारी, स्वप्नील, व्यसनी
आणि समाजात स्थानच नसल्याने
न्यूनगंडग्रस्त आणि त्याचमुळे
समाजावर आणि राज्यकर्त्यांवर
चिडून असलेले, क्षुद्र, नगण्य जीव
-- ते कविता लिहिणार म्हणजे हीच
असलीच आजारी, रोगट मनस्थिती
पसरवणार ते समाजात – मग यांना
कविता लिहायला बंदीच का करू नये ?

वस्तू, घटना, अनुभव, पुराणे, इतिहास
आणि आधुनिक जगण्याची सर्व आयुधे

यांच्यांतले अनेक अनपेक्षित आणि दूरदूरचे
आणि चकित करणारे संबंध कवी दाखवतात
-- काय गरज आहे त्याची ? नुसते असे
मनांचे वेगवेगळे विचित्र खेळ
खेळून काय हित साधणार आहे माणसाचे ?
हा वेळ आणि शक्ती यांचा अपव्यय नाही ?
असा अपव्यय समाजाचे नुकसान नाही करत ?

काहीजण म्हणतात की कविता शोध घेते
-- कसला ? आहे त्या मर्यादित मनाला
त्याच्या बाहेरचे काय सापडू शकेल ?
आणि एखाद्या कवीचे मन
हे इतर कुणाहीपेक्षा अधिक महत्त्वाचे कसे ?

ना पैसा ना प्रसिद्धी देते कविता
तरीही का लिहितो कवी ?
आत्मसमाधानासाठी ?
त्याचा हा स्वार्थी हेतू
समाजाने का चालवून घ्यावा ?
की ज्या हेतूने स्वतःची सुखदुःखे, विचार
यांचे घातक स्तोम माजवले जाते ?
समाज अशाने दुबळा नाही होत ?

खरे तर माणसाचे मन आणि विचार
यांशिवाय असतेच काय जगात ?
सर्वांच्या समान हिताचे सापडेल
तेवढेच बघावे – प्रत्येकाचे वेगवेगळे
काय कामाचे ?

मंद प्रकाशात दारू पीत
वाहवा वाहवा करत
सुखासीन मनांचे अवडंबर
माजवणाऱ्या कविता हव्यात कशाला ?
न कळणाऱ्यांना न्यूनगंड देणाऱ्या ?

आणि काय म्हणतात कवितेचे वकील –
कविता माणसाला उन्नत करते, बरे करते,

अहिंसक, संवेदनशील, सर्जक
आणि प्रेमळ करते – जगण्यात
सौहार्द आणि समता आणते.
कविता माणसाला स्वातंत्र्य देते.
क्रोध, द्वेष, संघर्ष यांचे उच्चाटन करते.
कविता निराशा घालवते,
जगण्याला अर्थ देते, जगण्यातले
न समजलेले प्रदेश उजागर करते.
जगण्याला मूल्यात्मकताच देते.

हे सगळे खरे कशावरून ? पुरावे काय ?
यांना भाकडकथा का म्हणू नये ?
माणसाचे मन हे विदीर्ण आणि संघर्षात्मक
असणे भागच असताना
हे अशक्य दावे का स्वीकारावेत ? या विज्ञानयुगात ?

अणूचा अभ्यास जर संगणकावर शक्य आहे
तर कवितेचा का नसावा ?
कवितेमुळे मेंदूच्या रसायनांत होणारे बदल
अभ्यासून त्यांतले फायद्याचे बदल
करता येतील अशा गोळ्याच का काढू नये ?
ती अक्कल येण्याच्या आधी तिच्या अभावी
चांगले म्हणजे काय यावर हुशार मतभेद
माजवणाऱ्यांना सहज दडपून टाकता येईल.
बहुमताचे सत्ताधारी घेतील योग्य ते निर्णय.

आणि सगळे जर तात्पुरतेच आणि गटनिहायच असणार आहे
तर लिहायच्याच कशाला कविता ?
--- ००० ---

July 4

जायबंदी

१

पहिले शाखाप्रबंधक पोस्टिंग किंवा पहिले ऑफिसर म्हणून पोस्टिंग हे ग्रामीण विभागातच होत असे. मी ज्या खेड्यात गेलो तिथलाच होऊन राहिलो. लोक म्हणत की तुम्ही बाहेरचे वाटतच नाही, आमचेच वाटता. सुमारे साडेतीन वर्षांनंतर माझी बदलीची ऑर्डर आली. अनेक गावांचे सरपंच आले आणि म्हणाले की तुम्ही इथेच राहा, तुमच्या बँकेला लागेल तेवढ्या सह्यांचा विनंती अर्ज आम्ही देतो. म्हटले, असे काही करू नका. मी मुलांना मुंबईला ठेवलेय माझ्या आईवडिलांकडे. या बदलीने तिकडे पोचायचे माझे अंतर निम्मे कमी होतेय, त्यामुळे, मीच जाऊ इच्छितो. आणि दुसरे म्हणजे असे सह्यांचे पत्र वगैरे नाही चालत आमच्याकडे. उलट, दबाव आणायचा प्रयत्न केला म्हणून माझ्यावर कारवाई होईल. मग मात्र लोकांनी निरोप देण्याचे ठरवले.

पण, सामान्यतः असे होत नसे. माझ्यासारखे फार थोडे वेडे सोडले तर, असे ग्रामीण पोस्टिंग मिळालेले कर्मचारी एकेक दिवस मोजत. कधी एकदा ही काळ्या पाण्याची शिक्षा संपतेय आणि तीन वर्षे पूर्ण करून आपण पुन्हा आपल्या शहरी परततोय, असे हवालदिल होत काळ कंठत. एकदा एक अमराठी कर्मचारी मला म्हणाला की अब मेरे तीन साल पूरे हुए हैं, अब उन्होंने मेरा ट्रान्स्फर करना चाहिये के नही ? म्हटले, बाळा, तुझ्या आधी इकडे आलेले बरेच आहेत रांगेत, ते बघ ना, तू एकटाच कुठे चाललास पुढे ?

२

माणूस छोटामोठा आजारी पडला तर ठराविक दिवस त्याला जायबंदी होऊन पडावेच लागते. ते आजारपण संपल्याशिवाय तो बाहेर पडणे वा रूटीन चालू करणे, हे करूच नाही शकत.

३

‘ तिरंगा ‘ चित्रपटात नाना एका गँगस्टरला त्याचे हात मागे बांधून उलटा टांगतो आणि पुढे विशेष म्हणजे, आत दोनतीन जिवंत उंदीर असलेली पिशवी खालून त्याच्या मुंडक्याला बांधतो ! एका मिनिटात तो इसम वठणीवर येतो ! नानाच्या मनात येईपर्यंत त्या इसमाची सुटकाच नसते !

४

तसाच आहे हा कोरोना काळ ! काहीजण प्रचंड हवालदिल झालेयत. ही परिस्थिती कधी बदलणार ते माहीत नाही. आणि चाललेय ते तर पूर्ण मनाविरुद्ध आहे, सहन करणे शक्यच नाहीय ! कंटाळाही गोठून आता डोके फोडायला लागलाय !

५

ऐसा कुछ नही चलता फ्रेंडस, जरा वैज्ञानिक दृष्टिकोण वापरा आणि शांत राहा. जे. कृष्णमूर्ती म्हणतात, समस्येपासून पळू नका, लिव्ह विथ द प्रॉब्लेम – समस्येबरोबर जगा – त्यातूनच तुम्हाला त्या समस्येतून बाहेर पडायची गुरुकिल्ली सापडेल ! कोणत्याही गुरुबाजीशिवाय, हे विचारार्थ जारी केलेले आहे. घरी थांबा, समजुतदार, शांत राहा आणि स्वतःच्या मनाचे कार्यकलाप समजून घ्यायला ही संधी वापरून तिचे सोने करा !

--- ००० ---

स्पर्धेतली पन्नासच्या वर नाटके वाचून आम्ही निवड केली होती --

Champra Deshpande wrote on Balkrishna Kawathekar's timeline.

खूप शुभेच्छा !

दरवाजा

दरवाजा खुलाच असतो
इथून फक्त पाच पावलांवर
जावेसेही वाटते बाहेर कधी कधी
पण तो काळ संपला की काय

तो पूर्ण दरवाजा
आता अंधाराने भरत आलाय
आणि तो अंधार झालाय घट्ट दगडासारखा
आणि त्यामुळे दरवाजा झालाय
भयानक अवजड आणि दुराग्रही

याच दरवाजातून एकदा
आला होता एक नाग आत
ही त्याची सर्वांत भयानक आठवण --
आता तो जणू झालाय आपोआप
चित्रगुप्ताचे खाते माझ्या नावचे

त्यावर काही वर्षांपूर्वी चिकटवलेला
गणपती झालाय आता जीर्ण
आणि मनाच्या तुकड्यांसारखा भग्न
मला ना आता कृपेची आस
ना शापाची काळजी
माझे काळीज आता स्वखुशीने
पूर्णपणे झालेय तो दरवाजा

पूर्वी मी रंगीत कपडे वापरत असे
तेव्हा दरवाजाची उघडझाप स्मूथ होती
नंतर बाहेर राजकारणे वाढत गेल्यापासून

त्याच्या बिजागऱ्या गंजल्या
इच्छेच्या तेलालाही जुमानेनाशा झाल्या

खानदेशातल्या शाळकरी मुलींच्या
एका गाण्याची आठवण आहे साठून
त्या दरवाजाच्या अंधारात –
बांधून दे बंगला रे भीमराया
त्या बंगल्याल्या एकच खिडकी
हवा येण्याकरिता रे भीमराया
त्या बंगल्याला दे दरवाजा
जाण्यायेण्याकरिता रे भीमराया
-- होते कधीतरी बाहेर जायची इच्छा
फक्त पाच फुटांवरच तर आहे तो

त्याचे पॉलिश गेलेय
पण दरारा वाटावा
असा तो दणकट होऊन बसलाय
आता ना मॉलच्या पिशव्या आत येणार
ना कुणी पाहुणे ना गहन पुस्तके

मला विद्युतदाहिनी नको
हा दरवाजाच वापरा
मीच याला स्वीकारत गेलो
आणि होऊ देत गेलो एक क्रूर
हुकूमशहा -- आणि तरीही अजूनही

मी त्याच्याकडे प्रेमानेच पाहतो
--- ००० ---

जगणे मरणे

ते गाव सुटले संपले आयुष्यातून
असे कट करता येणे
हेच तर जगण्याचे प्रेम

लोणची मुरांबे काचसामान
न फुटता आले याचा आनंद होतोय

म्हणजे मरणे कठीणच जाणाराय

--- ००० ---

Champra Deshpande added 2 new photos.

Champra Deshpande's photo.

Champra Deshpande's photo.
उगीच आपले दोन फोटो --

July 3

तिच्यामुळे की तीच

तिच्यामुळे
प्रेरणा स्फूर्ती मर्मदृष्टी
की तीच ते सर्व
याच्याशी वाचकाला काय देणेघेणे

मुळात आहे का
एवढे काही म्हणावे असे कवितेत
हे तो बघणार

कवी खुला असतो
तो मुद्दाम कळू देतो स्फूर्तीला
की तीच आहे स्फूर्ती

वाचक उथळ असेल तर
त्याला मर्म नाहीच कळणार
हे कवी सोडून देऊ शकतो

पण तीच हे कळल्याने
स्फूर्ती आनंदित होणे
हा खाजगी आनंद
हवाच असतो कवीला

मर्म आहे नाही

असे चालत राहिले तरी
कवी मश्गूल असतो
स्फूर्तीबरोबर एकांतात
--- ००० ---

पुण्यबिण्य

एक हाडांचा पिंजरा टाकतो
अल्युमिनियमचे दाणे
निळ्या कावळ्यांना

त्याला हवे असते पुण्य
आणि कावळेही बिचारे व्हावेत काळे
या हेतूने तो रोज हे करतो
त्याची हाडे करकरवत

कावळे कबूतरांसारखे
घुटुर्र घूं ओरडतात
त्यामुळे रोज पिंजऱ्याचा
एक पडोसी क्रोधित होतो

त्याचा क्रोध गंजलेला असल्याने
त्याचे हिमोग्लोबिन उडालेले असते
पाऱ्यासारखे पांढरे फटक पडत

क्रोधी माणसाचे पूर्ण खानदान
पिंजरे होण्याच्या मार्गावर असते

खानदान म्हणते या क्रोध्याच्या
तावडीतून सुटू तो सुदिन
बाकी काहीही नको
पुण्यबिण्य
--- ००० ---

July 2

दोन कविता --

काहीतरी राहूनच जातेय ( आभासी हॅम्लेट )

खरे तर मनाला माहीत असते
पण ते म्हणते
की कळतच नाहीय
काहीतरी राहूनच जातेय
कितीही बोलले तरी --
वाटतेय की
ते आठवेलच
वाटतेय की
ते अगदी माहीतच आहे

पण मग राहतेय कसे काय
की बोलले जातच नाहीय
की बोलल्याने काही बिघडेल
असे वाटतेय
किंवा ते अनपेक्षित वाटेल
म्हणून टाळलेच जातेय
की काहीसे अयोग्यही वाटतेय

इजाही व्हायला नकोय ऐकून
आणि बोलल्यामुळे
हे अबोल बोलणे
थांबायलाही नकोय

कदाचित न जाणो उलट छानच घडेल
सहज – खोळंबलेले केवळ
बोलले जाण्याची वाटच पाहात
--- ००० ---

## होकार

तो कवी होता
ती सूचकता होती

तो म्हणाला कबूतर
ती म्हणाली पॅरिस

तो म्हणाला व्हिस्की
ती म्हणाली रुमाल

तो म्हणाला छत्री
ती म्हणाली कादंबरी

शेवटी त्याने
धाडस करायचे ठरवले

तो म्हणाला पुणे-मुंबई महामार्ग
ती म्हणाली गेट वे ऑफ इंडिया

इथे तो उत्तेजितच झाला
त्याला तिचा होकार कळला होता

तो कविता लिहू लागला
सूचकतेच्या पूर्ण सहभागाने
--- ००० ---

आठवलेसाहेबांसारखे थोडे आपलेही कवित्व --
विनाकारण रस्त्यावरती येत आहेत लोक
त्यांना सगळा वाटतो आहे हलकाफुलका ज्योक.

चित्तथरारक पुस्तक --
**भंडारदरा धरण** ( पुनर्जन्माची कहाणी ) – ले० मनोहर शियेकर, प्रका० रफल्स पब्लिकेशन सर्व्हिस, पुणे.

काहींना आश्चर्य वाटेल की मी या पुस्तकावर कसे काय लिहितोय. या पुस्तकाचा लेखक हा महाराष्ट्राचा एक अभिमानास्पद अभियंता असून तो माझा आतेभाऊ आहे. त्या नात्यामुळेच हे पुस्तक माझ्याकडे आले हे खरे असले तरी आपापल्या क्षेत्रात कशी उत्तुंग आव्हाने निर्माण होतात आणि ती कशी हिकमतीने पेलली जातात याची ही उद्बोधक आणि प्रेरणादायक कहाणी आहे. क्षेत्र कलेचे असो की शास्त्राचे निरनिराळ्या माणसांनी समस्यांना कसे तोंड दिले हे पाहणे हे पुढील पिढ्यांसाठी मौल्यवान असते. हे पुस्तक तसे फक्त पन्नास पानांचे असून आणखी काही पाने संबंधित माहितीची आहेत. सिव्हिल म्हणजे स्थापत्य अभियांत्रिकीच्या क्षेत्रात महाराष्ट्रात निर्माण झालेले एक प्रचंड आव्हान कसे पेलले गेले याची ही चित्तथरारक कहाणी आहे. कोणत्याही शाखेच्या अभियंत्यांनी तर ही वाचावीच पण तुमच्याआमच्यासारख्या इतर

लोकांनीही वाचावी अशी आहे. विद्यार्थ्यांच्या वाचनातही हे पुस्तक समाविष्ट असेल तर अशा कामांसाठी त्यांचीही मानसिक तयारी करायला हे महत्त्वाचे ठरू शकते.

१९६७ च्या भूकंपात भंडारदरा धरणाला धक्का बसला आणि १९६९ साली त्याची एक भिंत असुरक्षित झाली. १९२६ साली बांधलेले हे धरण. हे धरण फुटले असते तर जीवितहानी आणि वित्तहानी प्रचंड झाली असती. ही भिंत दुरुस्त करण्याचे अत्यंत जोखमीचे, तांत्रिक कौशल्याचे आणि धाडसाने, धीराने करण्याचे हे काम होते. यासाठी जी अभियंत्यांची टीम नेमण्यात आली तिचा कार्यकारी अभियंता हा माझा भाऊ होता. त्यामुळे, या अत्यंत महत्त्वाच्या कामाची प्रत्यक्ष हाताळणी केलेल्या माणसाकडूनच हे सर्व लिहिले गेले आहे. या कामातल्या तांत्रिक समस्या, निसर्गाशी स्पर्धा करत करावे लागणारे काम, असंख्य योजना, ताणतणाव, कुठून कोणते मटेरियल व यंत्रसामुग्री मिळवावी याचे प्रश्न – असे हे अनेकांगी आव्हान होते. या कामातल्या आपल्या लोकांच्या कौशल्यामुळे शासनाचे करोडो रुपये वाचणार होते. या शास्त्राचा अभ्यास असणाऱ्यांना हे सगळे अधिक बारकाईने समजावे म्हणून यात तक्ते व आकृत्याही दिलेल्या आहेत.

एक प्रसंग तर असा आला होता की एखाद्या गूढशास्त्रवाल्याला काही विचारावे असे ठरले ! त्या गूढशास्त्रवाल्याने ध्यानातून नेमकी समस्या सांगणे आणि अमुक कामगाराला धोका असल्याचे सांगणे – हा एक अजब भाग यात आहे !

हे पुस्तक सुविहीतपणे प्रसिद्ध होण्यात चंद्रमोहन हंगेकर यांचे विशेष योगदान झालेले आहे.

एकूणात आपले भंडारदरा धरण आयसीयूतून बाहेर पडून पुन्हा टुणटुणीत कसे झाले याची ही रंजक आणि ज्ञानवर्धक गोष्ट आहे. सदर दुरुस्तीनंतर आता अठ्ठेचाळीस वर्षे झालेली असूनही ते धरण धडधाकट आहे ! या प्रचंड कामात माझ्या आतेभावाचा एक महत्त्वपूर्ण सहभाग होता हे अर्थातच मला अभिमानाचे आहे.

--- ००० ---

July 1

फोटो

ते भयानक झालं तरी
ब्यूटिफुलच दिसतंय
मिनिटामिनिटाला बदलतंय
आणि सतत मायला फोटोजिनिकच
-- किती काढणार फोटो

कवितेत उकलून ठेवावा
एखाद्या तुकड्याचा पूर्ण अर्थ
तसंच हे सालं दर सेकंदाला

फोटोग्राफर म्हणतंय शेवटी

हे सगळीकडंच असणार ना
बघतील ना लोक
हेच कशाला पायजेलाय

आणि सौंदर्य काय म्हणतंय
टिपून साठवायची गरजच नाहीय
बघा आणि पुढं जा

तरीही कविता असतेच ना
फोटोही असणारच की
आश्चर्याचे स्नॅप्स

देणाऱ्याचा आणि घेणाऱ्याचा
हावरटपणा मात्र फोटोत न येवो म्हणजे झालं
--- ००० ---

कल्पना

आपली ओळख जरी
आजच झाली असली
तरी मी तुला समजून घेईन
माझ्या भूतकाळावर आधारित
माझ्या कल्पनेने

तूही माझ्याबद्दल तसेच करशील

आपले भूतकाळ असले
जर जुळणारे एकमेकांशी
तर वर्तमानातले
आपले प्रेमही फुलेल

भूतकाळ न जुळल्यास
तुझ्यासारखी छान प्रेयसी
गमावली जाईल की काय
हेच फक्त मला
माझ्या कल्पनेवर आधारित
भय आहे

की भूतकाळ सोडूनच देऊ या
आपापले
म्हणजे जुळण्याचा प्रश्नच
रद्द होईल

याचे उत्तर मात्र वर्तमानातच मिळावे लागेल

--- ००० ---

June 30

तुकाराम या विषयावर मी २५ कविता लिहिलेल्या आहेत -- त्यांतले हे घ्या --

तुकारामसार

तुकाराम सार ऐका हे अपार
जगण्याचा भार टाकावया
मन हेच केंद्र फेका हो बाहेर
देवाचे माहेर स्वतःच व्हा
देवाचे अस्तित्व म्हणजे नास्तित्व
रिकामीक सत्त्व जगण्याचे
वनांतरी जाणे सुखांना मुकणे
नको मुळी सुकणे संसाराचे
ठायीच बैसोन करा एकचित्त
घरी सत्य वित्त सहजची
फावला एकांत एकविध भाव
अवघेचि भेव नष्ट आता
स्मरणाच्या साठी वेळचि नसावी
सर्वकाळ व्हावी भेटगाठ
भेद तो नासला अहंकार गेला
चित्ती देव आला हेचि सर्व
देव तेचि पुण्य अदेव ते पाप
रिकामे ते माप असू द्यावे
आता व्हावे जल देवाची जी मर्जी
जावे मनमौजी सर्वांसवे
अवघेचि शुभ माझे नाही काही
मला नाही काही क्षोभचिंता
लागला हा झरा अखंडचि वाहे

तुका म्हणे घ्यावे पूर्ण विश्व
प्रत्यक्ष कृतीचे सुंदर सौष्ठव
शब्दाचा गौरव कामा न ये
तुका म्हणे आता निवांतचि राही
पाहिले ते पाही परतोनी
--- ००० ---

आज सकाळी टीव्हीच वर ' माझे माहेर पंढरी ' या अभंगाचे गायन चालू होते. मी जरा उशिरा लावले. गायकाचे नाव सांगितले वा दाखवले गेले नाही आणि त्याच्या चेहऱ्यावर अंधारच होता. पण, ग्रेट ! हा अभंग संगीतातून किती अत्युच्च उत्कटतेला पोचू शकतो त्याचे मूर्तिमंत प्रात्यक्षिकच ! आणि साथीला असलेला तबलजी ! तोही असामान्य ग्रेट !

कोण कोण होते हे महाराष्ट्राचे प्रेमबिंदू ठरावेत असे संगीत-प्रवासी ?

( श्रोत्यांमध्ये मुख्यमंत्री आणि त्यांचे कुटुंबीय होते, तो कार्यक्रम. )

दृश्य

राष्ट्रप्रमुख सस्मित मुद्रेने
भेटताहेत त्यांच्या सैनिकांना
हे दृश्य फक्त समोर
बाकी बोलायचे काहीच नसते
एवढ्यातूनच खूप काही पोचते

सैनिक हसत नाहीत

त्यांच्यात्यांच्यांत आणि पाहणाऱ्यांच्यांतही
एक दरारा असतो आदर असतो आणि जणू
यांतला कुणीही गाजवू शकणार असतो
असामान्य शौर्य कधीही
( जरी मोकळ्या वेळात
ते गात नाचत बागडत हसत असले तरी )
मृत्यूच्या बेफिकिरीत

आत्मविश्वास त्यांच्या रक्तातच असतो

जगभरच्या माणसांना
आपापल्या सैनिकांचा अभिमान असतो
--- ००० ---

June 2020

June 30

कुलफीप्रिय

तेच पांढरे पक्षी
रोज तितकेच तास
त्याच ठिकाणी
घिरट्या घालत असल्याने
माझ्या मनाला जगाची सवय होते

नेमक्या अमुक वाजता दुपारी
वाजायची घंटी कुलफीगाडीची
तेव्हापासून सगळा काळ
सलग वाटत राहिल्याने
भीतीच्या वेळी भयग्रस्त व्हायचे
हे मनाला सांगावे लागत नाही

ही काळाची सततता आणते
कंटाळा थकवा नीरसता आणि निर्जीवता
जसजसे मनाचे बाहेरचे स्तर होत जातात
जाड जीर्ण जाचक जेरबंद

हा दोष बाहेरच्या सततच्या जगाचा
की कुलफीप्रिय मनाचा
हे समजायलाही काळच लागेल
या कल्पनेने भयग्रस्तता येते
--- ००० ---

June 29

' मी ग्रेट आहे ' ही श्रीधर तिळवे यांची कविता मला शेयर करायची होती पण तिथे शेयर हा ऑप्शनच नाहीय. मराठी संस्कृतीचा थोडक्यात पंचनामा चांगला आहे. आणि हो, तिळव्यांच्या कवितेला माझे अनुमोदन आहे ! ( कॉमेंटमध्ये लिंक दिलीय. लिंक ओपन होत नव्हती म्हणून ती कविताच खाली कॉमेंटमध्ये कॉपीपेस्ट केली आहे. )

नक्षी

टप्प्याटप्प्याने घडतेय
पदराची नक्षी
आणि मास्कच्या आडून उडतोय
मनातला पक्षी

तयारच आकाश
नव्याने घडतेय
उद्याचे स्वप्न
आजच पडतेय
--- ००० ---

Champra Deshpande wrote on Amit Deshpande's timeline.

खूप शुभेच्छा !

Champra Deshpande wrote on Dilip Wadekar's timeline.

खूप शुभेच्छा !

Champra Deshpande wrote on Subhash Kulkarni's timeline.

खूप शुभेच्छा !

हुसेनचे घोडे

हुसेनचे घोडे
गतिमान होते
माझ्या मनाच्या
खालच्या तुकड्याने
वरचा तुकडा
कंट्रोल करावा
तसेच तणावग्रस्त

हुसेनची मास्टरी
त्या घोड्यांतही
गाजवत होती रंग
पाशवी रस्त्यांचे

मनाला येत होता
एक धिप्पाडपणा
तुटल्याने विव्हळणारा

आता कोणत्या
शक्तीला जावे शरण
स्वतःपासून वाचण्यासाठी
अशी हवालदिल
अवस्था दणकट तीव्र
प्रयत्नांत थिजलेली

रस्ते
वाट पाहणारे
--- ००० ---

फेसबुकवर टाईप करताना अक्षरे उमटायला वेळ लागतो -- इतरत्र असा प्रश्न येत नाही -- असे कशामुळे होते ?

सत्कारणी

मी काही केले नाही
म्हणजे वेळ वाया घालवला
असे न होणारे काय असू शकेल
म्हणजे मी काहीच न करता
निसर्ग चालूच असतो तसे

मी बघतोय एकीकडे
आणि विचार काही
दुसराच चालू आहे
तर वेळ वाया गेला
असे म्हणता येईल

मी काही वाचत असताना
मला काहीच समजत नाहीय
सेक्सच्या विचारांमुळे
तर वेळ वाया गेला

की सत्कारणी लागला

हा प्रश्न मीच मलाच विचारतोय
माझ्या स्वेटरचा ब्रँड उच्च आहे
मी भांग चांगला पाडतो
मी पिकनिकमध्ये रमतो
आणि नोकरी आणि वाचन

मी थोडाफार प्रसिद्धही झालोय
माझ्या कवितांमुळे
--- ००० ---

June 28

Pravin Kamble's photo.
रंगमंच...सादर केलेले प्रयोग
निर्मित - मयुरी थिएटर
नाटक - "स्टॅलिन"
लेखक - च.प्र. देशपांडे
दिग्दर्शक - प्रविण कांबळे
रवींद्र नाट्य मंदिर प्रभादेवी मुंबई

नॉर्मल

सूर्य काही सांगत नाही
आपणच ठरवतो की
चांदण्याला पृथ्वीची चव असते
आणि अंधाराला असतो देवाचा वास

आपणच म्हणतो
चाबूक शक्य तो वापरला जाऊ नये
आणि इकडे तर आधारकार्डाशिवाय
काही घडूच नाही शकत

कोणत्या इमारतीला तडा गेला
तर माझे मन दुखावेल
हे ठरलेलेच असते आधीच

सर्वसंमतीने

अनोळखी वाटणारा मासा
टाकून देतो समुद्र
किनाऱ्यावर
फक्त कावळ्यांसाठी

या रगाड्यात नसलेले अल्पसंख्य
हमखास ठरतात ॲब्नॉर्मल आणि
नॉर्मल सगळे असतात कंटाळून
आत्महत्येच्या विचारात
--- ००० ---

June 27

( बौद्धिक – एकरेषीय ) अर्थहीन कविता किंवा अ-कविता ही माझी १७ जूनची पोस्ट काही कवींनी मनसोक्त, अनिर्बंध, फ्री कविता लिहिण्यास उद्युक्त व्हावे यासाठी होती. तिथे त्या वेळी काहींनी त्यांच्या जुन्या-नव्या कविता दिल्याही होत्या. दीपाली कुलकर्णी यांनी मात्र दीर्घ लेखन केले होते, पण ते पूर्ण नव्हते. आता त्यांनी फायनल करून इथे दिलेली कविता पाहून थक्क झालो. त्या निरर्थक कवितेच्या पोस्टला हे दांडगेच फळ आले म्हणायचे !

अ-कविता म्हणजे कांदेबटाटेलिंबे इतस्ततः टाकणे नव्हे. त्या कवितेलाही कवीच्या आकलनाची एक आंतरिक सलगता असते आणि जाणीव-नेणीव यांच्या एकत्रित कृतीमुळे येणारा एक भरघोसपणा असतो आणि अनेकार्थताही असते. अशी कविता, कविता म्हणून समजल्या जाणाऱ्या रूढ प्रकाराची काही वैशिष्ट्ये नाकारते, अभिव्यक्तीचे खुले स्वातंत्र्य घेते आणि बौद्धिक अनाकलनीयतेच्या क्षेत्रातच मुख्यतः आपला ऐवज मांडते.

दीपाली कुलकर्णी यांची कविता एका बाजूला अ-कवितेचे सर्व स्वातंत्र्य घेते पण त्याचबरोबर सांगीतिक लयीचा बाजही अवलंबते. त्यांनी यापूर्वी फारसे काही लिहिलेले नाही, हे पाहता, ही कविता म्हणजे एक चांगला अपघात म्हणावा इतकी जोरकस आहे. याचा अर्थ, अशा प्रकारचा अनिर्बंध आशय त्यांच्या मनात घोळतच असावा, त्याला हा एक योग्य मार्ग सापडला, असे दिसते. ओसंडत्या तुफान गतीची ही कविता मराठीत नक्कीच एक वैशिष्ट्यपूर्ण कविता ठरावी. त्यातही, एखाद्या स्त्री-कवीने असे काही लेखन केल्याची फारशी उदाहरणे नाहीत, हाही एक ( महत्त्वाचा नसलेला असा ) मुद्दा आहेच.

या कवितेसाठी दीपाली कुलकर्णी यांचे मनःपूर्वक अभिनंदन ! त्यांच्याकडून आणखीही असेच उत्तम लेखन घडत राहो, हीच सदिच्छा !
--- ००० ---

लेबले

ब्राम्हण म्हणून कुणाला सडवले जाते
मराठेपणाच्या अभिमानात कुणी सडतो
आपण दलित की आंबेडकरवादी की बौद्ध
या विवंचनेत काही सडतात
रोमँटिकांना लोक म्हणतात
तुमचा काळ संपला आता तुम्ही जुने झालात
कलावादी तर हेटाळलेच जातात
हिंदुत्ववाद्याला व्हायचे असते जगद्गुरू
कुणाला पूर्ण जग आपल्याच धर्माचे करायचे असते
आताच्या गुंताड्यात कम्युनिस्टांचे काय काम
ॲब्सर्ड अस्तित्ववादी अतिवास्तववादी
हे सगळे टाका आता साठोत्तरीत
आता समकालीन अशी नवी लेबले लागतील
कलावंतांना सरळ आता सत्योत्तरी म्हणावे हे बेश्ट

दलित शोषित वंचित पीडित
मधमवर्गीय नवश्रीमंत
कारखानदार प्रशासक कारकून मजूर
दुकानदार डॉक्टर इंजिनियर
वगैरे सक्तीच्या लेबलांत काही गाडले जातात

कवी लेखक कलावंत तर तुरुंगातच असतात
मित्र नातेवाईक म्हणतात वाटले नव्हते
हे असले असते याच्या डोक्यात शी ऽऽ
म्हणजे चोरून हा किती भंगार जगत असणार
शिवाय हा अनैतिक घातकी आणि विकृत आहे
--- ००० ---

वाळवी

मी एकटा बसून असलो
तरी असतातच माझ्यात असंख्य संबंध
मोडकळीला आलेल्या
वस्तुसंग्रहालयाचे वारस म्हणून

हवेचा श्वास कोंडतोय
असा मला भास झाला तरी

माझ्या कपड्यांच्या कपाटाची
वाळवी कधी काढावी
या विचारात मी बसून राहतो

अशा वेळी माझ्या कल्पनेतली
माझी जुनी प्रेयसी
टेबलाच्या ड्रॉवरमधून बाहेर येते
एक कर्तव्य म्हणून फक्त
कारण आमच्यातला हरवलेला चार्म
पुन्हा शोधायचा आम्ही कंटाळा करतो

करायचे काय हिचे
या विचारात मी बंद दाराकडे पाहतो
मग खिडकीतून बाहेर
समोरच्या घरात
जेवत असलेल्या कुटुंबाकडे

मग मला निराशा येते आणि मी
वाळवीच खाऊ लागतो अचानक खरवडून
--- ००० ---

Pravin Kamble's photo.
रंगमंच...सादर केलेले प्रयोग
निर्मित - मयुरी थिएटर
नाटक - "विरह वेदना अर्थात साक्ष मावळत्या सूर्याची"
लेखक - चं. प्र. देशपांडे
दिग्दर्शक - प्रविण कांबळे
कालिदास कला मंदिर- नाशिक.

June 26

Champra Deshpande wrote on Neelima Kadam Jangada's timeline.

खूप शुभेच्छा !

Champra Deshpande updated his status.

सृष्टी

मी झोपेतून उठतो म्हणजे
झाडांना नाकारतो असे मुळीच नाही
माझे एवढेच असते म्हणणे
की सिनेमाचे हीरो म्हणजे सृष्टी नव्हे

उगीचच लांगूलचालन करत
मी सूर्यस्तोत्र नाही गात
तो त्याचे काम करतो
हे मात्र मला मान्य असते

खरा प्रॉब्लेम असतो तो सत्ताधारी
तो सूर्यही झाकोळून टाकू शकतो
सिनेमाचे हीरो शेपूट हलवत
त्याच्या घरी पाणी भरतात

सूर्य तिकडे असतो ते माझ्या मनामुळे
हीरो मेकप उतरवतो ते माझ्या मनामुळेच
सर्व शेपट्या हलतात त्याही माझ्या मनांमुळेच
हे पाहून रोज मी माझे मन थोडे थोडे चिरडत राहतो
--- ००० ---

Pravin Kamble's photo.
रंगमंच...सादर केलेले प्रयोग
निर्मित - मयुरी थिएटर
नाटक - "विरह वेदना अर्थात साक्ष मावळत्या सूर्याची"
लेखक – चं. प्र. देशपांडे
दिग्दर्शक - प्रविण कांबळे
कालिदास कला मंदिर- नाशिक.

मास्क तात्पुरता तोंडावरून खाली हटवलेले लोक हे नेकबेल्ट ( मानपट्टा ) वाले मानेचे आजारी लोक वाटतात !

June 25

इच्छा असूनही

माहीत असलेले नाहीय हे
उद्दामपणे उडत जाणारे मांजर
आकाशात कोणतेच
दुःखाचे चिन्ह नसताना

आपल्याला हवा तोच
हवा तसाच येईल प्रतिसाद
हरवलेली सायकल शोधणाऱ्या
थकलेल्या पोलिसाचा
हे सांगता नाही येणार

नवा असला संपर्क तरी
कारखाना तर चालू झालेला असून
कामगार हजर आहेत डबे घेऊन

अशा वेळी खरे तर
तिला सुचायला हवे
तिकडून येणाऱ्या हवेला
स्पर्श करून सांगणे
की तिचाही होकार आहे

दोन्ही बाजूंनी
अडवले जातायत ढग
मग इच्छा असूनही
पाऊस पडणारच कसा
--- ००० ---

Champra Deshpande wrote on Pranav Sakhadéo's timeline.

खूप शुभेच्छा !

Champra Deshpande wrote on Minakshi Patil's timeline.

खूप शुभेच्छा !

फेडरिको गार्सिआ लोर्का या स्पॅनिश कवीची ची एक कविता --

मिट्ट कबुतरे

विजयी शाखासंभारातून मी पाहिली
मिट्ट काळोखाची दोन कबुतरे.
त्यांतले एक म्हणजे होता सूर्य,
आणि दुसरे होता चंद्र.
मी म्हणालो ‘ माझ्या छोट्या शेजाऱ्यांनो
कुठे आहे माझ्या थडग्याचा स्मारक दगड ? ‘
‘ माझ्या शेपटीच्या पिसाऱ्यात, ‘ म्हणाला सूर्य.
‘ माझ्या घशात ‘, म्हणाला चंद्र.
आणि मी पृथ्वी पांघरून बाहेर फिरत असताना
पाहिले शुभ्र बर्फाचे दोन गरुड
आणि एक मुलगी नग्न असलेली.
त्यातला एक दुसरा होता
पण ती मुलगी काहीच नव्हती.
मी म्हणालो, ‘ छोट्या गरुडांनो,
कुठे आहे माझ्या थडग्याचा स्मारक दगड ? ‘
‘ माझ्या शेपटीच्या पिसाऱ्यात, ‘ म्हणाला सूर्य.
‘ माझ्या घशात ‘, म्हणाला चंद्र.
विजयी शाखासंभारातून मी पाहिली
दोन कबुतरे – दोन्ही नग्न असलेली.
त्यांतले एक दुसरे होते
आणि दोन्ही मिळून ती काहीच नव्हती.
--- ००० ---

June 24

Champra Deshpande wrote on Raj Chinchankar's timeline.

खूप शुभेच्छा !

Champra Deshpande updated his status.

मापकाटा

रागाचे माप

परिस्थितिनुरूप असावे लागते
किंवा लोकांना माहीत असल्यास
तुमच्या स्वभावानुरूप

प्रेमाचेही दर्शन देता येते
ओळख घसट वा आसक्ती
यांच्या प्रमाणात तारतम्याने

यांत गफलत झाली
वा पाहणाऱ्याला वाटली
तर मूळ मुद्याची गाडी भरकटून
नको तिकडे जाते

भावना प्रगटीकरणावरचे नियंत्रण
करतात कमावलेली बुद्धी
आणि सराईत सावधपणा

याचा मापकाटा नसतो
कुठेच उपलब्ध

त्यामुळे बऱ्याचदा
मूळ मुद्दा राहतो बाजूला
आणि भावनेचे प्रमाण
आणि प्रगटीकरणाची पद्धत
यांचीच चर्चा निर्णायक ठरते
--- ००० ---

Champra Deshpande added a new photo.

आज संध्याकाळचे आकाश --

पुनरुत्पादन

मनाच्या हालचालींची
भाषा बदला आता
तुमच्या रोमँटिक
शर्टाची चंद्रबाही

कितीशी तहान शमवणार

तुमचा मूड तसा असेल
तर तुम्ही म्हणा
किती विद्वान काही झाडे
किती त्यांचा विस्तार
कामशास्त्राच्या शेकडो फांद्यांचा

प्रत्येक धून गाईल
निमंत्रणाची इमारत
आणि दगडांचे ढीगही
वाटतील तुम्हाला
पक्ष्यांचे पुनरुत्पादन

नुसते निवेदन नको
जग जाळून
पेटला पाहिजे
प्रेमाग्नी ( कधी सूचक )
प्रत्येक मजल्यावर
--- ००० ---

June 23

Champra Deshpande wrote on Pratibha Tembe's timeline.

खूप शुभेच्छा !

Champra Deshpande wrote on Sharad Deshpande's timeline.

खूप शुभेच्छा !

दुःखाचे दशावतार

स्त्रीचे दुःख स्त्रीलाच कळणार – ( त्यातही काळ्या स्त्रीचे वेगळे, गोऱ्या स्त्रीचे वेगळे, नोकरदार स्त्रीचे वेगळे, मजूर स्त्रीचे वेगळे आणि समसंभोगी स्त्रीचे वेगळे )
पुरुषाची दुःखे पुरुषालाच माहीत –
श्रीमंताची श्रीमंताला, गरिबाची गरीबाला आणि मध्यम वर्गीयाला तर वालीच नाही –

आणि चिनी माणसाचे दुःख अमेरिकनाला कसे कळणार ?
आणि मुख्य म्हणजे कुठल्याच एका व्यक्तीचे दुःख दुसऱ्या कुठल्याच व्यक्तीला कळणार नाही –
( हे पाहिले तर दुःखाचे दशावतार म्हणायच्या ऐवजी दुःखाचे अब्जावतारच म्हणावे लागेल ! )
तर, असे हे सगळे मान्यच केले समजा, संवेदनशीलता वगैरे झूठ असते, हेही मान्य केले, समजा –
तर काय ?
मानवी आयुष्यातली ही एक सततची, न सुटणारी, शोकात्म समस्या समजावी
की सगळी मने शास्त्राच्या मदतीने एकसारखी करायचे प्रयत्न करावेत – म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोणातूनच सुटेल ही समस्या, असे काही ?
अशा परिस्थितीत करावे काय, ही एकच समस्या आहे, खरे तर, असे नाही वाटत ?
--- ००० ---

कोरोना काळात सारखेच हेवी डोस नकोत
म्हणून हा घ्या एक साधासा हलका डोस --

सवय

काही काळ
संपर्क नाही झाला
की कळते
सवय झालीय

संपर्काच्या अभावातही
गोडवा असला
तरी आहे तो ताणच

तुलाही असेलच ना
मन

तुला नाही कळत का
माझ्या मनाची अवस्था
तुझ्या स्वानुभवावरून
--- ००० ---

सत्योत्तर

रस्त्यात सापडलेल्या सूटकेसमधून
माणसांच्या जिभा निघाल्याची बातमी

ही सत्योत्तर जुमला असल्याचे
ओरडू लागले काहीजण
तेव्हा काहींनी राशोमानची आठवण देत
नेमके सत्य असे काही नसतेच
हे पटवायला सुरुवात केली

लोकशाही मौल्यवान का तर ती माणसाला
अमुकच एक सत्य असते या भ्रमातून मुक्ती देते
असे एक श्रेयस्कर सत्य समोर आले

लोकशाहीचा हा नवा मार्गदर्शक फंडा
राखण्यासाठी इच्छा असो वा नसो
सर्वांनाच सत्योत्तरालाच सत्य
म्हणण्याची पद्धत स्वीकारावी लागली

सत्याचा डांगोरा आणि आरडाओरडा
चालूच राहिला पण जनता शांत राहू लागली
सगळे सत्योत्तरच आहे तर आपल्या
आवडी लहरी इच्छा स्वप्ने यांना तरी वाव देऊ
असे लोकांनी ठरवले आणि ते रिलॅक्स झाले

लोकांनी सत्याकडे आता
सुखोपभोगाप्रमाणे पाहायला सुरुवात केली --
उत्तेजित राहणे त्यांना मस्त वाटत होते
--- ००० ---

June 21

चेहरा

चेहरा अट्टल दगडी हवा
बदलता मूड उमटू नये त्यावर
आत काहीही चाललेले असो
बाहेरची आक्रमक
आत्मविश्वासाची मूर्ती
मानवी भूमिकांनी युक्तच हवी

लेचापेचा करुणायुक्त

प्रेमळ चेहरा
फार मोठा पल्ला नाही गाठू शकत

काही माणसे मारावी लागतील
काही त्या चेहऱ्याच्या निर्णयाने मरतील
कोट्यवधींवर दबाव ठेवावा लागेल
यासाठी आपले मन देणे
हे त्या चेहऱ्याचे बलिदानच असते
त्यामुळेच त्याला हक्कही असतो
इतरांचे बलिदान मागण्याचा

हे न समजता आणि देशाच्या
स्वाभिमानाची दक्षता न बाळगता
काहीजण शोधतात राजकारणात
कोवळे कवी चेहरे

खरी काळजी असेल सर्वांची
तर अविचल दगडी चेहराच निवडायला हवा
--- ००० ---

मानवी सुखासाठी

निसर्ग चाललेला असतो सहज
आपण वाट पाहतो
इंद्रधनुष्याची वा जगबुडीची
कारण अंदाज करणे
आणि प्रतिसादांबद्दल
सतत साशंक असणे
हाच असतो
आपल्या जगण्याचा पॅटर्न

वस्तू घेता येतात विकत
पण प्रतिसाद जर घेतले विकत
तर त्यांच्या वस्तू होतात

सहज वाटूनही
प्रतिसाद देता न येणे

हा असतो महिमा मानवी
भूत वर्तमान भविष्य यांचा

अब्जावधी सुखाचे क्षण
मारून टाकणारे मानवी जग
प्रवचने देते अहिंसेवर

मानवी सुखासाठी
हिंसा गरजेचीच असते
असा सर्वमान्य शेवट करत
--- ००० ---

वेगळेच जग

एखाद्या दिवशी
काल ज्या कळत होत्या कविता
त्या आज कळत नाहीत

आज तुम्ही हे म्हणताय
मग त्या साली
तुम्ही ते तसे का केले होते
असे मुद्दे आठवत नाहीत

जणू वेगळेच झालेले असते जग

अशी वेगवेगळीच असतात जगे
वेड्यांनो जगात
तुम्ही जो करता प्रचार
तो फक्त एका समान जगातच राहतो

सत्याचा स्फोट केला म्हणजे
तो आवाज सर्वांनाच ऐकू जाईल
असे काही नसते

तरीही सत्याचे पाईक
हिंडत असतात
स्वयंतुष्ट विश्वासाने

की बाबा सत्यमेव जयते
असा दिवस येईलच
आज ना उद्या
--- ००० ---

June 20

उकाड्यातले शब्द

उकाड्यातले शब्द घामेघूम झाले होते
त्यावरून आले लक्षात
की एसी थंडी पाऊस वारा
अशा कोणत्याच परिस्थितीचा
वारा न लागलेले शब्द कुठले असणार

निराश तसेच बी-पॉझिटिव्हवाले
उन्मादी वगैरेंचे शब्द
बोलतच नव्हते काही अजून

बोंबलायला प्रमाण भाषा
असूच नाही शकत हे आता उमगले
मने आधी एकसारखी करायला हवीत

प्रमाण भाषा नाहीच आहे
याला बोलींचा पाठिंबा उभा राहिला

म्हणजे शब्द व्याकरण भाषा
तरी प्रमाण करून दाखवा
किंवा मने तरी एकसारखी असे झाले

मने एकसारखी झाली तर वादाचे मुद्देच
मिटतील मग भाषा लागेलच कशाला हेही आले समोर

मग त्यापेक्षा सरळ मने नष्टच होऊ शकतात का
तेच पाहावे ना असे उकाड्यातले शब्द म्हणाले
--- ००० ---

Pravin Kamble's photo.
रंगमंच... सादर केलेले प्रयोग...
निर्मित - मयुरी थिएटर
"स्टॅलिन"
लेखक - चं. प्र देशपांडे
दिग्दर्शक - प्रविण कांबळे
कुसुमाग्रज प्रतिष्ठान - नाशिक

कवितेचा विषय

छे छे विषय कसा असेल
मतांचा बालेकिल्ला
बाळगल्यासारखा

निमित्त असते
आणि अनेकदा अनेक

प्रत्येक कविता जाते
एका एका टोकाला
निश्चित करत
जगण्या-मरण्याच्या सीमा

सूडाग्नी पूर्ण व्यक्त व्हावा
आणि सर्व पिढ्यांचे तर्पण व्हावे
तसे मग राहात नाही
मनाला देणेघेणे

प्रेमातही प्रेम हा शब्द न येताही
कळते सर्व उद्युक्तता
आणि वाचणारा म्हणतो
क्या बात है
इतके सभ्य मादक द्रव्य पाहून

कविता लगेच बाजूला होते
निमित्ताला उघडे पाडून
--- ००० ---

June 19

भुलवणारे शब्द

कधी कधी
काही तास जाऊनही
नेमके काय
हे ठरत नाही

कसेही चालेल
तसे तर आवडेलच
पण हे असे
अधांतरीही ठीकच

न जाणो होईलही
आकाशवाणी ज्या वाणीला
आपण आपलीच समजतोय
तिच्याकडून

आपली वाणी
असावी आपल्या अधीन
यासाठी तिला भुलवणारे
शब्द हवेत
--- ००० ---

June 18

समूहगिरी

विभूतिपूजकांनी मूर्तिपूजकांना हसावे,
एका रंगाच्या झेंड्याला वेगळ्या रंगांच्या झेंड्यांनी प्रतिगामी म्हणावे,
रथयात्रांच्या गर्दी प्रतिगामी आणि जयंत्या-पुण्यतिथ्यांच्या गर्दी पुरोगामी समजाव्यात,
एका झुंडीने वेगळ्या झुंडीला अवैज्ञानिक म्हणावे,
जे फक्त आपापल्या समूहांनीच जगू शकतात त्यांनी इतर समूहांना अन्यायी म्हणावे,
त्यांच्या अस्मिता समाजविघातक असून आमच्या अस्मिता समाज घडवणाऱ्या आहेत
असे सर्वांनीच एकमेकांबद्दल म्हणावे,
आणि सारांशाने सर्वांनीच सतत संघर्षात राहावे --

हे आणि असे सगळे का घडत राहते ?
-- एकट्याने जगणे आणि स्वतःच्या मनाला सामोरे जाणे
याला सर्वच माणसे घाबरतात, म्हणून.
आणि फक्त समूहातच सर्वांना सुरक्षित वाटते, म्हणून.
--- ००० --

औचित्य

हे काय वय आहे का
हे काय दिवस आहेत का
ही काय वेळ आहे का
असे औचित्यविचार गेले कधीच तेल लावत
कधीही खा तंदूर चिकन
आणि दुतर्फी सुखाचे असेल
तर कधीही करा प्रेम
आणि प्रेमालाप आणि प्रेमचाळे
हवे तर औचित्य म्हणून प्रेमक्रीडा म्हणा

तुम्ही निव्वळ पान खाण्यासाठी जाता
गेट वे ऑफ इंडियाला
तिथले बेल्जियम पानच तुम्हाला हवे असते
पाचशे सत्तर रुपये
पान नुसते तिकडून इकडे येण्याचा
विमानखर्चच केवढा असतो

एकच आयुष्य पण नक्की किती काळ
हे माहीत नसलेली फडतूस पद्धत
त्यामुळे येते मग सगळे लोड वर्तमानावर
भरपूर कमवा आणि मनसोक्त भोगा

असे करणारे म्हणे वेडे किंवा आजारी किंवा जुलमी होतात
खड्ड्यात गेले आपले डोकेच भरलेय
आंतरविरोधांनी तर न्याय आणि आरोग्य
जाऊ द्यावेच लागणार ना भोसड्यात
--- ००० ---
कॅबरे

देहात अडकवून ठेवणारे तत्त्वज्ञान
आधी करते गाफील
आणि मग उभा करते
प्रचंड अनावश्यक संघर्ष
स्वतःचीच तडफड करणारा

वाटेवरून गेलेले सिनेमाचे पोस्टर
काही वेळ ठेवते ती वाट उत्तेजित
हे पाहायचेच असे ठरवल्यावर
बाजारातल्या इतर वस्तू होतात नाराज
ही नाराजीही संघर्षच तर असते

पोस्टर शरीरात सामावून घेतल्यावर
कॅबरे वेगळा कुठला राहणार
--- ००० ---

नवोदित कवींसाठी ( किंवा कुणासाठीही ) एक कविताखेळ --
अशी निरर्थक कविता लिहा -- खरोखरच निरर्थक असेल तर फ्रेंडससाठी पोस्ट करा --

निरर्थक

रंगांसारखे शब्द
त्या वेळी येतील ते इतस्ततः
गटारातून काढून
थेट स्वर्गात न्यावेत

टेबलाखाली मुतताना
जलपरीच्या देखत
ताज्या बातम्यांचे
केशकर्तनालय
भरून जावे मांजरांनी

फिकीरच नसलेले
हॉटेलमालक गांधी टोपीतले
हलकेच हसून निघावे
पूर्वेला जणू शेवटच्या प्रवासाला

आपण असावे फक्त
साक्षीदार समोर घडणाऱ्या
अचानक भोसकाभोसकीचे
वाणसामानाची यादी संभाळत

अर्थाचा कंटाळा आलेले जगच
फक्त असू शकते पर्याय
पुन्हा उसळी घ्यायला
पोस्ट ऑफिसातून
शेयर बाजारात
--- ००० ---

June 16

मी न पाहिलेले जग

अमेरिकेत व्हाईट हाऊस आहे आणि
फ्रान्सनध्ये द लूव्र
हे मला माहीत आहे

दोन महायुद्धांचे मी दोनतीनदा
वाचून पाहिले
पण काही लक्षातच नाही राहात

कुठे कुठे काही काही असते
आणि मनुष्यस्वभावाप्रमाणे
संघर्ष वा युद्धे होत असतात

एवढे मला बास असते
जग फिरायची आणि इतिहास
घोळत बसायची मला गरज नाही

अब्जावधी लोकांच्या जुन्यानव्या
अनुभवांची मला काय गरज
जंगले पर्वत धबधबे

मेरिलीन मन्रोला मला पाहायचे होते

जवळून एक आपले सौंदर्याचा रसिक म्हणून
पण आपली औकातही नसते ना
--- ००० ---

विश्वाच्या निर्मितीचे बडबडगीत

मनाचा तर्क कल्पना फिक्षन
आधारित असणार फक्त
ते अस्तित्वात आल्यानंतरच्या विश्वावर
त्या आधीचे त्याला काही समजूच नाही शकणार

मन नसताना विश्व कसे निर्माण झाले
याची कल्पना मन नाही करू शकणार

आज जगताना मन थांबू शकले
तरच ते कळू शकेल
पण कसे कुणाला ते नाही कळणार

अन्यथा
मन जी जी बडबड करेल
ती ती सर्व व्यर्थ असेल

मना आधीचे विश्व फक्त आणि
फक्त मना आधीच अस्तित्वात असू शकेल

आणि इंद्रिये पाचच का
सहा किंवा चारच का नाहीत

कधीच नसणार मनाच्या मर्यादेत
म्हणजे मनाच्या बडबडीत
पूर्ण असणे
--- ००० ---

Champra Deshpande added 3 new photos.

मधेच थोडासा छांदिष्टपणा --

June 15

व्यवस्था म्हणजे काय रे भाऊ ?

अभिनेता सुशांतसिंह राजपूत याच्या आत्महत्येमुळे अनेक महत्त्वाचे प्रश्न पुन्हा एकदा चर्चांच्या ऐरणीवर किंवा व्यक्तिगत विचारांच्या मैदानांवरही समोर आले. बॉलिवुडमध्ये मोठमोठी आर्थिक साम्राज्ये आणि घराणी असून ती ठरवतात की कोणते सिनेमे कितपत पुढे येऊ द्यायचे, कोणते फ्लॉप करायचे, कोणत्या नटनट्यांना किती ग्लॅमर मिळू द्यायचे, स्पर्धा कशी करायची, पुरस्कार कुणाला मिळू द्यायचे, वगैरे. ( अशा चर्चा तर फिल्मफेयर, ऑस्कर, ज्ञानपीठ आणि नोबेल यांच्या बाबतीतही होत असतात ! ) यात पूर्ण जरी नसले तरी बरेचसे तथ्य असणारच. जिथे करोडो, अब्जावधींचे व्यवहार होतात तिथे आपापले हित आणि वर्चस्व संभाळणे, त्याला धोका निर्माण करेल त्याला नामोहरम करणे, हे घडत राहणारच – आणि विशेष म्हणजे, हे सर्वांना पटणारच ! यावरच्या चर्चेत एकजण म्हणाले की हे असे फक्त बॉलिवुडमध्येच घडते असे नाही. मानवी व्यवहाराच्या, जगण्याच्या सर्वच क्षेत्रांत हेच घडत असते. हेही अर्थात पटण्यासारखेच आहे. राजकीय पक्ष, कारखाने, बँका, संस्था – या सगळीकडे लॉबीज असतात, गट असतात. वर्चस्वाच्या झगड्यांवरून फुटीही पडतात. याला कुणीही अपवाद नसते. अगदी डावी विचारसरणी मानणारे वा समतावादीही याला अपवाद नसतात. हा मानवी दुष्टपणा म्हणा की गधडेपणा म्हणा की क्रूरपणा म्हणा, यासहच सगळीकडे माणसे वागत असतात. हे लक्षात घेऊनच फोडा आणि झोडा सारखी राजकारणे खेळली जातात. स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करण्यात यशस्वी झालेले, ते टिकवण्याचा आणि विरोधकांना डोके वर काढताच येऊ नये याचे प्रयत्न करणारच. हे सगळे कळत नकळत आपल्याला मान्यच असते. कारण आपली टाळकी तशीच असतात. याहून वेगळे असे काही मानवी जगणे असू शकते का, असा प्रश्नही आपल्याला कधी पडत नाही. कारण, आपल्या वागण्या-जगण्यातून आपण याच मानवी वागण्याच्या पद्धतीला प्रोत्साहन, बढावा आणि ताकद देत असतो. आपल्यावर जेव्हा ‘ दुसऱ्याचे ‘ वर्चस्व असते तेव्हा आपण, जगण्याची ही पद्धत नव्हे तर फक्त वर्चस्ववाले बदलण्याचे प्रयत्न करतो. त्यालाच आपण ‘ व्यवस्था बदलणे ‘ असे गोंडस, आदर्शवादी, न्यायवादी, समतावादी, वगैरे नाव देतो. नुसते वर्चस्व कुणाचे यात बदल करण्याने फक्त, अन्याय करणारे आणि तो सहन करणारे हे बदलू शकतात. ‘ व्यवस्था ‘ नाही बदलू शकत. ‘ व्यवस्था ‘ म्हणजे आपली मन वापरण्याची वर्चस्ववादी, फुटीरतावादी, स्वकेंद्रित जगण्याची पद्धत. ती बदलण्याबाबतचे प्रश्न कुणालाही पडत नाहीत. मग, मानवी जगणे संवेदनशील, सहकार्ययुक्त आणि सुंदर होण्याची स्वप्ने आपण कोणत्या आधारावर पाहात असतो ?

--- ००० ---

ही घ्या एक पटकन वाचून होणारी कविता –

झोपी जाण्यापूर्वीचा छोटा संवाद

-- पाब्लो सॅबोरिओ

-- हं, कसला विचार चाललाय ?<br>
-- माझा विचार नव्हताच चालला.<br>
-- विचार न करणे कशाबद्दल चालले होते ?<br>
-- माझे विचार न करणे हे सगळ्याबद्दल होते.<br>
-- ओह ! हे तर काव्यात्मकच झाले !

-- होय तर.

--- ००० ---

( इंग्रजीत, स्त्री बोलतेय की पुरुष हे उघड होत नाही
-- ते तसेच राहावे म्हणून मराठीत वाक्यरचना जरा बदलली आहे. )

पाब्लो, त्याच्या एका मुलाखतीत काय म्हणतो, ते पाहा – ( त्याच्या एका चित्राच्या अर्थाबद्दल -- )

– What is the meaning behind 'Return to Source'?

I have noticed we no longer have experiences. We conceptualize experience; we interpret and define what is happening all the time. Return to Source is a challenge to this mode of existing; a reminder that prior to language and thought, there is awareness. All the works are titled 'In Silentio' (in silence). People are invited to experience the art without the aid of concepts or interpretation.

Artist's comments: "Return to Source is the outcome of living in pure meditation – a return to the intuitive, playful and immediate mode of existing that children and Buddhas exemplify".

वर्चस्व

कुणाचेच वर्चस्व नाही
अशा समाजाची कल्पना करा
म्हटल्यावर ते म्हणाले
प्रत्येकाने आपापल्या भिंतींना अत्तर लावा
म्हणजे ** ना प्रॉब्लेम वेगळाच होता
गटारात चुकून अंगठी पडली
तर ती काढून न घेता
कुणाचे बापजादे
निघून गेलेत यात्रेला

त्यांच्या दैवताची भरावी जत्रा
आणि पालखीत
त्यांच्या पुढाऱ्याची बायको असावी
ही होती त्यांची छुपी मागणी
जी मान्य न झाल्यास ते
अन्याय्य बदल्यांचा प्रॉब्लेम दाखवून

करणार होते आंदोलन

फाटाफूट सगळ्यांच्यातच झालेली होती
अजूनही होत होती
उड्डाणपुलांच्या खाली झोपणाऱ्यांनी तर
नादच सोडून दिला होता

त्यांना पोषक आहाराने उद्युक्त करून
पालखीचे सध्या स्थगित करून जोर लावावा
असाच त्यांचा आता अजेंडा ठरला
--- ००० ---

काल माझ्या उजव्या पायावरून पाल गेली -- कुणी म्हणाले की हा अपशकुन झाला. मला अपशकुन करून ती पाल स्वतःच इतकी घाबरली की सुसाट पळून गेली ! आज मला भारद्वाज पक्षी दिसला. हा शुभशकुन आहे म्हणतात ! हरकत नाही -- समतोल झाला. पण, माझे याकडे पाहण्याचे रहस्य वेगळे आहे -- " तुका म्हणे आम्हा । शुभकाळ सर्व दिशा ।। " शिवाय वैज्ञानिक दृष्टिकोण वगैरे असतेच ना !

June 14

Champra Deshpande shared a post.

या माहितिपूर्ण आणि ' शहाणे ' करणाऱ्या पोस्टसाठी
आपण राजीव साने यांना धन्यवाद दिले पाहिजेत !

Champra Deshpande wrote on Adv Vrushali Dusane's timeline.

खूप शुभेच्छा !

असणे आणि होणे

असणे आणि होणे यात खूप ताण निर्माण झाला तर मन भरकटू शकते. भरकटलेले मन ताळ्यावर आणणे, हे खूप अवघडही होऊ शकते. असे मन माणसाला जगणे असह्य करू शकते. मग तुम्ही राजेमहाराजे का असानात.

१३ जूनला मी इथे दिलेली ' तंबाखूची टपरी ' ही कविता एकूण जगण्याच्या प्रक्रियेसाठीच महत्त्वाची असली तरी ती ' असणे आणि होणे ' या मानसिक समस्येवरचे एक समुपदेशन म्हणूनही वाचली जाऊ शकते. कविता जरा आकाराने ' मोठी ' दिसतेय, चला पुढे -- हा सरसकटचा फंडा वापरावा, अशी ही कविता नाही. पेसोआच्या मूळ आशयाशी पुरेपूर एकत्र राहण्याचा प्रयत्न मी अनुवादात केलेला आहे. तरीही, अनुवादात काही गुणदोष असूही शकतील. या सर्वासहसुद्धा ही कविता

सर्व फ्रेंडसनी वाचावी, असे मला सुचवावेसे वाटते. असणे आणि होणे यात असंख्य मने फाटावीत, असा हा हावरट काळ आहे. आपल्या कुवतीप्रमाणे होईल तितके अत्युत्तम काम प्रत्येकाने करावे, हे निर्विवादच आहे. पण, त्यातून मिळणारे ग्लॅमर, प्रसिद्धी आणि कधी कधी पैसा यांची हाव निर्माण झाली तर सगळेच मुसळ केरात जाऊ शकते. तसे कुणाचेही होऊ नये, या हेतूनेच हे सुचवत आहे. ही काही जीवन-संजीवनी आहे, असे काही म्हणायचे नाहीय.

--- ००० ---

कशासाठी

कुठून येतात या कविता ?
कशासाठी ? या आहेत का
या जगात सामावणाऱ्या वस्तू ?

येतात तर माझ्याच
गल्लीबोळांतून
कारण ओळखीच्या तर वाटतातच.

पण पूर्ण होताच
त्या गायब होतात.
म्हणजे त्यांचे अर्थ नष्ट होतात.

तरीही पुढे
कशासाठी थांबतात त्या इथे ?
की ही त्यांची कलेवरे ?

हसून त्या म्हणतात
विचार नका करू
आम्हाला बोलू द्या …

कुणालाही नकळतच
तर होणार आमचे काम
शांत राहा …

--- ००० ---

शांतिपाठ

नुसतीच ढगांची घुसमट
पंधरा वर्षांत कधीतरी
अंगावरून पाल गेल्यासारखी
थांबलेली मानसिक रहदारी

अनपेक्षित आवाज
म्हणजे गूढाचे दूतच
गुलाबजाम खाताना
लागलेल्या ब्लेडच्या तुकड्याने

रक्ताळ जिभेचा उमेदवार
लावतो जोरदार मताचा भाव
आता मात्र शहरात
फुटेल अफवांचे पीक

कुणाला हवीय हिंसा
मुलाबाळानातवंडांत
पुलावरून गडगडत येतात
शांतिपाठाचे शब्द
--- ००० ---

निर्णय

लोकशाहीत आधी सांगून
सर्वांचे विचार घेऊन
निर्णय व्हायला हवेत
ही विरोधकांची एक
प्रलंबित मागणी होती

सत्ताधारी म्हणाले
मरू द्या कटकट नको
बोलवा सगळ्यांना

तरीही काहीजण
काही खुसपट काढून

निषेध म्हणून गैरहजर राहिले
पण काही आलेही

विचारविनिमयानंतर
सत्ताधाऱ्यांनी निर्णय घेतला
तरीही विरोधक म्हणाले की बघा
शेवटी त्यांना हवे तेच केले त्यांनी
काय उपयोग झाला

गैरहजर राहिलेले शहाणे ठरले
आनंदाने ते म्हणाले
बघा आम्हाला वाटलेच होते
आमचा निषेधच
बरोबर ठरला शेवटी
--- ००० ---

मधला काळ

“ ते जास्त अनैतिक आहेत
आम्ही कमी अनैतिक आहोत “
असे दोन्ही बाजूंचे लोक
म्हणू लागले तेव्हा
एका लहान बालकाने विचारले --
तुम्हा दोन्ही बाजूंच्या लोकांना
भोळे की मूर्ख की सात्त्विक म्हणावे
की नुसतेच आपमतलबी ?
तेव्हा दोन्ही बाजूंच्या चाणाक्षांनी विचारले
की बाबा खरेच तू लहान बालक आहेस का --
त्यावर ते लहान बालक म्हणाले
की मी तुमच्यापेक्षा तरी नक्कीच
जास्त लहान आहे

हे सर्व सूर्योदय आणि सूर्यास्त
यांच्या मधल्या काळात घडले
--- ००० ---

Champra Deshpande wrote on Ratnakar Mahajan's timeline.

खूप शुभेच्छा !

June 12

फर्नांडो पेसोआ याचा आज जन्मदिवस. ( १३ जून १८८८ ते ३० नोव्हेंबर १९३५. )

या जागतिक मान्यताप्राप्त कवीची एक महा प्रसिद्ध कविता आहे – Tobacco Kiosk – म्हणजे, तंबाखूची टपरी.

त्या कवितेचा मराठी अनुवाद माझ्या कुवती-समजुतीप्रमाणे मी केलेला असून तो खाली देत आहे.

हे एक आव्हानात्मकच काम होते. माझा परिपूर्णतेचा दावा असूच नाही शकत. पण, माझे गेले चार दिवस पेसोआमय गेले, हे मला खूप समाधानाचे वाटले. या निमित्ताने पेसोआच्या काही कविता मराठीत आल्या, हेही एक बरे झाले.

हा स्थलकालबद्ध समस्यांचा कवी नसून पूर्ण मानवी जगण्याचेच भान घेणारा-देणारा आणि पर्यायाने माणसाचे शहाणपण जागृत करणारा कवी आहे, असे मला वाटते. बघा वाचून --

तंबाखूची टपरी
-- फर्नांडो पेसोआ – इंग्रजी अनु० – रिचर्ड झेनिथ

मी काहीच नाहीय.
मी काहीच नसेन नेहमीच.
काही असण्याची मी इच्छाही नाही करू शकत.
पण तरीही माझ्यात आहेत जगाची सगळी स्वप्ने.

या माझ्या खोलीच्या खिडक्या
माझ्या म्हणजे अशाच्या की जो जगातल्या लाखोंपैकी एक असून
त्याला कुणीच नाही ओळखत ( आणि समजा ओळखणारे असतेच कुणी
तरी थोडी तरी माहिती असू शकली असती का त्यांना ? )
तुम्ही उघडता ती खिडकी रहस्यावर रस्त्याच्या
जो सतत लोकांकडून ओलांडला जात असतो.
तो रस्ता जिथे पोचू नाही शकत कोणताही विचार.
खरा -- तर्कातीत खरा -- खात्रीचा -- नकळत खात्रीचा --
खडकांच्या आणि सजीवांच्या सर्व अस्तित्वांखाली जे रहस्य असते
त्यासह असणारा, भिंती दमट करणाऱ्या आणि
माणसांचे केस पांढरे करणाऱ्या मृत्यूसह असणारा आणि एकूणात
सगळ्याचीच गाडी काहीच नसण्यावरून
नेणाऱ्या नियतीसह असणारा असा रस्ता.

जणू काही सत्याचे ज्ञान झाल्याप्रमाणे आज माझा पराभव झालेला आहे.
जणू काही मृत्यू जवळ आल्याप्रमाणे आज मी पारदर्शक झालोय.

आणि जणू काही वस्तूंशी माझे काही नातेच राहिलेले नाहीय
निरोप घेण्याव्यतिरिक्त. ही इमारत आणि या बाजूचा हा रस्ता
झाले आहेत गाडीच्या डब्यांची रांग --
माझ्या डोक्यात परतीची शिट्टी वाजत असताना
आणि माझ्या नसांना हिसके बसत असताना आणि माझी हाडे करकरत असताना
आम्ही बाहेर पडण्याच्या वेळी.

एखाद्याने चकित व्हावे, शोधून काढावे आणि विसरून जावे
तसे झाले आहे आज माझ्या डोक्याचे दही.
आज मी फाटून गेलोय दोन गोष्टींत -- माझे देय निष्ठेचे, रस्त्यापलिकडच्या
तंबाखूच्या टपरीबाबतचे बाह्य वास्तव
आणि सर्व काही स्वप्न असल्याची माझी आंतरिक जाणिव यांत.

मी सर्वच बाबतींत अपयशी ठरलो.
आणि म्हटले तर मला कोणतीही महत्त्वाकांक्षाच नसल्याने
मी कशातच अपयशी नाही झालो.
घरामागच्या खिडकीतून बाहेर उडी मारून मी मला दिले जात असलेले शिक्षण सोडून दिले.
काही मोठ्या योजना घेऊन मी गावाकडे गेलो
पण मला असे दिसले की तिथे तर फक्त गवत आणि झाडेच आहेत.
आणि तिथे जेव्हा माणसे दिसली तेव्हा तीही इतर माणसांसारखीच दिसली.
-- आता मी खिडकीपासून मागे फिरतो आणि एका खुर्चीवर बसतो.
आता मी कशाचा विचार करावा बरे ?

मी काय आहे हेच माहीत नसलेल्या माझ्यासारख्याला
मी काय होईन हे कसे माहीत असणार ? मी काहीही विचार करत असलो तरी ?
पण मी खूप खूप गोष्टी होण्याबद्दल विचार करत असतो !
आणि आपण सगळेच्या सगळे असूच नाही शकणार एकाच वेळी कधीच
अशा एकाच गोष्टीबद्दल विचार करणारेही खूप असतात !
आणि प्रतिभावान ? या क्षणी काही लाख मेंदू तरी असतील की जे ते स्वतः
माझ्याप्रमाणे प्रतिभावान आहोत अशी स्वप्ने पाहात असतील --
आणि शक्य आहे की इतिहास यांतल्या एकाचीही नोंद घेणार नाही
आणि त्यांच्या सर्व काल्पनिक विजयांचे शेवटी शेण होईल.
नाही, माझा स्वतःवर विश्वास नाही.
वेड्यांची इस्पितळे, अशा खात्री बाळगणाऱ्या खूप वेडपटांनी भरलेली आहेत !
मग कोणतीही खात्री न बाळगणारा मी अधिक बरोबर नाही का ?
नाही, माझे सोडा …
जगातल्या पोटमाळ्यांत वा इतर खोल्यांत या क्षणी असे किती लोक असतील

स्वप्ने पाहणारे की जे स्वयंमान्य प्रतिभावान असतील ?
आणि किती प्रचंड आणि दर्जेदार आणि पारदर्शक अशा आकांक्षा असतील
-- खरेच प्रचंड, दर्जेदार आणि पारदर्शक –
आणि बहुतेक आवाक्यातल्या -- प्राप्त होण्याजोग्याही – ज्या कधीच पाहणार नाहीत
यशाचा प्रकाश वा एखादा साहानुभूतियुक्त श्रोता ?
जे जगाला जिंकण्यासाठीच जन्माला आलेत त्यांच्यासाठीच आहे हे जग
आणि अशांसाठी नाही की जे नुसतेच
आपण ते जिंकू शकू अशी स्वप्ने पाहतात जरी ती वास्तवात येणे शक्य नसले तरी.
मी स्वप्नात नेपोलियनपेक्षा जास्त काम केलेय.

मी ख्रिस्तापेक्षा अधिक प्रमाणात मानवतेला माझ्या
कल्पित हृदयाशी घेतलेय. कांटने कधीच न लिहिलेल्या
अशा तत्त्वज्ञानांचा मी गुप्तपणे शोध लावलाय.
पण तरीही मी आहे आणि बहुतेक असणार, एक पोटमाळ्याचा माणूसच
जरी मी तसा राहात नसलो तरी. मी नेहमीच एक असाच माणूस असणार
जो तसल्या हीन जगण्यासाठी जन्मलेला नाही
आणि मी नेहमी असाच असणार की ज्याच्याकडे गुण होते केवळ.
मी नेहमीच असाच असणार एकजण की जो
ज्या भिंतीत दारेच नाहीत अशा भिंतीत दार उघडण्याची वाट पाहात राहिला
आणि गात राहिला गाणे अनंताचे खुराड्यातून
आणि ऐकत राहिला देवाचा आवाज एका आच्छादित विहिरीत.
माझ्यावर विश्वास ? नको, कशावरच नको.
कोसळवू द्या निसर्गाला माझ्या उकळत्या डोक्यावर
ऊन आणि पाऊस यांना आणि उडू द्यात वाऱ्यात माझे केस -- आणि बाकीचेही
काहीही येवो येणारच असेल आणि यायलाच हवे असेल तर किंवा न येवो.
अंतःकरणपुर्वक ताऱ्यांचे गुलाम आम्ही.
आम्ही पूर्ण जग जिंकले होते अंथरुणातून बाहेर पडण्यापूर्वी
पण आम्ही जागे झालो तर सगळे अंधुक झाले होते आणि
आम्ही उठून उभे राहिलो तर सगळे परके झाले होते आणि आम्ही बाहेर गेलो तर
तिथे पूर्ण पृथ्वी होती शिवाय ग्रहमाला आणि आकाशगंगा आणि अथांगता.

( हे बालिके, खा तुझी चॉकलेटस, खा, खा !
विश्वास ठेव माझ्यावर – या पृथ्वीवर चॉकलेटसारखे तत्त्वज्ञान नाही
आणि सगळे धर्म मिळूनही
एखाद्या गोळ्यांच्या दुकानाहून जास्त काही शिकवत नाहीत.
खा, हे गलिच्छ मुली, खा ! चॉकलेटबाबतच्या
तुझ्या सत्यासहच मलाही खाता यायला हवी होती ती !

पण मी खास विचार करतो आणि ते चांदीच्या कागदाचे आवरण
काढून टाकून देतो जमिनीवर, जसे टाकून दिलेय मी आधीच आयुष्य. )

तरीही, निदान, मी जे कधीच होऊ शकणार नाही
त्याबाबतच्या माझ्या निराश कडवटपणातून
घाईत लिहिल्या जाणाऱ्या या कविता तरी राहताहेत --
अशक्यतेकडे जाणारे एक मोडके फाटक म्हणून.
पण निदान मी तिरस्कार तरी करू शकतो माझा अश्रूंशिवाय
आणि स्वतःला मळक्या कपड्यांप्रमाणे, यादीशिवाय फेकून देण्यात तरी
वस्तूंच्या गर्दीत दाखवू शकतो भारदस्तपणा
आणि बसू शकतो घरी शर्टाशिवाय.

( हे माझ्या सांत्वनकर्त्या, तू अस्तित्वात नाहीस
आणि म्हणूनच करतो आहेस माझे सांत्वन.
एक जिवंत पुतळा म्हणून कल्पिलेली तू एखादी ग्रीक देवता अस
किंवा रोममधली एखादी अशक्य आणि भारदस्त अशी भयंकर कुलीन स्त्री अस
किंवा अस एखादी मोहक आणि लोभस अशी एखाद्या दरबारी संगीतकाराची कन्या
किंवा अठराव्या शतकातली दरबारी किताबधारी अस मोठ्या गळ्याची आणि दूरस्थ
किंवा आमच्या पालकांच्या पिढीतली प्रसिद्ध वारांगना अस
किंवा मी फारशी कल्पना नाही करू शकणार अशी कुणी आधुनिक अस
-- यांतले काहीही, तू जे काय असशील ते असत, मला प्रेरित करू शकत असशील तर कर !
माझे हृदय म्हणजे ओतून टाकलेली एक बादली आहे.
आत्म्यांना आवाहन करणाऱ्यांप्रमाणेच मी आवाहन करतो मला स्वतःला
काहीही न सापडता.
मी खिडकीकडे जातो आणि पाहतो रस्त्याकडे परिपूर्ण आकलनाने.
मला दुकाने दिसतात, पदपथ दिसतात, समोरून जाणाऱ्या कार्स दिसतात
आणि दिसतात कपडे घातलेली जिवंत अस्तित्वे एकमेकांजवळून जाताना.
कुत्रीसुद्धा असतात अस्तित्वात तिथे, तीही दिसतात – आणि या सगळ्याचे
माझ्यावर येते हद्दपारीच्या शिक्षेसारखे दडपण –
आणि हे सगळे असते परके इतर सगळ्याचसारखे. )

मी जगलोय, शिक्षण घेतलेय, प्रेम केलेय आणि विश्वासही ठेवलाय
आणि तरीही आज कोणत्याही भिकाऱ्याचा, तो मी नसल्यामुळे मला हेवा वाटतो.
मी प्रत्येकाच्या चिंध्या, व्रण आणि खोटेपणा पाहतो आणि मला असे वाटते की
आपण बहुतेक कधीच जगलो, शिकलो, प्रेम केले वा विश्वास ठेवलाच नाहीय.
( कारण यांतले काहीही केलेले नसताना हे सगळे करणे शक्य आहे. )
कदाचित आपण नुसतेच अस्तित्वात राहिलोय, जसे पालीने तिचे शेपूट

कापून टाकल्यावर ते शेपूट राहते वळवळत त्या पालीशिवाय.
मी मला ते करू पाहिले जे माझ्या आवाक्यातले नव्हते
आणि मी स्वतःला जे करू शकलो असतो ते मी नाही केले.
मी चुकीचा पोषाख घातला आणि मी जो नाही तो मी आहे
असे लगेच समजले गेले आणि त्यावर मी काहीच बोललो नाही
आणि हरवूनच गेलो.
मी तो मुखवटा काढू गेलो तर तो चिकटलेला होता माझ्या चेहऱ्याला.
आणि जेव्हा मी तो काढला आणि आरशात पाहिले स्वतःला
तेव्हा मी आधीच म्हातारा झालेलो होतो.
मी खूप प्यालो होतो आणि आपण काढलेली आपल्या पोषाखातली हॅट
पुन्हा कशी घालायची हे आता मला समजत नव्हते.
मी तो मुखवटा फेकून दिला आणि झोपलो एका खबदाडीत
-- एखादा कुत्रा केवळ निरुपद्रवी आहे म्हणून त्याला सहन करते
एखादे व्यवस्थापन, तसेच.
आणि ही सगळी कहाणी लिहून मी दाखवून देणार आहे, मी कसा उदात्त आहे ते.

हे माझ्या फालतू कवितांच्या संगीतमय अर्का,
मी माझ्या हातून तुला घडवलेय हेच मला पाहता यायला हवे होते
रस्त्यापलिकडच्या तंबाखू टपरीकडे सतत पाहात राहण्यापेक्षा --
माझी अस्तित्वात असण्याची जाणीव पायदळी तुडवणारी ती टपरी --
एखाद्या जाजमाला एखाद्या दारुड्याने अडखळण्याप्रमाणे किंवा
एखाद्या भटक्याने चोरलेल्या शून्य किंमतीच्या पायपुसण्याप्रमाणे.

पण तंबाखू टपरीचा मालक दाराकडे आलेला असून तो तिथे उभा आहे.
मी त्याच्याकडे अर्धी मान मुडपत अस्वस्थपणे पाहतो आणि
माझा आत्मा तर अर्धवट समजत असल्याने जणू चक्रवाढीने अस्वस्थ होतो.
तो मरेल आणि मी मरेन.
तो त्याचा चिन्हफलक सोडेल आणि मी माझ्या कविता सोडेन.
सरतेशेवटी त्याचे चिन्हही मरेल आणि त्याचप्रमाणे माझ्या कविताही.
अंतिमतः ज्या रस्त्यावर ते चिन्ह होते तोही मरेल.
आणि तशीच ती भाषा जीत माझ्या कविता लिहिल्या गेल्या.
आणि नंतर हे सगळे जिथे घडले तो हा भिरभिरता ग्रहही मरेल.

दुसऱ्या एखाद्या ग्रहमालेच्या दुसऱ्या काही ग्रहांवर असेच माणसांसारखे
कुणी कवितांसारख्या वस्तू तयार करत राहतील
आणि चिन्हे म्हणावीत अशा वस्तूंखाली जगत राहतील --
सतत एक वस्तू दुसरीसमोर येत

सतत एक वस्तू दुसरी इतकीच फालतू असत
सतत अशक्य असत आणि वास्तवाप्रमाणे गधडे असत आणि
सतत आंतरिक रहस्यही पृष्ठावर झोपलेल्या रहस्या इतकेच खरे असत.
सतत ही गोष्ट वा ती गोष्ट असत किंवा हीही गोष्ट नाही आणि दुसरीही नसत.

पण एक माणूस तंबाखूच्या टपरीत शिरलाय ( तंबाखू खरीदण्यासाठी ? )
आणि एक शक्यतायुक्त वास्तव अचानक माझ्यात प्रस्फुटतेय.
मी माझ्या खुर्चीवरून अर्धवट उठतोय – शक्तीने, खात्रियुक्त आणि मानुष –
आता मी प्रयत्न करेन कविता लिहिण्याचा ज्यांत मी आधीच्या उलटेच बोलेन.

त्या लिहिण्याचा विचार करतच मी एक सिगरेट शिलगावतो
आणि त्या सिगरेटीत मी लज्जत घेतो सर्व विचारापासून मुक्त होण्याची.
तो सिगरेटचा धूर जणू माझाच माग असल्याप्रमाणे माझे डोळे त्याच्या मागे जात राहतात
आणि मग एका संवेदनशील आणि अनुरूप क्षणाच्या रूपात
मी आनंद घेतो सर्व अंदाजांपासूनच्या मुक्तीचा आणि भान येण्याचा की
तत्त्वज्ञान म्हणजे नुसताच एक परिणाम असतो तब्येत बिघडल्याचा.
मग मी पुन्हा खुर्चीत टेकून बसतो आणि झुरके घेत राहतो.
जोवर नियती अडवणार नाही तोवर मी झुरके घेत राहीन.

( माझ्याकडे सफाई काम करणाऱ्या स्त्रीच्या मुलीशी जर मी लग्न केले
तर कदाचित मी सुखी होईन. ) मी खुर्चीवरून उठतो. मी खिडकीकडे जातो.

त्या तंबाखू टपरीतून तो माणूस बाहेर आलाय ( उरलेली नाणी खिशात ठेवत ? )
वा, मी तर ओळखतो त्याला : तो तर तत्त्वज्ञानहीन एस्टीवज आहे.
( तो तंबाखू टपरीचा मालकही दारापर्यंत आलाय. )
अलौकिक प्रेरणेनेच जणू, एस्टीवज इकडे वळतो आणि माझ्याकडे पाहतो.
तो भेटीदाखल हात हलवतो, मी प्रतिसाद देत ओरडतो, " हॅलो एस्टीवज ! " आणि पूर्ण विश्व
कोणतीही ध्येये वा आशा-आकांक्षा नसलेल्या पूर्वपदाला येते
आणि तंबाखूच्या टपरीचा मालक स्मित करतो.
--- ००० ---

June 11

Champra Deshpande updated his status.

फर्नांडो पेसोआ

‘ नम्रता ‘ हा शब्द आपण व्यवहारात, एक वेगळ्या प्रकारचा ढोंगीपणा, या अर्थी वापरतो. नम्रता म्हणजे खरे तर काहीच नसणे, जे पेसोआचे प्रत्यक्ष जगणे होते. परवा, म्हणजे १० जूनला त्याची एक कविता मराठीत अनुवाद करून मी इथे दिली होती. तेव्हा लक्षात आले की १३ जून हा पेसोआचा जन्मदिन आहे. आता, काहीच नसणाऱ्याचा कसला जन्मदिन, हा प्रश्न येऊ शकतोच. पण काहीच नसण्यातून हा माणूस जर कविता लिहीत होता तर त्याचप्रमाणे, आपणही आपला आदर व्यक्त करायला हरकत नाही, असा विचार मनात आला. त्यामुळे, १३ जूनपर्यंत रोज इथे थोडा थोडा अनुवादित पेसोआ द्यावा असे ठरवले. आजच्या अनुवादित कविता खाली देत आहे. उद्या त्याची एक जगविख्यात कविता देईन.

हे हृदया
-- ( फर्नांडो पेसोआ – टोपण नाव – अलवारो डी कँपोस )

या क्षणी मी कोण आहे ते मला नाही माहीत. मी स्वप्न पाहतोय.
स्वतःचाच अनुभव घेण्यात गर्क होत मी झोपलोय. या शांत वेळी
माझा विचार विसरतो त्याची विचारक्रिया
आणि माझ्या आत्म्याला तर आत्माच नसतो.

मी अस्तित्वात असेन तर ते माहीत असणे चुकीचे आहे.
मी जागा झालो तर मला वाटते की मी चुकलोय. मला नसते माहीत, बास.
मला हवेय किंवा माझ्याकडे आहे किंवा मला आठवतेय, असे काहीच नसते.
मला असणेच नसते किंवा विधिव्यवस्थाही.

दोन भ्रमांच्या मधला जाणिवेचा एक क्षण,
असा मी चहूबाजूंनी वेढलेला असतो पिशाचांनी.
राहा निद्राधीन, इतरांच्या हृदयांबाबत अनभिज्ञ,
हे माझ्या, कुणाच्याच अखत्यारीत नसलेल्या हृदया !

-- ०६ जानेवारी १९३३.
--- ००० ---

विचार आणि प्रेम
-- फर्नांडो पेसोआ

माझी नजर एखाद्या सूर्यफुलासारखी स्वच्छ आहे.
माझी ही एक पद्धत आहे की रस्त्यावरून चालताना
मी उजवीकडे आणि डावीकडे बघतो
आणि कधी कधी माझ्या मागेही बघतो
आणि प्रत्येक क्षणी मला असे काही दिसते की
जे मी पूर्वी कधीच पाहिलेले नाही

आणि एकूण सर्व गोष्टींची नोंद घेण्यात तर मी पटाईत आहे.
एखादे नवजात मूल जसे आपण खरोखरच सत्यात
जन्माला आलोय हे पाहून जसे चकित होईल
तेच तसेच चकित होणे अनुभवण्याची माझ्यात क्षमता आहे.
प्रत्येक क्षणी मला असेच वाटते की
मी नुक्ताच जन्मलोय एका पूर्णपणे नव्या जगात …

डेझी फुलावर असावा तसा माझा जगावर विश्वास आहे
कारण मला ते दिसते. पण मी त्याचा विचार नाही करत.
कारण विचार करणे म्हणजे न समजणे.
आपण त्यावर विचार करावा म्हणून नाही निर्माण झालेले जग
( विचार करणे म्हणजे आपले डोळे सदोष असणे )
आपण त्याच्याकडे फक्त पाहायचे आणि त्याच्यासह राहायचे.

माझ्याकडे कोणतेही तत्त्वज्ञान नाही, फक्त ज्ञानेंद्रिये आहेत …
मी निसर्गाबद्दल बोललो तर त्याचा असा नाही अर्थ की त्याचे स्वरूप मला समजते
पण मी त्याच्यावर प्रेम करतो याच कारणामुळे फक्त मी बोलतो.
कारण जे प्रेम करतात त्यांना हे कधीच नसते माहीत की ते काय
कशासाठी कशावर प्रेम करताहेत.

प्रेम करणे म्हणजे शाश्वत निरागसता.
आणि निरागसता म्हणजे एकच – विचार न करणे.

०८ मार्च १९१४.
--- ००० ---

पेसोआचेच पानपूरक –

सगळेच सगळ्याच्या अतीत असते
आतून आणि अमर्यादपणे
स्वतःपासून खूप दूर, हे विश्व
अस्तित्वात येण्याने स्वतःलाच फसवते
--- ००० ---

सौंदर्य
-- फर्नांडो पेसोआ

सर्व सौंदर्य हे अस्तित्वात असले तरी ते एक स्वप्न असते
कारण सौंदर्य म्हणजे त्याच्या असण्यापेक्षा काही जास्त असणे.
मी तुझ्यात जे सौंदर्य पाहतो
ते इथे नाहीय माझ्या निकट.

मी तुझ्यात जे पाहतो ते जगत असते माझ्या स्वप्नात
इथून खूपच दूर. तू जर असशील खरेच अस्तित्वात
तर ते मला
मी स्वप्न पाहिल्यामुळेच फक्त कळते.

सौंदर्य हे एक संगीत असते जे ऐकताच स्वप्नात,
ओसंडून येते जगण्यात.
पण तेही नेमके जगणे नव्हे :
ते असते ज्या जगण्याने स्वप्न पाहिले ते जगणे.

-- २२ एप्रिल १९३४.
--- ००० ---

आद्य पाप
-- ( फर्नांडो पेसोआ – टोपण नाव – अलवारो डी कँपोस )

आपण काय असू शकलो असतो याची कहाणी कोण लिहील ?
आणि समजा लिहिलीच कुणी ती,
तर मानवजातीचाच तो एक सत्य इतिहास असेल.

जे आहे अस्तित्वात ते फक्त खरे जग -- आपण नव्हे, फक्त जग.
वस्तुतः आपण आहोत अस्तित्वातच नसलेले.

मी असा आहे जो अस्तित्वात येण्यात अपयशी ठरला.
आपण सगळे असे आहोत ज्यांनी आपण अमुक असल्याची कल्पना केली.
आपले सत्य मात्र ते आहे की जे आपल्याला कधीच प्राप्त नाही करता आले.

त्या आपल्या सत्याचे काय झाले – जे होते बालपणाच्या खिडकीतून पाहिलेले स्वप्न ?
आपल्या त्या खात्रीचे काय झाले – आपल्या योजनांच्या ज्या नंतर टेबलावर अवतरल्या ?

जेवण झाल्यावर, बाजूला खुर्चीवर बसत,
बाल्कनी खिडकीच्या चौकटीवर विसावलेल्या माझ्या हातांच्या घडीवर डोके ठेवून

मी चिंतन करतो.

काय झाले माझ्या त्या सत्याचे, की आता माझ्याकडे फक्त जगणे उरावे ?
आणि त्या मला काय झाले, की आता फक्त अस्तित्वात असणेच असावे ?

किती राजेमहाराजे मी असत आलोय !

माझ्या आत्म्यात आणि काहीशा सत्यासह;
माझ्या कल्पनेत आणि काहीशा न्यायासह;
माझ्या बुद्धीत आणि काहीशा आवश्यकतेसह –
अरे देवा ! अरे देवा ! अरे देवा !
मी किती राजेमहाराजे राहात आलोय !
मी किती राजेमहाराजे राहात आलोय !
मी किती राजेमहाराजे राहात आलोय !

--- ०७ डिसेंबर १९३३.
--- ००० ---

June 10

फर्नांडो पेसोआ ची आणखी एक कविता --

सर्दिमहिमा

मला प्रचंड सर्दी झालीय, आणि हे
प्रत्येकालाच असते माहीत की अशी सर्दी
जगणे कसे बेसूर आणि बेताल करते ते.
अशी सर्दी आपल्याला नको जगणे असे करते
आणि आपल्याला अगदी तात्त्विकही शिंका आणते.
मी पूर्ण दिवस शिंकरण्यात घालवलाय.
माझे डोके चहूबाजूंनी ठणकतेय.
एका किरकोळ कवीसाठी ही एक दुःखद अवस्था आहे !
आज तर नक्कीच मी एक किरकोळ कवी आहे.
मी जे असायचो ती फक्त एक वांच्छा होती जी उध्वस्त झालीय.

हे माझ्या परीराणी तुला कायमचा रामराम !
तुला होते पंख सूर्यकिरणांचे आणि इथे मी खुरडतोय.

आता मी अंथरुणात पडल्याशिवाय बरा होणारच नाही.
मी या विश्वात पडून राहिल्याशिवाय कधीच बरा नसतो.
कमी नाहीच – भयानकच म्हणावी लागेल ही शारीरिक सर्दी !
मला आता सत्य आणि थोडे ॲस्पिरिन यांची गरज आहे.
--- ००० ---

रीत

छे छे सरळ काहीच नाही बोलायचे
दिसायचे साधेच
पण अमुक योग्य वा तमुक करा
असे म्हणायचेच नाही
-- ते तसे म्हणणे खोटे तर असतेच
पण ते खोटे असल्याचे गृहीत धरणे
हा अंतःप्रवाही डावच ठेवायचा

कविता ही दोनतीन बाजूंनी
कोंडी करत आणायची
वाचक हरीण आणि कवी शिकारी
असे काहीही न समजता

कविता थांबण्याचा बिंदू
हा समूळ स्फोटाचाच असायला हवा

पण तसे काहीच नाही घडले
तरी कवीचे काहीच नाही म्हणणे
असा निरुपद्रवीपणाचा आवही हवाच

आशय कुणीच नाही ठरवू शकत
पण अभिव्यक्तीची रीत मात्र
बऱ्याचदा वाचकच ठरवतात

ती रीत पाळली की ते फसायलाच काय
बळी जायलाही तयार होतात अशी ही कल्पना
--- ००० ---

June 9

Champra Deshpande shared a memory.

1 Year Ago

Champra Deshpande updated his status.

जागतिक शहाणपणासाठी ज्ञानेश्वर आणि तुकाराम ही मराठीची जगाला देन आहे. त्याच प्रकारे पोर्तुगालचा कवी फर्नांडो पेसोआ हाही जगाचा एक अमूल्य ठेवा आहे. पेसोआने स्वतःच्या नावाने आणि अनेक टोपण नावांनीही खूप कविता लिहिल्या. अलवारो डी कँपोस या टोपण नावाने त्याने लिहिलेली ‘ लिस्बनची पुनर्भेट १९२३ ‘ या नावाची एक कविता आहे. तिचा ( मला जमेल तसा ) अनुवाद खाली देत आहे. पेसोआचे बालपण लिस्बनमध्ये गेले होते, हा या कवितेचा संदर्भ आहे. ( ‘ लिस्बनची पुनर्भेट १९२६ ‘ या नावाची त्याची आणखी एक वेगळी कविता आहे. तीही खास आहे. )

लिस्बनची पुनर्भेट १९२३

नाही, मला काहीच नकोय.
मी आधीच सांगितलेय, मला काहीच नकोय.

निष्कर्ष घेऊन नका येऊ माझ्याकडे !
मृत्यू हा एकच निष्कर्ष.

मला सौंदर्यशास्त्र नका प्रदान करू !
मला नैतिकताही नका सांगू !
तत्त्वज्ञानही दूर न्या इथून !
माझ्याकडे नका खपवू तुमच्या पूर्ण व्यवस्था
आणि कंटाळा नका आणू मला
तुमच्या समस्याभेदांचा वैज्ञानिक
( अरे देवा, ते विज्ञान ! ) –
शास्त्रांमधल्या, कलांमधल्या आणि
आधुनिक प्रस्थितीच्या ( civilization ) !

देवांना मी कधी काही हानी पोचवलीय का ?

तुमच्याकडे सत्य असेल तर ते तुमच्याजवळच ठेवा !

मी एक तंत्रज्ञ आहे पण माझे तंत्र
तांत्रिक क्षेत्रापुरते मर्यादित आहे, आणि शिवाय

मी एक सर्किट माणूस आहे, आणि तसे असण्याचा
मला पूर्ण हक्क आहे, ऐकताय ना ?

देवाला स्मरा आणि मला एकट्याला राहू द्या !

तुम्हाला वाटते, मी असावे विवाहित, व्यर्थ, सरधोपट आणि करदाता --
होय ना ? की या सर्व बाबींविरोधी मी असावे असे तुम्हाला वाटते ?
कशाच्याही विरोधी ?

मी जर दुसराच कुणी असतो तर
आलोही असतो तुम्हा सर्वांबरोबर !
पण मी जो आहे तो असल्यामुळे द्या सोडून !
नरकात जा माझ्याशिवाय, किंवा मग
माझे मला जाऊ द्या तिकडे !
आपण एकत्र कशाला जायला हवेय ?

माझा हात नका पकडू !
मला नाही आवडत माझा हात पकडलेला,
मी तुम्हाला आधीच सांगितलेय,
मी फक्त एकटाच असू शकतो !
मला वैताग येतो सारखेच
तुम्ही मला सामाजिक करू पाहण्याचा !

हे माझ्या निळ्या आकाशा – तेच
जे मला लहानपणीही माहीत होते –
परिपूर्ण आणि रिकामे शाश्वत सत्य !
हे माझ्या सौम्य, शांत, सातत्ययुक्त तागुस सरिते,
जिच्या छोट्या सत्यात आकाश होते प्रतिबिंबित !
हे माझ्या अतीत दुःखमय दिवसांच्या लिस्बन गावा,
आज मी तुला पुन्हा भेटतोय !
तू ना माझ्याकडून काही घेत ना मला काही देत –
तू काहीच नसणे आहेस – मला वाटते, मीच.

मला शांततेत राहू द्या, कारण
फार काळ असणारच नाहीय मी …
आणि जोवर मला
शांतता आणि अथांगता शाबूत ठेवतील

तोवर
मला एकटाच राहायचे आहे !
( १९२३ ).
--- ००० ---

एवढाच प्रश्न

जे आहे ते आहे
आणि जे असू शकेल ते असू शकेल
माझ्या बालपणातले किस्से
हॉकी आणि बुचबॉल आणि सायकल
आणि अनेकदा ढोपर फुटणे
याबरोबरच सतत माघार घेत
मुलींशी बोलणे टाळणे

काही ना काही गंड
झालेच असतील तयार
माझ्या प्रत्येक वागण्यातून

आता मला ते सगळेच
चुकीचे वाटते
मधे गाडी बदलून मुंबईला जावे लागणे

माझ्या जन्मापासूनच खूप
घडत आल्या समस्यात्मक घटना
मी कधी धमक्या चालवून नाही घेतल्या
पण त्या येतच राहिल्या मधून मधून

अनुभव वाढत आले
पण मन कर्मठ होत आले

हे सगळे टाकता येईल का एवढाच प्रश्न
आता माझ्या समोर आहे
--- ००० ---

June 8

या आधीच्या पोस्टमधल्या कवितांना
' पानपूरक ' म्हणून लिहिलेली कविता --

निरोप ( पानपूरक )

प्रेमाबाबत काहीच न बोलता
आपण ‘ कलेसाठी कला ‘ वर बोललो
स्पर्शाबाबत काहीच न करता
आपण परिवर्तनावर बोललो
पुन्हा भेटण्याचे काहीच न ठरवता
आपण मोबाईलवर बोललो
-- आणि आपल्याला हवी ती उत्तरे मिळाल्याने
आपण हसून निरोप घेतला
--- ००० ---

परदेशी स्त्रियांच्या काही प्रेमकविता --

प्रेम
– मार्गारेट ॲटवुड

हा शब्द असा आहे की छिद्रे बुजवण्यासाठी आपण तो वापरतो.
बोलण्यातल्या ऊबदार मोकळ्या जागांसाठी तो अगदी योग्य आकाराचा असतो
तसाच एखाद्या पानावरच्या लाल-दिल आकाराच्या दिलासारख्या मुळीच न दिसणाऱ्या
रिक्त जागांसाठीही तो योग्य असतो.
ज्या छापील फॉर्मवर कोणत्याच सूचना दिलेल्या नाहीत
त्यातल्या एखाद्या रिकाम्या जागेतही आपण तो घालू शकतो.
काही तर पूर्ण मासिके अशी असतात की त्यांत प्रेम या शब्दाशिवाय फारसे काहीच नसते –
तुम्हाला तो सर्वांगावर घासता येतो आणि त्याच्याशी सैपाकही करता येतो …
--- ००० ---

नजर
-- सारा तीसडेल

स्टेफनने घेतले माझे चुंबन वसंतात
रॉबिनने पानगळीत

पण कॉलिनने फक्त पाहिले माझ्याकडे
आणि चुंबन कधीच नाही घेतले

स्टेफनचे चुंबन मस्करीत हरवले
रॉबिनचे गेले खेळकरपणात
पण कॉलिनच्या नजरेत जे होते चुंबन
ते मात्र मला रात्रंदिवस झपाटतेय
--- ००० ---

एक
-- सारा तीसडेल

तुझ्या आधी घेतले होते
स्वर्गातल्या वाऱ्यांनी आणि मग पावसाच्या नजाकतीने
-- आता तू आला आहेस, मी का फिकीर करू
त्यांच्यासारख्या एकेकांची पुन्हा ?
--- ००० ---

आठव
-- ख्रिस्तिना रोझेटी

आठव मला जेव्हा मी निघून गेलेली असेन
खूप दूर त्या शांततेच्या जगात
जेव्हा पुन्हा ना मी येऊ शकणार तुझ्या हातात
ना मी निघालेली जाण्यासाठी पुन्हा वळून थांबणार
--- ००० ---

पुटे

प्रत्येक वस्तूवर माझ्या
अनुभवाचे आवरण आहे
प्रत्येक व्यक्ती
माझ्या आयुष्याने अवगुंठित
प्रथमच समोर आलेली व्यक्ती
वा वस्तूही माझ्या भूतकाळात
न्हालेली की बरबटलेली

एखादा कवी आयुष्यभर
निराशेच्या लिहितो कविता
एखादा अत्युच्च संभोगानंदाच्या
आणि एखादा सतत
म्हणत राहतो
की खूप लोक क्रूर आहेत

मीही लिहितो कविता
पण मला जे दिसतच नाही
ते मी कसे लिहिणार
आणि जे दिसते ते तर
मलाच काय सर्वांनाच
आधीच माहीत असलेले असते
आवृत्त वा अंधारलेले

प्रत्येक व्यक्ती अनुभव वा वस्तू
एक निमित्त असते माझ्या कवितेत
त्यांच्यावरील पुटे हटवण्याचे
--- ००० ---

आठवण म्हणजे

आठवण म्हणजे
आता नसलेली घटना
पण मनात असलेली
सावलीच्या रूपात

आठवण आणू शकते
आताही जुने रोमांच
आणि आठवण असू शकते
जुने सडत चाललेले दुःख

पुन्हा तेच घडण्याची भीती
परिणामांची भीती आणि
वर्तमानात वाटणारी
भविष्याची भीती
--- ००० ---

अर्जंट

रोजच सूर्यास्ताच्या वेळी
आकाश ढग आणि प्रकाश
यांची हजार डिझाइन्स होतात
ती जिवंत नसल्याने
त्यांना असंवेदनशील नाही म्हणता येत
माणसाच्या फाटक्या अवस्थेबाबत

माणसे असतात संवेदनशील
पण मर्यादित आवाक्यात
त्यांना अमर्याद निसर्ग समजू नये
ती जिवंत असतात

माणसांना जिवंतपणा न सोडता
संवेदनशील राहावे लागते

कधी कधी तर
तेही विसरले जाते
दारू आधी आणली पाहिजे
या अर्जंट काळजीत
--- ००० ---

June 6

कवींच्या आत्महत्या

मराठीतल्या दोन कवींनी
आत्महत्या केलीय की तीन की चार
अशी अनिश्चित अवस्था असलेला मी
तुला सांगतोय
कविता हा एक तर जगण्याचा
किंवा मग मरण्याचाच मार्ग असतोय
आत्महत्या मरूनही करता येते
आणि जगूनही

तू माझी मादक प्रेयसी आहेस
याचा अर्थ सतत रोमँटिक
राहायला मी बांधील नाही

खूप बोली आहेत खूप खेडीही
लोककला तमाशे वा पाच रुपयांत
फक्त स्तनदर्शन देण्याचे कार्यक्रम
यांनाही मी बांधील नाही
जरी मी समजतो स्वतःला
एक कलावंत एक कवी

मला जी भाषा अवगत आहे
ती मी माझी नाही समजत
याचा अर्थ मी
पुरोगामी आहे असा नाही
उलट कोणत्याही भाषेचे स्तोम
माजवणारे हत्यारे असतात
माणसांचे हे मला स्पष्ट दिसते

समजा तुम्ही कुणी
मला मोठा कवी करू शकता
त्यासाठी मी काय देऊ ते सांगा
निरनिराळ्या भाषा बोलत चाललेले
सगळे मानव खरेच
आहेत का प्रिय तुम्हाला

हे मी तुझ्याशीच बोलतोय
प्रेयसी आहेस म्हणून विश्वासाने
आणि पूर्ण बेफिकिरीने कारण
बाहेर लगेच बनवली जाईल
माझी एक भलीबुरी प्रतिमा
आणि माझ्या कविता कुणी वाचणारच नाहीत

तू आहेस माझी
तुला हवा तसा असायला मी नसलो बांधील
तरी तू वाच
न समजल्यास पुन्हा वाच

तुला
माझी प्रेयसी राहावे असे वाटत राहील
तोवर वाच

जिथे जिवंत वाचकच नाहीत
मोकळे तिथे जगणे काय आणि मरणे काय

मी काही फक्त कवी नाहीय
माणूस म्हणून मी पूर्ण अज्ञात आहे
--- ००० ---

June 5

कवितेचे स्टेशन

एक दिवा लकलकतोय
तोवर स्टेशन नाही लागणार
कवितेचे फक्त खरखरत राहील

दिव्याचा अडथळा
अंधाराला ठीक
कवितेला कशाला

भीतीकडून द्वेषाकडे
जातानाच्या मधल्या वेळात
सांस्कृतिक टॉवर

म्हणून ते कविता मागत होते
इथेच ठिणगी पडली आमच्या जंगलात
आणि मी संन्यासच जाहीर केला

माझी कविता आणि मी
एवढीच गर्दी बास
माझ्या एकलकोंडेपणात

आमचा एकांत बहरेल
मधेच कुणाला दया न आल्यास

माझ्या एकटेपणाची

--- ००० ---

June 4

Champra Deshpande wrote on Swaroop Khopkar's timeline.

खूप शुभेच्छा !

स्पेशालिटी

आधुनिक जीवनातली अनेक वैशिष्ट्ये, खाद्यपदार्थ, संगणकविषयक परिभाषा, प्रवास व परदेश प्रवास यांचे उल्लेख, वगैरे यांचे अनेक वाचकांना माहितिअभावी अडथळे वाटणे शक्य असते. त्याचप्रमाणे, काही विद्वान वा बहुश्रुत कवींच्या कवितांत नेहमीच देशीपरदेशी पुराणांतले संदर्भ, मिथके, जागतिक इतिहास व भूगोल, मानववंशशास्त्र वा इतर काही शास्त्रे, वगैरे गोष्टींचे विशेष संदर्भ येत असतात. काही कवींच्या लेखनात ते सर्व त्यांच्या अभिव्यक्तीची स्वाभाविक शैली म्हणूनही येत असतील. पण, काही कवी, जाणूनबुजून, कविता ' वजनदार ' वाटावी म्हणून असे काही पेरतही असावेत, अशी अनेकदा शंका येते. असे व्हावे वा होऊ नये, असे काही म्हणायचे नाहीय. पण, सामान्यतः, आपला, कवितेचा मराठी वाचक पाहता, कवितेतली अशी ' स्पेशालिटी ' ही सहज संपर्कात अडथळा आणणारी ठरते का, असा प्रश्न आहे. याला कवितेचा गुण वा दोष म्हणता येईल का, असाही एक दुसरा प्रश्न आहे. यावर मुक्त मते यावीत.

--- ००० ---

क्रांती

कुणाला काही कळूच नाही द्यायचे
वागण्यातून हाच उपाय
आपल्यातली क्रांती
छुपी ठेवायचा

आपले मुखवटे तर गळून पडलेत
पण हे खुले होऊ द्यावे
तर त्यांच्या मुखवट्यांची सत्ता
धोक्यात येते

मग कशाला हे बिघडवायचे
आपल्याला शक्य असताना
सतत खोटे राहणे सहज
या ना त्या रूपात

आपण खुले झालो तर
आपण नसल्याचे पाहून
दुःखी होतील सर्वच मुखवटे आणि
खेचतील आपल्याला कोर्टात खोट्या

फसवणुकीच्या आरोपाखाली
--- ००० ---

पुण्यातल्या वीजपुरवठ्याची धूळधाण

पुण्यातल्या वीजमंड्ळाचे बारा वाजलेले आहेत. गेल्या एका महिन्याहून जास्त काळ त्यांच्या वीजपुरवठा व्यवस्थेचा पुरता फज्जा उडालेला आहे. तक्रार केली की ' हो, बघतो ' म्हणतात. दिवसातून पाचपंचवीस वेळा वीज जाणे-येणे असे होत राहते. यूपीएस चालू असलेल्यांचा प्रश्न नाही पण अनेकांचे युपीएस बिघडलेले असून कोरोनामुळे दुरुस्त झालेले नाहीत. अनेकजण युपीएस वापरतच नाहीत. अशांकडे संगणक सारखे बंद पडणे आणि पुन्हा चालू करणे, असे होत आहे. इतर मशिनरीही अशीच चालू-बंद होत आहे. लोकांचा बराच वेळ वाया जातो आहे. घरून काम करणाऱ्यांना तर फारच त्रास आहे. विद्यार्थ्यांच्या शाळा, क्लासेसही ऑन लाईन चालू आहेत, त्यांतही खंड पडताहेत. सारांश, वीजमंडळाकडे सध्या --
अशास्त्रीय पद्धतीने केलेली कामे
भंगार मशिनरी
अकार्यक्षम, अज्ञानी, बेफिकीर, बेजबाबदार कर्मचारीवर्ग
-- अशा गोष्टींचा प्रचंड साठा झालेला आहे, असे या परिस्थितीवरून वाटते.

महाराष्ट्रातल्या या नामवंत स्मार्ट शहराची जर ही अवस्था आहे तर इतरत्र काय असेल ? सध्या मी, वीज जाण्याचे एक नोंदपत्रकच तयार करतोय. ते नंतर संबंधितांकडे पाठवणार आहे. हे सुधारेल अशा आशेची धुगधुगी टिकून असल्याने हे प्रयत्न करणार आहे.
--- ००० ---

धूळ

सहज प्राप्य असलेला संवाद
दुष्प्राप्य होत दूर जातो
डोळ्यांदेखत
खेड्यातल्या रस्त्यावर
धुळीत दिसेनाशी व्हावी
एस्टी तसा

वेळेचा तगादा गर्दी

आणि लोक अनेक कामांत गर्क
असले तरी
नाटकांचे तमाशांचे शेवट
नैतिकच असायला हवेत
याबाबत आग्रही मने

डबल घंटी वाजताच
काही प्रॉब्लेमच नसल्याप्रमाणे
सुटते एस्टी धूळ उडवत
हवा तो प्रवासी
मागे राहिल्याचे विसरत

तो प्रवासी उगीचच
इकडेतिकडे बघतो
आणि स्मितहास्य देत म्हणतो
रामराम पोलिसपाटीलसाहेब
--- ००० ---

ड्रॉवर

आपण अनावश्यक माहिती देऊन बसलो
उगीचच या विचारात
आवरतो टेबलावरचा पसारा
आणि मग राहतो बसून
याच्या संभाव्य दुष्परिणामांचा विचार करत

एकदा वाटते ड्रॉवरमध्ये ठेवलेल्या
सर्व वस्तू पुन्हा बाहेर काढाव्यात
चहा पिऊन यावे आणि मग ठरवावे
त्यांचे काय करायचे ते

इथून उठल्याशिवाय जाता तरी कसे येईल कुठे
की हेही अनावश्यकच वाटतेय
किंवा चालेल नाही घेतला तरी चहा

सगळे असावे अनावश्यकच
पण त्याचे दुष्परिणाम होऊ नयेत

मी टेबलावर नकळत ताल धरतो
“ अकेला हूँ मै इस दुनिया में “

आता टेबलावर बसलेली माशी पाहतेय
माझ्याकडे पाहून हसतही असेल

आणखी काही वर्षे तरी राहावे हे आवश्यकच
या विचारात मी ड्रॉवर उघडतो
--- ०°० ---

Champra Deshpande wrote on Awdhoot Parelkar's timeline.

खूप शुभेच्छा !

June 2

Champra Deshpande wrote on Amol Kulkarni's timeline.

खूप शुभेच्छा !

June 1

निर्लज्जांनो

आंब्यांच्या बागायतदारांना जगवण्यासाठी
नाही खात तुम्ही आंबे
स्वतःच्या चैनीसाठी खाता
तुम्हाला लाज वाटली पाहिजे
जेव्हा तुम्ही म्हणता की
टीव्ही मालिका आणि हिंदी सिनेमे
हे तुमच्या मानसिक आरोग्याचे रक्षक आहेत

कंटाळा येणे हे तर
तुमच्या सुखासीन जगण्याचे
ज्वलंत निदर्शक आहे
तुम्ही दारू पीत

दर्जेदार सिनेमे बघता चिकन खात
शास्त्रीय संगीत ऐकता
तुम्हाला लाज वाटायला हवी
कितीही महाग झाल्या तरी
तुम्ही सिगरेटी ओढता

दाढी वाढली
केसांना कलप नाही केला
म्हणून अस्वस्थ होताना
अमेरिकेतला अन्याय तुम्ही
सहज विसरलेले असता

हजारो लोक मृत्युमुखी पडत असताना
आपापले कुटुंबीय संभाळत
तुम्ही वर्क फ्रॉम होम करत
स्वतःचे लाखोंचे पगार शाबूत ठेवता
भाजी दूध किराणा औषधे
सगळे जेव्हा धुऊन पुसून घेता
तेव्हा तुम्ही हे विसरता की
या सर्व गोष्टी कित्येकांना
मिळतच नाहीयत
चालून चालून पाय फुटले तरीही

याच्याशिवाय तुमचे चालतच नाही
अमुक तमुक तुम्हाला मुळीच आवडत नाही
म्हणाताना तुम्हाला वाटते की हे जग
तुमच्या बापाचे असून तुम्ही म्हणाल ते होईल

तुम्ही निर्लज्जपणे कविता नुसत्या लिहीतच नाही
तर मायकोवस्की नेरुदा पेसोआ बोदलेयर
आरती प्रभू गुरुनाथ धुरी ढसाळ सुर्वे
यांच्यावर चर्चा करत बसता
फावल्या वेळात जेवून खाऊन

तुम्हाला फटके मारायला हवेत तुम्हाला
उन्हातून चालवायला हवे अनवाणी
तुमच्या सगळ्या आवडीनिवडी आणि व्यसने

टराटर फाडून टाकायला हवीत

तुमची सुखाची हाव दुःखाची भीती
तुमच्या मनाच्या सगळ्याच आत्मकेंद्री
आपमतलबी सवयी भाजून काढून
राख करायला हव्यात
--- ००० ---

किमया

घरातल्या काही वस्तू
खिडकीतून दिसणारा
थोडाफार निसर्ग
दहावीस विशेषणे
आणि काही क्रियापदे

एवढ्या सामुग्रीतून
लिहिल्या जाऊ शकतात
हजारो भेदक कविता

ती किमया
त्या उपलब्ध शब्दांची नसते
ती असते
त्यांना मिळणाऱ्या स्वातंत्र्याची
--- ००० ---

May 31

माती

खरे तर शत्रू आणि पाठिराखे
दोन्ही अनावश्यक असूनही
जेव्हा कळले की अरे
हे काही आपले पाठिराखे नाहीत
तेव्हा संध्याकाळ झाली

रात्रीच्या अंधारात

परतली नॉर्मल्सी

सकाळी पुढली कविता लिहिली

इथल्या मातीतली असेल नसेल
पण इथल्या मातीसाठीच तर आहे

ही माती अव्हेरूही शकते
ही कविता
त्याला मी काय करणार
मला जे दिसतेय त्याहून वेगळे
मी काय करणार

कुणालाच नकोय असे झाले
समजा एकूणच तर
जाऊ द्या मातीत
मी काय करणार
--- ००० ---

May 2020
May 30

समजणे म्हणजे फक्त बौद्धिक समजणे आणि ते स्मृतीत साठवता येणे, असे ज्यांना वाटते ते कलेतल्या अमर्याद समृद्धीला मुकतात.

सांगता नाही येणार

ती शेवटची भेट झाल्यालाही
आता काही वर्षे होऊन गेली
ती फक्त दुसरीच होती भेट
पण सखोल आपुलकी
गृहीत धरलेली
तसे सरळच जाणवणारी

त्या आधीची भेट झाली होती
त्या आधी काही वर्षांपूर्वी

इस्पितळातून कुणाला तरी भेटून
मी बाहेर पडलो आणि रस्त्यावरच ती भेटली
त्याच वेळी बोलत बसावेसे वाटत होते
पण मी घाईत होतो
पत्ते सांगणे झाले घाईत

हे आता इतक्या वर्षांनी का आठवतेय
सांगता नाही येणार
काय काय घडत असते मनात

याचा काहीही उपयोग नाही
की नुसतेच हे आठवणे
हेच ठेवायचेय आठवणीत
सांगता नाही येणार
--- ००० ---

May 29

जीभ आणि नाक फारसे आघाडीवर नव्हतेच, आता मास्कमुळे दिसणे मागे पडेल आणि स्पर्श तर टाळायचाच आहे. उभरत्या प्रेमिकांनी आता चांगल्या आवाजात चांगले बोलणे आवश्यक आहे ! व्हॉईस कल्चरची कास धरणे आणि आकर्षक मजकुराचे बोलणे म्हणजे काय, त्याचा सराव करणे यांवर जे भर देतील तेच यापुढे आघाडी घेतील ! ( हे पोस्टकर्त्याचे वैयक्तिक मत असून डॉक्टरी सल्ल्याशिवाय कुणी याचा अवलंब करू नये, हीच सूचना ! )

May 28

चित्रकार व्ही. एस. गायतोंडे यांना कवितांतून सादर अभिवादन

माझ्या शालेय जीवनापासून चित्रकलेत मी कच्चा लिंबू राहात आलेलो आहे. माझे अक्षरच इतके खराब आहे तर मला चित्रकला कशी अवगत होणार, अशा प्राथमिक अवस्थेत मी या क्षेत्रात कोणतेही प्रयत्न केले नाहीत. संगीतातले तंत्र न समजता जसे मला संगीत आवडत राहिले तशीच चित्रकलाही आवडत राहिली. त्या कलेतून व्यक्त होणारे सर्व काही समजून घेण्याचे माझे प्रयत्न फुटकळपणे का असे ना पण चालू राहिले. त्याच समजून घेण्याच्या प्रक्रियेत अलिकडेच भारताचे प्रख्यात चित्रकार व्ही. एस. गायतोंडे यांच्या चित्रांच्या संपर्कात आलो. कविता वा साहित्य या कलेचे ज्या प्रकारचे आकलन मी वर्षानुवर्षे मांडत आलो तेच इथे चित्रकलेत घडलेय, असे मला जाणवले.

गायतोंड्यांबद्दल इतरांनी लिहिलेले खूप काही मला वाचायला मिळाले नाही. त्यांच्या काही ओझरत्या मुलाखती, त्यांची काही महत्त्वाची वाक्ये आणि त्यांच्या कलेचा आस्थेने, प्रेमाने अभ्यास करणाऱ्या काही व्यक्तींचे उद्गार, एवढेच मिळाले. त्यांची आद्य ( original ) चित्रे मी मुळीच पाहिलेली नाहीत. जी पाहिली ती सर्व नेटवरच पाहिली. त्यामुळे, रंग, पोत

यांचा प्रत्यक्ष अनुभव मी घेतलेलाच नाही. तरीही, ग़ायतोंड्यांना मानवंदना देण्याची इच्छा होतच राहिली. मी ना चित्रकलेचा सखोल जाणकार, ना अभ्यासक ना समीक्षक – मग करावे काय ? या प्रश्नाचे माझ्याकडे उत्तर नव्हते. आणि तरीही, एक उत्तर मिळालेच ! आपण आपल्या कवितांतून बोलू ! आणि हे उत्तर स्वीकारून खालील कविता लिहिल्या.

माझ्या उपरोल्लेखित सर्व मर्यादा लक्षात घेता, या कवितांच्या वाचकांना मी काही सुचवू इच्छितो. गायतोंड्यांची चित्रे पाहात पाहातच मी या कविता लिहिलेल्या असल्या तरी या कवितांचा संबंधित चित्रांबरोबर तुलनात्मक विचार करू नये. किंबहुना, गायतोंड्यांची चित्रे अजिबात संदर्भाला न घेता या कविता वाचाव्यात. गायतोंड्यांच्या चित्रांचा थोडाफार फील या कवितांतून आला आणि वाचकांना गायतोंड्यांची चित्रे पाहायची इच्छा झाली तरी या कवितांचे काम झाले, असे मी समजेन. ती चित्रे पाहणे आणि त्या प्रक्रियेत मला जाणवलेले कवितांतून व्यक्त करणे हे काम मी प्रेमाने आणि आस्थेने केलेले आहे, पण, माझ्या मर्यादांबद्दल माफी असावी, ही विनंती.

--- ००० ---

व्ही. एस. गायतोंडे यांची चित्रे

१

आकाश आणि जमीन एकच झाल्यावर
आकाश जड होते आणि जमीन हलकी
जमिनीचाच रंग आकाशाला
कारण आकाश तर नसतेच
आणि जमीनच असते
गडद फिकट छटांची
मायावी मोहक पिवळी प्रिया
कितीही असू शकणारी विस्तार
मनातल्या दगडधोंड्याखड्ड्यांसह

आधी कुठे माहीत होते की ही जमीन आहे
वा क्षितिजामुळे वाटणारे हे आकाश आहे
हे तर नुसतेच मनाचे निवांत असणे आहे
मनाशिवाय
--- ००० ---

२

हे चित्र दोन्ही प्रकारे पाहा
टक लावून आणि टक न लावता
टक लावून पाहाल

तेव्हा असेल ते तुमचे जगणे
आणि टक न लावता पाहाल
तेव्हा असेल ते हे अभिव्यक्त चित्र

दोन्ही वेळी असेल ती एक लाट
येणारी आणि विरणारी
--- ००० ---

३

तुमच्या आहे त्या मनस्थितीतून
बाहेर पडल्याशिवाय
हे चित्र दिसणारच नाही
म्हणूनच ते चित्र ओपनच ठेवलेय
सर्वच मनस्थितींना
कारण कोणतेही तपशील ओलांडणे
हाच तर
हे चित्र पाहण्याचा मार्ग आहे
--- ००० ---

४

लिंगबदलाच्या आठवणी
सर्वच उत्तेजक
प्रत्येक बाजूने
रक्तवर्णी उगमातून
मधेच फुलणारा एक निळा कवडसा
-- हा काही येत नाही
विश्वरहस्याचा भेद म्हणून
उलट थोड्या अंतरावर
हा जणू येऊन पडला आहे चंद्रावरून
कधी काळी परकेपणाने

कोणत्याही लिंगानुभवाची
विशिष्ट ओळख म्हणून येणारी
खडबडीत आकारांची
अस्वस्थ रचना

कधीही होऊ शकते
जिवंत प्रवाहाचा प्रत्यय

फक्त मनाला असायला हवी लय
लिंगभेदबाह्य सामावून घेणारी जगणे
--- ००० ---

५

मी माझे कशाला काही सांगू
जर या सर्वांचा उगम फक्त
हाच असू शकतो
की मी बदललो तरच जग बदलेल

या शांततासंवादाचा साक्षी मी
चितारतो ती अथांगता
तिला हव्या त्या रंगांतून
परकेपणाने आणि देतो सोडून
--- ००० ---

६

हा एक पिवळा चंद्र आणि त्याचे प्रतिबिंब
असा हा खाली आणखी एक पिवळा चंद्र
आणि त्या दोघांचे प्रतिबिंब
असणारा मधे हा एक काळा चंद्र
आणि त्याखाली पुन्हा पिवळा काळा
सर्व चंद्रांना लालसर आकाशाचा स्पर्श
आणि काळ्या आकाशांची प्रतिबिंबे
लालमध्ये काळा काळ्यात लाल
असे एक विनाप्रतिबिंब एकात्म सत्य
या प्रतिबिंबांच्या मीलनातून उजळत गेलेला
काळा आणि लाल

या आकारांचे निरर्थ विहरतात
मधल्या व्यापक मोकळ्या स्पेसमध्ये
जणू यांच्या व्यतिरिक्त

--- ००० ---

७

इथे होत नाही कधीच पुनरावृत्ती
बघा ना हा लालपिवळ्याकाळ्याचा
विविध प्रस्तरांचा शांत कल्लोळ
हा असाच पुन्हा कधीच नाही प्रगटणार
आणि हा आहे ही तरी
त्याची आठवण कुठे आहे
तो तर स्थिरतेत न गोठता प्रवाही आहे
प्रत्येक क्षणी तसाच अनाक्रमक
-- तो जर पुनरावृत्ती असता
तर सत्य चित्र कसा असता
--- ००० ---

८

मी एक व्यक्ती म्हणून काढतो चित्रे
कोणत्याही वैज्ञानिक दृष्टिशिवाय
सापडतो मला प्रत्येक वेळी एक चमत्कार
एका अज्ञात लिपीत लिहिलेला
आणि तरीही रंगांतून व्यक्त होत राहात
रंगांतच ध्यानस्थ होणारा

माझा जगण्याचा आणि निसर्गाचा
अनुभव व्यक्त होतो माझ्यातून
कोणत्याही तात्त्विक रचनेशिवाय

आपल्या मनाने समजू न शकणारे सत्य
अवतरते रंगांतून
अर्थातच कोणत्याही कष्टांशिवाय मनाच्या
--- ००० ---

९

चित्रातच आहे इथल्या मंद प्रकाशाचा स्रोत

इथे सावल्या नाहीत नुसतेच आकार तरंगणारे
ना ढब ना सौंदर्य असलेले
कोणत्याही लक्षवेधकतेशिवाय
मनातून उमटणारे जग
गडद फिकट हिरवे किंचित लालसर
जणू असावी लिंगभावनाही हावहीन

मनाचे असून मनाला ओळखता येणार नाही
असे दूरस्थ संथ जग हलकेच हलत राहणारे
--- ००० ---

१०

ही आहे चित्रलिपीच पण शब्दभाषा नाही
हिला ओळींचे कप्पे आहेत
पण एकसंध आहे वाट पाहणे स्वातंत्र्याची
जणू जागा सोडत
आपापल्या आकारांची नेमून दिलेली निरक्षरे

हिरव्याकरड्यानिळ्याची
खपवून घेतेय थोडीफार बेशिस्त
ही मनापलिकडची स्वयंप्रकाशित भाषा
--- ००० ---

११

जमिनीच्या निळ्याने किंचित प्रकाशित
आकाशाचा निळा आणि मधेच काही अवजड
अंधारलेली बांधकामे ज्यांचे दिसतात
थोडे थोडे फिकट निळे आणि अंधारी पांढरे
प्रकाशित तुकडे पण या इमारती नाहीत
ते आकाशही नाही आणि ते तुकडेही नाहीत

हे तर एका जुन्या आठवणीचे
खोल साठ्यातून बाहेर आलेले
वस्तुहीन रूप मन टाकून
पाहणाऱ्याला लांब नेणारे

--- ००० ---

१२

मुळीच गर्द नसलेले उल्हसित
हिरव्यापिवळ्यापांढऱ्याचे
ताजेच घडलेले चित्र
मधल्या चौकोनांच्या दिशांनी
चहूकडे पसरलेले
मनाच्या पृष्ठभागाचे हसमुख चित्र

पण इथे मधेच हा
निळा काय करतोय
तोही आहे सामील की
जरा परकेपणानेच पाहतोय
निसर्गाची जादू

इतक्या दिशांचे मन
सामावून तर घेणारच सगळा आसमंत

पण हा नाही भावनोद्रेक
या क्षणी आहे हेच पूर्ण आहे
--- ००० ---

१३

अनेक रंगांचे चौकोन
लालहिरव्याच्या अभावाचे काहीसे उदास
वैविध्यपूर्ण विचार जणू
मधल्या तिरक्या कोनांमुळे त्रिमिती झालेले
गंभीर पण दुःखी नसलेले
मनाचे जणू एक दूरस्थ वस्तुचित्र

प्रत्येक घर पॉलिशशिवाय रफ
पण निळा तपकिरी आणि काळा
जणू अनुभवाने दाट झालेले
सफाईदार म्हणावे तुलनेने असे

या ना वस्तू ना मन ना जगाचे चलन
हे तर लेट गो जो भी है
--- ००० ---

१४

हिरवा आणि तपकिरी यांच्या छटांत
दोन स्पष्ट चेहरे अतिनिकट
समोरच्या स्त्रीला पांढऱ्याने विशेष
महत्त्व प्रदान केलेले
आणि हिरव्यावर पिवळ्याचे
अतीव्र उजळपण

स्त्रीच्या कानात डूल
एका भागाने निकट व्यक्तीच्या त्वचेशी
जवळीक सांगणारे
स्तनांचे अस्फुट दर्शन घडवणारे
प्रावरण आणि कोणते हात कुणाचे
हे कळू नये अशी घट्ट जवळीक

दुसऱ्या व्यक्तीचा एक डोळा काळा
जरी एक त्या स्त्रीसारखाच पिवळा उजळ
आणि खाली जणू त्या काळ्या डोळ्याचे
वर्धित रूप असा काळा गोल या नात्यातला अदृश्य
अज्ञात भाग अधोरेखित करणारा

काहीच पूर्ण नसण्याचे भान
व्यक्त करणारे एकूण अपूर्णासह
पूर्ण चित्र

हिरव्या पार्श्वभूमीवर तपकिरी
ठिपक्यांच्या उल्हसित
--- ००० ---

१५

ना गोंडस सौंदर्याचा हव्यास
ना व्यक्तिगत अनुभवांचे प्रक्षोभ
ना रंगांची धूळफेक ना रेषांचे भाले

आहे ते पाहणारे वस्तुनिष्ठ डोळे
वस्तूहीन आकारांत विसावणारे

अंधारप्रकाशाचे स्वयंप्रकाशी जग
समुद्र म्हणून पाहिलेले
पण समुद्रही सोडून निःसंग होणारे
शांततेचे रहस्य
--- ००० ---

May 27

भीतीला कोळून

उलटा शर्ट सुलटा केला
की पान कोरे दिसते
जे मला आवडायचा प्रश्नच नसतो
वा न आवडायचा

मला माहीत असते की लोक
उलट्यालाच सुलटा समजतात
आणि तेच असते माझ्या भीतीचे कारण
फक्त उलट्या शर्टातच भेडसावणारे

मिळालेल्या मिनिटांत
मी लिहितो कविता कोऱ्या पानावर
भीतीला कोळून
उलट्या लोकांत
--- ००० ---

सांस्कृतिक चाळा

कोरोना काळात जरा मेंदूचे व्यायाम म्हणून सुचतील ते प्रश्नही येऊ द्यायला हरकत नसावी. culture ला संस्कृती हा शब्द ठीक आहे पण civilization ला सभ्यता हा शब्द नाही पटत. मराठीत ते जाते चांगल्या वागणुकीकडे म्हणजे

संस्कृतीकडेच. तर सभ्यते ऐवजी प्रस्थिती हा शब्द मला ठीक वाटतो. सध्या तोच वापरतोय. प्रस्थितीमध्ये अनेक संस्कृती सामावलेल्या असू शकतात. याच सत्याबाबत एक प्रश्न आहे. निरनिराळ्या गटांच्या निरनिराळ्या संस्कृती असतात. त्यांचे वर्णन कुणी असंस्कृत पासून सुसंस्कृत पर्यंत करतात. तर संस्कृतीचे दर्जे असतात का ? संस्कृतीचे मूल्य ठरवता येते का ? येत असल्यास त्याला आधार कसला असतो ? कला ही संस्कृती निर्माण करत असते, असे म्हणतात. समजा तीन माणसे आहेत -- त्यांनी फक्त

१ मर्ढेकर, ढसाळ
२ पु शि रेगे, केशवसुत
३ आरती प्रभू, दिलीप चित्रे

-- असे आणि एवढेच वाचन केलेले आहे. तर त्यांना मिळालेले सांस्कृतिक टॉनिक कोणते अधिक महत्त्वाचे, असे काही असू शकेल का ? प्रचंड साहित्य वाचलेला माणूस आणि फक्त तुकाराम वाचलेला माणूस यांच्यांत काही फरक असेल का ? कसा, कोणता ?

माणसाचे सांस्कृतिक ' असणे ' म्हणजे काय ? नुसत्याच परंपरा, श्रद्धा, धर्म, जात -- हेच ? संस्कृती या शब्दाचा पूर्ण अर्थ काय असेल -- जो प्रत्यक्ष जगण्यात असेल ?

--- ००० ---

May 26

Champra Deshpande updated his status.

डायरेक्टच

तू अंधारात बसून कवींच्या मुलाखती घेतल्यास
तुझ्या आठवणींवर आधारित आणि एकेका वाक्यात
तू त्यांचे ज्ञानच गोठवून घेतलेस त्यांतल्या कुणाला
अर्पण होण्याऐवजी तुझी योजना वेगळीच होती
कुणाची निराशा कुणाची अतिवास्तवता
कुणाचा अस्तित्ववाद आणि कुणाची इथली माती
यांतून तुला स्वतःला समृद्ध होत जायचे होते

त्याच वेळी तुझी एक विद्यार्थिनी
तुझ्याकडून अत्यादराने कविता शिकायला येई
आणि तुझी इच्छा असे की तिला
कवितेऐवजी डायरेक्ट जगणेच शिकवावे
या अनपेक्षित बदलत्या अभ्यासक्रमाने ती

रुसून निघून जाई आणि चार दिवस गायबच होई

ती पुन्हा आली की कविता आणि जगणे
यांतली सगळीच समृद्धी दाटून येई तुझ्यात
आणि काय बोलू आणि काय नको असे तुला होई

आता तू पेसोआ वाचत असलास तरी त्याला तुला
कवी नाही समजता येणार कधी तुझ्या आठवणीत
राहावे असे काहीच नाहीय त्याच्याकडे पण
तरीही याचीही समृद्धी जमा करू शकशीलच तू

आणि मग काहीच नसण्याच्या समृद्ध मिषाने तिच्याशी
तू डायरेक्टच मुद्याचे बोलू शकशील प्रत्यक्ष उपयोगी
--- ००० ---

Champra Deshpande shared a link.

औषधाविना उत्तम आरोग्य कसे राखावे? | Dr. H .V. Sardesai | EP 2 | Audio Special | #thinkbank
youtube.com
डॉ. एच व्ही सरदेसाई यांची ही मुलाखत कमीजास्त प्रमाणात तरी फ्रेंडसना उपयोगी पडेल, असे वाटल्याने इथे ती लिंक देत आहे --

विनायक पडवळ आणि गिरीश साळवी हे सतीश तांबे आणि मी -- आमचे दोघांचेही घनिष्ठ मित्र ! आता ते दोघेही नाहीत !

May 25

कवितेत आलेला एखादा शब्द

कवितेतला ' मी ' हा बहुधा स्वतः व्यक्तिगत असा कवी नसतो -- माझ्या कवितांत तरी नसतो. व्यक्तिगत सुखदुःखे वा मूडस वाचकांना सांगत बसण्यात मला इंटरेस्ट नाही. पण, कवितेत माध्यम म्हणून वापरले जाणारे अनुभव, माहिती, आठवणी हे तर सगळे कवीच्याच मनातले असते. तर, ‘ मांजरसुंबा ‘ या माझ्या कवितेतले गावाचे ते नाव माझ्याच स्मृतीतले आहे. ते कसे माझ्या लक्षात राहिले ते जरा आत्मप्रौढीचा दोष घेत सांगतो. ९० नंतरच काळ. शेतकऱ्यांना एक अमुक इतक्या रक्कमेपर्यंतची कर्जमाफी जाहीर झालेली होती. अजून संगणकीकरण झालेले नसल्याने बँक कर्मचाऱ्यांना सर्व कामे स्वकष्टाने करावी लागत. आता प्रश्न असा होता की काही कर्जदारांनी निरनिराळ्या बँकांतून कर्जे घेतलेली होती. प्रत्येक ठिकाणी त्यांना उच्चतम रक्कमेचा माफीलाभ देणे चुकीचे होणार होते. त्यामुळे, निरनिराळ्या बँकांत असणारे कॉमन म्हणजे समान कर्जदार शोधून काढून त्यांची कर्जमाफी त्या त्या प्रमाणात त्या त्या बँकांकडे जाणे आवश्यक होते. आणि आमची

बँक ही तिथली लीड बँक असल्याने या उद्योगाचा पूर्ण कार्यभार आमच्या बँकेकडे होता. त्या वेळी आमच्या बँकेच्या क्षेत्रीय कार्यालयात मी एका विभागाचा प्रमुख होतो. या कामाचे ठिकठिकाणी नेतृत्व करण्यासाठी आमच्या बँकेचे अधिकारी ठिकठिकाणी पाठवण्यात आले होते. माझ्याकडे खुद्द नगर विभागाची सर्वात मोठी जबाबदारी देण्यात आली होती. निरनिराळ्या बँकांचे सुमारे दीडशे प्रतिनिधी आलेले होते. एका मोठ्या सभागृहात या कामाची व्यवस्था केलेली होती. मी तिथे जाण्यापूर्वीच नीट विचार करून हे काम अत्यंत कमी कष्टांत आणि बिनचूकपणे कसे करता येईल हे ठरवून ठेवले होते. मला दिलेल्या तीन सहाय्यकांनाही ते समजावून सांगितले होते. त्यामुळे ३-४ दिवस चाललेले ते काम हसतखेळत कोणताही ताण न येता पार पडले. ( काही ठिकाणी या कामाच्या योजना नीट न झाल्यामुळे अपयश आले आणि तिथे हा कार्यक्रम पुन्हा राबवावा लागला. ) “ आपण समान कर्जदार शोधण्याच्या वारीतले वारकरी आहोत – आपल्या हातात कर्जदार याद्यांच्या पताका आहेत – “ असे किरकोळ विनोद करत ते काम मस्त पार पडले. अनेक बँकांच्या प्रतिनिधींनी मुद्दाम फोन करून आमच्या साहेबांकडे माझ्या नेतृत्वाची स्तुती केली ! हे सगळे सांगितले कारण त्याच कामाच्या रगाड्यात ‘ मांजरसुंबा ‘ हे नाव कानावर पडले ! हे नाव खासच वाटले आणि काहीसे गंमतीशीरही. नंतर तो शब्द आम्हा सहकाऱ्यांत स्लँग म्हणजे आमच्यापुरताच अर्थपूर्ण झाला. “ अरे, असे नको करूस हे काम, सगळा मांजरसुंबा ( म्हणजे बट्ट्याबोळ ) होऊन जाईल ! “ – असे. तर असे स्मृतीत राहिलेले ते नाव कालच्या कवितेत आले. एका फ्रेंडने सांगितले की ते गाव नगर जिल्ह्यात नसून बीड जिल्ह्यात आहे. त्या वेळी ते नगर जिल्ह्यात होते का, हे आता नीट आठवत नाही. ( नेटवर पाहिले तर नगरच दिले आहे -- एकदोन ठिकाणी बीडही आहे ! ) त्याने काही फरकही पडत नाही. मी ‘ महाराष्ट्रात ‘ अशी दुरुस्ती करूनही टाकली. आले ना लक्षात -- कवितेत आलेल्या एखाद्या शब्दाला कसा इतिहास असू शकतो ते ? एक गंमत समझके भूल जाओ –

--- ००० ---

गिरीश साळवी

एक अत्युत्तम अभिनेता आणि माझा एक छान मित्र गेला ! गिरीश पतकेने बसवलेला, त्याने अभिनीत केलेला, तेंडुलकरांचा, ' चौऱ्याहत्तर पावसाळ्यांचा जमाखर्च ' हा एकपात्री दीर्घांक म्हणजे त्याच्या अभिनयाचा कळस होता ! सहज, साधा वावर, अर्थपूर्ण, उत्तम संवादोच्चारण, टायमिंग आणि नाटकाच्या लयीचे उत्तम भान, हे सर्वच त्यात पूर्णतेला पोचलेले होते ! ग्रेटच ! पण, वेडा होता ! अरे, मी म्हणायचो, तू एक उत्तम अभिनेता आहेस, शरीराची काळजी घ्यायला हवीस ! खरे आहे तुमचे, तो म्हणायचा ! मी कधी मुंबईला गेलो तर हे दोन गिरीश आणि मी यांचा गप्पांचा म्हणजे ग्रंथवाचनाचा कार्यक्रम हमखास ठरलेलाच असायचा ! गिरीश पतके त्याची शेवटची गाडी पकडे, पण हा, मी एशियाडमधून पुण्याला रवाना होईपर्यंत माझ्याबरोबर असे ! माझ्या ' बुद्धिबळ आणि झब्बू ' या नाटकात त्याने केलेली एक भूमिका पाहणाऱ्यांच्या कायम लक्षात राहिलेली आहे ! माझ्याच, ' झालं गेलं विसरून जाऊ ' या नाटकातही त्याने त्याच्या ग्रेट अभिनयाचा प्रत्यय दिला होता ! सिद्धार्थ तांबे यांच्या, गिरीश पतकेनेच बसवलेल्या, ' जाता नाही जात ' या गाजलेल्या नाटकातही त्याच्या अभिनयाचा कारनामा होताच ! हे सर्व ठीकच, पण, असे प्रेमळ मित्र असतात किती माणसाला ?

गिरीशच्या स्मृतीस अत्यंत स्नेहपूर्ण अभिवादन !

--- ००० ---

मांजरसुंबा

कुठून येते उदासीनता
कळत नाही
कुठून येते समाधान
कळत नाही
कुठून येतात लैंगिक भावना
कळत नाही
वगैरे कळत नाही ठीक चला
समजा हे सगळे येते
मांजरसुंब्याहून
जे महाराष्ट्रातले
मी न पाहिलेले एक गाव असून
त्याच्या नावाची फक्त स्मृती आहे
जी तिथूनच आलीय समजा

मग हे सगळे आपले मानून
मी यात आता मग्न कसा राहणार
हा विचारही येणारच ना तिथूनच

आता येऊ दे विस्मृती त्या गावाची
नव्हे त्याच्या नावाची तिथूनच
हीच प्रार्थना तिथूनच आलेली
म्हणजे आहे ते सगळे आहे तसे
चालू राहू शकेल
नकळत
--- ००० ---

May 24

नवा भूतकाळ

अनेकदा सांगून पाहिले
कुणाच्या डोळ्यांमागे कोणते खंदक आहेत
याचा फार विचार करत बसण्याचा काळ नाहीय
राहिलेला नवे काही घडायचे असेल तर
जुन्याची थोडी सरकवासरकवी होणारच

भूतकाळाच्या नादात खूप वेळ खाणे
म्हणजे कंटाळा निर्माण करणे

इमारतींच्या जंजाळातल्या व्यग्र शहराला जर
उल्हसित करणारा श्वास घ्यायचा असेल
तर देव्हाऱ्यांचे आकर्षण सोडून अल्प तरी
नवा भूतकाळ घडवायची तयारी ठेवावीच लागेल
--- ००० ---

आपल्या डेस्कटॉप बॅकग्राउंडवर जगातले कोणतेही ग्रेट चित्र ८-१५ दिवस ठेवावे, मग दुसरे घ्यावे -- आपोआप चांगली चित्रे पाहणे घडत राहते !

वेड्यांच्या पायांची हाडे

ज्या अर्थी मी कम्युनिस्ट नाहीय
त्या अर्थी मी निराशावादी असणार
असा माझ्यावर त्यांनी
त्यांच्या पराभूत मनाच्या
क्रोधातून आरोप केला

आख्खी मानवजात
फक्त निराशावादीच असू शकते
कारण हिंसेशिवाय तिचे
एक पानही नाही हलू शकत
असे मी निर्ढावलेले हसून म्हणालो

पुस्तके आणि भरमसाट विचार
यांचा मला कंटाळा होता
याला ते खाऊन-पिऊन सुखी असणे म्हणाले
त्यांच्या सुकलेल्या जीर्ण मेंदूंना
मी वेड्यांच्या पायांची हाडे म्हणालो
--- ००० ---

मौन

विसरून नाही जाता येत

जेव्हा आदल्या दिवशीचे प्राणिसंग्रहालय
तेव्हा जगाला तहान लागते
अगदी साध्या साध्या बाबींना मान्यता मिळण्याची

बदली झाल्याशिवाय गाव नाही सोडता येत
अशा अटळ हेक्यात अडकलेले विश्वास
मग डळमळू लागतात
हिंसा वाईटच असे पुन्हा एकदा म्हणत

हे देवाधर्माचे अडथळे
निसर्गाला स्मरून पार व्हावेत म्हणून
मग मौन धारण केले जाते
उपरतीची वाट पाहात
--- ००० ---

अमूर्त चित्राचा अर्थ आणि दर्जा

कीरो या जगविख्यात हस्तरेषातज्ञाची जरा परीक्षाच करावी, असे एकदा काहींनी ठरवले. हातांचे २०-२५ ठसे घेऊन ते त्याच्याकडे गेले. हे सगळे ठसे ३५ वर्षांच्या पुरुषांचे असून यांतला एखादा ठसा फारच वेगळा वाटतो का ते बघा, म्हणाले. कीरोने ते सर्व ठसे पाहून एक ठसा बाहेर काढला. तो म्हणाला की या माणसाला खुनाच्या गुन्ह्यासाठी फाशीची शिक्षा झालेली असून सध्या तो तुरुंगात आहे. हे बरोबर होते ! मग त्याला फाशी कधी दिले जाईल, असा प्रश्न विचारला गेला. कीरो म्हणाला की त्याची फाशीची शिक्षा रद्द होईल. पुढे तसेच झाले ! हे सगळे अंधश्रद्धा म्हणून उडवून लावण्यासारखे नाही, असे माझे मत आहे. हल्ली मेडिकल पामिस्ट्री आणि करियर पामिस्ट्री यांतही खूप संशोधन झालेले आहे आणि होत आहे. ते जाऊ द्या – या मतभेदासाठी मी हे लिहिलेले नाही.

आता दुसरी एक घटना सांगतो. मी बँकेत नोकरीला लागलो त्या काळात स्पेशल कलेक्षन असा एक प्रकार होता. म्हणजे, एखाद्या ग्राहकाच्या विनंतीवरून त्याने भरलेल्या दुसऱ्या बँकेच्या चेकचे पैसे त्या बँकेत जाऊन रोख आणून देणे. तसे रोख पैसे आणायला मी आणि आमचे एक रोखपाल ( कॅशियर ) एका बँकेत गेलो होतो. तिथला कॅशियर आमच्या ओळखीचाच होता. पण त्याने १०० च्या एका पॅकेटमध्ये एक सदोष नोट ( तेलकट वा धुतली गेलेली असेल वा चिकटवलेलीही असेल ) ठेवली होती. आमचा कॅशियर पैसे मोजत असताना तो दुसरा कॅशियर इकडचे-तिकडचे काही बोलत राहिला. आमचा कॅशियर नोटा मोजत होता. भराभर. ती नोट येताच त्याने ती बाजूला काढून ठेवली आणि तो पुढे मोजू लागला ! त्याला नुसत्या स्पर्शातून कळायचे ते कळले होते ! हेही सांगण्याचा हेतू वेगळा आहे.

अमूर्त चित्रे बघून आपल्याला असा प्रश्न पडू शकतो की हे खरोखर चांगले चित्र आहे की असेच कुणीही काहीही कसेही रंग उधळून वा थापून मारलेली रंगीत थाप वा बनावट चित्र आहे, हे कसे कळणार ? या बाबतीत आपण संगीताचे उदाहरण घेऊ शकतो. अज्ञात गायक गात असला तरी त्याचे गाणे लांबून ऐकूनही त्याची योग्यता ओळखणारे खूपजण असू

शकतात, असतात. तसेच चित्रे ' पाहणाऱ्या ' ला अमुक चित्र मास्टरचे आहे की एखाद्या नवख्या उडाणटप्पू नक्कलबाजाचे आहे, हे कळू शकते.

आणखी एक प्रश्न असा पडू शकतो की, पत्र्यावरचा वा लोखंडावरचा गंज यातही ' अमूर्त चित्र ' दिसू शकते. तसेच, झाडाचे खोड, फांद्या, भिंतीचे पोपडे, ढग, चहाचे वा अन्नाचे डाग, मोडक्या वस्तू – यांत कुठेही कलाकृती " दिसू ' शकतात. मग त्यांत आणि कलावंताने निर्मिलेल्या कलाकृतीत फरक काय ? तो कसा कळणार ?

हे प्रश्न काही आपल्यालाच पडतात, असे नाही. जगात अनेकजण यावर विचार करत असतातच. मी एका ठिकाणी असे वाचले की अनेक चित्रे समोर मांडून, चित्रे ' पाहणे ' माहीत असलेल्या काही लोकांना त्यांतल्या चित्रकारांबद्दल विचारले. या प्रयोगात अनेकदा असे दिसून आले की सुमारे ६५ टक्के लोकांना खरोखरच्या गंभीर आणि निष्णात चित्रकारांची चित्रे नेमकी ओळखता येतात.

अमूर्त चित्रातली मास्टरी कशी समजते यावर एक लेख वाचला. त्याचा सारांश असा –

सातत्य -- चित्रातल्या प्रवाहीपणात एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत सातत्य असते.
रंग – संगती नीट असते.
पोत – अनेक थरांचा असू शकतो. त्यातली सहजता कळते.
गुंतागुंत – चित्रातले आंतरसंबंध त्या चित्राची पूर्णता दाखवतात.
निःशंकता – रंगलेपन, रेषा यांत कुठेही भीती वा गोंधळ नसतो.
अर्थ – गायतोंडे बौद्धिक वा भाषिक अर्थ नाकारतात पण पिकॅसो सारख्या चित्रकारात ते असू-कळूही शकतात.

सारांश म्हणजे, काहींना जे वाटते की हे अनमानधपक्याने अंदाजे चालणारे आणि एखाद्या नशीबवानाला ' मोठे ' करणारे असे क्षेत्र आहे, ते काही खरे नाही. खरोखरची चिंतनात्मकता आणि माध्यमावरची मास्टरी समजू शकते. नासमझ वा समजून घेण्यात इंटरेस्टच नसलेल्या लोकांनी याची चिंता करायचे कारण नाही.

--- ००० ---

May 23

" When I don’t paint, I am not a painter. I am just an ordinary human being.” -- V. S. Gaitonde.

जगप्रसिद्ध भारतीय चित्रकार व्ही एस गायतोंडे यांच्याबद्दल बोलताना, त्यांचे एक वैशिष्ट्य म्हणून असे बोलले गेले आहे -- radical idea of separating meaning from painting -- अर्थ आणि चित्र यांची फारकत करणे. एखाद्या चित्रकाराला अशी गरज का, कशामुळे वाटू शकते, याचा आपण विचार करायला हवा. यावर फ्रेंडसनी बोलावे म्हणून ही पोस्ट. आपल्याला जे कळत नाही त्याची हेटाळणी वा टिंगल करावी, असे वाटणाऱ्यांनी या चर्चेत सहभागी होऊ नये, ही नम्र विनंती.

मार्ग

हळूहळू ओळखीचे
आकार नष्ट व्हावे
आणि आपला स्वभाव
सहभागी होऊ नये
अशा मार्गाने गेला तो चित्रकार

मग त्याला निसर्गातच
सापडू लागली अशी चित्रे
त्यांचे फोटो काढून
तो त्यांना फक्त नावे देऊ लागला

शेवटी त्याच्या लक्षात आले
चित्रकार तरी कशाला हवाय
आणि चित्र पाहणारा तरी

निसर्ग चालतोच आहे ना
आपोआप परस्पर
--- ००० ---

अनियंत्रित – स्वयंचलित कविता

सामान्यतः कलानिर्मितीत कलावंताचा व्यक्तिगत सहभाग – त्याच्या सबोध मनाचे निर्मितिप्रक्रियेवर असणारे नियंत्रण -- गृहीत धरलेले असते. त्याच वेळी अबोध मनही थोडेफार काम करत असले तरी त्याला मुक्त संचार करू दिला जात नाही. तो टप्पा या अनियंत्रित कवितेत ओलांडला जातो. ही मुक्त शैली प्रामुख्याने अतिवास्तववादातून आलेली आहे. कवीने कवितेवर कोणतेही संस्करण न करत बसता ती येतेय तशी खडबडीत वा रॉ म्हणजे पिकण्याची वा पिकवण्याची प्रक्रिया न झालेली असायला हवी, असे अतिवास्तववादाचा प्रणेता आंद्रे ब्रेटन म्हणतो. निकॅनोर पारा च्या अँटि-पोएट्री ( न-कविता ) मध्येही ही तत्त्वे अंतर्भूत असतात. संगीत वा चित्र या कलांतल्या ‘ अवैचारिक ‘ तत्त्वांचाही इथे मुक्त वावर असतो. काहीजण असे म्हणू शकतात की हे तिकडच्या लोकांनी आणलेले आहे – आपल्या मातीतले नाही. सगळी मानवजात एकत्र जगत असते, हे त्यांना समजत नाही. जातवादी, धर्मवादी वा देशवादी टोळ्यांच्या मानसिकतेमुळे असे होते. बुद्ध, जे. कृष्णमूर्ती वा ओशो हे भारतात जन्मले म्हणून जगात इतरत्र अप्रस्तुत ठरत नाहीत. मानसशास्त्राचा अमुक एक अभ्यास परदेशात झाला म्हणून तो इथल्या मातीतल्या लोकांना लागू होत नाही, असे नसते. कालिदास, टागोर, शेक्सपियर, पिरांदेल्लो, बेकेट, आयनेस्को हे पूर्ण जगाचे असतात, हे लक्षात घ्यायला हवे. तर, ही जी अनियंत्रित मुक्त शैली असते ती कुठेही काहीही फेकावे, जोडावे अशी असते का ? तर नाही. वर्तमानपत्राचे एखादे पान फाडून, त्याचे तुकडे हवे तसे मांडून त्यातून मिळणारा कुठलाही शब्दसमुच्चय म्हणजे ही अनियंत्रित कविता असते का ? या प्रश्नाला माझे उत्तर, ‘ नाही ‘ असे आहे.

कवीच्याही नकळत त्याचे जगण्याबाबतचे आकलन, परिपक्वता ( असलेली-नसलेली ) ही इथे काम करतच असते. ती व्यक्त होण्याला इथे अतिस्वतंत्र आणि अत्यंत नावीन्यपूर्ण वाव मिळतो, असे मी म्हणेन. गेयता, पद्यता, वैचारिक भूमिका वा भावनिकता अशी बंधने इथे नसतात. त्यामुळे, अर्थातच, अशा कविता फक्त सबोध मनाने वा वैचारिकतेने समजत नाहीत. त्यांच्या निर्मितिप्रक्रियेप्रमाणेच त्यांची वाचनप्रक्रियाही असावी लागते. या कवितेतून, कोणत्याही चांगल्या कलाकृतीप्रमाणेच, जगण्याचे आकलन, भान, परिपक्वता हेच व्यक्त होत असते. आज मी इथे दिलेली ‘ उडता उडता ‘ ही कविता या अनियंत्रित प्रकारातली आहे, असे मला वाटते.( यापूर्वीही मी अशा बऱ्याच कविता लिहिलेल्या आहेत. ) तिच्या ‘ यशस्विते ‘ बद्दल वा ‘ मूल्या ‘ बद्दल माझा कोणताही दावा नाही.

--- ००० ---

उडता उडता

व्यापक पाऊस पडला म्हणून
निकरावर आलेले खेळ निवर्तले
आणि भाळून गेलेले अजरामर झेंडे
सेक्स सिंबॉल होत पालखीत सामील झाले

आपण कोण अडवणारे
आपण कोण तिकीट चेकर
आपण कोण डोअरकीपर

बघता बघता संसार
मातीत गेलेले शास्त्रज्ञ
विसरून गेले घेतलेली सर्व कर्जे
आणि या पापाचे धनी होणे
टाळण्यासाठी कॅबरे डान्सरने
उरलेसुरले अवयवही दान केले

ही काय जादू थोडीच असते
हा तर असतो अनेक किलोमीटरचा लगाव
अंगाच्या कणाकणाला चिकटलेला
आणि मनाला गिळंकृत करून
निश्चिंतपणे वाट पाहणारा
अनिर्बंध मीलनाची

उडता उडता सर्व पायऱ्यांनी
मीपण सोडून अर्पण व्हावे
तशा मदमस्त

--- ००० ---

प्रेमच आपले बरे आहे

आधी वाटले राग आहे
मग दिसले सोबत आपली काळजीही आहे
तुटण्याच्या भीतीबरोबरच नाहीच तुटणार
हा विश्वासही आहे लौकरात लौकर
व्यक्त होतेय की काही
घडलेलेच नाहीय इजा करणारे
नॉर्मल तर आहे सगळे

हा एक नव्यानेच होणारा स्वीकारच आहे
पण एक जुनीच अट अधोरेखित करून
हलक्या हाताने

जवळीक नाकारावी तर दुरावाही
सहन होत नाहीय हे सत्य आहे

दुतर्फी मनांचे गोंधळ समजूनही
आणि समजल्यामुळे दिलासा आहे
की मूळ धागा अबाधित आहे

या कोरोनाच्या जगात
नकोच राग नाराजी
जास्त टिकवायला

प्रेमच आपले बरे आहे
--- ००० ---

May 21

Champra Deshpande updated his status.

फेसबुक स्लो चालणे, टाईप केलेले उशिराने उमटणे, कर्सर ऑपरेट न होणे, लॉग आऊट करायलाही वेळ लागणे -- असे प्रश्न सर्वांनाच येताहेत का ? हे असे फक्त फेसबुकवरच होतेय. काय असेल कारण ?

आमच्या भागातली वीज यंत्रणा गेले काही दिवस आयसीयूत गेलीय ! दर तासाने गायब होतेय ! त्यात माझा यूपीएस बंद पडलाय !

सह्या

वाळूचे वादळ
समुद्राच्या लाटा
कोरोनाचे सावट

पाच इंद्रिये काय
सहा सात वा आठही
असू शकली असती
मग वेगळेच असते जग

नाडी रक्तदाब मधुमेह
आणि रक्तातले प्राणवायूचे प्रमाण
कळतेय सहज मोबाईलवर

जातायेता खूप काही दिसत असते
आता येणार आहे असा एक रोग
जो कानांवर हल्ला करेल
कोलाहलाबरोबरच
पक्ष्यांचे आवाजही गायब होतील

परदेशातल्या आप्तेष्टांना
काळजी वाटत असल्याचे
मोबाईलवर दिसेल

भीती मात्र प्रत्यक्ष दाटेल मनात
जेव्हा हजार किमींवरून डॉक्टर कळवतील
सह्या करून घ्या अत्यावश्यक
--- ००० ---

May 20

कविता आणि वय

मी अगदी थोडा काळ किर्लोस्कर प्रेसमध्ये ‘ मनोहर ‘ मासिकाचा सहसंपादक म्हणून काम करत होतो. त्या वेळी मी ‘ सहशिक्षण ‘ या विषयावर अनेक नामवंतांच्या आणि शिक्षणतज्ज्ञांच्या मुलाखती घेऊन त्यांचा एक मोठा लेख तयार केला होता. त्या लेखाला प्रभाकर काटे यांची चित्रे लाभलेली होती. सुंदर असणे हे काट्यांच्या चित्रांचे प्रमुख वैशिष्ट्य असे. तर त्या प्रक्रियेत एक विचारवंत असे म्हणाले होते की वयाच्या २५ व्या वर्षापर्यंत मुलाने मुलीकडे पाहताही कामा नये. त्याचे पूर्ण लक्ष त्याच्या शिक्षणावरच केंद्रित असायला हवे. अशा विचारांमुळे ते सहशिक्षणाच्या विरोधात होते. मुलामुलींनी एकत्र शिकताच कामा नये, असे त्यांचे मत होते. यावर, अमुक एक शिक्षणतज्ज्ञ असे असे म्हणतो, त्यावर तुमचे काय मत, असे विचारल्यावर ते माझ्यावर खवळले होते. तर ते असो. नैसर्गिक वाढ आणि मानसशास्त्र यांना धरून त्यांचे विचार नव्हते. इथून सुरुवात करायचे कारण म्हणजे कवितेत येणारे अनुभव आणि कवीचे वय यांचा काही संबंध असतो का आणि त्याचे काही नियम वा शिस्त असते का, हा या पोस्टचा विषय आहे.

स्त्रियांनी, विशेषतः विवाहित स्त्रियांनी प्रेमकविता लिहिणे निषिद्ध मानणारे बरेच लोक अजूनही आपल्या समाजात आहेत. स्त्रियांवर घातले जाणारे हे निर्बंध अनैसर्गिक, अन्यायकारक आहेत, हे समजणाऱ्यांची संख्याही आता बऱ्यापैकी आहे, असे म्हणता येईल. असली बंधने वा अपेक्षा या निसर्ग आणि मानसशास्त्र यांना डावलून बाळगल्या जातात. त्यांना प्रत्यक्ष वास्तवाचा वा मानवी जगण्याचा आधार नसतो. तसेच प्रकार, कोणत्या वयात कशा प्रकारच्या कविता लिहिल्या जाव्यात यांबाबतच्या अपेक्षांमध्येही असतो. तरुण वयात औदासीन्य, मृत्यूचे विचार, निराशा, हे असू नये, असे काहींना वाटते. माणसाच्या जगण्याबाबतचे मूलभूत प्रश्न – जसे की, दुःख का होते, प्रत्येक संबंधात संघर्ष का असतो – हे खरे तर कोणत्याही वयात पडू शकतात. बुद्धाला ते प्रश्न पडले ते फक्त त्याच्यापुरते नव्हते. ते पूर्ण मानवजातीचे प्रश्न होते. अशा प्रकारच्या चिंतनाची कविता तरुण वयातही लिहिली जाऊ शकते. तरुण वयात कशाला आध्यात्मिक, असे म्हणण्याला अर्थ नसतो. आपण ‘ आध्यात्मिक ‘ चा संबंध धार्मिक कर्मकांडे, त्यांतल्या अधिकारांची रचना यांच्याशी जोडतो ते पूर्णतः चुकीचे असते. खरे तर प्रत्येक चांगली कविता ही व्यक्तिगत सुखदुःखांच्या पलिकडचा एकूण मानवी जगण्याचा आवाका घेणारीच असते. काही कविता फक्त व्यक्तिगत रागलोभ वा सुखदुःखे वा मते मांडणेच महत्त्वाचे मानणाऱ्या असू शकतात. आणि तरीही, काही कविता, कोणत्याही अनुभवाच्या निमित्ताने, मनाच्या गुंतागुंतीच्या रचना, जगण्यातली आंतरद्वंद्वे यांचे परिपूर्ण भान घेणाऱ्याही असतात. या अर्थाने त्या आध्यात्मिक असतात. तरुण वयात अशा कविता कुणी लिहीत असेल तर, ‘ अरेरे ‘ वा ‘ बिचारा ‘ असे कवीला म्हणणारे काही असू शकतात. ज्ञानेश्वर काय, ‘ वरून ‘ त्या कामासाठीच आले होते, इतर तरुणांनी त्या फंदात पडू नये, असे त्यांना वाटते.

स्त्री-पुरुष यांच्यांतल्या आकर्षणाचा विषय घेऊ. हे फक्त तरुण वयातल्या लोकांचे आरक्षित क्षेत्र असते, असे काहींना वाटते. तसे वाटणे हे अर्थातच अनैसर्गिक, मानवी जगण्याच्या वास्तवाला नाकारणारे आणि हेकटपणे नैतिक स्वरूपाचे असते. स्त्री-पुरुषांतले आकर्षण हे दोन्ही बाजूंनी वयबद्ध असू शकत नाही, तसे ते नसते, हे अगदी आधुनिक संशोधनही सांगते. त्यामुळे, पन्नाशी, साठीच्या पुढच्या स्त्री-पुरुष कवींनी प्रेमकविता लिहू नयेत, असे वाटणाऱ्यांकडे दुर्लक्ष करणेच योग्य ठरते. प्रेमाकडे व्यक्तिगत अनुभव म्हणून पाहणारे कवी जसे ‘ उतार ‘ वयातही असू शकतात तसेच ते अनुभव पूर्ण मानवी जगण्याची प्रक्रिया असे भान घेणारेही असू शकतात. स्त्री-पुरुषांतले आकर्षण वा प्रेम म्हणजे फक्त मुले जन्माला घालायचा कार्यक्रम नसतो. त्याला इतर अनेक आयाम असतात. प्रेमामुळे मेंदूत घडणाऱ्या रासायनिक प्रक्रिया, त्यांचे मानवी जगण्यातले स्थान, यांवर खूप संशोधन झालेले आहे. रजोनिवृत्तीनंतरच्या स्त्रीने वा साठीनंतरच्या पुरुषाने प्रेमकविता लिहिणे म्हणजे काहीतरी अघटित वा विकृत आहे असे समजणे, हेच खरे तर विकृत आहे. माणूस ब्रेनडेड -- मेंदूमृत होत नाही तोवर सर्व मानवी भावभावनांनी, विचारांनी तो युक्त असतो, हे समजून घ्यायला हवे. कलेच्या क्षेत्रात सर्व मानवी जगणे, त्याचे कोणतेही विभ्रम कोणत्याही वयात आविष्कृत होऊ शकतात, हे समजणे अवघड जाऊ नये.

कलात्मक अभिव्यक्तीत कोणत्याही कारणाने वयाची बंधने मानणे ही एक सामाजिक विकृती असते. ते फक्त सवयीने बिंबवलेले विचारव्यूह असतात. स्त्री वा पुरुष कलावंतांनी वा कवींनी असल्या समजांना किंमत देण्याचे काहीच कारण नाही. सरकारी सेन्सॉर नसावा असे आपण म्हणतो, तसाच, हा असला सामाजिक सेन्सॉरही नाकारला पाहिजे.

--- ००० ---

Champra Deshpande wrote on Anil Sadolikar's timeline.

खूप शुभेच्छा !

May 19

गुन्हे

मूक असले तरी तुझे सूर
सहज ऐकू येतच होते
जे कदाचित
माझ्या उद्युक्त करण्यातूनही
आले असतील
त्यामुळे ते मला हवे तेच
माझेच सूर आहेत
हे समजून मी तुझे आकाश व्यापले

तुला ते आक्रमण वाटले खरेच
की घाईने टप्पे ओलांडणे वाटले
समजले नाही
उगीचच मैफल थांबली

आता हळुवार
तुला हव्या तेवढ्याच गतीने जाऊ
गतीपेक्षा लयीला महत्त्व देऊ

एकदा एकत्र आल्यावर एकमेकांची
समज दुतर्फी असायला हवी
तू अचानक
न्यायमूर्तींच्या भूमिकेत जाऊ नयेस

मी जे करतो ते
दुतर्फी मान्य असेच असायला हवेत
गुन्हे
--- ००० ---

चर्चा न करता

बर्फ वितळला
की दगडाला पाझर फुटला
की नुसतेच एक
खोटे आवरण बाजूला झाले
याच्या नेमक्या विश्लेषणाची
आता गरजच काय

आता प्रत्यक्ष शब्द
आणि प्रत्यक्ष कृतीच हवी
करारमदार नकोतच
किंवा नको आराखडा
वा काहीही नेमके वा निश्चित
करणारे बोल

काहीच कबूल नकोय करायला
आता जगण्यातच आपोआप
ठरत जातील पायवाटा
आणि अनवधानी मोहाचे मार्ग

लागलेला सिग्नल
ग्रीनच आहे ना
याची मुळीच चर्चा न करता
सरळ पुढे जाण्याची ही वेळ

समज म्हणून काही असते की नाही
--- ००० ---

May 18

प्रायोगिक नाटकांसाठी खुशखबर --

प्रेक्षकविरहित कार्यक्रमांसाठी स्टेडियम्स उपलब्ध होणार !

May 17

आदरणीय रत्नाकर मतकरी यांच्याशी कधी माझी भेट वा प्रत्यक्ष ओळख अशी झालेली नव्हती. त्यांची अनेक नाटके मात्र मी पाहात आलेलो आहे. त्यांचे ' जावई माझा भला ' हे नाटक एके काळी खूप गाजले होते. त्या वेळी मी ते पाहिले नव्हते. दोनच दिवसांपूर्वी, ते नेटवर उपलब्ध असल्याचे पाहून मी ते पूर्ण नाटक पाहिले. संवाद आणि नाट्यतंत्र यांवर अजब हुकुमत असलेला लेखक !

मतकरींचा माझ्याशी आलेला एक संस्मरणीय संबंध म्हणजे – एकदा एकदा ' लोकमत ' ने अनेक नामवंतांकडून मराठीतल्या सर्वकाळ महत्त्वाच्या अशा दहा नाटकांच्या याद्या मागवल्या होत्या -- त्यात मतकरी यांनी माझ्या ' बुद्धिबळ आणि झब्बू ' या नाटकाचा समावेश केलेला होता. त्याचा साभिमान उल्लेख मी माझ्या संकेतस्थळावरही केलेला आहे.

मराठी रंगभूमीवरच्या या महत्त्वाच्या लेखकाच्या स्मृतीस माझा सादर प्रणाम !

' माझे जीवन गाणे ' हे मंगेश पाडगावकरांचे गीत मुळात पुलंनी संगीतात गुंफले होते आणि त्याचे गायक होते जितेंद्र अभिषेकी. आत्ताच झी युवा वर तेच गाणे शौनक अभिषेकी यांनी सादर केले. चाल वगैरे सगळे तेच होते पण संगीतसाज पूर्ण आधुनिक वाद्यांचा होता. तंबोरे, पेटी, तबला, व्हायोलिन, हे काही नाही. एक प्रकारचे फ्यूजनच. मला छान वाटले -- एक वेगळीच मजा वाटली. साथीदार सगळे, आपण एका कसलेल्या गायकाला साथ करतोय याची नम्र जाणीव असलेले होते. वेगळा हटके प्रकार !

दोन कविता --

मग मीही म्हटले

चैन पडत नव्हती
म्हणून मी काळ उलटा केला
आणि स्थल उजवीकडे वळवले
तेव्हा खात्री पटली
की आता अनिश्चितता संपेल

झाडांचा नुसता हिरवा रंगच
भटकू लागला आकाशात
आणि आकाशाचा निळा
आश्रयाला आला पाण्याच्या मगात

हे सुटणारे प्रश्न नाहीत

हे माहीत असलेली माती
निश्चिंतपणे बसली होती
भूतकाळाच्या जखमा वाळू देत

हवेच्या सहनशक्तीचा प्रश्न होताच
त्याची जबाबदारी
माझ्या मूर्ख मनाने घेतली
आणि अभ्यासक्रमात नसलेली पुस्तके
विकत आणली

पण एकूणात माझे मन राहिले
आत्मविश्वासातच
मग मीही म्हटले जाऊ दे
होईल ते होईल
--- ००० ---

अब्दुल्लाच्या कळ्या

वाटलेच मला
अब्दुल्ला वा पीटर
असे काही आले की
लगेच सुरू होणार तुमच्या डोक्यात
धर्मनिरपेक्षतावादाचे धर्मचक्र

तुमचा प्रॉब्लेम सांगू का
तुम्हाला दुफळी आवडते
आणि मग तिची भीती वाटते
म्हणून तुम्ही एकोप्याचे बोलता

तुम्हाला दुफळी का आवडते
याचाच घ्या ना तपास
कशाला काल्पनिक
वास्तवात मरत बसताय

या कवितेसाठी कधी नव्हे ते
मी आधी शीर्षक दिले
मग माझ्या लक्षात आले

की हे निरर्थक आहे

असू द्या ना ते निरर्थकच
--- ००० ---

टयूनिंग

शब्दांशिवाय
होकार देण्याचे तुझे कसब
मला खूप वेळ रेंगाळणाऱ्या
माझ्या आवडत्या
शेपू भाजीसारखे वाटते
आणि तुझे स्मित
माझ्या परमप्रिय
कार्ली भाजीसारखे
हटके आणि भिडणारे

लोक भेंडीबद्दल बोलतात
सिमला मिर्चीच ग्रेट म्हणतात
कुणी म्हणतात आधी तिला
ढोबळी मिर्चीच म्हणा
दोडका काकडी पडवळ
दुधी कोबी गाजर
यांचाही कुणी जयजयकार करतात

मला भाज्यांचे कुणी शिकवू नये
तुझ्या आकर्षणाचे रंग
मला पुरेपूर माहीत आहेत

कारण माझी आवड स्पेशल आहे
तुझ्यासारखीच
आपले टयूनिंग जमवणारी
--- ००० ---

May 16

सहज जाता जाता

ऑक्टाव्हिओ पाझ ची एक कविता --

वाट

हवेहून जास्त
पाण्याहून जास्त
ओठांहून जास्त
हल्लक हलके

तुझे शरीर म्हणजे तुझ्या शरीराचा सुगावाच
--- ००० ---

Champra Deshpande wrote on Swapnil Chavhan's timeline.

खूप शुभेच्छा, स्वप्नील !

स्वचित्र

तुम्ही येताजाता माणसांत पण आस्था असूनही
तुम्हाला कशातच इंटरेस्ट नाही असे वाटते
आणि याचा बराच प्रभाव राहतो – कुणी म्हणतो --
च्यायला आम्हाला आपुलकी वाटते इतकी
पण या माणसाला आमच्याबद्दल काय वाटते
हे कळतच नाही – पाहिला की उग्र वाटतो हा माणूस
मग याला विनोदीही कसे सुचते – नाहीच कळत --
हा भित्रा आहे की धाडसी – अत्यंत कमी सामुग्रीवर
बेधडक मैदानात घुसतो हरण्याची धास्तीच नाही असा
-- पण प्रांजळपणे स्वतःच कबूलही करतो हा की
त्याचेही मन भीतीयुक्तच आहे कधी कधी तर प्रचंड

हा कसा वाटतो यावरून वा काही सांगोवांगीच्या
तपशीलांवरून याच्या लेखनाचे विश्लेषण
नाहीच करता येणार आणि उगीचच असेही वाटत असते
की खूप असे काही लोक ज्याला वाईट म्हणतील
असेही काही दडलेले असावे याच्या जगण्यात भूतकाळात

पण हा म्हणतो की मी माझे चरित्र

सांगण्यासाठी लिहीतच नाही त्यामुळे
माझ्या लेखनाचा माझ्या मनोविश्लेषणाशी संबंधच नाही
माझ्या मनाच्या उत्खननातूनच जरी
येत असले शब्द तरी त्यांत माझ्या भावनांचा
बडेजाव नाही असणार तो म्हणतो मुख्यतः
त्याचे नसलेले असे पूर्ण नसण्याचे क्षणच तो वाटतो
सर्वांनाच ओझी फेकता येण्याची शक्यता सांगण्यासाठी
--- ००० ---

May 15

मूल्यऱ्हास

इथे बरेच विषय मी विचारविनिमयासाठी मांडत असतो – माझी अमुक मते फ्रेंडसच्या गळी उतरवण्यासाठी नाही. त्याच प्रकारची ही पोस्ट आहे. हल्ली ' मूल्यऱ्हास ' हा शब्द नेहमीच वाचनात येतो. काय आहे ही भानगड, असे आपण कधी विचारत नाही. एक लक्षात घेतले पाहिजे की आपण ज्यांना मूल्ये म्हणतो त्या काही बौद्धिक रचना असतात आणि सामान्यतः त्या ' आदर्श ' म्हणून स्वीकारलेल्या असतात. मूल्ये मान्य सगळ्यांनाच असतात पण प्रत्यक्षात आचरणात नसतात. उदाहरणार्थ ' समता ' हे मूल्य घेऊ. हे मान्य सगळ्यांनाच असते पण आचरण विषमता निर्माण करणारे असते. पतिपत्नींनी शंभर टक्के एकमेकांशी एकनिष्ठ असायला हवे याला सगळेच ' हो हो ' म्हणतील पण ते आचरणात असणार नाही. भ्रष्टाचार वाईट असे सगळेच म्हणतील पण मनात आणि खाजगीत त्याचे समर्थनही करतील. कोणतेही मूल्य म्हणजे माणसाच्या जगण्यातले एक आंतरद्वंद्वच असते. ' अहिंसा ' हे मूल्य चांगले आहे हो पण तुम्ही युद्धसज्ज नसाल तर जगात तुम्हाला कुत्रेही विचारणार नाही – असा हा पेच असतो. आणि हे शेकडो-हजारो वर्षे चालू असते. तसे नसते तर ' समता ' हे मूल्य मानून त्यासाठी झटायची गरजच उरली नसती. मूल्य-स्वीकार आणि मूल्य-विरोध या द्वंद्वातूनच माणसाची ' प्रगती ' चालू असते ! काळानुरूप त्या प्रकाराची अभिव्यक्ती, प्रमाण बदलते, वेगळे असू शकते, इतकेच.

हे सर्व पाहता ' मूल्यऱ्हास ' होतोय, म्हणजे काय ? निरनिराळी मूल्ये स्वीकारणे आणि त्यांचा ऱ्हास करत जगणे हेच तर घडत असते. आज वेगळे असे काय घडतेय ? की आपण मूल्यऱ्हासाबद्दल बोललो म्हणजे आपण स्वतः फार मूल्ययुक्त वागणारे आहोत, असे भासवण्याची ही एक युक्ती असते ? आणि यातले मतभेदांचे क्षेत्र लक्षात घेतले तर आता अगदी मूल्यऱ्हास होतोय असे म्हणण्यासारखे आपले मूल्ययुक्त वागणे कधी होते ? वस्तू आणि बाजार यांचे प्रचंड जग खुले झालेले असल्यामुळे मुळातच असणारी द्वंद्वात्मकता खूप मोठी दिसते, इतकेच !

मूल्ये आचरणात असूच नाही शकत तर त्यांचा ऱ्हास कसला ?
--- ००० ---

दुरावा

दुरावा हा एक ताण आहे

ज्यामुळे जग हा एक ताण आहे
आणि सगळे संबंध
आणि भूतभविष्य
ठरलेले विचार
महत्त्वाकांक्षा
अंधारऊन
प्रेयस-श्रेयस

दुराव्याला नुसता तुझा स्पर्श
झाला तरी हे सगळे जाते
हे मी पाहिलेले आहे
पण तुझ्या स्पर्शाची इच्छा करता कामा नये
ही अटळ अट धुव्वा उडवतेय जगण्याचा

दुरावा निर्माण करणारे मनच
तो टिकवण्याचा
आटोकाट प्रयत्न करतेय

तू ना सजीव ना दयाळू
ना तुला मन हा स्वछळ कळणारे

ना दोष देणे ना दया भाकणे उपयोगाचे
हे मला समजतेय याचाही एक ताण

वाट तरी कसली पाहणार
--- ००० ---

नुसतेच गांभीर्य नको म्हणून थोडे असेही --

सांग आता

जे हवे आहे
तेच नको आहे
असे वाटण्याचा काळ
आता तू ओलांडलेला आहेस
आता सर्व फक्त हवेच आहे

तर हा मधे कोरोना
पण एक लक्षात घे
तो आपल्याला दिसत नाही
आणि आपणही
काय हवेनको म्हणतो
ते त्याला समजत नाही

सरळ त्याच्या उपस्थितीला
अस्तित्वहीनच समजू या
आता

सांग आता
कधी येशील
--- ००० ---

Champra Deshpande added a new photo.

निसर्ग आणि माणूस एकत्र --

पालुपद

कंटाळा येतोय ?
म्हणजे ?
काही घडत नाहीय, असे वाटतेय ?
“ काहीच नाही घडत “
हे पालुपद असलेले नाटक
आले समोर आणि जग म्हणाले
हे तर काही महत्त्वाचे घडतेय
जागतिक रंगभूमीवर !
आणि ते
अजूनही घडतच राहिलेय –

पंखा लावा --
त्यातून बरसतील
विचार आणि आठवणी !
की त्यांचाच आलाय कंटाळा ?
की तुम्हाला हवाय पाऊस

सहवासांच्या बेशुद्धींचा
किंवा एकेक टप्पे ओलांडून
पुढचे रस्ते दिसण्याचा ?

तुम्हाला कंटाळा नसेल आला --
नुसतीच तुमच्या कॉलरवर
कावळ्याची घाण पडली असेल –

नीट विचार करा --
थकू नका असे –
--- ००० ---

May 14

अर्थपूर्णता

माझ्या लहानपणची गोष्ट. धावत्या इंग्रजीत लिहिलेला मजकूर पाहून मीही तसेच सरपटते काही गिचमिडून याचा अर्थ काय, असे विचारत असे. तसेच, बरेच पुढे, ' सत्यकथे ' तल्या कविता वाचून, कशाही शेजारी कोणतेही शब्द लिहून मी अशा अनाकलनीय मजकूरांच्या कविता सत्यकथेकडे पाठवल्या होत्या. त्या उलट टपाली परत आल्या ! तर, ' अर्थपूर्णता ' ही लक बाय चान्स म्हणजे अनमान धपक्याने वा राम भरोसे अस्तित्वात येते असे अनेकांना वाटत असेल का ? की न जाणो, फासे आपल्या बाजूने पडले तर आपले लेखन उदाहरणार्थ नोबेलच्या तोडीचे ठरू शकेल, असे ?
--- ००० ---

प्रत्येक घटनेला इतकी हजारो, लाखो कारणे असतात की कोणतीही कारणमीमांसा उथळ ठरावी. त्यावर उपाय म्हणून शोधलेली, नियती, प्राक्तन, प्रारब्ध वगैरे उत्तरेही कुचकामीच. मग काय आहे हे ? -- हा प्रश्न नको पडायला ?

वरून फळ खाली का पडते, या मार्गाने शोध घेणारा जसा महत्त्वाचा असतो तसाच आणि तितकाच, सवयींना धक्का बसल्यावर माणूस हवालदिल का होतो, या मार्गाने शोध घेणाराही असतो.

May 13

आमची सोसायटी सील

दोन दिवसांपूर्वी आमच्या सोसायटीतील एक व्यक्ती पॉझिटिव्ह असल्याचे कळले होते. आमच्या शेजारच्याच इमारतीत. एक वयस्कर बाई एकट्या राहणाऱ्या आहेत, त्या काही बाहेरच्या व्यक्तींकडून सेवा घेत होत्या, असे कळते. त्या प्रकारात त्यांचा विषाणूंशी संपर्क आला असावा. आधी ती एकच इमारत अलग -- आयसोलेट केली होती. पण, आता, त्या बाईंना

एकटे वाटू नये म्हणून सदहेतूने त्यांच्याकडे जाणाऱ्या त्याच इमारतीतल्या आणखी एका बाईंना पॉझिटिव्ह होण्याचा प्रसंग आला आहे. हे पाहून, आजपासून आमची सोसायटी सील केल्याचे कळले. आता पोलीस बंदोबस्तच असणार.

या परिस्थितीला घाबरून रखवालदारांनी पोबारा केला आहे. आता मेंबर्सनाच आळीपाळीने ती कामे करावी लागणार आहेत. उदा सर्व इमारतींना वेळोवेळी पाणी सोडून टाक्या भरणे, वगैरे. यातून अनेक उपप्रश्न तयार होत आहेत. आमचे चिरंजीव काही वर्षे इथले कार्यकर्ते आहेत. त्यांच्या मुली म्हणजे आमच्या नाती त्यांच्यावर भडकलेल्या आहेत. त्याने मुळीच खाली जाता कामा नये, असे त्यांना वाटते. आम्ही घरात वयस्कर आहोत, सुनेचे वडीलही पुण्यातच एकटेच असतात आणि नातींची १० वी व १२ वी ची वर्षे ! हे सर्व लक्षात घेऊन नातींचा आणि सुनेचा सक्त विरोध आहे. अशा वेळी, नीट काळजी घेऊन काहींना कामे करावीच लागतील असे मी म्हणताच सर्वजण माझ्यावरही चिडले. यातून आता कसे काय मार्ग निघतात ते पाहू. आपल्या कोषात सतत सुरक्षित राहू इच्छिणारेही काही असतात. त्यांनाही इतरांबरोबर सक्तीने बाहेर काढावे लागेल, असे हे संकट आहे.

सारांश, सर्व फ्रेंडसनी पूर्ण काळजी घ्यावी. आसपास केसेस निघाल्या तर इतरही बरेच प्रश्न निर्माण होतात, हे लक्षात घ्यावे.

--- ००० ---

Champra Deshpande wrote on Sanjay Bhaskar Joshi's timeline.

खूप शुभेच्छा !

May 12

मतभेद

एकपत्निव्रताप्रमाणे तो
एकशत्रुव्रत पाळतो
माझा एक मित्र
मी तर त्याला सदिच्छाच देतो
की बाबा सात जन्म
तुला हाच शत्रू लाभो

मला तो म्हणतो की तुला भावनाच नाहीत
तू षंढ आहेस मी म्हणतो की मान्य
मी उत्तर नाही देणार मला नकोय
तुझे शत्रुत्व तू एकनिष्ठच राहा

एरवी बरा असतो तो जादुटोण्याविरोधात

पण मानवी हिताचा विषय निघाला
की त्याचे शात्रुत्व जागे होते
मग तो ढुंकूनही बघत नाही
इतर कुणाकडे

अरे त्याला काही मोठे साधायचे असते
तुझ्यासारखे किरकोळ अग्रक्रम ठेवून
त्याला कसे चालेल कंगाल होऊन
नुसते कोपऱ्यात बसणे नाही आवडत त्याला

त्याचे म्हणणे चांगले आणि हिताचे
हाच असायला हवा अग्रक्रम
पण त्यावरच तर असतात ना मतभेद
--- ००० ---

तीच माणसे

अंतर राखायची साथच पसरलीय
ओढणीच्या मास्कमुळे
आधी स्त्रिया ओळखू येतच नव्हत्या
आता मित्र आणि शेजारीही
त्यात अनेक व्यक्ती हेल्मेटवाल्या
सरळ दुर्लक्ष करत
आपल्याच नादात चालावे लागते

कुणी रागावत नाही
हे खरे असले तरी आपुलकी गेलीच आहे

असे वर्षदोनवर्षेही चालेल म्हणतात

ही आवरणे नसलेल्या व्यक्ती
भेटण्याची स्वप्नेही मागे पडत जातील

हिचा तो आणि तिचा हा
न पाहता निघून जातील
जवळून अंधळ्यासारखे

स्वतःच्या प्रतिमा सादर करायचा
त्रास वाचल्याने माणसे जरा सैलावतील
भेटतील मोकळी तेव्हा जरा
दुरावा मिक्स करून बोलतील
दुराव्यामुळे तीच माणसे
पुन्हा मिळवावीशी वाटतील
--- ००० ---

" तिने देशात टॉप केलेय " किंवा " तो राज्यात पहिला उभा राहिलाय " -- हे चालवून घ्यावे की शुद्धीकरणाचा सल्ला द्यावा ?

May 11

Champra Deshpande wrote on Shrinivas Arvind Patke's timeline.

खूप शुभेच्छा !

सर्जक कला

कोणत्याही कवीची प्रत्येक कविता ही त्याच्या कुवतीच्या अत्युच्च स्तराला पोचणारी असेलच असे नाही. कवीने त्याची खंत बाळगायचेही कारण नाही. मुख्य समस्या कोणती असते तर कविता ही निर्णयात्मक वा बोधप्रद होण्याची. तशी कविता ही फक्त नाकारली वा स्वीकारली जाऊ शकते. ती कधीच काही नवे देऊ शकत नाही, कारण, आहे ते पाहण्याची वा समस्यांची प्रक्रिया समजून घेण्याची जाग तिच्यात नसते. ती जाग असणारी कविता वर्षानुवर्षे ताजी आणि जिवंत राहते. हे समजलेला कवी कधी कधी, लिहून झालेल्या कवितेतली बोधप्रदता काढू जातो तर त्यात ती पूर्ण कविताच नष्ट होते. ( माझे एक नाटक असे लिहून झाले होते. सगळा सूर बोधप्रदतेचा होता. मलाच ते बालिश वाटू लागले. ती पूर्ण संहिता नाकारून मी त्या नाटकाचे पुनर्लेखनच केले ! ) मतप्रदर्शनाचा हेतू हा कलेचा प्रमुख दोष म्हणता येतो.

काहींच्या मते ' योग्य बोधप्रद ' असणे हेच फक्त कलेचे मूल्य, असे असू शकते. पण, तशी कला पंथस्थापक असते हे पाहायला हवे. त्यामुळे ती संघर्षाची आणि छळाची आहे ती रचना स्वीकारणारी असते, म्हणजेच मूल्यहीन असते, असे म्हणता येते. दुःखाची रचना नुसतीच उगाळत राहणे म्हणजे सर्जक कला नव्हे.
--- ००० ---

व्हायरस

माझ्या आयुष्याने मी तृप्त आहे
आणि मी कृतार्थ आहे
यांतले ग्लॅमर हवेय

याच्याबरोबर वा तिच्याबरोबर
फोटो काढून तो क्षण मिरवायचाय

आणि मधेच शंकेची पाल
मीच झालोय की काय
मीच घडवलेला
एक कृत्रिम व्हायरस प्रतिकारहीन
आणि निरुपाय
--- ००० ---

आजच्या माझ्या वाढदिवसानिमित्त आलेल्या फ्रेंडसच्या शुभेच्छांना व्यक्तिशः प्रतिसाद द्यायचा प्रयत्न केला आहे. तरीही काहीजण राहिले असतील याची मला जाणीव आहे. सर्वांच्या या उदंड प्रेमाबद्दल मनःपूर्वक धन्यवाद !

May 10

रोज नवा भाग

अजून पुढे आहे कथा
असे सांगत संपला
हिंसक सूडाचा पहिला भाग

आहे का गरज दुसरा बघण्याची
ही पात्रे ना प्रेमाची ना माहितीची
ना आपल्या भागातली

तरीही मरू देत
असे कसे म्हणणार
संवेदनशीलता तर हवीच

आणि आपले आपण
आतल्या आत
जखमी होत राहणाऱ्यांचे काय

स्वतःच्या पिढ्या न पिढ्यांचे
आयुष्य बरबाद करण्याचा सूडच
पूर्वजांचा स्वतःवर घेणाऱ्या

रोज नवा भाग
पुढे काय होईल
याची काडीची उत्सुकता नसलेला
--- ००० ---

May 9

मायाजाल

सहज चालता चालता
टाकलेले पाऊल
अचानक खोलात रुतत जाणे

कुठे कोरोना
कुठे विश्वासघात
कुठे द्वेष

तर कुठे
आपल्याच विचारांचे
मायाजाल
--- ००० ---

एका अमूर्त चित्राचा जन्म

पाठिंबा प्रतिसाद
अनुकूलता पूरकता
आपोआप सुसंगत
हार्मनी मेलडी
नेमके जुळत जाणे
एकलय एकभाव
विलय विलोप
निश्चिंत निर्भय

हालचालींचे संगीत
नजरांचे हरवणे
देणेघेणे ताबाहीन

दिन हो या रात
हम रहे साथ साथ

जुन्या काळातले
ताजे गाणे
आणि वर्तमानातले
मुरलेले तराणे

मिसळते आकार
मिसळते स्पर्श

एका कालातीत विभोर
अमूर्त चित्राचा जन्म
--- ००० ---

कंटिन्यू

मध्यरात्रीनंतर
मोबाईलवर
पाहिली वेळ

मग वाटले
तहान आहे
पाणी झाले

तरी जमेना
मग गालिब वाचला
अध्यात्म वगळून

मग आले लक्षात
जाग आणि झोप
यांत फरक कशाला

मन तेच असणार
झोपावे आता
स्वप्नात पुढे कंटिन्यू

--- ००० ---

May 8

डास

आता जागे राहावे
स्वेच्छेने सोडत
जगण्यावरचा हक्क

पांघरुण घेताना
कुठे समोर असतात
पाहिलेली सगळी दृश्ये

डासांकडे पाहायचे
विचार म्हणून
आपोआप जातात
--- ००० ---

नाटक

करायचे काहीच नाहीय
आणि
दरम्यानच्या काळात काहीच घडत नाही
या दोन जागतिक प्रख्यात
हिरे संवादांवर तोलून धरलेले
नाटकच काय आख्खे जग

असे घडेल तसे घडेल
म्हणत चरकात
पिळले जाणाऱ्यांना म्हणते
वाट बघा बघत राहा

अन्यायग्रस्ताला नाही चालत
परक्याचे प्रेमही

तो खवळतो

सगळेच बोलतात अर्थपूर्ण
खूप वेळ
ओळखी करून देतात घेतात
उपचार म्हणून
काहीही कसेही मागेपुढे
जणू इंटरेस्टच नसलेले

क्षणोक्षणी जगाबाहेर
निघून जाणारे एक नाटक
सर्व पात्रे समोर असताना
--- ००० ---
कोरोनानंतर --
( ही एक जगण्यातली ॲब्सर्डिटी व्यक्त करणारी पोस्ट आहे, हे कृपया लक्षात घ्यावे, ही एक विनम्र विनंती ! )

थियेटरमधे जाऊन चित्रपट पाहणे नगण्य झाल्याने खूप खर्चिक चित्रपट निर्मिती बंद होईल. चैनीची नवी नवी साधने, अलंकारांचे प्रकार, महागडे कपडे, हॉटेलिंग यांचे महत्त्व कमी कमी होत जाईल. पण, करमणूक लागेलच ना ! जाहिरातींची गरज खूप कमी झाली तर टीव्ही चॅनेल्स तरी कशी चालतील ? पण, समजा चालतील. लोक टीव्हीवर, मोबाईलवर ७० ते २०१८-१९ पर्यंतचे सिनेमे कायमच पाहात राहतील. इकडे अधिकाधिक समृद्ध, फॅशनेबल होणे बंद पडत चाललेले आणि २०३० लाही जुने सिनेमे पाहणे ! म्हणजे, एक प्रकारे, वास्तवाचा प्रवाह मंदच होईल. मनावर सारखे जुनेच हॅमर झाल्याने मन, तोच काळ वर्तमानकाळ म्हणून जगू लागेल ! गेली काही वर्षे कलावंत लोक त्यांची एक गहन समस्या सांगत होते की वास्तव एवढ्या वेगाने बदलतेय की ते कळायच्या आत ते बदललेले असते ! त्यामुळे, वास्तव समजून घेऊन कलाकृती निर्माण होणे अशक्यच होतेय ! आता तो प्रश्न येणार नाही. फारसे न बदलणारे वास्तव आणि ते समजून घ्यायला हवा तेवढा वेळ ! त्यामुळे, कलावंतांची समस्या नष्ट होईल -- ते एकापेक्षा एक भारी कलाकृती निर्माण करतील ! म्हणजेच, वास्तव ठप्प झाल्याने संस्कृती खूप सखोल आणि समृद्ध होत जाईल ! कोरोना ही अशा प्रकारे एक इष्टापत्तीच ठरेल !

पटतेय का ?
--- ००० ---

चांगली माणसे

याच्यापेक्षा ते अधिक
मौल्यवान वा महत्त्वाचे
मानावे ही शक्यता
फक्त मानवी मनात आहे
म्हणूनच त्याला नैसर्गिक न म्हणता

विकृत वा करप्ट म्हणावे लागते

एकामुळे दहांची आयुष्ये विस्कटणे
हेच तर असणार प्रत्येक मनाचे जगणे

कायद्याने काहींना शिक्षा होऊ शकते

बाकीचे उजळ माथ्याचे अर्थातच
नैसर्गिक आणि साधे ठरतात

ते म्हणतात चांगली माणसे
राजकारणात यायला हवीत
--- ००० ---

Champra Deshpande wrote on Raj Kulkarni's timeline.

खूप शुभेच्छा !

लिस्ट

गाणे वेगात रंगात येत चाललेले
आणि इकडे गुन्हेगारी कट
टोकावर येत चाललेला
जरी माहीत असले की
हीरो पार करेल सर्व अडथळे
तरी मस्त उष्ण सेन्सेशन

प्रत्यक्ष जगण्यात
ना गाणे ना गुन्हा

काय ग्रेट असतात ते लोक
कसले धोके पत्करतात

आता कधी शिकणार गायला नाचायला
पण एखादा जबरदस्त गुन्हा जमायला हवा

शेवटी हीरोने खतम केले तरी चालेल

लिस्ट तर आहे मनात

--- ००० ---

May 6

Champra Deshpande added a new photo.

Champra Deshpande's photo.

Champra Deshpande shared a memory.

1 Year Ago
हे नाटक असे ठिकठिकाणी होत राहील याची सुतराम कल्पना नव्हती --

माध्यम

मृत्यूबद्दल खूप झालेय बोलून आता बास
मी गेल्यावर ही नदी वाहातच राहील नको
या विश्वात माझा अहंकार क्षुद्र आहे ओके
अनिश्चितता आहे भीती आहे असू दे असू दे
युद्ध वाईट द्वेष वाईट बंधुत्व हवे भूल जाव
संस्कृती नको अन्न हवे संधी हवी समता हवी
झाले की आता कितीदा तेच तेच
आपली भाषाच नाही
तिचे अर्थही जुनेच झालेत सगळे
प्रेमातच जग जगते हे गुळगुळीत झालेय
माणुसकी हवी सहानुभूती आणि न्याय हवा
कुणीही नाही नाही म्हणत हो पण कितीदा ते
वर्ण जात धर्म लिंग यांमुळे कुणाचेही वर्चस्व नको
मान्य चला पुढे हे सगळे जुने झाले आता
आधुनिकताही जुनी झालीय तर बाकीचे काय
काय काय जुने झालेय हे सांगायचाही कंटाळा येतोय
आहे ना भरपूर पुन्हा तेच तेच कशाला लिहायचे

असो जाऊ द्या ते विषय बंद कितीही हौस असली तरी
लिहायची बोलायची डोळ्यांतून पाणी काढायची
आता एकच प्रयत्न चालू शकेल निर्विवाद

कोरोना कोव्हिड १९ तो आहे नवीन अजून काहीच
न समजलेला आणि जुना न झालेला फ्रेश ताजा

पण माध्यम तर तेच जुने कंटाळलेले भित्रट मनच
तर असणार नवे काय बोलणार
--- ००० ---

May 5

पूरक

अनेकांना हेवा वाटतो
कित्ती सुंदर दिसतात
आणि गाणे कित्ती सुंदर
आणि नाच कित्ती सुंदर
एकमेकांना अनुकूल
लयदार सगळे
सगळ्या हालचाली
कित्ती पूरक कित्ती
एकमेकांना सुंदर करणाऱ्या

अवघड काही नसते यात
दोघांनाही पटेल
असे एक गाणे
मुक्रर केले की झाले

मग त्याला ध्येय म्हणा
की स्वप्न की कर्तव्य
--- ००० ---

ओळखता येतच नाही ती कविता

कधी कधी मी शब्द वापरतो
रंगांप्रमाणे अनपेक्षित एकत्र
माहीत नसलेले
त्यांच्या एकत्र येण्याचे अर्थ

ते नसते एखादे दृश्य वा वस्तू
वा घटना वा अनुभव
वा माझ्या विचाराचा अर्क

ओळखता येतच नाही ती कविता
तिला असू द्यावे लागते दूरच

मला विश्वास असतो
मला दिसलेले आपोआप परस्पर
पाझरलेले असतेच तिच्यात

कारण माझ्यातूनच तर येते ती
जरी
माझ्या नियंत्रणाशिवाय
--- ००० ---

पुस्तकांची राने

ना बर्फाळ डोंगर
ना हिरव्यागार दऱ्याखोऱ्या
ना फुलांची मैदाने
ना मुसमुसती गाणी

तुला आवडतात पुस्तकांची राने
जिथे एकत्र फिरणे शक्यच नसते
तू वाचलेल्या पुस्तकांवर
तू माझी मते विचारतेस
मी ती वाचली नसली तरी
तुला हवीत म्हणून मी ती देतो

माझी मते तू खूप लक्षपूर्वक ऐकतेस
तुझे ऐकणे मी लक्षपूर्वक पाहात राहतो

इतकी सूक्ष्म तीव्रता
बर्फा झाडा फुला गाण्यांत
कशी मावणार
--- ००० ---

' रोखठोक ' मध्ये, दारूची दुकाने खुली करण्यावर चर्चा होणार हे जाहीर झाले तेव्हाच मी ती चर्चा ऐकायचे ठरवले. वेगवेगळे राजकीय पक्ष असले तरी राजकीय तोंडसुख घेण्याचा हा विषय नव्हता. आणि, पिण्याऱ्यांचीही मने दुखवू नयेत आणि मार खाणाऱ्या स्त्रियांचीही बाजू घ्यावी -- असा चलाख समतोल साधायचा हा विषय होता ! तसेच झाले ! एक अतिडावे तर म्हणाले की समग्रतेने पाहण्याचा हा विषय आहे ! अर्थात, सगळ्यांनाच हे पटण्यासारखे होते. लोकांनी दारू प्यावी पण आपापल्या पत्नींना मारहाण करू नये, हा खरा चर्चेचा सुवर्णमध्य असा शेवट झाला असता, पण ते त्यांना सुचले नाही.

May 4

दिसणारे वास्तव ही माया आहे, हे नकळत कळत असते -- ती माया नाकारण्याची मूलभूत प्रेरणा म्हणजे दारूसाठी होणारी गर्दी !

Champra Deshpande added a new photo.

सकाळ कशामुळे होते, ते माहीत असते --
ती ' पाहणे ' ही घडावे --

Nothing prevents happiness like the memory of happiness.
-- Andre Gide

'Therefore' is a word the poet must not know.
-- Andre Gide

सिगरेट

नदीच्या अंगाने ओढलेली सिगरेट
आकाशाच्या ऍशट्रेमध्ये
चहाची वाट पाहात थांबली

उपास करायचे ठरवून
गायब झालेले पोस्टमन
लाल भडक तारा घेऊन
उगवले अचानक
नर्तकीच्या घेरातून

ना पत्ते हवे होते
ना तंद्रीतले बदाम

जगाच्या उचापत्या
करण्यापेक्षा
खोक्यांमागच्या वळचणीत
तात्त्विक चिंतन करत बसावे

एवीतेवी कायमच
उद्याच्या सूर्यासाठीच जगायचेय
तर मग आज जगणे घडले काय
की मरणे

तरीही क्षणभर तरी
शांत राहता येणे
हे चांगलेच होईल
--- ००० ---

May 3

बळ

वारेमाप एकाच
कापडाचे तागे
घेताच
मांजरांचे आत्मविश्वास वाढले

ती सगळ्यांनाच
आडवी जाऊ लागली
दुधा ऐवजी मटण मागू लागली

मांजरांच्या मनांतले एकीचे प्रेम
आणि त्या प्रेमाची हिंसक नखे
पाहून पोलिसांनी
वरचे आदेश विचारले

सहानुभूती माणुसकी आणि आस्था

यांचे फतवे निघाले
सध्या नको
बळ वापरायला म्हणून
--- ००० ---

Champra Deshpande updated his status.

' योध्यांना ' हा शब्द एबीपी माझाने बिनचूक लिहिला, असे मला वाटते --
कोई शक ?

Champra Deshpande updated his status.

फुगा

पानपूरके म्हणून
माझे बरेच लेखन वाचले गेले
वाचताना वाचकांनी कांदेपोहे खाल्ले
त्यांचे डाग मी आभूषणे म्हणून मिरवले
एखाद्या शूर योध्यासारखे

जग बदलण्याचे जाऊ द्या
मनांचे फुगे फोडणे महत्वासाचे होते
ते घडले की नाही माहीत नाही

माझा फुगा फुटलेला असल्याने
मला ना खेद ना खंत
--- ००० ---

Champra Deshpande's photo.

May 2

पुण्यातला कालचा पाऊस --

अघटित

आज संध्याकाळी पुण्यात पाऊस पडून गेला. मी सांगतोय ही घटना त्याच्या आधी घडली. मी निष्कामपणे खुर्चीत बसून बाहेर पाहात होतो. तेव्हा अचानक ती अघटित घटना घडली. सैन्यदलातले वैमानिक विमानांच्या कसरती कशा करतात ते आपण अनेकदा पाहिलेले आहे. अगदी तसेच, आकाशात उडत असलेला एक पक्षी उलटापालटा तिरकावाकडा होत थेट आकाशातून खाली पडताना मला दिसला ! असला हा प्रकार मी आयुष्यात पहिल्यांदाच बघितला. अचंबित होत धक्काच बसला ! पक्ष्यालाही अचानक हार्ट ऍटॅक वगैरे येत असेल का काय ?

कोरोना जगभर मृत्यूचे दर्शन घडवतोच आहे ना ! त्यात हे !

--- ००० ---

उत्तम ! ' दर्द ' हा लेख मी ६८ साली मी २२ वर्षांचा असताना लिहिलेला आहे. विसरून गेलो होतो. छान आठवण दिल्याबद्दल, महेश, तुला आणि लेख बराच बरा असल्याबद्दल मला धन्यवाद !

वाचन, अर्थात, उत्तमच !

April 30

द फिल्म ऑफ डिस्काएट

एखाद्या कारणाने वा संकटामुळे वा समस्येमुळे वा घटनेमुळे आलेली अस्वस्थता वा अशांतता नव्हे -- मन म्हणजेच अस्वस्थता वा अशांतता असल्याचे दिसणे, समजणे, जाणवणे ! ग्रेट कवी फर्नांडो पेसोआ याच्या जगप्रसिद्ध अशा, ' द बुक ऑफ डिस्काएट ' या लेखनावर आधारित हा चित्रपट पाहिला ! मित्रवर्य रवीन्द्र लाखे यांनी इथे लिंक दिल्यामुळे हे जमून आले ! एका कवीने लिहिलेला चिंतनशील मजकूर आणि त्याच्या कविता, चित्रपट या माध्यमातून अभिव्यक्त करण्यासाठी दोन तासांचा असा चित्रपट घडवणे हेच एक प्रचंड आव्हान होते ! हे सुचणे आणि या सर्जक प्रक्रियेतून कुणी जाणे ही एक महान जागतिक महत्त्वाची घटना आहे. एकूण मजकूराला आणि कवितांना अनुरूप -- तो अर्थ व्यक्त होईल अशी एकामागोमाग येणारी दृश्ये हीच या चित्रपटाची पटकथा आहे. यात निवडलेला मजकूर आणि कवितांच्या ओळी अस्तित्व ढवळून काढणाऱ्या आहेत !

चित्रपट म्हणजे असे काही असले तरी चालेल किंबहुना तसेच हवे आहे, असे वाटणाऱ्यांनी हा चित्रपट जरूर बघावा.

--- ००० ---

April 2020

April 29

" एक कमरे में बंद हो " हे गाणे रोज आठवायच्या काळात नेमका गेला !

-- ऋषीला सादर प्रणाम !

चेनस्मोकर प्रमाणेच

चेनफोनर असा एक शब्द असावा का ?

April 28

आमराई

आमराई की आंबराई असा उगीचच प्रश्न पडला. अशा वेळी शक्य तो नको किरकोळ चूक म्हणून मी सरळ पाहूनच घेतो शब्दकोशात. तर, ' आमराई ' हेच बरोबर आहे.

प्रश्न पडायचे कारण असे घडले की झी युवा वरचा ' हसा चकट फू ' हा कार्यक्रम पाहात होतो. मुलगी पाहायला मुलगा आणि त्याचे आईवडील येतात. तेव्हा आंब्यांचा विषय निघतो. ' पाडाला पिकलाय आंबा ' हे त्या मुलाचे अत्यंत आवडते गाणे असते. लगेच त्या गाण्यावर नाच सुरू होतो. मुलाची आईही नाचू लागते. ती प्रचंड जाड असते. तिच्याकडे पाहात मुलीचे वडील म्हणतात, " आख्खी आमराई नाचतेय, असे वाटते ! "

--- ००० ---

काय घडले असेल वा घडतेय वा घडेल यांच्या अंदाजे विचारांवर बऱ्याचदा माणूस वागत असतो -- त्या वागण्याला सत्याचा पाया नसतो !

Champra Deshpande shared a post.

Madhav Manjrekar's photo.

Madhav Manjrekar's photo.

After an amazing first half of बुध्दीबळ आणि झब्बू written by Champra Deshpande on Sunday, we will be presenting the second half and climax of this नाटक on तौर्य प्रतिष्ठान कट्टा on Wednesday April 29th at 8:30pm Eastern, 5:30pm Pacific, and (Thursday April 30th) 6:00am India time.

It is our fortune that Champra sir has graciously agreed to participate in the discussions that get triggered after the reading. Not to be missed!

Participants in the reading:

Shrinivas Joshi

Snehal Bhagwat

Pankaj Shetye

Shilpa Shinde

Discussions will be led by

Shilpa Kulkarni

And prayers will be conducted by

Vijaya Bapat

From phone, please call:

+1 646 876 9923 or
+1 312 626 6799
Meeting ID: 334 529 483
Zoom web-link in the comment below.

Edit
Champra Deshpande wrote on Prabhakar Bhatlekar's timeline.

खूप शुभेच्छा !

Champra Deshpande shared a post.

प्रिय मित्रवर्य प्रभाकर भाटलेकर यांची अनपेक्षित अनोखी भेट --
खूप आनंद वाटला ! धन्यवाद मित्रा !

Champra Deshpande updated his status.

लॉकडाऊन तोडणाऱ्या एका उडाणटप्पू तडफदार हीरोला पोलिसांनी एक अजब शिक्षा दिली -- उभ्या उभ्या बारा केळी खाणे ! केळी मोठी !

April 27

अगदी छोटीशी कविता इथे दिली तरी सुमारे दहावीस वाचकच ती वाचतात. त्या मानाने ही आता एक बरीच दीर्घ म्हणावी अशी देतोय कविता. अर्थातच मनात ओशाळवाणेपणा आणि अपराधी भाव आहेत ! पण लिहिलीय ना आता तर असू द्या, असे म्हणून देतोय --

चित्रपट

१

लोखंडावरून निथळलेले
द्वेषाचे पाणी
अर्धवट झोपेत असल्याप्रमाणे
प्रेयसीच्या पदरात पडले
तेव्हा आकाशाने डोळा मारला

आता काय घडेल

याची कुणालाच खात्री नव्हती
तरीही अर्वाचीन अर्वाच्यता करत
दंगेखोरांचा जमाव
भरधाव गेला काळ तुडवत

याची सलग स्टोरी होणारच नव्हती
प्रेयसी सावध असे
वाव दिला की आपले स्वातंत्र्य जाते
आणि आपण शाळेतल्या मैदानावर
अंगाईगीत ऐकत
अर्पणच होतो
माघार पुसत म्हणून ती
सतत तुकडे करत राही
प्रत्येक विचाराचे

त्यामुळे दहाबारा चालू विचार
संसर्गापासून लांब राहात
तिच्या आठवणींच्या

भावना उधाणल्या म्हणून
भूतकाळाचे कौतुक करणारे
खूप असतात
तुरेबाज कोंबडे
पण त्यांच्या तुऱ्यांना
हवी असते चव
अस्ताव्यस्त संभोगांची
त्यात मार खाऊन ते
वैफल्यग्रस्त होतात
जणू अमुक अमुक
हे घडायलाच हवे होते

हे बर्फयुग आहे बाळांनो
इथे कुणी कुणाला नाही ओळखत
तुमचे अनुभव तुम्हाला लखलाभ
त्यांच्या लेणी नका खोदू
सर्वांच्या बोधासाठी

उद्या तुमचे आले समजा
खराब दिवस
तर तुम्ही काय कारकुनांवर
जाल चाल करून
जे बिचारे धर्मग्रंथांना स्मरून
ठरवतात त्यांच्या घड्याळांचे डिझाईन

तुम्ही तुमच्या दुखणाऱ्या पोटातून
पडू शकाल का बाहेर
हा आधी प्रश्न तर पडू द्या ना

२

कित्येकांना प्रश्न विचारत
तुमचे पाय झिजवत आलात तुम्ही
आपण समदुःखी म्हणून
पार्टी केली
आणि त्यानंतर तीव्र इच्छांमुळे
आपण गाठले
गेट वे ऑफ इंडिया
तिथेच तर भेटले आपल्याला
गुप्त मार्गांचे गाईडस
ज्यांच्या कानांना होते
जुने त्वचारोग

समुद्रावरचे खारे विचार
आपण खाल्ले
शेंगदाण्यांबरोबर
आपल्या प्रिय बांधवांनी
प्रेमाने विकलेल्या
हिंसक मसाल्यासह

३

कोणतीच मासलेवाईक उत्तरे
पटेनाशी झाली तेव्हा
आपण वारीला जायचे ठरवले

अनैतिक हेतूंनी

हातात झांजा आणि मनात गांजा
असे आपण बचावत आलो
वर्षानुवर्षे

४

आपल्या ठिकठिकाणी बदल्या झाल्या
तेव्हा प्रत्येक ठिकाणच्या ग्रामदेवता
आपण आधी अत्यादरपूर्वक पूजून
मगच अंथरल्या सामोपचाराच्या चादरी
एखाददुसरा गुन्हा माफ व्हावा
म्हणून आपण धूर्त राहिलो
बाजारपट्ट्यात ओळखी दाखवत
फिरताना गळ्यात रुद्राक्ष पेहनून
धारण करत सर्व फावला वेळ लैंगिकतेत
मस्तकाच्या मध्यभागी

५

होऊही शकतात चुका
घडूही शकते समोरच्या वास्तवाचे
अनपेक्षित विच्छेदन

हे मनात समजून राहातच
आपण दोन गटांच्या मारामाऱ्यांत
तटस्थ राहिलो जरी दोघेही मित्रत्वाने
आपल्याला त्यांचेच मानत राहिले
उघड डावपेचाने

आपणही आपली झाकणे उघडली नाहीत

६

इतका वेळ
मी आपले भास रंगवत बसलोय

कारण माझ्या दुःखावर
उपाय ठरेल
असा एक गट मला जमवायचाय
प्रत्येक दुःखाची एकेक
चळवळ व्हायला हवी
याला सध्या माझा पाठिंबा आहे

एवढ्यावर किंवा एवढ्याने
तुमचे समाधान व्हावे

७

निसर्गावर तसा माझा विश्वास नाही
मला सोयिस्कर नसलेले
अनेक प्रकारचे बदल
इथे घडत राहतात
मी नाइलाजाने आजारी पडत
नुसता अन्यायग्रस्त
पाहात राहतो
पक्ष्यांच्या पंखांतून ठिबकणारे
माझेच जुने रक्त

रस्ते आणि आदर्श
हेही निसर्गाचेच भाग धरावे झाले

८

कित्येकदा
कशाचीच खात्री नसल्याने
मला काहीच रेटायचे नसते
इतरांच्या हद्दी
सोलून काढत

मला कुणी ढोंगी कुणी धूर्त
कुणी वेडपट तर कुणी हलकट
म्हणतात

आपापल्या अन्यायांविरोधात
लढायची परंपरा
फाडून काढत राहते
रूटीन स्वास्थ्य
एक रूटीन असल्याप्रमाणे

जितके झेंडे तितके न्याय
एकमेकांना घाबरणारे

९

अस्तनीतले निखारे
म्हणून मी बाळगले माहीत असून
हीरो लोकांचे कपडे
आणि विनोदवीरांचे
कडवट आरसे
जरी ते कधीही
परत मागत नसत
माझ्या स्वप्नांचे अवशेष

मला खूप अनुभवसमृद्ध
वाटण्यासाठी हे आवश्यक होते
अन्यथा मी एखाद्या धमकीचा
शिकार होणार होतो
वाट लावणाऱ्या पुरती
माझ्या आयुष्याची

१०

एका बैठकीत पूर्ण चित्रपट
दाखवण्याची वचने देणारे
ग्लॅमरस पैलवान
मला अनेकदा भेटले
पण ताकास तूर न लागू देता
मी चालू ठेवली
माझी गुप्त लफडी

मला मुक्त होण्यात
इंटरेस्टच नव्हते
त्या ऐवजी मी पसंत
करत आलो
राजकीय चर्चा
आणि समाजकार्यातून मिळणारे
पिंजलेले समाधान
माझे सर्व लक्ष
या दिसणाऱ्या जगावरच
केंद्रित करायचे
हे माझे ठरलेले होते
मला दुचाकीचा अपघात झाल्यापासून

११

खरे तर
मला चित्रकार व्हायचे होते
हवेचे पदर उलगडत
आतली रहस्ये पाहणारा
कुणाच्याही आवाक्यात
येणार नाहीत अशी
विचारांच्या गुंताड्यामुळे

ते न घडण्याचे कारण एकच होते
फारच मनाला लावून घेतलेला
भावनांच्या खंजिरांचा प्रेमभंग

१२

मला पडणारे प्रश्न नियतीचे
वा सुखदुःखाचे वा सूडमत्सराचे
असे नसत
माझ्या रस्त्यावरच्या चाकोरीतून
किती गेल्या असाव्यात बैलगाड्या
असे विचार मला महत्त्वाचे वाटत

१३

दात दुखू लागल्यावर
मी प्रथम टेबलावरची माशी उडवली
आणि वाट पाहात बसलो
भावविभोर संध्याकाळ होण्याची
कारण माझ्या या खोलीत
पूर्वी कुणितरी राहून गेल्याच्या
आठवणी आहेत
हे मला नेहमीच जाणवते

१४

खरे तर मी माणूसघाणा नाहीय
फक्त माझ्या मनातून कधी कधी
कीटकनाशकांचे वास येतात एवढेच
मी शेतकरी नसलो तरी एखादा
तमासगीर मला हे सांगतो
तेव्हा हे अटळ असल्याचे समजून
मी ओशाळे हसतो

१५

समजा मी आजारी आहे
खूप वेदना आहेत
औषधे असली तरी
कंट्रोल नाहीय
अशा वेळी माझ्या तोंडून
मी लहानपणी पाठ केलेली
रामरक्षा येईल की बंधुभावाचे महत्त्व
हे नाही सांगता येणार मला

माझ्यासाठी बांधलेले झुले अनेक आहेत
पण निवड करण्याबाबत
मला आत्मविश्वास नसतो

१६

मला माझे आत्मचरित्र थोडेच सांगायचेय
अनेकदा तर मी कोणत्या ना कोणत्या
हीरोशी एकरूप झालेला असतो
अमुक काळात लोकांचा दबलेला राग
अमुक नट तीव्रतेने व्यक्त करे
त्याने लोक सुखावत
असे जनरल बोलणे
आणि काळाचा आवाका
माझ्या खिशात बसवणे
असे केले की
आता यायला लागले ड्रायव्हिंग
असा मला साउंड इफेक्ट जाणवतो

१७

आपल्याला वाटते आपण रिकामे आहोत
पण आपले कान तरी हलत असतात
पाय तरी चालत असल्याच्या भ्रमात असतात
किंवा आपल्या जिभेने ठेका तरी धरलेला असतो
छुपनेवाले सामने आ
या गाण्याचा
म्हणूनच अमुक एकाचेच असे नव्हे
प्रत्येकाचेच आयुष्य कष्टातच जाते
हे मान्यच करावे लागते

१८

आपल्याला वाटते
जगणे म्हणजे
एकेकाची एकेक सलग गोष्ट
हा चित्रपटांचा पगडा असतो
अमुक एका स्टाईलचे असे
हेयर कटिंग आपण कधीच केले नाही
असे असले तरी त्या तशाचीही
होते गोष्ट दखलपात्र नसली तरी

आणि ग्रेट लोकांचे काय बोलणार

ते तर जन्मालाच आलेले
प्रदीर्घ गोष्टींचे
दूरच्या विहिरीतल्या एका बेडकात
प्राण असणारे
तो असेपर्यंत भीतीच नसलेले

माझीही गोष्ट
माझ्या जन्मापासूनच सुरू होते
असे सामान्यतः म्हणता येईल

सारखे आवाज कसले येतायत
म्हणून बघायला जावे
आणि दिसावे की हे तर आपलेच
स्नेहीजन बांधव आणि हितचिंतक
माझाच जणू अमरपट्टा असल्यासारखा
हा एक वैफल्यग्रस्त अहंकार

१९

अगदीच नाही असे नाही
कधीतरी वाटतेच की बाबा कळावे
कशासाठी हा डोलारा
एक माणूस ग्रेट आणि मी लहान
असण्याचा उपयोगच काय

त्याला खरेच ग्रेट
म्हणजे माझ्या लहानपणापेक्षा
खास वेगळे असे काय वाटत असेल
की बाहेरच असतो फक्त फरक

त्याला सगळीकडे आदर मिळण्याची
सवय लागते हाच असावा तो फरक

२०

भेदाभेद अमंगळ
इथे पोचणे झाले

की प्रश्नच संपतील मानवजातीचे
जीवितकार्यच संपेल

सगळी प्रगती निरर्थक होईल
करायचे काय नुसते जिवंत राहून
कंटाळवाणे मग
ही एक समस्या राहीलच म्हणा

२१

स्वच्छता पाळा आणि कल्चर्ड वागा
की झाले मग तुलनाच संपेल

२२

लहानपणी मला
ब्लेडचे तुकडे जमवायची सवय होती
पेन्सिलींना टोक करण्यासाठी

एकदा बोटाला जखम झाली
तेव्हा मनाला शहाणपण आले

२३

माझा एक मित्र
काही कट्टर मते बाळगणारा होता
मला ना काही पटवायचेय ना काही
पटवून घ्यायचेय हे पाहून तो वैतागे
मला षंढ म्हणे शिवाय नपुंसक म्हणे
मग भाकड आणि वातड म्हणे

तो ज्या व्यवस्थेवर चिडे
तिनेच मला निराश
केले होते आणि दिङ्मूढ
हा माझा दोष कसा

२४

रस्त्याला मॉर्फिनचे इंजेक्षन
देणारे डॉक्टर शेवटी
सरकारी किताबाचे मानकरी ठरले
पण आधी सैनिकांना दिले किताब
कारण त्यांना गोळी घुसण्याचा धोका होता
त्यांच्या वंशावळीत
डॉक्टरांनी फक्त
ट्रॅफिक थांबवला होता

हे सगळे विचार दुसरे कुणी करतात
राष्ट्रपतींना वेळ नसतो

२५

संस्कृती म्हणजे
भूतकाळमुक्त होण्याची प्रक्रिया
इथे तर उलट
किल्ल्यांचे पुनरुद्धार चाललेत
भेदाभेद आणि विषमता
यांची आवडच जोपासली जातेय

२६

जोवर माणसे
कृतज्ञ आणि विभूतिपूजक राहतील
तोवर ती
हिंसक आणि आक्रमकही राहतील

अत्यंत प्रामाणिकपणे निष्ठेने आणि प्राणपणाने
लोक द्वेष जोपासत राहतील

त्यांची सर्व प्रमाणपत्रे
साधने बनतील
त्यांच्या बेधुंद त्यागाची

२७

श्वासावर लक्ष केंद्रित करणे
म्हणजे मृत्यूची आठवण ठेवणे
बुद्ध म्हणाला सगळे
बदलत असते टिकाऊ काहीच नाही
मग मी काय टिकवतो
काय घट्ट धरून ठेवतो
हे पाहता दिसते की मी तर
श्वासाहून अधिक दुःखावर टिकून आहे
हा भ्रम घालवण्यासाठीच तर बुद्ध म्हणाला
दुःखमुक्ती शक्य आहे

दुःख टिकवण्यासाठी द्वेष लागतो
की स्वरक्षणासाठी
दुःखच द्वेषाला जन्म देते कोण जाणे
पण द्वेषाने अधिकाधिक दुःखी
होत जाणे घडते खरे
स्वाभिमानाने जगायचे तर द्वेष हवाच
बुद्धाचे गुणगान करण्यासाठी
आधी आपण टिकायला तर हवे

बुद्धविरोधी जगत
बुद्धाची अस्मिता बाळगण्याने
दुःख पक्के होत जाते
आणि तरीही
बुद्धच सत्य
असे म्हणत टिकून राहता येते

२८

समजून घेण्यासारखे इथे काही नाहीय
माणसे कमीजास्त यशस्वी होतात इतकेच
आणि तुलनेसाठी सगळेच महत्त्वाचे असतात

मानवाच्या विकासासाठी
यश निर्माण करण्यातून
यशस्वी म्हणून पक्के जगता येते

मनात काहीही पक्के झाले
की त्याचे दुःखात रूपांतर होते

शेवटी दुःखच होते रूपक
आकाशात उडणाऱ्या
पंखवाल्या तगड्या घोड्यांचे
पांढऱ्या शुभ्र

न्याय म्हणजे सर्वांना
समतोल राखण्याच्या प्रयत्नात
वेडे होण्यापासून वाचवत राहणे

२९

पहाट म्हणजे अंधार फुटून
त्यातून बाहेर पडणारे
जीवजंतूंचे मोहोळ
काही ना काही शोधत फिरणारे
विचारांचे अजस्त्र हत्यार घेऊन
उजेडाचे तुकडे करत जाणारे

पृथ्वीवरची सर्व जीवसृष्टी
देते साक्ष
की
संगीत आणि गोंगाट यांत फरक असतो

३०

ही ना एका माणसाची
ना एका अनुभवाची गोष्ट आहे
पण हिला सलगता आहे
ती विदीर्णतेची स्फोटांची
विध्वंसाची
आणि पाणवठ्यावर गेलेल्या स्त्रियांना
सर्पदंश होण्याची

स्त्रिया आकांतही करतात

आणि सुखेही फुलवतात
आणि या द्वंद्वामुळेच
त्यांच्या स्तनांतून दूध पाझरणे
बंद झालेले असते

संस्कृती म्हणजे मुख्यतः निर्लज्ज असणे
म्हणजेच स्वातंत्र्यासाठी धडपडणे
धड राहात आणि शौर्य गाजवत

संगीताला नादब्रम्ह म्हणा की बेधुंद विश्व
अधाशासारखी पुस्तके वाचणारे लोकच
हजारो वर्षांचे अनुभव भांडार टिकवून ठेवतात
चुकूनही कोणत्याही
क्षणाबाहेर पडणे टाळायचेच असते

३१

आपली मते सर्वांना पटली
की जग समस्याहीन होईल
असे वाटणाऱ्यांचे मुळात हे पक्के असते
की मते बाळगणे कधीच
कदापि बंद पडता कामा नये

आपापले बीपी संभाळत
ते सत्याचा पुकारा करत राहतात
यामुळेच तर सत्य समता स्वातंत्र्य
यांची दबावाने गळचेपी होत राहते

न्यायासाठी वैचारिक
संघर्षाला पर्यायच नाही
हे सर्वमान्यच असल्याने
मानसिक कचाट्यातून सुटणे अशक्य बनते

पण याला मानवी जगण्यातली
ॲब्सर्डिटी म्हटले तर सगळेच भडकतात

३२

मी कान पाडून जगतो
मी कुणाला त्रास देत नाही
माझे खिसे तपासा
माझ्या पिशव्या तपासा
मी निहत्ता आहे
मी एकटा आहे
मी काम करेन
मी कमीच कमवेन
मी तुमचे काहीच घेणार नाही
माझे असेल ते सगळे
काढून घ्या हवे तर
आणि आता मला
नुसते जगू द्या

यावरसुद्धा हसून जगणे तरी कशाला मागतोयस
असे विचारणारे असणारच

३३

अन्यायनिवारण करा
नवे अन्याय निर्माण करा
क्रांती ही सतत चालणारी प्रक्रिया असते
कुणीही वगळला जाता कामा नये
सर्वांना बोलू द्या

३४

तुम्ही त्या वेळी तसे केलेत
मग तुम्ही त्यानंतर काय केलेत
तुम्ही असे वागलात
तुम्ही तेच तर केलेत
तुमचा इतिहास हेच सांगतो
तुमचा तर किती भयानक आहे
तुम्ही फक्त सत्तेचाच विचार केलात
अहो तुम्ही तर
सत्तेसाठी खून केलेत

तुम्ही नालायक आहात
तुम्ही बेगडी आहात
तुम्ही फूटपाडे
तुम्ही हावरट
तुम्ही पांढरे
तुम्ही नारिंगी
तुम्हाला जॉनी लिव्हर आवडतो
तुम्हाला तर असरानी
तुम्ही अमरीश पुरी आहात
तुम्ही प्राण आहात
प्राण हवाच शरीरात
अहो पुरी खाल्ल्याशिवाय
कसा टिकणार प्राण
तुमचे बापजादे परदेशी
तुम्ही तर
व्यभिचारातून जन्मलाय
जीभ हासडून काढू
आम्ही गुंडगिरीला घाबरत नाही
तुम्ही गुंड
तुम्ही गुंड
तुम्ही गुंड
तुम्ही गुंड

३५

बरे आहात ना
होय तर आणि तुम्ही
मीही बरा आहे
कोवळे ऊन छान वाटते सकाळी
डी जीवनसत्त्वही असते त्यात
मुलाचे लग्न झाले का
अरे काय हे त्याला दोन मुले आहेत
आणि तुमची मुलगी
ती परदेशात असते
पोटासाठी जावेच लागते लांब
तर काय काळाचा महिमा
छान वाटले तुम्हाला भेटून

मलाही छान वाटले
चला भेटू पुन्हा
होय अवश्य
छान आहे तुमचा टीशर्ट
मुलाने परदेशातून आणलाय
कमालाय हा तुमचा स्वेटर
माझ्या अमेरिकेतल्या मुलीने दिलाय
वा वा आता मात्र चलू या
होय होय भेटू पुन्हा

३६

शेवट म्हणजे तरी काय
कात्रीची खात्री देत
वडाची साल पिंपळाला लावणे
किंवा पिंपळावरचा मुंजा घरात आणणे
किंवा पुतळ्याला हार घालून
बाकीच्या भोसडीच्यांना धमक्या देणे

शेवट म्हणजे शांतिपाठ
किंवा प्रायोपवेशन किंवा संथारा
पण खरेखुरे नको
सिंबॉलिक हवे सगळे
आपण कष्टपूर्वक
स्वातंत्र्याच्या सिंबॉलाचे
विनम्र सिंबॉल बनावे

मी सारखा एकच तोच तसाच कुठे असतो
माझी पावले उलटी दिसल्याने
काहीजण मला भूत म्हणतात
मी हसून त्यांना म्हणतो
सोडा आता अंधश्रद्धा
जगण्याच्या खऱ्या मैदानात या
पळू नका
बुद्धीचा विकास करा
ती सर्व काही मिळवून देईल
मग संघर्ष करा

आठवा रूप आठवा प्रताप
मनाने सतत स्थिर होत राहा
तेच फेटे त्याच तलवारी घेऊन
लढे देत राहा कसले ना कसले
नामोहरम करा त्यांना
जे कुर्निसात नाही करणार

उधळपट्टी म्हणा की संसार
ब्रम्हचर्य टिकायला हवे
गाढवाजवळ गेले नाही की झाले

तुमचा गनिमी कावा
त्यांचे एखादे चक्र
कुणाकुणाचे आपापले रंग
एकोप्याने राहा
हा देश सर्वांचा आहे

बाकी सर्व ठीक आहे
आपल्यालाच नष्ट व्हायची वेळ येईल
असे प्रश्न विचारायचेच नाहीत

सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामया :
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित दुःखमाप्नुयात
दुसरे काय आणि शिवाय फार तर ओम शांति !
--- ००० ---

परवा एक अभिनेत्री सांगत होती की शूटिंग सुरू झाले तरी यापुढे निदान काही काळ तरी प्रेमाची समीपदृश्ये कोरोनामुळे वर्ज्यच होतील !

April 26

आठवणी

ही तर नुसती आवाजाच्या
अभावाची शांतता

ठरणारी आठवणीत राहणारी
एक लंबीचौडी घटना

हळूहळू उमलता
पहाटेचा उजेड
नीट पाहिला
तर कळतोच त्याचा संदेश
की ही काही घटना नाही

आपल्याच आयुष्यात
आलेली एक दीर्घकालीन झुळुक
अचानक निघून जाते

तिचे असणेही नसते घटना
आणि जाणेही

तिचे पुनरागमनही होऊ शकते
घटना नसलेले

आता आठवणींना
थाराच नाही
--- ooo ---

April 25

Champra Deshpande wrote on संभाजी सावंत's timeline.

खूप शुभेच्छा !

Champra Deshpande wrote on Pandurang Dalal's timeline.

खूप शुभेच्छा !

Champra Deshpande wrote on Purushottam Berde's timeline.

खूप शुभेच्छा !

Champra Deshpande wrote on Harishchandra Thorat's timeline.

खूप शुभेच्छा, सर !

प्रेमबीम

प्रेमबीम होते
पण वेळा जुळत नव्हत्या
प्रेमबीम होते
पण तेवढ्यात कोरोना आला
प्रेमबीम होते
पण बोलायचे विषयच संपले
प्रेमबीम होते
पण फार सेंटीबिंटी नाही
अर्जन्सीच कमीजास्त असावी
यात पैसे थोडेच कमावले जातात
बेकारीच्या कुऱ्हाडी आहेतच
कधीही तोडतील अशा

प्रेमबीम होते
पण इतर व्यस्तता फार होती
वाट पाहण्यात
वेळ वाया जाई अपमान वाटत
मधेच कधी कंटाळाही येई

प्रेमबीम होते
पण नसले तरी चालणार होते
पण असायलाच हवे होते
--- ००० ---

Champra Deshpande shared a post.

Madhav Manjrekar's photo.

Madhav Manjrekar's photo.

Please join us for नाट्यवाचन on the next तौर्य प्रतिष्ठान कट्टा (Sunday April 26th, 11:30am eastern, 9:00pm India time).

बुध्दिबळ आणि झब्बू

लेखक: चं.प्र. देशपांडे

Presenters:

Shrinivas Joshi

Snehal Bhagwat

Pankaj Shetye

Shilpa Shinde

Discussions:

Shilpa Kulkarni

From phone, please call:

+1 646 876 9923 or

+1 312 626 6799

Meeting ID: 684 167 221

For calling from India, and for video conferencing, Zoom call link in the comment below.

Edit

Champra Deshpande updated his status.

' रंगवाचा ' च्या मार्च २०२० या अंकात आलेला माझा लेख इथे देत आहे. पूर्ण अंकच वाचनीय आणि अभ्यसनीय आहे. मिळवून जरूर वाचा. लेख --

**अभिव्यक्तिस्वातंत्र्य**

-- चं. प्र. देशपांडे.

महाराष्ट्रीय कलोपासकचे पदाधिकारी, स्वयंसेवक, मंचावरील मान्यवर, स्पर्धेत सहभागी सर्व महाविद्यालये आणि विद्यार्थी, परीक्षक आणि प्रेक्षक – प्रथमतः मी स्पर्धेतल्या सर्व विजेत्यांचे अभिनंदन करतो आणि ज्यांना यश मिळालेले नाही त्यांना एकच सांगू इच्छितो की मीही यश आणि अपयश या दोन्हींतून गेलेलो आहे – आपले काम चालू ठेवणे हीच अपयशाला श्रद्धांजली समजावी. सुदैवाने या अंतिम स्पर्धेला तुम्हाला नाट्यक्षेत्रात हयात घालवलेले उत्तम, अभ्यासू परीक्षक लाभलेले होते. त्यांचा निर्णय दिलखुलासपणे स्वीकारा आणि शक्य झाल्यास त्यांच्याशी चर्चा करून आपली नाट्यसमज वाढवून घ्यायचा प्रयत्न करा. मला आणखी एक गोष्ट सुरुवातीलाच सांगायची आहे – ती म्हणजे या जल्लोशी आणि सळसळत्या उत्सवात तुम्ही मला दोन शब्द बोलण्याची संधी देत आहात त्याबद्दल मी खूपच कृतज्ञ आहे. यासाठी मी तुम्हा सर्वांचा आभारी आहे. बोलणार आहे याचा अर्थ खूप लंबेचौडे भाषण करणार आहे असे नाही. पण, लेखकांना आणि कलावंतांना नेहमीच महत्त्वाच्या ठरणाऱ्या एका प्रश्नाबद्दल मी बोलणार आहे, थोडक्यात. तो प्रश्न म्हणजे

अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा आहे. याचा अर्थ मी फक्त राजकीय वातावरणाबद्दल बोलणार आहे असा मुळीच नाही. साहित्य संमेलनांत एक अशी पद्धत रुळते आहे की राजकारणाचे क्षेत्र साहित्याला वर्ज्य असूच नाही शकत, असे म्हणायचे आणि फक्त राजकारणावर बोलायचे ! साहित्याबाबत एक वाक्यही बोलायचे नाही ! मी अर्थातच तसे काही करणार नाही. अभिव्यक्तिस्वातंत्र्य हा नेहमीच माझ्या चिंतनाचा विषय राहात आलेला असल्याने, माझ्या मराठी नाटकाच्या क्षेत्रातल्या नव्याने उभरत्या मित्र-मैत्रिणींना विचाराला काही खाद्य देण्याचा माझा विचार आहे.

कलेत राजकारण वर्ज्य नसते असे म्हणणाऱ्यांचे एक वैशिष्ट्य विचारात घ्यायलाच हवे असे असते. राजकारण वर्ज्य नाही असे म्हणणारे हे लोक कलेतून बाकी सगळे मानवी जगणेच हद्दपार करू इच्छितात. प्रेम, एकाकीपणा, निराशा, उत्तर-आधुनिक जाणिवा हे सगळे कलेत आले तर त्याला ते भरल्या पोटीची करमणूक वा कलावंताची असंवेदनशीलता म्हणतात. या प्रकारच्या कलावंतांची आणि विचारवंतांची संख्या जेव्हा समाजात वाढते तेव्हा कलावंताच्या सर्जकतेवर तो एक दबाव निर्माण होतो. अशा वेळी आपले अभिव्यक्तिस्वातंत्र्य अबाधित राखणे हे कलावंताला जमले नाही तर तो स्वतःची सर्जकता गमावून बसण्याचा धोका असतो. यात आणखीही एक प्रश्न लक्षात घेण्यासारखा असतो. उदाहरणार्थ, गो. पु. देशपांडे यांचे ' उध्वस्त धर्मशाळा ' हे नाटक घ्या. त्यातले श्रीधर कुलकर्णी हे पात्र एका विशिष्ट विचारसरणीचे आहे म्हणून त्याला चौकशीच्या दिव्यातून जावे लागते, असे आहे. नाटक अर्थातच त्याची बाजू घेऊन लिहिलेले आहे. त्याचे उदात्तीकरणही आहे. ' बघा, किती हा अन्याय ! ' असा टोन आहे. पण, त्याच विचारसरणीची सत्ता असलेल्या देशांत विरोधकांना हवेतच मिसळून टाकले जाते, त्याचे काय – हा प्रश्न इथे येत नाही. अशा गोष्टींची भलावण करणारे लोक आणि कोणत्याही भूमिकेचे फुगे फुगवणारे लोक हे मानवी जगणे समजून घेण्याची सर्जकता नाकारत असतात. ते स्वतः तर ती नाकारतातच पण इतरांनीही ती नाकारली पाहिजे असा दबाव ते विविध प्रकारे निर्माण करू पाहतात. तो झुगारून कलावंताला आपल्या स्वतःच्या चिंतनशीलतेने आणि सर्जकतेने जगता येणे आणि अभिव्यक्त होता येणे हे अशा वातावरणात महत्त्वाचे ठरते. असो. यावर फार वेळ न घालवता पुढे जाऊ.

या निमित्ताने तुमच्याशी थोडे बोलायचे म्हणून २७ तारखेला सकाळी मी तीन एकांकिका पाहिल्या. त्यांतल्या एकीचे उदाहरण घेतो आहे. ती म्हणजे, ' वन टाईम सेलेब्रेशन '. मी शाळाकॉलेजात असताना एक लेख वाचला होता, त्यात असे होते की अमेरिकेत एका तरुण अविवाहित मुलीची आई तिला गर्भनिरोधक गोळी घ्यायची आठवण करते ! आम्ही अचंबित होऊन एकमेकांत याची चर्चा करायचो. किती वेगळे वातावरण ! इकडे हे कदापि घडणे शक्य नाही, असे आम्ही समजायचो. मी पाहिलेल्या तुमच्या त्या एकांकिकेत असे धक्क्यावर धक्के आहेत. आदल्या वर्षी मुलाला त्याच्या आईने वाढदिवसाला संभोगविषयक पुस्तक भेट दिलेले आहे आणि या वर्षी ती त्याला निरोधांचे पाकीटच भेट देते आहे ! त्याबाबत पति-पत्नींतले संवाद आहेत ! शेवटी कहर म्हणजे तो मुलगा समसंभोगी असल्याचे कबूल करतो. आणि ही विकृती वगैरे न समजता किंवा दुःखाचा खूप गोंधळ न घालता आईवडील ते स्वीकारतात ! काही वर्षांपूर्वी ही एकांकिका खूपच सनसनाटी आणि वादग्रस्त ठरली असती. आज ती निर्भयपणे सादर होते आहे. याचा अर्थच ती एक तर सेन्सॉरही झालेली आहे आणि प्रेक्षकही बराचसा समजुतदार झालेला आहे. असे पाहिले तर हे अभिव्यक्तिस्वातंत्र्य लेखकाने घेतलेलेही आहे आणि शासनाने व समाजाने दिलेलेही आहे, असे म्हणता येते. असे जुळून आले नाही तर समस्या निर्माण होतात.

काही प्रश्न समाजाकडून तयार होतात. अशा नाटकांची उदाहरणे म्हणजे, ' यदाकदाचित ', ' सखाराम बाइंडर ', ' घाशीराम कोतवाल ', ' मी नथुराम गोडसे बोलतोय ' आणि ' गिधाडे '. कधी अश्लीलतेचे आरोप कधी इतिहासाशी प्रतारणा केल्याचे आरोप तर कधी पूज्य विभूतींचे वा देवदेवतांचे विडंबन केल्याचे आरोप. ' गिधाडे ' मध्ये एका स्त्रीच्या पोटावर लाथ मारल्याने होणाऱ्या तिच्या गर्भपाताचे दृश्य होते. ते लोकांना खूपच बीभत्स वाटले. दिग्दर्शक दुबेजींनी यावर मार्ग काढला.

त्या स्त्रीच्या साडीवर दिसणारे रक्ताचे डाग त्यांनी निळे दाखवले आणि हा निळा रंग लाल समजावा, अशी घोषणा केली. या प्रकारे, कधी मार्ग काढून वा कधी संघर्ष करून पुढे जावे लागते. अलिकडेच प्रेमानंद गज्वी यांचे ' छावणी ' हे नाटक आपल्या शासकीय सेन्सॉरने बराच काळ अडवून ठेवले होते. लेखकाला त्यासाठी संघर्ष करावा लागला. इथे माझ्याही एका नाटकाचे उदाहरण देतो. माझे, ' जागचं हलायचं नाही ' या नावाचे एक दोन अंकी नाटक होते. त्याला मान्यता प्रमाणपत्र मिळालेलेही होते. पण, नंतर त्यातला काही भाग पुनर्लिखित करून त्यात काही बदल केल्यामुळे ते पुन्हा शासनाकडे मी पाठवले. दरम्यानच्या काळात डान्सबार बंदी झालेली होती. गंमत बघा – ते नाटक सत्तरच्या दशकातल्या हिंदी सिनेमाची एक बनावट स्टोरी हाताळणारे आहे. त्यामुळे त्यात कॅबरे डान्सर स्त्रीचे एक पात्र आहे ! तर मला पत्र आले की ते सगळे आणि तिची वाक्ये वगळावी लागतील कारण डान्सबार बंदी आहे ! मी त्यांना उत्तर पाठवले की अहो, या पात्रासह आणि तिच्या संवादांसह तुम्ही अमुक तारखेला आधीच प्रमाणपत्र दिलेले आहे, ही त्याची प्रत ! आता फक्त काही बदल केल्यामुळे पुन्हा पाठवलेय. तरीही बऱ्याच दिवसांनी, अरुण नलावडे तिथे अध्यक्ष झाल्यावर मला ते प्रमाणपत्र मिळाले ! माझ्याच ' ढोलताशे ' या नाटकात एक वाक्य क्रिकेट आणि पाकिस्तान याबाबत होते, ते वगळायला सांगितले होते. कारण देशाच्या परराष्ट्र धोरणाशी विसंगत असे काही नाटकात असू नये, असे एक कलम असते. ही सर्व लेखकाच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्यावरची एक प्रकारची आक्रमणेच असतात. म्हणूनच, हे सेन्सॉर बोर्डच रद्द करायला हवे अशी मागणी अमोल पालेकरांनी कोर्टाकडे केलेली आहे. त्याबाबतचा निकाल अजून आलेला नाही.

इथे एक लक्षात घ्यायला हवे की जगातल्या अनेक लेखकांच्या बाबतीत, म्हणजे उदाहरणार्थ, तस्लिमा नासरीन, सलमान रश्दी, गाओ झिंगझिआन हे अमुक देशात त्यांच्या लेखनाला धोका आहे म्हणून कुठेतरी दुसऱ्या देशात आश्रयाला जाण्याच्या घटना आपण वाचलेल्या असतात. एक तर त्यांचे साहित्य अनुवादित होऊन जगात पोचलेले असते किंवा मिळतो समजा त्यांना दुसऱ्या देशात आश्रय – तितके तीव्र, तसे आहेत का आपले प्रश्न आणि तसे आश्रयबिश्रय घेणे ही आपल्या बसकी बात आहे का ? आणि आपल्याला खतमच करावेसे वाटावे अशा प्रकारचा काही आशय आपण मांडतोय का ? तसे नसेल तर, इथले कायदे समजून घेऊन लेखन करता येईल असे मला वाटते. कोणत्याच देशात वा मानवी समूहात शंभर टक्के अभिव्यक्तिस्वातंत्र्य मिळणे अवघड आहे, हे आपणही समजून घेतले पाहिजे. अश्लीलतेच्या बाबतीत, कायद्यात, लेखकाला खूपच झुकते माप आहे. कोणत्याही कलाकृतीतला नुसताच एखादा संदर्भहीन तुकडा अश्लील ठरवता येत नाही. पूर्ण कलाकृतीतले त्याचे स्थान आणि त्या कलाकृतीचा भाग म्हणून त्याची गरज, हे विचारात घ्यावे, असे आहे. त्या बाबतीत काही वाचक, समीक्षक यांची साक्षही काढता येते. दुसरा एक कायदा म्हणतो की इथली कायदा व सुव्यवस्था बिघडवणारे, समाजात फूट पाडून भडकवणारे, असे काही कलेत नसावे. शिवाय, इथले सनदशीर मार्गाने निवडून आलेले सरकार, हिंसा भडकवून वा बेकायदेशीर मार्गांनी उलथून टाकण्याचा हेतू कलेत असता कामा नये. मला वाटते की बहुसंख्य लेखकांना या कायद्यांचा अडथळा येण्याची शक्यता नाही. पण, ज्यांचे हेतूच तेच तसेच बेकायदेशीर काही योजलेले असतील तर त्याचे पुढील संगीत ऐकायची त्यांना तयारी ठेवावी लागणारच, हे उघड आहे. तरीही, अमुक एक कायदा मोडला जातोय का यावर मतभेद होऊ शकतील, समर्थनार्थ वा विरुद्ध मांडणी केली जाऊ शकेल, हेही लेखकांनी समजून राहायला हवे. अशा प्रकारचे निर्बंध घालणारे कायदे जगात जवळ जवळ सर्वच देशांत आहेत, हे आपल्याला विसरता येणार नाही. २०१४ ते २०१६ या काळात पोलिसांनी दाखल केलेल्या या कायद्याखालच्या ११२ केसेसपैकी फक्त दोन केसेसमध्ये दोष सिद्ध होऊ शकलेला आहे, असे नेटवर दिसते. हे पाहता ही काही प्रचंड काळजीची बाब दिसत नाही. तरीही, एखादे सरकारच अशा कायद्याचा गैरवापर करतेय असे वाटले तर न्यायालयाचा दरवाजा ठोठावणे हाच मार्ग उरतो. रीतसर चाललेल्या लोकशाहीमध्ये फार क्वचितच कुणा लेखकाला इतक्या टोकाला जावे लागेल, असे वाटते.

हे झाले समाजाचे वा कायद्याचे निर्बंध. सर्वात पहिला निर्बंध तर लेखकाचा स्वतःचाच असतो. मनात असलेले वा समजलेले ते सर्वच व्यक्त करायची लेखकाचीच हिंमत होत नाही. नातेवाईक, मित्र, ओळखीचे लोक काय म्हणतील, त्यांना काय वाटेल, त्यांच्या कशा प्रतिक्रिया येतील याच्या विचारांना अनेक लेखक घाबरू शकतात. अत्यंत चावट वा अश्लीलतेच्याही वादात येईल अशी एखादी कादंबरी लिहिली समजा तर आपल्या मुलांच्या जगण्यावर त्याचा काय परिणाम होईल याची कल्पनेने भीती वाटू शकते. माझे ‘ बुद्धिबळ आणि झब्बू ‘ हे नाटक स्त्री-पुरुषांतल्या छुप्या आकर्षणांचा विषय हाताळते. एकाने मला विचारले की हे एवढे सगळे तुम्हाला कसे माहिती ? म्हटले, बाबा, अशीच सांगोवांगीची माहिती वापरलेली आहे. स्वतःच्या अनुभवाबरोबरच निरीक्षणातून आणि चिंतनातूनही बरेच मनोव्यापार लेखकाला कळू शकतात, हेही लक्षात घेतले गेले पाहिजे. खानोलकरांनी त्यांच्या कादंबऱ्यांतून स्वतःच्या विकृती व्यक्त केल्या, असे म्हणणारे विद्वानही इथे होऊन गेलेले आहेत. प्रत्यक्ष कलेपेक्षा त्या कलावंताचेच मूल्यमापन आधी करा, ही जर समाजात प्रवृत्ती असेल तर तिचा लेखकाला त्रास होऊ शकतो. त्या त्रासाला लेखकाला तयार राहावेच लागणार. लेखक मध्यमवर्गीय नसावा, तो परिवर्तनवादीच असावा अशा प्रकारच्या अपेक्षा या कलाक्षेत्रातल्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याला अटकाव करणाऱ्या असतात, हे लक्षात घ्यायला हवे. आता माझे हेच ‘ बुद्धिबळ आणि झब्बू ‘ हे नाटक परिवर्तनवादी कुठे आहे ? पण ते मानवी जगणे पाहणारे, त्या निमित्ताने काही आशय व्यक्त करणारे आहे की नाही ? ज्यांनी पाहिले त्यांनी ते या समजुतीनेच पाहिले, त्यामुळे मला काही प्रश्न आला नाही.

हे स्वातंत्र्याचे प्रश्न का निर्माण होतात, हे पाहिले पाहिजे. प्रत्येक माणसाचे जनुक नकाशे वेगवेगळे असतात, त्याची वाढ वेगवेगळ्या वातावरणात, वेगवेगळे परिणाम घेत झालेली असते. काही लोकांच्या आयुष्यात अमुक एका विभूतीला सर्वोच्च स्थान असते. थोडक्यात, प्रत्येकाची घडण, प्रोग्रॅमिंग वेगवेगळे असते. अमुक धर्माचे, व्यक्तीचे वा जातीचे विडंबन वा विटंबना सहन होणारच नाही, अशी काहींची अवस्था असू शकते. आणि सगळी कलानिर्मिती ही फक्त त्या त्या लेखकाच्या व्यक्तिगत प्रतिक्रिया व्यक्त करणारीच असते, हा बहुसंख्यांचा समज असतो. त्यामुळे सर्वच कलावंतांबाबत माणसे सौम्य वा तीव्र मानसिक संघर्षात असू शकतात. जेव्हा जेव्हा लोकांना असे वाटते की अमुक एका कलाकृतीतून आपल्या घडणीलाच विरोध होतो आहे वा धोका निर्माण होतो आहे तेव्हा तेव्हा त्या कलावंताचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य नष्ट केले पाहिजे असे त्यांना वाटते. या बाबतीत हे लक्षात घेतले पाहिजे की जगातले अनेक मान्यताप्राप्त लेखक हे सांगत असतात की त्यांच्या लेखनाचा कच्चा माल हा व्यक्तिगत अनुभवातून वा परिश्रमातून येत असला तरी ते व्यक्तिगत प्रतिक्रिया व्यक्त करण्यासाठी लिहीत नाहीत. ते मानवी जगणे समजून घेण्यासाठी लिहितात. वाचकांनीही व्यक्तिगत पूर्वग्रहांतून वा मतमतांतरांतून कलेकडे पाहू नये, अशी अपेक्षा असते. पण अनेकदा तसे घडत नाही. आणि हेच, ही स्वातंत्र्याची समस्या निर्माण होण्याचे कारण आहे. जिथे कुणावर तरी आक्रमण करणे, कुणाविरुद्धतरी द्वेष पसरवणे असे कलेचे योजनाबद्ध हेतूच असतील तिथे संघर्ष निर्माण होणारच हे समजून घेता येते.

आता थोडे आपल्या राजकीय वातावरणाकडे पाहावे असे वाटते. काय आहे परिस्थिती ? नेते तर इकडून तिकडे उड्या मारतातच आहेत पण पक्षांच्या युत्या वा आघाड्याही कशाही – अनपेक्षितही होत आहेत. जरा डिझाईन बदलले की इकडचे पोपट आणि तिकडचे राघू लगेच वेगवेगळेच बोलायला लागतात, हे आपण पाहात आहोत. थोडक्यात म्हणजे अमुक माणसे वा पक्ष अमुक विचारसरणी मानतात, असे काही दिसत नाही. याचे आता कुणाला आश्चर्यही वाटत नाही. हीच उत्तर आधुनिक अवस्था म्हणायची ! ना धर्म, ना विचारसरणी, ना कोणती मूल्ये ! सगळे जगणे उथळच असते, हीच धारणा ! याही परिस्थितीत परिवर्तनवादी विचारवंत मात्र नेट लावून त्यांची ठराविक मते रेटताना दिसतात, तो भाग वेगळा आणि निरर्थकही. आता काही पक्ष जातवादी, काही धर्मवादी, काही भाषावादी असे असल्याने समाजात फूट पाडणारे आहेत, असे म्हटले जाते. मला वाटते, ते सगळे मतांच्या गठ्ठ्यांसाठी असते. असे फूटपाडे पक्ष इथे कायदेशीर मान्यता कसे प्राप्त

करतील ? सगळेच मान्यताप्राप्त आहेत म्हणजेच संविधान मानणारेच आहेत, हेच गृहीत धरायला हवे. कुणाचे काही वेगळे म्हणणे असेल तर कोर्टात जाऊन ते सिद्ध करायला हवे. या सगळ्याचा सारांश असा दिसतो की निवडणुका जिंकणे आणि आपल्या अग्रक्रमांप्रमाणे देश घडवणे हेच सर्वांचे उद्दिष्ट आहे. आणि त्यात विचार वगैरे काही नसून पूर्वग्रह आणि एकूणच घडत आलेले त्यांचे त्यांचे स्वभाव आहेत. म्हणजे काँग्रेसला समजा अनाक्रमक, अहिंसक, समजुतदार, शांततावादी अशी प्रतिमा आवडते तर बीजेपीला स्वाभिमानी, जरूर तर आक्रमक, जशास तसे वागणारी अशी कणखर प्रतिमा पसंत पडत असेल – असे फरक असू शकतात. लोकांना आता मतदानातून विचार निवडायचा नसून स्वभाव निवडायचा आहे. त्यामुळे आता विचार पोचवणे याला महत्त्वच राहिलेले नाही. आपापल्या अस्मिता आणि स्वभाव यांचे राज्य आणणे हेच महत्त्वाचे झालेले आहे. त्यामुळे एकूणच यातल्या संघर्षांना एक शाळकरी आणि माथेफिरू स्वरूप येत चाललेले आहे. तरीही या राजकीय क्षेत्रातल्या लोकांना कलेचे काही देणेघेणे आहे असे दिसत नाही. तुम्ही प्रेमकविता लिहिली की निराशेची लिहिली की एखाद्या कालबाह्य विचारसरणीची लिहिली याने त्यांना काहीच फरक पडत नाही. एक तर त्यांना वेळही नाही आणि कलेकडे जाण्यासाठी लागणाऱ्या तरल मनाचे कौतुकही नाही. एखाद्या राजकीय स्वभावाची तरफदारी करणारे वा त्यांच्या राजकीय स्वभावाच्या विरोधात असलेले असे काही तुम्ही लिहिलेत तरच त्यांचे लक्ष जाऊ शकेल. पण याही परिस्थितीत काही परिवर्तनवादी वा विद्रोही टाईप विचारवंत मात्र कला ही डाव्या विचारसरणीचीच असायला हवी, हे कट्टरपणे मांडत असतात. ते वास्तवापासून तुटलेले आहेत हे एकदा लक्षात आले की त्यांच्याकडे दुर्लक्ष करता येते. म्हणजेच, एकूणात सध्या राजकीय लोकांकडून तरी मराठी लेखकांच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याला काही धोका दिसत नाही.

माणसांच्या जगण्याचा हा जो एक नमूना तयार झाला आहे तो विचारात घेता लेखकाने लेखनपूर्व चिंतनस्वातंत्र्य वापरायचीच जास्त गरज आहे, असे दिसते. आपण का लिहितो आणि आपले लिहिणे हे सर्वच माणसांसाठी असू शकते की नाही – हे विषय लेखकाच्या चिंतनात असायला हवेत, असे वाटते. पुन्हा एकदा आभार मानून थांबतो.

( पुरुषोत्तम करंडक पारितोषिक वितरण समारंभ, पुणे, दिनांक २९-१२-१९. )

--- ००० ---

Edit

Champra Deshpande added a new photo.

अजगराचा लाऊडस्पीकर --

April 24

Champra Deshpande shared a post.

आपल्या फ्रेंड लीना पांढरे यांनी शेक्सपियरच्या प्रेमकवितेवर एक सुंदर लेख लिहिलेला आहे -- त्याची लिंक --

https://www.facebook.com/leena.pandhare.50/posts/2931652566924936

त्यात त्यांनी दिलेल्या ओळी तर खासच आहेत ! जरूर वाचा --

## आवाहन

दिवस कुठलेच संपत नसतात
ना रोमँटिकपणाचे ना अतिवास्तववादाचे
आदिवासीवादही असतो मनात
सर्व मिळून तर
होते आवाहन प्रेयसीला

आता आपण कुणी नवे आहोत
या भ्रमात चालते मनाचे
हजारो वर्षांचे
हातपाय कुठेही जोडलेले
कुरूप भयचित्र

अप्रस्तुत काहीच नाही होत
समजलेली निरर्थकताही
व्यापून असतेच प्रेमाचे अंगण

एकमार्गी एकरेषी विचारकवी
असेही म्हणू शकतात की प्रेम
असे काही नसतेच

पण मनात असलेली ॲब्सर्डिटीही
नष्ट न करू शकता ते स्पर्श करतात
प्रेमाला
आणि सगळ्यासह क्षणात
अदृश्य होतात
--- ००० ---

## भाषेशिवाय मन

मला वाटते काही बोलायचेय तुला
अगदी ओठांपर्यंत आलेय
मनात तर आहेच
किंबहुना कालच्या तुझ्या बोलण्यात
ते होतेच पण खुले नव्हते
आणि आता बोलायचे असून

राहून जातेय
शब्दांचा नाहीय दुष्काळ
तू तर माहीर आहेस
दडवण्यात तर फारच
किंवा तेच खरे तर
सूचकपणे अधिकच
देणारे असते
असेही पटू शकते

पण तू बोलशील
असे मात्र नक्की वाटते
न बोलताही हवे ते घडत असले तरी

शरीरांसारखेच शब्दांचेही
असणारच ना अस्तित्व
अर्थपूर्ण

नाही तरी भाषेशिवाय मन
म्हणजे काय असू शकेल
तूच सांग निदान हे तरी
--- ००० ---

April 23

अबोला

मुख्य मुद्यावर मूक
राहूनही सूचकपणे चेतवणे
आकाशाचे अंग
ही एक अगम्य सिद्धी

तरीही मुद्दाम
आग्रह धरावा शब्दांचा
तर रुसण्याचे नाटक करत
आकाशभर अबोला
--- ००० ---

" मै ऐसा भयानक अंधेरा हूँ जो उजालेको खा जाता हूँ ! "
-- कादरखान.
( कुली नं. १ )

Champra Deshpande shared a link.

Champralekhan
champralekhan.com
माझे संकेतस्थळ

माझ्या सर्व लेखनाचे संकेतस्थळ असल्याचे फ्रेंडसना माहीतच आहे. त्याच्या नूतनीकरणाचे काम मी करत आणले होते. आज पुस्तकदिन आहे आणि आजच ते काम पूर्ण झाले आहे. इच्छुकांनी जरूर पाहावे. संकेतस्थळ -- ( खाली कॉमेंटमध्ये तपशील दिला आहे. )

April 22

संगीत

नेमका नेम साधण्यासाठी
आधी मी माझ्या मनाची तार छेडतो
मग आकाशाकडे नजर टाकून
हवेला हळुवार स्पर्श करतो

तोवर मला हवे ते कळलेले असते
पक्षी खूप आपुलकीने जवळ आलेले असतात
आणि माझ्या मनातून
तिकडचे संगीत सुरू झालेले असते
--- ००० ---

21 April 2020
Yesterday

थेट

समाजमाध्यमांची झोपडपट्टी
चंगळवाद्यांना लागणाऱ्या
उत्पादनांमुळेच कामे मिळणारी

विषमतेमुळेच तर
पोटापाण्याची सोय होते

हसत हसत कायप्पावर
खूप तपशील सांगणारे लोक
मैत्रीत होतात म्हातारे
ऐन तारुण्यात

स्त्रियांचा आकर्षकपणा वाढल्याने
पुरुष अधिकच हिंसक होतात
आणि त्यांना वाचवायच्या
प्रतिज्ञा करतात

करमणुकीच्या अभावी
निर्जन झालेला रस्ता
एकाकीपणाच्या पुलावरून थेट
उडी मारतो सामाजिक उत्सवात

आत्महत्या कुणालाच नको असते
--- ००० ---

मोजदाद

वस्तू अनुभव आणि मानसिक तीव्रता
यांचे वैविध्य तपासत दाखवत
बसावे तर ते न संपणारे होईल
एक रटाळ व्याख्यान

झाडांचा प्राण्यांचा आणि इतिहासाचा
अभ्यास करून कवितेला हजारो
नैवेद्य दाखवले पंचपक्वानांचे तेही
रटाळच जगण्याचा आरसा होत

मोजदादीशिवाय
काय करता येईल हा प्रश्न
चिंतनात घेताच

कवितेला तरतरी आली
--- ००० ---

सहवास

जिभेशिवाय मला
तुझी चव कळते
स्पर्शाशिवाय ऊब

तुझा आभास
मी सत्य होऊन
व्यापून टाकतो

तेव्हा कुठे तुला दिसते
नुसत्या तर्कावर नाही चालत
आपला सहवास
--- ००० ---

रीत

तू उचकटलास माझा डलनेस
पिरगाळलेस
माझ्या आसक्तीचे कवडसे
बर्फात ठेवलेस माझे हात

हीच होती तुझी प्रेमाची रीत
हे समजताच मी मोकळा अवकाश
भरून टाकला अंधाराने
माझ्या बेशुद्धीच्या

बेशुद्ध होणे ही असते
माझ्या सुखाची परमावधी
--- ००० ---

अग्नीच्या घशातून

आज नाही माहीत

पण होऊ शकते
अग्नीच्या घशातून
निघालेल्या
दुःखाच्या तरंगांतून
उद्याचा भविष्यकाळ
आमच्या खिशात आहे

आत्मविश्वासाला दुर्गुण नका म्हणू
आमचे जबडे कधीचे चावत सुटलेत
कणाकणाचे असणे
अव्याहत उगवणाऱ्या जंगलाचे
इत्थंभूत पारायण

थकल्यामुळे मधेच
आम्ही हरल्यासारखे दिसू शकतो
एवढेच
--- ००० ---

झोप आणि विचार

झोप येते प्रलयासारखी
विचारांच्या इच्छेविरुद्ध

विचार जातात स्वतःच्या
त्वचेखाली नाइलाजाने

खिडकीतून दिसणाऱ्या वळणावर
दुचाकी घसरली होती एकदा मागे

या विचाराची काय आता
एवढी अर्जन्सी आहे

झोपेचे कवच अधिक जाड होतेय
विचारांचा निरोप घेत

राहिलेले विचार उठताच सकाळी
केले तरी मग सकाळचे लांबणीवर पडतील

अशा हजारो राहात गेलेल्या विचारांचे
असुरक्षित चाललेय आयुष्य नाइलाजाने
--- ००० ---

भूतकाळाचे जंगल --

अंधाऱ्या गोंगाटाच्या नागमोडी वाटेवरचा चंद्र --

सलगी --

कोरोनानंतरचे जग --

प्रेम --

मालेगावातील एका रुग्णालयाचे नाव
' सामान्य रुग्णालय ' असे आहे !
( हे अर्थात टीव्हीवर दिसले. )
काय असावा याचा अर्थ ?

कंटाळा

कंटाळा हा एक जीव आहे
असे समजून
आधी त्याचे दात पाडले
तेव्हा आलेल्या रक्ताचे
अत्तर करून मग ते
फर्निचरला चोपडले

त्या दुर्गंधित आभासात बसून
एक कादंबरी वाचताना
तिच्यातली सगळीच पात्रे
कोरोनाकाळात गेली

तीही म्हणू लागली
कण्हत विव्हळत की साला

खूप खूप कंटाळा आलाय

--- ००० ---

प्रामाणिक

टीव्ही ९ वर एका धर्माचा कार्यक्रम चालू होता. ( पूर्वीचा रेकॉर्डेड असू शकतो. ) एका बाजूला स्त्रिया आणि एका बाजूला पुरुष अशी बरीच गर्दी होती. धर्मगुरूने विचारले, " इथे आलेल्यांपैकी किती स्त्रियांनी आपापल्या पतींना मारहाण केलेली आहे, त्यांनी उभ्या राहा -- " जरा वेळाने हिय्या करून ७-८ स्त्रिया उभ्या राहिल्या ! धर्मगुरू म्हणाले, " छान, देव तुमच्या प्रामाणिकपणाबद्दल तुम्हाला आशीर्वाद देईल ! " मग तोच प्रश्न त्यांनी पुरुषांना विचारला, " किती पुरुषांनी आपापल्या पत्नींना मारहाण केलेली आहे, ते उभे राहा -- " त्यावर त्या गर्दीतले निम्म्याहून अधिक पुरुष उभे राहिले ! धर्मगुरू म्हणाले, " छान, तुमच्या प्रामाणिकपणाबद्दल देव तुम्हाला आशीर्वाद देईल ! "

सारांश, प्रामाणिकपणा महत्त्वाचा !

--- ००० ---

अटीतटीवर

शेवटी होतेच
अटीतटीवर येणे

निश्चित समजल्यावर
की आता तुटणे नाही

माझा अस्वस्थपणा पोचून
तू अस्वस्थ होणे हीच दिलजमाई

--- ००० ---

अचंबित

प्रत्यक्षात न येता
आल्याचा फील देणे
हे तुझे अचंबित करणे

यासाठी तुला
काहीच नाही करावे लागत
ती कर्तुत असते माझ्याच मनाची
गुंतलेल्या

मला क्षणात समजते
माझे मन माझे नाही

माझी इच्छा असली तरी
आता माझ्याकडे
अचंबित व्हायचे साधनच नाहीय
--- ००० ---

एक वास्तववादी फँटसी

कोरोनावर काही औषध निघेल, मग पुन्हा थोडे थोडे निर्भय होता येईल आणि मग पुन्हा एकमेकांना लुटणे, छळणे, देशोधडीला लावणे, काहींवर उपकार करत आत्मप्रौढ राहणे वगैरे नॉर्मल जगणे सुरू करता येईल. हा आशावाद तर ठेवायलाच हवा. पण, समजा, लौकर नाही निघाले जालिम औषध तर ? किटस वापरत, इतर काळजी घेत हळूहळू सुरूच करावे लागेल सगळे. मग, सैनिक, पोलीस, आरोग्य कर्माचारी, सफाई कर्मचारी हेच फक्त जिवावर उदार होऊन काम करताहेत, असे नसून, शिक्षक, दुकानदार, कारकून, वाहनदुरुस्तीवाले, केशकर्तक, भाजीवाले, वगैरे सगळेच जिवावर उदार होऊन काम करताहेत, असे एक समतेचे चित्र तयार होईल ! सगळ्यांनीच सारखे एकमेकांना नमन करणे आणि सर्वांनीच सर्वांचा गौरव करत राहणे, असे होऊ शकेल. आणि यातून मग पुन्हा मुळातला हलकटपणा, नीचपणा, जातिटोळ्या, पक्षटोळ्या हे सगळे सुरू करता येईल. वर्चस्वयुद्धे सुरू करता येतील. थोडक्यात, कोरोनानंतरचे जग हे आता आहे तसेच माणसाच्या स्वतःच्या मुळावर येणारेच असेल --- फक्त ते सर्व, किट वापरत आणि वारंवार हात धुवत चालवावे लागेल, इतकेच ! नाही तर, आहे या मनाने, माणूस शहाणपणा कसला शिकेल ते कुणीही सांगावे.

--- ००० ---

खोली

एरवी त्याची खोली
सवयीची असल्याने
कवीलाही काही ती जाणवत नाही

जेव्हा तिरपागडे पीळ बसतात
कवीच्या मनाला
तेव्हा एक विशेष व्यक्तिमत्व
धारण करते तीच खोली
एकाकीपणाने धुरकट झालेली

तेव्हाच प्रवेश मिळतो तिला कवितेत
आणि वाचकांनाही भावते ती
त्यांच्या मनांना अधिकच

एकाकीपणाची खात्री देत

कवी पडून असतो छताकडे बघत

--- ००० ---

कादरखान

या माणसाची महती मला इथले आपले मित्र राजू कुलकर्णी यांच्याकडून समजली. एके काळच्या अनेक हिंदी चित्रपटांचे पटकथा आणि संवाद लेखक. अजब, अतर्क्य घटना आणि आगापिछा ओलांडून वा निरर्थक म्हटले तरी चालेल असे मॅड संवाद, ही या कलावंताची वैशिष्ट्ये. राजू कुलकर्णी यांची कादरखानांच्या संवादांवर नंबरी मास्टरी आहे. त्या माहोलात एकदा सुमारे एक तास ' बरबाद मजा ' आली होती ! हे आठवायचे कारण म्हणजे आत्ताच जरा वेळ ' हीरो नं. 1 ' हा चित्रपट पाहिला. त्यात कादरखान यांनी गोविंदाच्या पित्याची भूमिका केलेली आहे. यात गोविंदा वेश बदलून करिश्माच्या घरी नोकर म्हणून आलेला असतो. त्या बाबतीतला एक संवाद -- " लैला का मजनू बनके रास्ते पे कपडे फाडते हुए घूमना आसान है मगर किसी के घर के कपडे धोना बहुत कठिन है ! " -- मजा आली !

मी उल्लेख केलेल्या आपल्या वकील मित्राचे नेमके नाव ( राजूच ना ? ) कृपया पुढील मित्रांपैकी कुणी सांगू शकतील, त्यांनी सांगावे, ही विनंती --

सतीश तांबे, युसुफ शेख, आनंद थत्ते

( आता नाव नीट समजले आहे -- ॲडव्होकेट राज कुलकर्णी. )

--- ००० ---

नाट्यकर्मींचे अण्णा

पुण्यातल्या ' मनोरंजन ' या नाट्यव्यवस्थापन संस्थेचे अण्णा तथा मनोहरपंत कुलकर्णी हे निवर्तल्याचे समजते. माझ्यासारख्या अनेक नाट्यकर्मींचे ते अण्णा होते. नव्या हौशी नाट्यसंस्थांचे तर एक आधारच. पैसे ' नंतर ' दिले तरी चालवून घेणारे ! मला त्यांची विशेष आपुलकी म्हणजे माझ्या अनेक नाटकांना त्यांनी दिलेली उपस्थिती. त्यांचा खास अभिप्राय म्हणजे मंद स्मित करत पाठीवर हात ठेवणे ! ते नुसता व्यवसाय करत नसत. नव्या नाट्यकर्मींचे कौतुक करणे, त्यांना प्रोत्साहन देणे, हेही ते करत. पुण्यातल्या तर बहुतेक सगळ्याच आणि बाहेरगावच्याही असंख्य नाट्यसंस्थांचे ' मनोरंजन ' शी संबंध येत असत. त्यांच्या स्मृतीस अत्यादरपूर्वक अभिवादन !

अण्णांचे पुत्र मोहन कुलकर्णी हेही अण्णांची परंपराच चालवत आलेले आहेत. त्यांच्या दुःखात माझ्यासारखे असंख्य नाट्यकर्मी सहभागी आहेत !

--- ००० ---

हो

कधी कळणार तुला हो चे महत्त्व कोण जाणे

ई ई कमिंग्स बघ काय म्हणतोय --

प्रेम हे एक ठिकाण आहे
आणि या प्रेमाच्या ठिकाणातून
सरकत राहतात
( शांततेच्या उजळपणासह )
सर्व ठिकाणे

हो हे एक जग आहे
आणि या जगात हो च्या
जगतात
( खुबीने वळवलेली )
सर्व जगे

-- मलाही तेवढे एकच तर हवेय अक्षर
ज्यात मी सामावून घेईन
( माझ्या सर्जकतेने )
सर्व भाषा
--- ००० ---

वश

कवितेला कुणी कंट्रोल
केलेले तिला आवडत नाही

कवी जर त्याच्या विचारमनाने
लुडबुड करू लागला
तर त्याच्या
कद्रू कर्कश करंट्या
जगण्याला मरायला सोडून
ती निघून जाते

ती त्यालाच वश होते
जो तिला वश करण्याच्या
प्रयत्नातच नसतो
--- ००० ---

व्हायरस

एक तासभर समजा
नसतेच केले
हे नेहमीच अनिवार्य वाटणारे विचार
तर जगण्यातली सुरक्षितता
धोक्यात येणार होती का
कितपत

जसे हजारो व्हायरस आहेत
तसेच हजारो विचार

यांपासून लांब न राहण्याची विकृती
मला इतकी का प्रिय आहे

जेव्हा मी विकृत नसेन
तेव्हा काहीच नसेल
असे मला वाटते की काय
--- ००० ---

In Aankhon Ki Masti Ke. (Umrao Jaan 1981) FULL HD SONG.
youtube.com

आशा भोसले ८७ वर्षांच्या आहेत. एका टीव्ही चॅनेलने त्यांच्याशी थोडी बातचित केली. मग एक गाणे गुणगुणण्याची त्यांना विनंती केली. त्याच जिवंत चैतन्यपूर्ण आवाजात त्यांनी खालील गाणे गुणगुणून दाखवले. यासाठी त्यांनी हेच गाणे निवडावे याचा अर्थ हे त्यांच्या स्वतःच्या मनात खोलवर असलेले गाणे असणार. चित्रपट, ' उमराव जान ' आणि संगीत खय्याम -- खरोखरच सुंदर, ग्रेट गाणे -- या गायिकेचे स्वतःचे खास आवडते गाणे म्हणून आपणही पुन्हा हे एकदा ऐकू या --

ऑर्फियस

काल, सागर तळाशीकरने एफबी लाईव्ह वर जी. ए. कुलकर्णी यांची ‘ ऑर्फियस ‘ ही कथा वाचली. कोरोना काळात लोकांची नुसतीच जत्रा करून करमणूक करत बसण्यापेक्षा जरा सांस्कृतिक व्यायाम करवणारा हा एक चांगला उपक्रम सागरने सुरू केलेला आहे. उत्तम आवाज, भाषेची समज आणि शब्द न शब्द नीट पोचायला हवा याचे भान ही सागरच्या वाचनाची गुणवैशिष्ट्ये आहेत. तो एक उत्तम अभिनेता आहे. ‘ राशोमान ‘ या जगप्रसिद्ध नाटकात त्याने जबरदस्त काम केले

होते. त्याच्या सर्व कुवती व्यक्त होतील अशा संधी आपल्या सांस्कृतिक वातावरणात त्याला मिळालेल्या नाहीत, असे मला वाटते. ते आता, जो भी है ! मी ‘ ऑर्फियस ‘ या कथेबद्दलच लिहिणार आहे.

ऑर्फियस हे ग्रीक पुराणातले एक मिथकपात्र आहे. तो एक महान संगीतकार, कवी आणि प्रेषित होता. त्याने काही धर्मही सांगितला, असे म्हटले जाते. त्याची पत्नी युरिडाईस त्यांच्या विवाहाच्याच दिवशी सर्पदंशाने मृत्यू पावते आणि ऑर्फियस अत्यंत दुःखी होतो. नंतर तो पाताळलोकात जाऊन, त्याचे संगीत आणि काव्य यांचा देवांवर प्रभाव पाडून तिला पुन्हा पृथ्वीवरील प्रकाशजीवनाकडे नेण्याची संधी मिळवतो. पृथ्वीवर पोचेपर्यंत त्याने मागे वळून पाहायचे नाही, अशी या बाबतीतली अट असते. ती त्याच्याकडून मोडली गेल्याने क्षणात युरिडाईस पुन्हा मृत्यू पावते, अशी ती कथा आहे. हीच कथा आधाराला घेऊन जीएंनी त्यांची कथा लिहिलेली आहे. मानवी जीवनाबाबतची स्वतःची आकलनप्रक्रिया व्यक्त करण्यासाठीच जीए हे आव्हान घेतात, हे स्पष्ट आहे.

या कथेतले भाषिक फुलोरे आणि झगमगाट हे या कथेच्या माहोलासाठी योग्यच आहेत, असे म्हणता येईल. ती तर जीएंची खास क्षमताही आहे. पण, इथे मुख्यतः आपण या कथेच्या आशयाकडेच पाहू.

१ विवाहाच्याच दिवशी पत्नी युरिडाईस सर्पदंशाने मृत्यू पावल्याने ऑर्फियस दुःखी होतो आणि तिला परत आणायचे ठरवतो. आपल्याकडे, रामही पत्नी सीतेचे अपहरण झाल्यावर दुःखी होतो आणि तिला परत आणायचे ठरवतो. आपला यक्षही प्रेयसीच्या विरहाने व्याकूळ होतो. म्हणजेच मानवी जगणे हे घटनांतून सुखदुःख निर्माण करणारे असते. मग तो प्रेषित असो की देव असो की एक साधा यक्ष.

२ मूळ कथेतला ऑर्फियस एक महान वादक, कवी आणि प्रेषित आहे. इथला, जीएंच्या कथेतला ऑर्फियस काही त्या योग्यतेचा वाटत नाही. अवाढव्य भाषा वापरत जीए त्याला देव-देवता यांच्यापर्यंत आणून पोचवतात पण यात त्याचा काहीही स्पार्क दिसत नाही. तो एक सामान्य, सरधोपट, मिडिऑकर माणूसच असल्याचे पुढेही दिसत राहते. युरिडाईसला सोडवून नेताना त्याला अत्यंत हुशार समस्या काय दिसते तर आता ती पूर्वीसारखी असणार नाही. त्याला दिसणाऱ्या सौंदर्यावर, प्रसन्नतेवर कायम तिच्या मृत्यूच्या आठवणीची छाया राहील ! तर नकोच हे म्हणून मुद्दाम तो मागे वळून तिच्याकडे पाहतो आणि जाणीवपूर्वक देवाची अट मोडून तिला पुन्हा मृत्यूच्या पाताळलोकात जाऊ देतो ! यात काय विशेष अक्कलेचा भाग आहे ? एरवीही जगताना प्रत्येकाच्या स्मृती आणि मनोरचना वेगळ्याच असतात. ती समस्या टाळण्याचा उपाय कुठे उपलब्ध असतो ?

३ त्यांना जेव्हा दुसरी संधी मिळते तेव्हा ती युरिडाईस नाकारते. कारण काय तर तिने मृत्यूचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेला आहे आणि ऑर्फियसने त्याच्या प्रिय व्यक्तीच्या मृत्यूचा अनुभव घेतलेला आहे – त्यामुळे त्यांचे जगणे पूर्वीसारखे असू शकणार नाही. नंतर पुन्हा, ती आधी मेली तर ऑर्फियसला फार दुःख होईल आणि तो आधी मेला तर तिला सहन होणार नाही ! यात तरी काय मोठी बुद्धिमत्ता दिसतेय ? हेही किरकोळच तर आहे. तेच अगदी अगाध ज्ञान असल्याप्रमाणे सादर केले गेलेय.

४ यातले देव-देवताही यांच्यासारखेच सामान्यच आहेत. शेवटी देवसाहेब म्हणतात की ऑर्फियस आणि युरिडाईस हे दोघेही शहाणे आहेत. का ? तर दोघांनाही आपल्या मर्यादा कळतात म्हणून ! दुः ख सहन करण्यातल्या आणि आकांक्षांची पूर्तता करण्यातल्या मर्यादा ! ये तो सबको मालूम रहता है ! यात खास असे अगाध, सखोल ज्ञान कसले आहे ? ! ते देव नामक इसम यालाच ज्ञान म्हणतेय !

देहमृत्यूचा अनुभव ही एक बालिश असली तरी ‘ अर्थपूर्ण ‘ कल्पना म्हणून स्वीकारली समजा तरी ही कथा कोणता आशय पोचवते ? माणसाच्या सुखाधारित सर्वसामान्य प्रतिक्रियांचा ! माणूस त्याच्या प्रभावयुक्ततेतून वागत असतो, हेच ना ? ही तर जन्नतकी हकीकत सगळ्यांनाच माहीत असते ! पण, हेच काहीतरी सखोल आहे असे समजणे म्हणजे, ‘ दिल बहलानेके लिये खयाल अच्छा है ‘, इतकेच !

जीएंच्या कथा मी बऱ्याच वर्षांपूर्वी वाचल्या होत्या. ते मराठीतले एक मोठे कथाकार आहेत, हेच माझ्या मनात बिंबलेले आहे. पण ही कथा मात्र मला पोरकट, बालिश वाटली.

सदर पोस्ट तुम्ही करमणूक म्हणूनही वाचू शकता वा गंभीरपणेही वाचू शकता. मी काही समीक्षक वगैरे नाही, पण, समीक्षकांनी, शेरेबाजी करणे वा व्हेग काहीतरी बोलणे यापेक्षा कोणत्याही कलाकृतीच्या आशयाच्या पाण्यात उतरले पाहिजे, असे मला वाटते. कोणत्याही कलाकृतीचा आशय पोचत जाण्याची प्रक्रिया या अंगाने जास्त लिहिले गेले पाहिजे. असो.

अगदी थोडक्यात लिहिले आहे. जीएंबद्दलचा आदर दुखावण्याचा वा उगीचच काही सनसनाटी लिहिण्याचा हेतू नाही हे फ्रेंडसनी समजून घ्यावे, हीच एक विनंती !

--- ००० ---

फांद्या

मानापमानाच्या फांद्या
छाटल्या गेल्यावर
बेढब झाड सुंदर दिसू लागते
ते आतून दुखावले गेले नसले तर

कशाचेही कधीही काहीही
घडत असते हे पाहून
निरिच्छता आणि आग्रह
दोन्ही उचल खात राहतात

--- ००० ---

' प्रत्यय ', ' किंग लियर ', आणि डॉ. शरद भुथाडिया.

काल, ' प्रत्यय ' या कोल्हापूरच्या नाट्यसंस्थेतर्फे एक एफबी लाईव्ह कार्यक्रम झाला. तो विशेषतः ' प्रत्यय ' ने १९९३ साली सादर केलेले शेक्सपियरचे ' किंग लियर ' हे नाटक आणि त्यातली लियरची प्रमुख भूमिका आणि दिग्दर्शन करणारे आमचे मित्रवर्य डॉ. शरद भुथाडिया यांच्याबद्दल होता. आमचा मित्र आणि उत्तम नट सागर तळाशीकर याने तो अत्युत्तमपणे सादर केला. मी कोल्हापुरात असताना काही वर्षे या टीमबरोबर होतो, त्यामुळे, मला त्यांच्याबद्दल विशेष आत्मीयता आहे.

त्या कार्यक्रमात सागरने तेंडुलकरांचा एक लेख वाचला. ते त्या वेळी लोकसत्तेत ' रामप्रहर ' नावाचे सदर लिहीत असत, त्यात तो आला होता. ( दिनांक २८ मे १९९३. ) त्यात तेंडुलकरांनी त्या प्रयोगाची आणि विशेषतः डॉ. भुथाडियांच्या अभिनय-दिग्दर्शनाची थोरवी, शब्दांची अजिबात काटकसर न करता सांगितलेली आहे ! ती अर्थात योग्यच आहे, असे मीही म्हणू शकतो कारण ते नाटक मीही पाहिले होते.

त्याच लेखात ' मोठे नाटक म्हणजे काय ' यावरही तेंडुलकर बोललेले आहेत. त्यांच्या मते, नुसत्या कथेतल्या गुंतागुंतीने नाटक मोठे ठरत नाही. ते मुख्यतः मानवी स्वभावातील गुंतागुंत, मानवी कृतींतली गूढ अतार्किकता, त्याची स्खलनशीलता आणि नियतीच्या निर्दय न्यायाचा सखोल वेध यांमुळे मौल्यवान ठरते. ( डॉ. लागू आणि तेंडुलकर यांच्या एका जाहीर संवादात, ते नियती मानतात, असे तेंडुलकरांनी सांगितले होते, त्याची आठवण झाली.) ते प्रेक्षकाची तर्कबुद्धी विकल करणाऱ्या प्रखर सत्याचे दर्शन घडवत त्याला हेलपाटून टाकते. थोडक्यात, ते अमुक एक पटवायला वा अमुक एक भूमिका मांडणारे एकरेषीय नाटक नसते. ते समग्र अस्तित्वाचा आवाका घेणारे, कोणत्याही स्पष्टीकरणाशिवाय जगण्याच्या भानाचा झपाटा व्यक्त करणारे असते. ( ही वाक्ये शब्दशः नाहीत -- स्मरणावर आधारित आहेत. )

चांगल्या, मोठ्या नाटकाबाबतचे हे तेंडुलकरांचे विचार मला पूर्ण पटतात. चांगले नाटक हे मानवी संबंधांचेच असावे लागते. तुम्ही एखाद्या पात्राची महती गाऊ लागलात तर मानवी संबंधांना सपाटता येते आणि कलाकृतीतली ' दर्शनाची जान ' संपून जाते.

ही पोस्ट फ्रेंडसच्या विचारार्थ दिलेली आहे. माझ्या सर्व 'प्रत्यय ' मित्रांचे अभिनंदन आणि त्यांच्या पुढील वाटचालीला खूप शुभेच्छा !

--- ००० ---

कवितेची गरज

" तुम्ही ही कविता लिहायची काही गरजच नव्हती " -- असे माझ्या प्रत्येक कवितेबद्दल म्हणणारे एक वा अनेक वाचक असू शकतात याची मला कल्पना असते. माझ्यासारखे असे अनेक कवी आहेत की जे एखादे काम साध्य करण्यासाठी वा एखाद्या वस्तूची वा विचाराची जाहिरात वा प्रचार वा प्रसार करण्यासाठी लिहीतच नाहीत. यावर लगेच असे हेटाळले जाऊ शकते की याचा अर्थ जगातली घाण तुम्ही आहे तशी ठेवू इच्छिता किंवा वाढवू इच्छिता. हा तुमचा आपमतलबीपणा आहे, तुम्ही असंवेदनशील आहात. हे जर खरे असेल तर हेही एक कामच झाले ! या कामासाठी अमुक एक कविता लिहिली आहे, हे दाखवता यायला हवे.

--- ००० ---

कवितेचे पूर्ण होणे -- असेही --

एखाद्या वेळी असे होते -- कविता लिहिली जाते पण मला कळते की माझ्या मनाने गोंधळ केलेला आहे -- नको ते काही त्या कवितेत घुसडलेले आहे. स्वतंत्रपणे म्हटले तर त्या घुसडलेल्या मजकुरात आणखी एक वेगळी कविता असते -- पण ही अशी घुसखोरी झाल्याने, लिहिलेली कविता बिघडलेली असते. याचा अर्थ ती टाकून द्यावी लागते, असे नाही. नको तो

मजकूर उडवून हवा तो शोधून काढावा लागतो. आता मनाची अनावश्यक लुडबुड बंद झालेली असते. आता ती एक एकसंध कविता घडते. मग तिच्यात मानसिक विदीर्णतेचे का चित्र असे ना ! प्रत्येक कवितेचे एक आपापले ' पूर्ण असणे ' असते -- ते कवीला कळणे हेच त्याचे सर्वात मोठे कर्तृत्व असते. पण, ते खरे तर त्याचे नसतेच कर्तृत्व -- त्याची ' मीगिरी ' थांबल्यावरच तर ती कविता प्रगट झालेली असते !

--- ००० ---

मुक्कामी गाडी

उशीर झाला म्हणून
अंधार लावून घेतला जातो
तर दिवे जातात

कामांच्या मनसुब्यांसह
झिरझिरीत दिसत असते
मुक्कामी गाडीचे चित्र

पहाटे सर्व आवरून
वेळेत येऊन पकडायला हवी
स्टँडवरचाच चहा मारून

एवढ्या छोट्या खेड्यातही
भरून जाते पहाटेच्या अंधारात
कामांच्या रामरगाड्यात गाडी

गार वाऱ्यात कामाची जुळणी करत
स्टँडवरची सामसूम मागे सोडून
सुरू होते गाडी शेजाऱ्याकडे दुर्लक्ष करत

--- ००० ---

समाधानी

त्या घरात मी एकटाच राहायचो
आणि पालींच्या पाठलागांना घाबरायचो
म्हणून मग मी मच्छरदाणी सुरू केली
झोपताना तरी अंगावर पडायची भीती नको म्हणून

एक दिवशी सकाळी उठल्यावर भिंतीकडेला

डोके फोडून मर्डर झालेली
पाल पडलेली दिसली निपचित
किळस टाळत ती निर्भयपणे दिली टाकून मी केरातून

जिने मर्डर केला होता ती पाल
मला कर्मपूर्तीच्या समाधानात दिसली
मीही तिला समाधानातच दिसलो असेन
आता त्यांची भांडणे थांबतील या विश्वासामुळे
--- ००० ---

इव्हेंट

नुकतीच एक महाप्रचंड दिलासादायक बातमी पाहिली टीव्हीवर ! चीनने वुहानमधला लॉकडाऊन उठवलेला असून त्याचा आनंदी जल्लोष असा इव्हेंट साजरा केलेला आहे. पूर्ण वुहान शहर रंगीबेरंगी रोषणाईने झळाळून निघाले होते. पूर्वी २६ जानेवारीला मुंबईत असा आख्खे शहर प्रकाशमान करणाऱ्या रोषणाईचा इव्हेंट घडत असे -- तो पाहायला आख्खी मुंबई लोटत असे, त्याची आठवण झाली !

यामागे चीनचा प्रचंड आत्मविश्वास दिसतो. या इव्हेंटनंतर वुहानमध्ये वा चीनमध्ये कुठेही पुन्हा कोरोनाचा प्रादुर्भाव झाला तर लोक तोंडात शेण घालतील. ( पण, कदाचित तिकडे असे काही केले जात नसावे. ) यातला आणखी एक भाग असा आहे की कोरोनामुळे तिथे मृत्युमुखी पडलेल्या हजारोंचे दुःख अजून ताजे असताना असा इव्हेंट करावा का -- हा प्रश्न तिथे काहींना पडला असेलच. पण, त्याला अभिव्यक्ती देणे त्या मानवतावादी देशात कदाचित शक्य होत नसावे.

माणूस बुद्धिप्रामाण्यवादी असो की सश्रद्ध, आस्तिक असो की नास्तिक -- त्याला भावनिक इव्हेंट गरजेचेच वाटत असावेत. लोकशाही देशांत अशा बाबींवर फार तर मतभेद होऊ शकतात, इतकेच.

अगदी वैज्ञानिक दृष्टिकोणातून पाहिले तर काय गरज आहे असे काही साजरे करायची वा इव्हेंट निर्माण करायची ? की माणसाचे मन लक्षात घेऊन, कधी काय करावे याची काही आदर्श, बिनचूक रचना सांगता येईल ?
--- ००० ---

सामीक्षिक व्यायाम

प्रत्येकाची आवडनिवड वेगळी, मूल्ये वेगळी, निकष वेगळे -- त्यामुळे, साहित्यात अमुकच श्रेष्ठ असे म्हणण्यात काही अर्थ राहात नाही -- हे अनेकदा म्हटले जाते. इथले ज्ञानपीठ काय किंवा तिकडचे नोबेल काय, ते काही पूर्ण मानवजातीचे मूल्यनिर्णयन नसते. बाळ कोल्हटकरांना का देऊ नये या दोन्हींतला एखादा पुरस्कार, यावर माझ्या एका मित्राशी मी नगर ते पुणे या एस्टी प्रवासात चर्चा केली होती.

या एकूण ' मानवी हक्क ' पार्श्वभूमीवर एक वैचारिक व्यायाम सुचलाय. तो मी करणार नाहीय, हे आधीच सांगतो. व्यायाम असा -- नोबेल देताना जे सन्मानपत्र दिले जाते त्यात त्या त्या कवीचे वा लेखकाचे महत्त्व काय कशात आहे, हे सांगितलेले असते. एक प्रकारे ते निकषच असतात. ते समजा गेल्या पंचवीस वर्षांचे एकत्र करायचे आणि त्यातून काही मूल्यरचना सापडतेय का, ते पाहायचे. तसे काही सापडेलच. त्या मूल्यांप्रमाणे वा निकषांप्रमाणे आपले, इथले मराठीतले कुणी -- ज्या बिचाऱ्यांचे इंग्रजीत अनुवाद झालेले नाहीत -- असे कुणी सापडतात का, ते शोधायचे. तसे नसेल काही सापडत तर ती काय अशी वेगळी मूल्यरचना आहे याची चिकित्सा करायची.

एखाद्या तडफदार समीक्षकाने हा सामीक्षिक व्यायाम करून पाहावा, असे सुचवावेसे वाटते. अशा वैचारिक मंथनाचे निदान नावीन्य म्हणून तरी काही महत्त्व राहील, असे वाटते.

--- ००० ---

प्रदीप

हॉटेलच्या पायऱ्यांवरून
टप्प्याटप्प्याने खाली
वाहात येत होता रक्ताचा ओघळ
द्वारपाल तिसरीकडेच बघत होता
आपण त्याच पावली परत फिरलो

नको कटकट म्हणून आपण देश बदलला
तर विमानात माझा जिगरी बालमित्र भेटला
-- प्रदीप -- त्याने उंची गॉगल घातला होता
त्यानेच मला ओळखले
तुझे उपकार विसरणार नाही म्हणाला
आपण त्याचा अर्थ विचारला नाही
आपण घाबरलेलो होतो

जग हे एक गूढच आहे साले
असे म्हणून आपण विषय सोडून दिला

काही दिवस स्पेनमध्ये राहून
मग आपण इटलीला गेलो
आणि तिथून मग अमेरिकेला

--- ००० ---

रुक जाना ओ जाना हमसे दो बातें - Google Search
google.com

आधी आणि मग

मी कोणत्या तरी हॉलिवुड दिग्दर्शकाबाबत वाचले होते की तो हे आधी ठरवत असे की एक दृश्य स्टेडियममधले हवे, एक चर्चमधले हवे किंवा एक चित्रप्रदर्शनाचे हवे, वगैरे. मग त्याप्रमाणे ते कथा रचत. त्याच पद्धतीने, मला वाटते की देव आनंद रोड रोलर चालवतो, असे गाणे हवे, हे आधी ठरले असावे आणि मग, ते सगळे लक्षात घेऊन, हे गाणे, त्याची चाल आणि संगीत तयार झाले असावे. अशा उलट्या पालट्या पद्धती वापरून काही खास मजेदार सापडू शकते, हे मात्र खरे ! बघा -- चित्रपट, ' वॉरंट ' --

जादुई संबंध

जसे असायला हवे होते
तसे ते नव्हते
आणि उद्वेगाचे हे की
असणारही नव्हते कधीच

माझे एकच समूळ गाऱ्हाणे होते
प्राण गहाण टाकणारे

शांततेत दूरवर
रडणारे एक कुत्रे
कायमचे माझ्या शर्टावर
वाळत टाकलेले होते

मी तो शर्ट काढून फेकणे
आणि माझे रडणे थांबणे

यांच्यांत काय असा जादुई
संबंध होता
त्याचा नंतर मी कधीच
विचारही नाही केला
--- ००० ---

समूह

माझेही मन आहे समूहमनच
एक तर दिवा लाव

किंवा जळफळाट लाव
या दोन्हींची गरज नसलेला
समूह न सापडल्याने
ते एकाकी होते

मग कोणत्याही कारणांनी
एकाकी झालेली मने
त्याला आपली वाटतात

याचाही त्रासच तर आहे
हे समजून ते शांत होते

एकाकीपणा विरून जातो
--- ००० ---

जुने जाऊ द्या

१. समोर उपलब्ध असणारे तपशील आपल्या अर्धवट अकलेने तपासून, आपला सदोष तर्क वापरत निष्कर्षाप्रत पोचणे -- ही झाली जुनी, पारंपरिक, भोळसट अशी सत्यशोधक पद्धत. यांतले निष्कर्ष बरोबरच असतात, असे काही नाही.
२. निष्कर्ष कोणता हवा आहे हे आधी ठरवून त्याच्या पुष्ट्यर्थ उपयोगी असे तपशील जमवून इच्छित सत्यापर्यंत पोचायचे -- ही नवी, आधुनिक, वैज्ञानिक दृष्टिकोणयुक्त, अभिव्यक्तिस्वातंत्र्ययुक्त, विवेकी पद्धत. या पद्धतीतलेही निष्कर्ष बरोबरच असतील, असे काही नाही.

दोन्ही पद्धती वापरणारे प्रत्येक काळात असणार. बुद्धी ही माणसाची एक सिद्धी वा त्याला मिळालेला एक वर आहे, असे मानले तर भस्मासुराची आठवण ठेवावी, म्हणजे झाले !
--- ००० ---

आठवत

अडचण काहीच नाहीय
रंगीत भिंतींच्या
मोकळ्या स्पेसमध्ये
गरम काढा कपात
आणि वाफ
आणि किंचित ताप

आठवत बालपणीचा अंधार

अशाच तापासह
आणि त्याच वेळी
घरात निघालेला साप
सारवलेल्या
--- ००० ---

सिग्नल

अमूर्तात जसे विचार
तशाच मूर्तात वस्तू
स्टेशनवर थांबलेली गाडी
वा हिरवीगार मिरची

पण वस्तूची हालचाल
हवी असेल
तर सिग्नल
अमूर्तच लागेल
--- ००० ---

अपराध

स्वतःच्याच निर्लज्जपणाने
जेव्हा लज्जित होते मन
तेव्हा समजलेच पाहिजे
की कोणतेही विचार
निरर्थकच असतात

याला पाठिंबा म्हणून मग
चांगल्या विचारांचीही
लाज बाळगू लागावे
विचार नकोच असे म्हणत

विचारांचा अपराध
नष्टच व्हायला हवा

हाही आग्रह नकोय खरे तर
--- ००० ---

तरीही

कवितेतली कोणतीही वस्तू
अदृश्य होण्यासाठीच आहे
तर दारूच्या प्याल्याऐवजी
ढगांचा मोर का असू नये

मी फावल्या वेळात
एकटक पाहतो
एरवीही त्याशिवाय मला येतेच काय

तरीही लोक मला
अष्टावधानी म्हणतात
--- ००० ---

हीच एक संधी असे समजून, कोरोनामुळे घरी डांबले गेलेले जगभरचे अनेक पतिदेव आपापल्या पत्न्यांना पिटून काढत आहेत, अशी एक बरीच सविस्तर बातमी टीव्हीवर होती. त्यासाठी, हेल्पलाईन नंबर्स जाहीर करणे, पोलिसांना विशेषाधिकार देणे, हिंसा करणाऱ्या व्यक्तीला घर सोडायला लावणे, असे अनेक उपाय जगभर करावे लागत आहेत. आपल्याकडचे पतिदेव एक तर मुळातच पिचून, पेकाळून गेलेले असावेत किंवा धूर्त आणि डावपेची तरी असावेत किंवा मग इथल्या पत्न्याच जबाबदार आणि जिनियस असाव्यात. त्यामुळे, इकडे तशा फारशा बातम्या येत नसाव्यात.

पूर्वी एका युद्धाच्या वेळी इथे बरेच दिवस ब्लॅक आऊट होता -- त्यानंतर नऊ महिन्यांनी इथला जन्मदर वाढला होता. तसेच काही सर्जक वातावरण चालू असेल का इथे ? किंवा, याहून उच्च म्हणजे, परस्पर प्रेम हाच इथल्या संसारांचा पाया आहे, असे तर नसेल ?
--- ००० ---

वासलात

वासलात लावल्याप्रमाणे
शांतता खात्रीची समजणे
हे
धूळ पुसायचा कंटाळा
करत केलेली
टंगळगळ असते

ना धड चंद्र दिसत

ना भरती येत

--- ००० ---

3 Years Ago

एफबीने करून दिलेली हिंदीतली आठवण --

कोरोनाग्रस्त रुग्णाला बिनचूक ओळखण्याचे काम आता वासावरून कुत्री करणार आहेत. त्यासाठी ब्रिटनमध्ये कुत्र्यांचे ट्रेनिंग सुरू झालेले आहे. मानवहिताचे हे काम एका विशिष्ट जातीची कुत्रीच फक्त करू शकणार आहेत. कोरोना संशोधनातला हा नक्कीच एक महत्त्वाचा टप्पा ठरेल.

गप्पा

संध्याकाळच्या
न मारलेल्या गप्पा
रेंगाळत्या

नुसते म्हणणे
की व्हायला हवे
भयमुक्त

या किनाऱ्यावर
ते नाहीच घडणार
आणि नकोच आहे

आवाज नकोच आहेत
थांबायला आणि जखमा
भरून यायला

--- ००० ---

खचाखच भरलेले इटलीतले ४०-५० हजारांचे स्टेडियम. एक सनसनाटी फुटबॉल मॅच. करमणुकीची प्रचंड हाव आणि धुंदी. तिथेच झाला करोनाचा आगीसारखा फैलावता संसर्ग. कळलेही नाही की ही करमणुकीची धुंदीच आपल्याला मृत्यूची भोवळ आणणार आहे ! बुडाला चूड लागत असते तेव्हा बिचाऱ्या माणसाला काही कळत नसते, असे का होते, याचे संशोधन व्हायला हवे.

करमणुकीची धुंदी
धार्मिक जिद्द
उत्सवाचा उन्माद

पक्षीय अभिनिवेश
पार्ट्यांचा जल्लोष
सहलींची बेशुद्धी

हे सगळे लागणारच हो आयुष्यात !
नाही तर, जगणे म्हणजे काय मग ?
--- ००० ---

माझे एकटेपण

फिस्कटलेल्या विचारांनी
गेलो रस्त्यावर निर्मनुष्य
होत
तर माझे एकटेपण
विरून गेले

आता मी म्हणतही नाही
की मला घरी परतायचेय
--- ००० ---

01 April 2020
Today

Champra Deshpande shared a memory.

4 Years Ago
एफबीने करून दिलेली माझी आवडती आठवण --

5 Years Ago
मी टप्प्याटप्प्याने सांगत असतो, इतकेच --
मुझे सब मालूम रहता है --

केंद्र

माणूस महत्त्वाचा आणि व्हायरस कमी वा बिनमहत्त्वाचा, असे काही मानवकेंद्रित मूल्यनिर्णयन निसर्गात / विश्वात नाही. माणसाचा सापेक्षतावाद, वैज्ञानिक दृष्टिकोण, नोबेल पारितोषिके वा ऑस्कर ऍवॉर्डस, हे सगळे माणसाने रचलेले '

महत्त्व ' आहे. त्यामुळे, एकूणात हे सगळे घडण्याच्या सर्जक प्रक्रियेला कुणी देव म्हणत असेल तर म्हणो, पण, तो मानवी बुद्धीने नाही चालत, हे समजून घेतले पाहिजे. हे समजले तर ' आता वाचवायला का नाही येत देव ' वा ' देव असे दुःख निर्माणच का करतो ' वगैरे प्रश्नांतली हवा निघून जाते.

दोन दिवस जरा दुर्लक्ष झाले तर वस्तूंवर लगेच धूळ जमते. आहे ते सतत मातीत जात राहणे आणि नवे निर्माण होत राहणे हे चालूच असते. माणसाची बुद्धी ' सातत्य ' मानणारी असते. म्हणूनच, ' सगळे सतत बदलत असते ' हे बुद्धाने सांगितले. पूर्ण मानव, त्याच्या सर्व कर्तृत्वासह नष्ट झाला तरी विश्वाला काही फरक पडत नाही.

या कोरोनाच्या निमित्ताने, ' इथे काहीच मानवकेंद्रित नाहीय ' हे भान आले तर एकूण निसर्गप्रक्रियेतला एक महत्त्वाचा टप्पा पार पडला, असे मानवी बुद्धीनेच म्हणता येईल !

--- ००० ---

समोर

स्वतःलाच वाटणारे
स्वतःच्या यशाचे ग्लॅमर
अधिकच तीव्र करते
जगण्याची तर्री

हे नाही घडले तर
या भीतीने
पाठपुरावा होतो
धुंदीत हरवण्याचा

असणे सगळे कळत
दिसत जाणवत भासत
राहिले पाहिजे
समोर सतत

--- ००० ---

March 2020

March 30

मिनिटामिनिटाला समस्या निर्माण होतील, दिसतील, असा काळ आहे. त्या सर्व समस्या हाताळण्यासाठी देशात हजारो लोक आहेत. काही निवडून आलेले आहेत, काही नेमलेले आहेत. प्रत्येक समस्येवर आदर्शपणे काय केले पाहिजे हे फक्त तुम्हालाच माहीत आहे. त्या त्या जागांवरचे निर्णय घेणारे लोक समजा मूर्ख वा अर्धवट आहेत. शिवाय मनुष्यबळ, अर्थबळ, साधनांचा अभाव, अशीही अनेक कारणे असू शकतील. एका वेळी समजा एक हजार समस्या हाताळल्या जाऊ शकतात

आणि येतात समस्या समजा दोन हजार, तर अग्रक्रमांचे निर्णय घ्यावे लागतील. तेही कसे घ्यायला हवे हे समजा फक्त तुम्हालाच माहीत आहे -- पण, उपयोग काय ?

आहे त्या ठिकाणी तुम्हाला शक्य असेल ते चांगले आणि परिपूर्ण जरूर करा. पण, एक भ्रम दुरुस्त व्हायची गरज आहे. क्षणाक्षणाला विचलित होणे आणि प्रक्षुब्ध होणे म्हणजेच संवेदनशीलता, माणुसकी आणि प्रामाणिकपणा -- हे डोक्यातून काढून टाकायला हवे. बहुसंख्य लोक प्रामाणिकच आहेत, हे समजून घ्यायला हवे. सर्वांच्या कमीजास्त आकलनातून, बरोबर वा चूक असण्यातून आणि कार्यक्षमतेतूनच हे सगळे चालणार आहे. तुमच्या एकट्याच्या डोक्याने जग चालू नाही शकणार.

जो कर सकते हो वो करो मगर शांत रहो !
अन्यथा तुम्ही स्वतःच एक वाढीव समस्या व्हाल !
--- ००० ---

कालचा पाऊस --

माझ्या दोन नाती घरात बैठे बॅडमिंटन खेळताहेत. बाजूला ठेवलेल्या मोबाईलवर एकेक गाणे लावताहेत. मी जरा वेळ तिथे जाऊन बसलो तर म्हणाल्या की आता तुमच्या आवडीची गाणी सांगा. मी ' साथी न कोई मंजिल ' सांगितले ! ते सुरू झाल्यावर म्हणाल्या की असले नको, चांगली सांगा. मग त्यांना -- झुमरू, तारीफ करूं क्या, जंगली, छुपनेवाले, सपनेमे मिलती है -- अशी गाणी सांगितली ! ती आम्हा तिघांच्याही मते ग्रेट गाणी ठरली ! आता बास ! आता काही जेवणाचे बघू --

गर्दी

या गर्दीला
घरी पोचायचेय
हसत्या रडत्या बाळांसह

बाळांनो घरी पोचा
म्हणतेय घरची वृद्ध गर्दी

जिला ' सोडून द्यायला '
लागू शकते
साधनांअभावी
--- ००० ---

झी न्यूज ( हिंदी ) चॅनेलवर एका बुजुर्गांची मुलाखत चालली होती. मुलाखतकर्ती म्हणाली की या लॉकडाऊनमुळे दिल्लीची हवा खूप स्वच्छ झालेली आहे, त्यावर काय म्हणाल ? बुजुर्ग म्हणाले की खरेच आहे ! पण, माणसाचे काय दुर्दैव बघा -- अशा स्वच्छ हवेत त्याला मास्क घालून फिरावे लागतेय !

1 Year Ago
कानडीत झालेल्या ' ढोलताशे ' ची एफबीने दिलेली आठवण --

प्रत्येकच बातमी जेव्हा
ब्रेकिंग, धक्कादायक आणि महत्त्वाची
होऊ लागते तेव्हा
त्या विशेषणांचे अर्थच नष्ट होत जातात.

मोकळा वेळ म्हणजे
मनाला स्पीड न देणे

कंट्रोल

जगातली सर्व शहरे
जशी शांत आहेत
तसेच राहू द्यात अनावश्यक
माहितीचे साठे
अनुभव विचार आठवणी

जग कंट्रोल करेल
असे काहीच नाही जगात
हेच तर सांगताहेत पक्षी
--- ००० ---

१ एका देशात करोना रुग्णांची संख्या वाढल्याने, सर्वच रुग्णांना उपचार देणे अशक्य झाले आणि त्यामुळे, ६०-९० या वयोगटातल्या रुग्णांना मरणाला सामोरे जायला सोडून द्यावे लागले, असे कानावर आले. करोना रुग्ण हा श्वास घेण्यासाठी तडफडत असतो. व्हेंटिलेटर नसेल, उपचार नसतील तर तिथे दयामरणाची कायदेशीर अनुमती असते का ? आपल्याकडे अशी वेळ येणार नाही, येऊ नये, हे ठीक असले तरी, यावर काही तातडीचा विचार व्हायला हवाय का ?

२ मुंबईतल्या अनेक इस्पितळांची माहिती दिली जात होती त्यावरून उपलब्ध व्हेंटिलेटर्स सगळे सध्याच्या रुग्णांसाठी वापरात आहेत आणि एकही शिल्लक नाही, असे दिसत होते. हे अर्थातच भयानक आहे. सुदैवाने या बाबतीत एक चांगली बातमी आलेली असून, महिंद्र कंपनी लौकरच रुपये साडेसात हजारांना व्हेंटिलेटर्स उपलब्ध करून देणार आहे. त्यांचे हे फारच मोठे आणि महत्त्वाचे काम असून त्याबद्दल त्यांना धन्यवादच द्यायला हवेत.

Champralekhan

champralekhan.com

माझ्या सर्व लेखनाचे संगणकीकरण २७-०३-०३ ला पूर्ण झाले आणि माझ्या संकेतस्थळाचे प्रकाशन २८-०३-०९ ला झाले --

महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त घेतलेल्या खुल्या संकेतस्थळ स्पर्धेत या संकेतस्थळाला विभागून तिसरा पुरस्कार मिळाला.

कोरोना आणि ऍब्सर्डिटी

युवल नूह हरारी यांचा ‘ The world after corona virus ‘ हा लेख ‘ फायनान्शियल टाइम्स ‘ मध्ये आला होता. त्याचा छाया देव यांनी केलेला मराठी अनुवाद मला कायप्पावर, माझा मित्र अतुल पेठे याच्याकडून मिळाला आहे. त्या लेखाचा शेवट असा आहे – “ – प्रत्येक संकट ही एक संधी आहे. आपण आशा बाळगली पाहिजे की सध्याच्या रोगाच्या साथीमुळे मानवजातीस जागतिक मतभेदांमुळे उद्भवणाऱ्या धोक्याची जाणीव होईल. आता मानवतेने निवड करायची आवश्यकता आहे. आपण मतभेदांच्या मार्गावरून प्रवास करायचा की आपण जागतिक एकात्मतेचा मार्ग स्वीकारावा ? आपण मतभेद निवडला तर आताचे संकट लांबत तर जाईलच पण भविष्यात कदाचित आणखी वाईट आपत्तींना सामोरे जावे लागेल. पण त्या ऐवजी आपण जागतिक एकता निवडली तर ते केवळ कोरोना व्हायरसच नव्हे तर भविष्यातील सर्व साथीच्या आणि एकविसाव्या शतकातील मानवजातीला त्रास देणाऱ्या संकटांविरुद्धही विजय ठरेल. “

बोंबला ! जागतिकच मतभेद नकोत म्हटल्यावर इथल्या छोट्या छोट्या मतभेदांचे काय होणार हो ? आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्य ? इथले लेखक-कलावंत मरतील ना वेडे होऊन अभिव्यक्तिस्वातंत्र्याविना ! ये कैसे चलेगा ? म्हणजे हा विचारवंत एक प्रकारचा फॅसिस्ट वा कम्युनिस्ट म्हणून रद्दच करावा का ? तसे नको – पुढे जाऊ. याच लेखात युवालने एक वैज्ञानिक शक्यता व्यक्त केलेली आहे. ती अशी की देशाच्या आरोग्यस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी असे केले जाऊ शकेल की उदाहरणार्थ तुम्ही तुमच्या मोबाईल स्क्रीनला स्पर्श केला की त्या वेळचे तुमच्या शरीराचे तापमान आणि बीपी सरकारकडे नोंदले जाईल. याच पद्धतीने तुम्ही कुठे गेला, कुणाला भेटला याचीही सरकारला दखल घेता येईल. याचीच आणखी प्रगती म्हणून तुम्ही कशाने हसता, कशाने दुःखी होता, हेही सरकारला कळू शकेल. ( याच्या पुढचा वैज्ञानिक भाग म्हणजे तुम्हाला कशाचे काय वाटायला हवे, यावरही सरकारचे नियंत्रण येऊ शकेल ! ) आणि, अर्थातच, कोणताही सत्ताधारी हे करू शकेल, असे युवाल म्हणतो. आता, आपल्याकडे काही लोक असे आहेत की, सत्ताधारी कुणीही असो, विरोध करणे हेच त्यांचे जीवनकार्य आहे, असे ते मानतात. आयुष्यभर बोटे मोडत राहणे आणि कुत्सित-उपरोधिक बोलणे, हेच काम ते करत असतात. हे पाहता, एखाद्या रात्री समजा टीव्हीवर ‘ साहेबांचे ‘ भाषण झाले तर दुसऱ्या दिवशी पहाटे पोलिस जीवनकार्यवाल्याचे दार ठोठावू शकतात.

जीवनकार्यवाला – काय आहे ?

पोलीस – काल सायबांचं भाषण झालं टीव्हीवर –

जीकावा – बरं, मग ?

पोलीस – तुम्ही चिडचिड केली, कुत्सित बोललात –

जीकावा – माझ्या मनात मी काही पण करीन –

पोलीस – ते ठीक हो – पण त्यासाठीच सरकारी निमंत्रण आलंय तुम्हाला – आमच्याबरोबर चलावं लागेल –

जीकावा – जुलूम आहे हा –

पोलीस – ते ठीक आहे हो – तुमच्याकडं काही पुरस्कारबिरस्कार असले तर घ्या बरोबर – ते वापस करावे लागतील – आणि मग नंतर तुम्हाला आमच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा अनुभव मिळेल –

-- हे सगळे, विज्ञान आणि माणसाची बुद्धी यांमुळेच तर घडणार. कुणी म्हणेल की मग ‘ विवेका ‘ चे काय ? त्यावर एकच उत्तर मिळू शकेल – सुरळी करायची !

तर ही शक्यता सांगून युवाल म्हणतो की व्यक्तिगत गोपनीयता आणि आरोग्य हे दोन्ही नागरिकांचे अधिकार असायला हवेत. यांतली एकच निवड करायची झाली तर सामान्यतः गोपनीयतेचा त्याग करायला लोक तयार होतील. आणि लेखाच्या शेवटी तो काय म्हणतो ते वर दिलेच आहे. अलगतावादी राष्ट्रवाद की जागतिक एकात्मता यांतून माणसाला निवड करावी लागेल, असे तो म्हणतो.

माझे अभिव्यक्तिस्वातंत्र्य वापरायचे झाले तर हा विचारवंत गोंधळलेला आहे, असे मी म्हणेन. विचारवंत जेवढा मोठा तेवढा तो अधिक गोंधळलेला असणार, हेही म्हणून ठेवतो. कारण सरळ आहे – जागतिक एकात्मता – मतभेदहीन – शक्य असेल तर गोपनीयतेचा प्रश्न कशाला शिल्लक राहील ? मग वर्चस्वासाठी जुलूम करायची वृत्तीच संपुष्टात नाही का येणार ?

विचारवंताला बुद्धीचे प्राबल्य टिकवणे महत्त्वाचे असते. बुद्धीने तो खूप आदर्श विचार मांडू शकतो. पण, त्या बाबतीतल्या मूलभूत प्रश्नाला तो बगल देतो. माणूस ' मतभेदहीन ‘ जगू शकतो का, असा प्रश्न तो विचारत नाही. तसा तो नसेल जगू शकत तर का नाही – हे विचारावे लागते. आणि ते जाते ज्याला आध्यात्मिक म्हणतात त्या क्षेत्रात. बुद्धिमंतांना ते कसे चालेल ? माणूस तडफडून मरू दे कोरोनाने पण, नुसते आदर्श विचार मांडत राहायचे, बास !

पहले ऍब्सर्डिटी समझ लो भैया, बाद में बाकी सब !

--- ००० ---

नाग

लहानपणी मी एक पौराणिक चित्रपट पाहिला होता. त्याची कथा नीट आठवणे आता शक्य नाही आणि त्याची गरजही नाही. तर त्यात एक नाग राजाला चावून मारणार हे राजाला माहीत असते. राजा पूर्ण बंदोबस्त करतो आणि राजवाड्यात सेफ राहतो. तो म्हणतो, " मी हुकुमशाहीवादी प्रतिगामी असलो तरी अंधश्रद्ध नाहीय -- मी बुद्धिप्रामाण्यवादी आहे. पूर्ण काळजी घेतलीय. अब कुछ नही हो सकता ! " पण, राजा झोपलेला असताना, त्याच्या शेजारी ठेवलेल्या फळफळावळांच्या तबकातल्या सफरचंदातून तो नाग बाहेर येतो आणि राजाला चावतो ! टाळ्यांचा कडकडाट करत लोक !

तेव्हा तो अंधश्रद्ध चमत्कार वाटे, पण, आता च्यायला तथ्य वाटते त्यात ! हो सकता है ! नम्र राहू या, ' मला काही नाही होणार ' अशी मस्ती नको. आता आपण फक्त आपल्याला आणि आपल्या प्रियजनांनाच जबाबदार नसून पूर्ण मानवजातीला जबाबदार आहोत. हा करोना जाईलही काही दिवसांनी, पण, या निमित्ताने सुरू झालेले जगण्याबाबतचे सर्वांचे चिंतन चालू राहो, हीच सदिच्छा !

--- ००० ---

आपले आणि परके

आपले साहित्य वा साहित्यशास्त्र हे आपल्या परंपरेतून विकसित होत आले नाही -- आपण परभृत होत गेलो -- ही आपली एक त्रुटी आहे, अशी मांडणी केली जाते. आता, हे ओळखून, कुणीतरी तशी मांडणी करत आणली पाहिजे, अशी अपेक्षाही व्यक्त होते. माझ्या आठवणीप्रमाणे सुधीर रसाळ, कै. दिलीप चित्रे आणि कै. माजी पंतप्रधान नृसिंह राव यांचे असे मत आहे. मला हे मुळीच पटत नाही. लेखक वा कवी वा समीक्षक हा अमुकच प्रकारच्या प्रभावांनी युक्त असला पाहिजे, याची मूल्यात्मकतेसाठी गरज नाही. विज्ञानप्रसार, फोफावते तंत्रज्ञान आणि विक्राळ शहरीकरण आणि हे सगळे जागतिकिकरण आणि प्रचंड प्रभावी माध्यमे यांसह ! यात अमुक एका परंपरेचे शुद्धीकरण राहणारच नाही. पूर्ण मानवजात एकत्र जगते, असेच याकडे पाहावे लागेल. अस्तित्ववाद, अतर्कवाद वा उत्तर-आधुनिकता हे सर्व ' परके ' आहे अशा संकुचित विचारांचा उपयोग नाही. इथले आणि परके सगळे एकत्र येत राहणार. नुसते अनुभवक्षेत्र वा प्रभावक्षेत्र कोणते आहे यावर साहित्यमूल्य ठरू शकणार नाही. मग पुन्हा, धारावीत आयुष्य गेलेल्यांनीच कविता लिहावी -- मध्यमवर्गीय काय लिहिणार -- असले खुजे विचार महत्त्व पावू शकतात. अनुभवसाठा वा क्षेत्र कोणते, किती आहे ही कलेत वा साहित्यात महत्त्वाची बाब नसते. ते मर्यादित प्रभावक्षेत्र भेदून लेखक वा कवी पाहू शकतो का, हे महत्त्वाचे असते. कवीच्या प्रभावक्षेत्राची अभिव्यक्ती महत्त्वाची नसून त्याला त्या मर्यादित प्रभावक्षेत्राची रचना पूर्णपणे पाहता येण्याचे भान असणे महत्त्वाचे असते. आणि हे आपल्या वा परक्या वा कुठल्याही कला-साहित्य क्षेत्राबद्दल खरे असते. परंपरेचा वा अमुकच साच्याचा बडेजाव माजवणे हे मौल्यवान कलेला अडथळा ठरणारे असते.

--- ००० ---

विचार

निर्मनुष्य शांततेत
करोना अद्वातद्वा विचार
खाली पडणारे
कृतिहीनतेच्या
अथांग पृष्ठभागावर

जाणवतील कुणाला
--- ००० ---

कवितेने करायची कामे -- ( निमित्त – कवितादिन )

स्वप्नांना अभिव्यक्ती देणे
सत्ताधाऱ्याची स्तुती करणे
सत्ताधाऱ्याला विरोध करणे
कालबाह्य परंपरा व रूढींना विरोध करणे
अंधश्रद्धांना विरोध करणे

समता आणणे दुःखांचे अग्रक्रम ठरवणे
१०० वर्षे जगलेल्याची स्तुती करणे
देशभक्ती वाढवणे प्रार्थना करणे
दलित शोषित वंचित यांची दुःखे मांडणे
सुखदुःखे एकाकीपणा भीती व लैंगिक भावना व्यक्त करणे
निसर्ग मुले मातापिता मित्र यांबद्दल प्रेम व्यक्त करणे
प्रेयसी व प्रियकर यांबाबत प्रेम व्यक्त करणे
स्फूर्तिदायक व उत्साहवर्धक कार्य करणे
जाहिराती करणे मंगलाष्टके करणे भक्ती करणे
न्यायाची चाड व अन्यायाची चीड व्यक्त करणे
एक सत्ता उलथवून दुसरी येण्याला मदत करणे
क्रांती करणे मूल्यऱ्हास व्यक्त करणे
अद्वैतभाव आणि वैश्विकता व्यक्त करणे
आस्तिकांची टिंगल व नास्तिकांचे गुणगान करणे वा उलट
वैज्ञानिक दृष्टिकोण व धर्मनिरपेक्षता यांचे संवर्धन करणे
माणुसकी म्हणजे काय ते सांगणे
( कसला ते माहीत नसले तरी ) शोध घेणे
हिंसेचे समर्थन वा तिला विरोध करणे
इतिहासाचे गोडवे गाणे स्वातंत्र्याची महती सांगणे
आपापल्या विभूतींत रमून राहणे
प्रेम आणि बंधुभाव यांचा गौरव करणे वगैरे
--- ००० ---

They also serve who only stand and wait.
जे केवळ थांबतात आणि वाट पाहतात त्यांचेही योगदान महत्त्वाचे असते.

-- प्रख्यात इंग्लिश कवी जोहन मिल्टन याची ही एक जगप्रसिद्ध ओळ आहे. ती सध्या आठवणे आणि तसे वागणे हे महत्त्वाचे आहे. कोरोनाशी लढण्यासाठी काहीजण अथक परिश्रम करत आहेत याबद्दल अर्थातच आपण सगळेच कृतज्ञ आहोत. पण, त्याचबरोबर हेही लक्षात घ्यायला हवे की जे घरी थांबलेत, गर्दी टाळताहेत आणि ठिकठिकाणी स्पर्श होणे टाळून त्या विषाणूंच्या फैलावाला अटकाव करताहेत तेही तितकेच महत्त्वाचे काम करत आहेत. ' बोअर झालो ' वगैरे म्हणत स्वतःचे कौतुक करायची ही वेळ नाही. शांत राहणे आणि आपली वर्तणूक त्या विषाणूला उपयोगी पडू नये याची काळजी घेणे हे महत्त्वाचे आहे. एखादे पूर्ण शहर वा कोणतीही गर्दीची ठिकाणे जर काही तास शांत, अस्पर्श राहू दिली तर हे शत्रुवर्य कोरोनामहोदय आपोआप मरून जातील.
--- 000 ---

पडणे

कमांडो कारखानदार
अर्थशास्त्री नेता
यांतले कुणीही फेल गेले
तर बाजार पडतो

हे मान्य असलेल्या लोकांच्या
कवी खिजगणतीतही नसतो

एकेका गोष्टीचे पडणे महत्त्वाचे
पूर्ण जगाचे नाही
--- ००० ---

कृष्णधवल --

अत्यादरणीय डॉ. ह. वि. सरदेसाई

यांच्याकडे पूर्वी माझेही जाणे घडले होते. माझ्या त्या वेळच्या तब्येतीच्या त्रासाबरोबरच मी त्यांना, " मन कुठे असते ? मानसिक ताण येतो म्हणजे काय ? ईगो कुठे असतो ? " -- असे अप्रस्तुत प्रश्नही विचारले होते. न रागावता स्मितपूर्वक त्यांनी तो संवाद होऊ दिला होता ! त्यांच्या स्मृतीस सादर अभिवादन !

आकार, पोत आणि छायाप्रकाश --

फूल

एक पत्रोत्तर
कमीत कमी शब्दांचे
अनेक मार्ग ओपन ठेवणारे
एखाद्या जुन्या
टेबलावर सांडलेला चहा
पुसून घ्यावा तसे

आपल्या कुंडीतल्या झाडाला
आटोपशीरपणाचे
फूल आणणारे
अनिश्चित भविष्याचे
--- ००० ---

मूक

कधी शंभर बाजूंचे अर्थ असतील
कधी शून्य – अशी असेल ही कविता
सूर्य उगवो की न उगवो अशी

सगळेच दिसत राहिल्याने
नेहमीच मूक असणारी
--- ००० ---

हात

पुढाऱ्यांनी अनुयायांचे
हात घेतले काढून
एकीसाठी उंचावायला
लोकशाहीत
शक्तीचे स्वातंत्र्य
उपभोगण्यासाठी
--- ००० ---

पुन्हा काल तसाच काला करोना ढग -- चार फोटो --

या सायकलला नजर लागूच नाही शकत --

शत्रू

मास्क तयार करणाऱ्या
सरकारी संस्थेला
त्यांनी एका ऑल टाईम
विभूतीचे नाव दिले
आणि सॅनिटायजरवाल्या
दुसऱ्या संस्थेला दुसऱ्या
आणि मग ते म्हणाले
हर हर महादेव

पण शत्रूच्या मनात
शत्रुत्वच नव्हते

--- ००० ---

स्टेशन

जेवताना गाणे लावले
म्हणून मारामारी झाली
कुणा दोन नागरिकांत
तिचे पडसाद
उमटलेले सूर्यावर
जाणवलेही नाहीत
महाराजांना

त्यांना झालेल्या
ओकारीतून ओसंडला
चंद्रप्रकाश
तेव्हा स्टेशन सुने होते
--- ००० ---

पुस्तक

माझ्याजवळ
एक पुस्तक आहे
त्यात घडून गेलेले
डावपेच आहेत

एकजण म्हणतोय
ते खोटे आहे सगळे
कारण आज
दुपारी साडेबारा वाजता
टक्क अंधार पडणार आहे
--- ००० ---

दुःस्वप्न

जाणीवपूर्वक फोन लावला
माझाच आटापिटा ऐकू आला
हे तर नकोय

बंद केला
तरी तेच

दुःस्वप्नच म्हणायचे हे
दुसरे काय
--- ००० ---

एकामुळे एक

एकामुळे एक घडणे
तुम्हाला समजते
तुम्ही म्हणा
करोनामुळे पडला
शेयरबाजार

मला नाही समजत
ते दडवण्यासाठी
मी फक्त हसतो
--- ००० ---

' करोना ' आता इतका बसलाय डोक्यात की लोक आता ' करो ना प्यार है ' असे गाणे गुणगुणू लागलेयत !

माझ्याऐवजी

आता मी खूप छोट्या
लिहीन कविता
बुद्धाऐवजी त्याचा पक्षी
बोलावा तशा
फक्त
माझ्याऐवजी मीच बोलेन
--- ००० ---

" सध्या ऑक्सिजनवर आहे -- म्हणजे इस्पितळांना ऑक्सिजन पुरवण्याच्या कामावर हो -- "

खर्च आम्ही केलाय या दरवाजावर आणि फुकटात फोटो काढताय तुम्ही
-- असे नाही म्हणणार कुणी, असे वाटते --

संध्याकाळी मुलेमुली आल्या की रपेटी सुरू --

मन जर असे सुघटित असेल तर काय होईल ?
-- सरळ आहे -- आपण आहोत हे त्याला कळणारच नाही --

रंगामुळे निष्कारण आनंदी वाटत राहते साले --

वैज्ञानिक कारणे असतीलच त्याची पण संध्याकाळी अचानक आलेला असा लांबलचक काळा ढग माणसाच्या मनाला जरा घाबरवतोच --

'

देवळात जाऊन येण्याला कुणी नको म्हणत नाही -- जाऊन निवांत बसता येते थोडा वेळ -- नवे डावपेच रचता येतात --

उमदा पण एकाकी --

बदक खरे असो की खोटे -- असते निरागसच --

वस्तुचित्र --

दोन वारली चित्रे --

तीन निरर्थक फोटो --

कर्तव्यतत्पर पण काळवंडत चाललेले आयुष्य --

औषधांच्या दुकानात --
" तुम्ही होळी सेल नाही लावला का ? "
" आज रंग ठेवलाय लावायला -- लावू का ? "
" धन्यवाद ! "

हा एक एकपात्री दीर्घांक आहे -- जो नीट करेल तो नटसम्राटच !

पुणे दर्शन --

होळी पौर्णिमेनिमित्त काही चंद्रखेळ --

कला, साहित्य, ज्ञान.

प्रमाणभाषा घडवण्यात ब्राम्हणांचे खूप मोठे योगदान आहे आणि जातिनिहाय विचार करता अजूनही त्यांचेच तुलनेने या भाषेवर अधिक प्रभुत्व आहे, हे नाकारता येणार नाही. बदलणार कसे हे वास्तव ? मनात लाख ब्राम्हणद्वेष असला तरी या भाषेचे करणार काय ? कोर्टात, विद्यापीठात, सरकारी कामात मराठी असायला हवी, असे आपण म्हणतो, ती कोणती मराठी ? भारतात मान्यताप्राप्त ज्या चौदा भाषा आहेत त्यांत मराठीही आहे – ती कोणती ? ती असते सर्व बोली भाषांसह असणारी प्रमाण मराठी. ब्राम्हण-वर्चस्वाचा न्यूनगंड आणि त्यातून निर्माण होणारा द्वेष यांमुळे प्रमाण भाषेची चेष्टा, टिंगलटवाळी आणि हेटाळणीही होताना दिसते. ‘ शब्दांची रोजनिशी ‘ हे नाटक बघा. सतत अनेक बोली भाषा मरत चालल्या आहेत, ही एक महत्त्वाची समस्या म्हणून आलीय त्या नाटकात. यावर खरे तर सर्वांनीच आपुलकीने प्रमाण मराठी आत्मसात करणे आणि काळाच्या ओघात तीत सर्व बोलींचा लहेजा, मसाला, श्रीमंती मिसळत जाणे, हाच योग्य उपाय आहे. आज, आहे या परिस्थितीत एखाद्या बोली भाषेत टीव्ही मालिका वा चित्रपट काढला समजा तरी पाहणार किती लोक ? तसा प्रयत्न केला तर मराठीत सबटायटल्स ( अनुवादित संवाद ) द्यावे लागतील, हे समजायला हवे. म्हणजेच, करमणुकीचा आणि व्यावहारिक उपयोगाचा सगळा कारभार प्रमाण मराठीतूनच चालणार, हे स्पष्ट आहे. आणि घडत आलेल्या परिस्थितीप्रमाणे अजून तरी, प्रमाण भाषा ही ब्राम्हणांचीच मक्तेदारी राहात आलेली आहे. या वास्तवात जातवादातून विचार करत, ब्राम्हणांचे वर्चस्व नष्ट व्हावे, अशी नुसती इच्छा करून उपयोग काय ? व्यवस्थेत राहून व्यवस्था बदलण्याच्या गप्पा मारणाऱ्यांनी प्रमाण मराठी ही ‘ आपली ‘ मानल्याशिवाय ते कसे घडणार ? ज्ञानाच्या अनेक क्षेत्रांत आता सर्व जातिजमातींचे लोक नुसतेच पुढे येत नसून अत्युच्च प्रावीण्यही संपादन करत आहेत. भाषेच्या बाबतीत ते का नाही घडू शकणार ? की सर्व बोली एकत्र घेऊन भाषेचे एक नवेच व्याकरण आणि त्यातून एक पूर्णतः नवीच प्रमाणभाषा तयार करायचा विचार आहे ? आहे ती मराठी ज्ञानभाषा व्हायला हवी, असे नुसते म्हणतोय आपण गेली काही वर्षे तरी ते घडत नाहीय. मग ही नवी प्रमाणभाषा घडवू शकणारे कोण आहेत ? ब्राम्हणेतर जातींतल्या लोकांना जोवर प्रमाणभाषा हा जगण्यातला अडथळा वाटतोय तोवर हे कसे घडू शकेल ? सर्व जातींतल्या लोकांनी प्रमाण मराठीवर प्रभुत्व मिळवत गेले पाहिजे, हाच उपाय दिसतो. जातिद्वेषाचे राजकारण करणाऱ्या गाढवांना हे कळणार नाही, पण, कला, साहित्य आणि ज्ञान यांच्या क्षेत्रांत ज्यांना काम करायचे आहे त्यांना हे समजून घ्यावेच लागेल. या सर्व क्षेत्रांतले ब्राम्हणांचे निपुणत्व नष्ट करायचे आहे, अशा क्षुद्र विचाराने हे घडू शकणार नाही. जात के परे सोच होनी चाहिये.

असले जातीय विभागांचे फडतूस लिहिण्यात वा मी ब्राम्हण आहे म्हणून ब्राम्हणांचे श्रेष्ठत्व सांगण्यात मला इंटरेस्ट नाही. आणि भाषेचे म्हणाल तर मी भाषातज्ज्ञही नाही. तरीही, फालतू, निरुपयोगी संघर्षात आपली सर्वांचीच शक्ती वाया जाऊ नये म्हणून मला समजेल तसे हे लिहिले आहे.

--- ००० ---

नाटकघर, पुणे निर्मित
।। शब्दांची रोजनिशी ।।
लेखक -- रामू रामनाथन, अनुवाद – अमर देवगावकर, रंगावृत्ती-प्रकाशयोजना-दिग्दर्शन – अतुल पेठे,
कलाकार – केतकी थत्ते आणि अतुल पेठे.

कालच इथे एका डच चित्रकाराचे एक उद्धृत मी विचारार्थ दिले होते – ते असे होते --
“abstract art is not the creation of another reality but the true vision of reality.”
-- Piet Mondrian

अमूर्तता म्हणजे दुसऱ्या वास्तवाची निर्मिती नव्हे तर वास्तवाकडे ' सत्य पाहणे ' –

ते या नाटकाबद्दल लिहिताना प्रस्तुत वाटते. या नाटकाची सुरुवातच एका अमूर्त चित्रफितीने होते. मी प्रथमच अशी चित्रफीत पाहिली आणि ती अशी अत्युत्तम ! नाटकाच्या आशयाला समृद्ध करणारी अशी ही बाब आहे. हे नाटकही अमूर्त शैलीतच लिहिलेले – सादर केलेले आहे. वास्तवातल्या अनावश्यक भागांची काटछाट करून आवश्यक तेच धारदारपणे सादर करणारे असे हे नाटक आहे. हे नाटक नुसते अमूर्त नसून निकॅनोर पाराच्या न- कवितेप्रमाणे ( Anti poetry ) नाटकाचे बरेचसे परंपरागत स्वरूप टाळणारेही आहे. हे ना व्यक्तिगत भावनिक उद्रेकांचे नाटक आहे ना एखादी वास्तवातली कथा सांगणारे. याला घटनाप्रक्रियेची सलगताही नाहीय. अमुक अशी ही दोन पात्रे आहेत सतत समोर हीच यातली सलगता. उपरोध, विनोद, शोकात्मता हे सगळे एकत्र पेलणारे असे हे एक वजनदार नाटक आहे. आणि त्याच वेळी निरर्थकतेकडे झुकणारे म्हणून हलकेफुलकेही.

भाषांचा मृत्यू हा या नाटकाचा पायाभूत विषय आहे. जगातले सगळे शिक्षणतज्ञ जरी मातृभाषेतून शिक्षण होण्याचे महत्त्व सांगत असले तरी शेकड्यांनी अनेकांच्या मातृभाषा मरत जाणे. व्यावहारिक – पोटापाण्याचे उपयोग नसतील तर भाषा मागे पडत जाते, हे आपण मराठीच्या बाबतीतही पाहात आहोत. इंग्रजी माध्यमाचे वेड प्रचंड वाढलेले आहे. भारतातल्या निवडक चौदा भाषांपैकी असणाऱ्या मराठीपुढे जर हे आव्हान आहे तर बाकीच्या छोट्या आणि कमी लोकसंख्येत बोलल्या जाणाऱ्या भाषांचे काय ! भाषा वाचवल्या पाहिजेत असे गळे काढून उपयोग काय ? पण, हे नाटक म्हणजे नुसताच एक भाषाविनाशाचा माहितिपट नाही. ही प्रत्यक्ष मानवी जगण्यातली एक महत्त्वाची समस्या म्हणून इथे पाहिली जाते. आणि भाषा हे संपर्काचे, अर्थांच्या देवघेवीचे साधन आहे हे अधोरेखित करत एक स्त्री आणि एक पुरुष अशी दोन पात्रे इथे आहेत. दोघेही घटस्फोटित असून पुनर्विवाहासाठी चाचपणी करण्यासाठी ते एकत्र आलेले आहेत. त्या स्त्रीला एक बाळ असून ते अमुक भाषेचे म्हणून जन्मलेय. त्याला वाढवणे, त्याचे संगोपन करणे हे अध्याहृत आहे. त्यांच्या बोलण्यात, वेगळे अनाकलनीय शब्द, शब्द न आठवणे, आठवले तर नीट उच्चारता न येणे, मनात आहे त्यापेक्षा वेगळेच काही बोलले जाणे, कधी नुसतेच विचित्र आवाजांनी संपर्क साधण्याचे प्रयत्न करणे – असे असंख्य अडथळे आहेत. शब्द, भाषा, अनेक लेखक हे विरत, लुप्त होत चाललेले आहेत आणि या अशा वातावरणात दोन व्यक्ती एकत्र येण्याचा, प्रेमाचा प्रयत्न करताहेत.

केतकीचा अभिनय आणि गाणी अत्युत्तमच आहेत. अतुलनेही अक्षरशः कमाल केलेली आहे. त्याचा वाचिक ( म्हणजे बिघडत चाललेल्या वाचेचा ) अभिनय म्हणजे हे नाटक आपल्या नसानसांत पोचवणारी बाब आहे. बाकी तांत्रिक अंगेही उत्तमच आहेत.

शब्द म्हणजे भूतकाळ – त्याला वाळवी लागत चाललेली आहे – तो नष्ट होत चाललेला आहे. हे या नाटकातल्या समस्येचे तत्त्वज्ञानात्मक अंग आहे. जे. कृष्णमूर्ती म्हणतात -- We live by words and words become our prison. – आपण शब्दांनी जगतो आणि शब्द आपला तुरुंग बनतात. आता शब्दांची ही एक वेगळीच समस्या आहे. शब्द तर हवेतच पण ते परिपूर्ण नसणे, विदीर्ण असणे आणि वेगवेगळे तुरुंगही असणे. – या सगळ्या अवस्थेचे भान हे नाटक आपल्याला देत जाते. मग जुळते का त्यांचे लग्न, मग त्यानंतर ते जगतात का आनंदात – अशा प्रश्नांची कथा सांगणारे हे नाटक नाही. म्हटले तर ते आपल्या मनांची आणि मानवी संबंधांची कथा सांगतेय. एखादी भूमिका घेऊन उत्तर देता येईल किंवा निराकरण करता येईल असा हा प्रश्न नाही. किंबहुना अमुकच एक बौद्धिक उत्तर नसल्याने जागरूकतेने भान घेत शहाणे व्हावे, अशी इथे मागणी आहे.

कलेतून परिपक्वता निर्माण करणारे हे नाटक मराठीत सादर होणे, हे खूपच महत्त्वाचे काही घडते आहे !
या एकूण टीमला धन्यवाद !

--- ००० ---

मन म्हणजे भूतकाळाचा कडेकोट तुरुंग --

अमूर्तता म्हणजे दुसऱ्या वास्तवाची निर्मिती नव्हे तर
वास्तवाकडे ' सत्य पाहणे ' --

सावल्यांचे प्रकार -- ठळक, कमी ठळक, फिकट, अधिक फिकट --

आमच्या सोसायटीतर्फे काही झाडे लावण्यात आली होती -- त्यांतले माझ्या कै. आईने लावलेले झाड आणि त्याची खाली पडलेली फुले --

प्रकाशथवा --

मोठ्या कॅमेऱ्यातून छोटा सेल्फी --

सुखाशा --

आकाशाची नक्षी ---

अमिताभ बच्चन आणि मी

मराठीत ' एबी आणि सीडी ' या नावाचा एक चित्रपट येतो आहे. त्यातले एबी म्हणजे अमिताभ बच्चन हे पात्र स्वतः अमिताभ बच्चन साकारत आहेत. आणि दुसरे सीडी म्हणजे चंद्रकांत देशपांडे हे माझ्या नावाचे पात्र विक्रम गोखले साकारत आहेत. त्याच नावाचा मी प्रत्यक्ष उपलब्ध असताना असे त्यांनी का केले असावे, ते सोडून देऊ. विक्रम गोखल्यांना ती संधी मिळालीय याचे दुःख नाही. पण, केला विचार की बाबा माझ्या नावाचे जे पात्र आहे ते समजा मीच साकारले असते तर काय झाले असते ? अमिताभ बच्चन कितीही व्यावसायिक यशस्वी असले तरी माझी प्रायोगिकता त्यांच्यावर हावी झाली असती आणि तो सिनेमा दणक्यात आपटला असता ! म्हणजेच, व्यावसायिकता म्हणजे ' मिळवणे ' आहे तर प्रायोगिकता म्हणजे ' घालवणे ' आहे. प्रायोगिकता म्हणजे ' अहो पंडितजन । तुका टाकावा थुंकोन ।। ' ! तुम्ही म्हणून जे काही आहात ते सगळे थुंकून टाकणे ! म्हणूनच, ती माझी भूमिका मलाच दिली असती तर अमिताभ बच्चन यांनी त्यांची भूमिका नाकारून यशस्वी माघार घेतली असती ! माघारच पण ' यशस्वी ' !

ती माझ्या नावाची भूमिका नेमकी काय आहे ते माहीत नाही -- उगीच आपली निरर्थक गंमत, असे समजा ! म्हणजे प्रायोगिकच ! व्यावसायिकला कणभरही निरर्थकता नाही चालणार ! पटतेय का ?

--- ००० ---

किंवा हा --

किंवा हा बघा --

कोरोनामुळे, हस्तांदोलन वा मिठी मागे पडून भारतीय ' नमस्ते ' जागतिक होण्याची शक्यता --

एका कोनातून मनाचे भाग --

आधी मतभेदांचे विषय, मुद्दे ठरवा; मग समन्वय समितीकडून त्यांच्यावरची कॉमन मिनिमम मतप्रदर्शने ठरवून घ्या आणि मग बोला --

छप्परे --

आठवणीचा आधार --

विचार म्हटल्यावर सगळे येणार -- नैतिक अनैतिक अपराधी भावाचे न्यूनगंडाचे अभिमानाचे विवेकाचे अविवेकाचे आनंदाचे सुखाचे उदासीनतेचे नैराश्याचे धैर्याचे भीतीचे मस्तीचे द्वेषाचे माघारीचे लैंगिकतेचे हिंसेचे सूडाचे वगैरे वगैरे वगैरे असे सगळेच -- अमुक नको वा तमुक चालेल असे कसे म्हणता येईल ?

काळोख आणि सावल्या यांच्या प्रभावात असणारा
एक स्वघोषित कवी --

मोरबे धरणाची भिंत आणि तटस्थ निसर्ग --

छाया, प्रकाश, उंची, खोली, अंतर, रंग --

वेडा घोटाळा ( दोन अंकी नाटक ).

पीडीए ची निर्मिती आणि दिलीप वेंगुर्लेकरांचे दिग्दर्शन. प्रयोग खणखणीत वाजणार याची खात्री होतीच. त्यात, चार पोलीस पात्रे ! त्यामुळे आणखीनच दणक्यात जबरदस्त ! दारिया फो च्या नाटकावरून वेंगुर्लेकरांनीच केलेले हे रूपांतर. एकूण पोलीस स्टेशनात घडणारे पूर्ण नाटक. आवश्यक तेवढे शाम भुतकरांचे उत्तम नेपथ्य. अथर्व भास्कर यांची उत्तम प्रकाशयोजना आणि रोहन फडके यांचे अगदी योग्य असे उडाणटप्पू पार्श्वसंगीत. सर्वांचाच अभिनय उत्तम – आशुतोष नेर्लेकर, योगेश कुलकर्णी, सारंग जोशी, संगीता डोंगरे-कुलकर्णी, यशवंत कुलकर्णी आणि प्रमुख भूमिकेत दिलीप वेंगुर्लेकर – असा एकूण तडफदार संच. नाटकाला गुन्हेगारी आणि पोलीसजग यांचा माहोल असल्याने सतत सनसनाटीपणा टिकवत चाललेला अजब प्रकार. एक रेल्वे कर्मचारी अतिरेकी म्हणून पोलिसांनी ताब्यात घेतलेला असताना तो त्या पोलीस

स्टेशनातूनच खाली उडी मारून आत्महत्या करतो – या विषयाभोवती फिरणारे हे नाटक. त्या गुन्ह्याच्या सत्याहून प्रखरपणे आपल्या जगण्यातल्या सत्याला उघडे पाडणारे !

या नाटकाचे इतर तपशील इथे सांगणार नाही. ते नाटक पाहता पाहताच समजत जाणे इष्ट. तर्क, वितर्क, कुतर्क, तपशीलांची केली जाणारी वाकवावाकवी, खोटे सत्य उभे करण्याचे प्रकार, आक्रमकता आणि शेपूट घालण्याचे प्रकार – असे सगळे जणू वास्तवाच्या बाहेरून आपल्या भानावर आदळत राहते. खूप खोलात चालल्याचे भासत असताना एकूणच उथळपणाचा अनुभव येणे, हे एक या नाटकाचे भारी वैशिष्ट्य आहे. म्हटले तर वास्तववादी पद्धतीने चालणारे हे एक अप्रतिम असे ॲब्सर्ड नाटक आहे. प्रत्येक गोष्टीची अर्थपूर्णता पाहात असल्याचे नाटक करत जगण्यातल्या निरर्थकतेला स्पर्श करणारे. इथला बाँबस्फोट म्हणजे एक असत्यस्फोटच ! इथे ना कथेची उकल महत्त्वाची ना एखादा सर्वमान्य संदेश देणे. अशी नाटके रंगभूमीवर क्वचितच येत असतात, हे लक्षात घेऊन, काही चांगले पाहणे महत्त्वाचे मानणाऱ्या सर्वांनी पाहावे, असे हे नाटक आहे.

सखोल कलात्मकतेचा एक उंच प्रत्यय निर्माण केल्याबद्दल पीडीए ला धन्यवाद !

--- ००० ---

विसंगती

तुम्ही आज असे म्हणताय तर मग त्या वेळी अमुक कसे केले होते – असे अंतर्विरोध तर सर्वच माणसांत असतात, तसे माझ्यातही आहेत. तरीही आपले आजचे असे काही वागणे, विचार, लहरी, स्वभाव हेही सगळे असतेच. आयुष्यभर मी, मला आवडत नसून, मने संभाळणे या एका प्रापंचिक धंद्यासाठी आणि संबंध बिघडणार तर नाहीत या कौटुंबिक हिताच्या भीतीने, असंख्य समारंभांना हजर राहात आलेलो आहे. पण, अलिकडे मात्र, थोडा वयाचा फायदा घेत आणि आता या जबाबदाऱ्या मुलावर सोपवाव्यात अशा उदात्त हेतूनेही जरा माझ्या स्वभावाप्रमाणे वागायचे धाडस सुरू केलेले आहे. एका उदाहरणाने सुरुवात करू. ज्याला जे साजरे करायचेय, एखाद्या प्रसंगाच्या वा दिनविशेषाच्या उत्साहात रममाण व्हायचेय ते त्याने जरूर करावे पण त्याचा इतरांना उपद्रव होऊ नये, असे मला वाटते. त्यामुळे, सत्यनारायण, शिवजयंती, आंबेडकर जयंती, गणेशोत्सव हे सगळे उपद्रवकारी दणक्यात आणि जल्लोषात सादर करणारे लोक वा मशिदींवरून कर्णे वाजवणारे लोक, हे मला आवडत नाहीत. पण, या सगळ्या गोष्टींना ज्याचीत्याची समर्थने असतात हेही मला माहीत आहे. सगळी समर्थने अर्धवट असतात आणि त्यांच्या विरोधातही मुद्दे असतात, हेही मला माहीत असते. सिनेमात, अमिताभ मोठेपणी गुन्हेगार झाला तर त्याची समर्थने त्याच्या वाईट गेलेल्या बालपणात असतात आणि ती आपण पटवून घेऊ शकतो, तसेच हे सगळे प्रकार असतात. माझ्या परीने माझ्या समर्थनीय स्वभावाचे आणखी काही गुण म्हणजे मला वाढदिवस, पन्नाशी, साठी, पंच्याहत्तरी वा सहस्रचंद्र वा शतकपूर्ती हे साजरे करणे आवडत नाही. माझ्या आईवडिलांचे मी हे काही केले नाही. त्यांनाही त्याची हौस नव्हती, हे जरा माझ्या पथ्यावर पडले. पण, अगदीच निराश, गंभीर वातावरणात राहावे, हा याचा हेतू नाही. घरच्या घरी, आमच्यापुरते, छोट्या प्रमाणात आम्ही हे सगळे करत असतोच. आम्हाला या जगात येऊ दिले, राहू दिले हेच उपकाराचे झाले, असे समजणारे आमचे गरीब बिचारे घराणे आहे. याचा अर्थ, पुन्हा, गुर्मी, माज, उद्दामपणा यांचा पूर्ण अभाव आहे, असाही नाही. अमुकच बरोबर असे काही म्हणायचा हेतू नाहीय. कारण, समजा माझ्या पत्नीला हे सगळे साजरे करायला आवडते पण माझ्या या असल्या विचित्र स्वभावामुळे ते शक्य होत नाही – म्हणजे मी, एक प्रकारे, तिच्यावर अन्यायच करत असतो ना ! तसाच इतरांनी माझ्यावरही केला तर चूक कसे, हे बरोबरच आहे ! तर सारांश

म्हणजे, असे प्रसंग वा समारंभ हे मी टाळत असतो. काहीजण समजून घेतात, काहींचा रोषही होत असेल. पण, त्याला इलाज नाही, असे मी हल्ली म्हणतो, इतकेच.

तरीही, कालच, आमच्या नात्यातल्या अशाच एका सहस्रचंद्र समारंभाला हजर राहिलो. ती व्यक्ती, अत्यंत साधी, सरळमार्गी, सर्वांची हितचिंतक, भांडणे वा वाद न आवडणारी, शक्य तो मदतीला तयार असणारी, अशी आहे. सर्वच नातेवाईकांना निरपवादपणे त्यांच्याबद्दल आपुलकी आहे. हे एक माझ्या हजर राहण्याचे समर्थन आणि दुसरे म्हणजे, बऱ्याच दिवसांत न भेटलेले अनेक नातेवाईक भेटतील, हे एक नेहमीचे समर्थन. यांमुळे गेलो. मग अर्थातच थोडे मंचावरून बोलणेही ओघानेच आले. मी बोललो, ते असे –

" मुंबईत आलो की नेहमीच अण्णांकडे आमचे सहकुटुंब जाणेयेणे असे. सुरुवातीला ते मुलुंड चेकनाक्याजवळ राहात. त्यांच्या घराच्या खिडकीतून चेकनाका दिसे. आमचा मुलगा महेश त्या वेळी चौथीपाचवीत असेल. हिंदी सिनेमामुळे त्याला स्मगलिंग वगैरे गुन्हे माहीत होते. त्या प्रभावाखाली त्याला तो चेकनाका दिसला. त्यामुळे, तो अण्णांना म्हणाला की अण्णा, तुमच्या एक येतेय का लक्षात, हा खाली जो चेकनाका आहे ना, तिथे स्मगलिंग चालतेय असा मला डाऊट आहे. आणि हे सगळे तुमच्या समोर घडतेय. पोलीस तुमच्याकडे चौकशीला येऊ शकतात, तुम्हाला साक्षीला बोलावू शकतात ! बापरे ! अण्णा हादरलेच ! ते म्हणाले की ही खिडकी बंदच ठेवतो मी आता, आणि तसे केलेही त्यांनी. तरीही, मधून मधून ती खिडकी उघडून ते खाली पाहात असत. तिथून मग नंतर ते सायनला राहायला आले. हे घर मोठ्या हायवेवर, भरपूर रहदारीच्या रस्त्यावर होते. आता अणांना हायसे वाटत होते. पण, पुन्हा महेशचे आगमन झाले. तो अण्णांना म्हणाला की अण्णा, ते त्या रस्त्याच्या पलिकडे टायरचे दुकान आहे बघा, आले ना लक्षात, त्याचा टायरचा धंदा हा नुसता दाखवायला आहे, खरे तिथे वेगळीच कामे चालतात, असा मला डाऊट आहे. आणि ते दुकान बरोब्बर तुमच्या बाल्कनीसमोरच आहे ! झाले, अण्णा पुन्हा हादरले ! तिथला काळ त्यांनी कसाबसा व्यतीत केला. त्यांच्या मुलांची शिक्षणे झाली. त्यानंतर ते राहायला गेले घाटकोपरला, स्टाफ कॉलनीत. इथे आता प्रश्न नव्हता. आजूबाजूला सगळा स्टाफच होता. पण, इथे महेशने एक वेगळेच संकट समोर आणले ! खाली पलिकडच्या इमारतीत अण्णांचा मुलगा उमेश याचा दवाखाना होता. महेश म्हणाला की अण्णा, उमेशच्या दवाखान्यात काय चालते हे कधी पाहिलेय का तुम्ही ? आता मात्र अण्णा स्तंभितही झाले आणि शिवाय हादरले ! ते म्हणाले की आता विचारतोच उमेशला. आणि त्यांनी खरेच त्याला विचारले की बाबा काय चालतेय तुझ्या दवाखान्यात, काय ऐकतोय मी हे ! तर आता उमेश जोरदार हादरला ! आपले काही बिंग बाहेर पडतेय की काय, असे त्याला वाटले ! असो. यातला गंमतीचा भाग वेगळा. कोणत्याही मुलांना रामायण-महाभारतातल्या गोष्टी सांगणारे अण्णा अत्यंत मनमिळावू, पापभीरू, सज्जन, सगळ्यांचे हित चिंतणारे आहेत ! त्यांना मनापासून लाखभर शुभेच्छा ! " यावर सर्व उपस्थितांना अर्थातच मजा वाटली !

इथे हे सांगायचे कारण म्हणजे, कुणाच्याही, म्हणजे माझ्याही, जगण्याला संगती नाही राहात. त्या वेळी नाही म्हणालात मग आता कसे गेलात, याला फारसा अर्थ नसतो. एकमेकांच्या विसंगतींबद्दल सारखे जाब न विचारता, ज्याला त्याला आपापल्या विचारा-आकलनाप्रमाणे वागू-जगू द्यावे, हे बरे. अशा या एकूण चिंतनात्मकतेतून मानवजातीच्या हितार्थ ही पोस्ट जारी करण्यात आलेली आहे ! धन्यवाद !

--- ००० ---

गाडीच्या वेगाने दृश्य असे बदलते
तर मनाच्या वेगाने जग किती बदलत असेल --

'जगण्याचे रूपांतर लाटेत --'

'विचारांचे कप्पे --'
अपघाती फोटोकला --

प्रवासाची भुरळ पडण्याचा क्षण --

February 2020
February 29

बेक्कार आहे जग -- कुठे काय चाललेय, माहिती पाहिजेल --

जवळून दर्शन --

आमच्या इमारतीच्या गच्चीवर रोज एकजण पक्ष्यांना दाणापाणी ठेवतात --
सुमारे १०-१५ मिनिटे अनेक पक्ष्यांचा अत्युत्साही गिल्ला चालू असतो --

छायाप्रकाश आणि रंग यांचा काय असतो हेतू ?

" आतल्या स्वच्छतेसाठी बाहेर -- "
" आमचेही तेच -- "
" कटकटच आहे ही एक -- "
" तर काय -- "

कुछ तो गडबड है !
गेली काही वर्षे मी पाहतो आहे -- सकाळ झाली की सुमारे वीस कबुतरांचा समूह बाहेर पडतो आणि गोल गोल चकरा मारायला सुरुवात करतो. फार उंचावरून नाही -- दहा मजली इमारतीच्या उंचीच्या जरा वरून-खालून. त्यांचा हा असे उडत राहण्याचा कार्यक्रम सुमारे पाचसहा तास चालतो. हा त्यांचा व्यायाम असतो की काय ते माहीत नाही. ही पाळलेली कबुतरे असून थोड्या थोड्या वेळाने वेगवेगळे समूह उडायला सोडले जातात, असेही असू शकेल. तेही कळणे अवघड आहे. कारण दिसतात तर सतत सगळी पांढरीच. पण, आज सहज लक्ष गेले तर ते सर्व सगेसोयरे गायब आहेत ! उडताना दिसत नाहीयत ! की " इकडे पुन्हा दिसलात तर याद राखा -- " असे कुणी त्यांना म्हणाले असेल आणि नको ती कटकट म्हणून त्यांनी उडण्याचे आकाश बदलले असेल ? या वा अशा कोणत्याच प्रश्नांची उत्तरे मिळणे शक्य नाही, हेही कळतेय. ते कळण्यसाठी मी काही फार कष्ट घेणार आहे किंवा त्यातच गुंतून राहणार आहे, असेही नाही.
फिर भी, कुछ तो गडबड है !
--- ००० ---

माझी सध्याची व्याख्या --
दिसणाऱ्या वास्तवाला जगण्याच्या सत्याशी जोडणे म्हणजे चांगली फोटोकला.

मी नष्ट नाही होणार -- माझे फक्त रूप बदलेल --

“Now, to consult the rules of composition before making a picture is a little like consulting the law of gravity before going for a walk.” – Edward Weston, photographer
अनुवाद --
आता चित्र तयार करण्यापूर्वी रचनेच्या नियमांबाबत विचारविनिमय करणे म्हणजे साधारणतः फिरायला जाण्यापूर्वी गुरुत्वाकर्षणाचे नियम समजून घेत बसणे आहे.
-- एडवर्ड वेस्टन, फोटोग्राफर.

पंक्चरलेल्या जगण्याचे समाधान आणि
बिकट समस्येची गुरुकिल्ली --

ट्रॅफिक तर असणारच ना जगण्यात --

दारूबंदीमुळे अवैध मादक द्रव्यांचा वापर वाढत असल्याने अधिक घातक परिणाम होताहेत -- हे पाहून चंद्रपूरमध्ये महिलांसह लाखोंची मागणी येतेय की दारूबंदी उठवावी ! वैधपणे सरळ दारू उपलब्ध असणेच बरे, असे लोक म्हणताहेत !

फोटोकला

सध्या हे प्रयत्न चालू आहेत. सुंदर निसर्गदृश्यांवर फारसा भर द्यायचा नाही आणि ' वेगळे ' काही वेगळ्या शब्दांसह सादर करायचे, असा हा प्रयत्न आहे. तांत्रिक सफाई कितपत येईल कोण जाणे.

एका नामवंत फोटोग्रफरने असे म्हटले आहे की हा कलाप्रकार तुम्ही स्वीकारलात की पहिले दहा हजार फोटो वाया जाणार, हे धरून चाला ! तर या ' वाया जाण्यात ' फ्रेंडसनाही सामील करून घेतो आहे.

न आवडल्यास सातत्याने माफ करत राहण्याचा तुमचा मोठेपणा मी माझ्या स्वार्थासाठी गृहीत धरत आहे. धन्यवाद !
--- ००० ---

बंद दरवाजे --

कालचा दिवस --
अंधाराचे रंग --

“No great artist ever sees things as they really are. If he did, he would cease to be an artist.”
– Oscar Wilde

“Every good painter paints what he is.”
– Jackson Pollock

माझ्या जागी माझ्या ऐवजी --

वाहतुकीला सायकल आणि आडोसा आयताच --

उत्तुंगतेच्या पायथ्याशी उडता पक्षी --

एक काळ असा येईल की या प्रत्येकाभोवती सजावट आणि रोषणाई असेल, दणाणून पोवाडे वाजत असतील, हजारोंची गर्दी असेल आणि उत्तुंग घोषणांचा पाऊस पडत असेल --

मनाच्या अंधारात प्रतिमांचे उत्पादन --

अर्कचित्र

आजच्या लोकसत्ताच्या लोकरंग पुरवणीत, प्रख्यात व्यंगचित्रकार प्रशांत कुलकर्णी यांचा ' अर्कचित्र ' हा एक उत्तम लेख आलेला आहे. विशेष म्हणजे त्यात, आपले एफबी फ्रेंड, प्रख्यात अर्कचित्रकार
प्रभाकर भाटलेकर
यांच्या अर्कचित्रांबाबत बराच गौरव-मजकूर आहे. तो जरूर वाचावा. एफबीमुळे भाटलेकर यांच्यासारखा मित्र मिळाला याचा अर्थातच मला खूप आनंद आहे.
--- ००० ---

निर्माती माती --

अवकाळी उन्हाळा सुरू झाला --

अंतर्बाह्य --

बुटके पोलीस --

संग्रह

चला या संग्रहाची
ही शेवटची कविता
आता आहे असा जाईल हा वेबवर
हे सांगण्यात काय आहे विशेष

मोठमोठे लोक आत्मचरित्र
सांगताना कधीही नाही सांगत
की बाबा अमुक अशी समस्या आली
आणि मग अमुक असे समजत गेले
पण ते चालते तुम्हाला
त्यांच्या यशोगाथा ऐकून
मनात टाळ्या वाजवता तुम्ही
पण त्यांच्या यशाचा आपल्याशी
काही झ्याटाचाही संबंध नाही
हे नाही पाहात तुम्ही
कारण त्यांनाही ग्लॅमरचा बडेजाव
आणि तुम्हीही ग्लॅमरचेच भोक्ते

या संग्रहाला तुमच्याकडून
नकोय ग्लॅमर पण एक मात्र हवेय
ग्लॅमरचे संमोहन द्या टाकून
निदान या कविता वाचताना तरी

या कविता बाहेर काय मिळवतात
हे नका पाहू
कविताच पाहा
--- ००० ---

चमत्कार

त्याने सोडलेली सिगरेट धुराची वर्तुळे
हॉटेलाची काच भेदून
पलिकडे जाताना दिसली
तेव्हा मात्र मी बिल देऊन
पटकन पाय काढता घेतला

हवे ते नाहीच घडणार

तर बाकीचे हवेय कशाला
असे म्हणून मी
दिसेल त्या स्त्रीला विचारायचे ठरवले
की वाजलेत किती

आयुष्य चांगले जाण्याबद्दल
माझ्या काही कल्पना होत्या
माझ्या आकलनाबाहेरचे
काहीच नाही दिसू शकत मला
याचा मला कंटाळा आलेला होता
म्हणून मी लगेच लिफ्ट घेतली

बाहेर आलो तर लख्ख ऊन होते
आणि समोर ती वाजलेत किती

पण नाही विचारले
असे घडणे हाही आणखी एक
चमत्कारच असे म्हणून दिले सोडून
--- ००० ---

एक गोंधळाचा प्रश्न

मला पडणारा एक असा प्रश्न आहे की ज्याच्या उत्तराबाबत मला माझ्या परीनेही स्पष्ट असे काही आकलन नाहीय. एक समजा उदास असा मूड तयार करणारे असे अत्युत्तम चित्र आहे आणि ते नेहमी जातायेता दिसेल असे घरातल्या हॉलमध्ये लावून ठेवलेले आहे. म्हणजे ते चित्र जो जो जेव्हा जेव्हा बघेल तेव्हा तेव्हा त्या त्या व्यक्तीचा मूड उदास करत राहणार का -- म्हणजे, एक प्रकारे, त्याची जगण्याची चेतना कमी करत राहणार का ? की त्या चित्रात असलेल्या कलेच्या अत्युच्च दर्जामुळे ते कलेचा आनंद निर्माण करत राहू शकेल ? आणि तो कलानंद चेतना फुलवणारा असेल का ? उदास मूडच्या कवितांचे पुस्तक कपाटात पडून राहते -- ते चित्राप्रमाणे सारखा तडक परिणाम करत राहात नाही. काही ठराविकच चित्र वा चित्रे सारखीच नजरेसमोर असणे हे पाहणाऱ्याच्या मनाला मर्यादित करणारे ठरणार नाही का ? यावरून घरात वा ऑफिसात अमुकच प्रकारची चित्रे लावावीत किंवा कोणतीच चित्रे लावू नयेत, असे काही निष्कर्ष निघतील का ?

हे प्रश्न, अर्थातच, चर्चेसाठी विचारलेले आहेत. अमुकच असे काही म्हणणे नाहीय. पण, अनेकांच्या विचारांतून काही दिशादर्शक मुद्दे समोर येतील, असे वाटते.
--- 000 ---

फोटो

घरातल्या सगळ्या
निसर्गदृश्यांची वासलात लावायचे ठरले
तेव्हा सरळच प्रश्न आला की मग
प्रत्यक्षातल्या डोंगराचे काय करावे
दुसऱ्यांनी काढलेले फोटो
आणि मला दिसणारी दृश्ये
यांत फरक तरी काय आहे
या प्रश्नाने भीती वाटली

दुसऱ्या तिसऱ्या चौथ्या
हातीचे जगणे नको म्हटले
तरी मी कुठे उमटू देतोय काही
माझ्या आठवणींशिवाय नवे
हे सत्य दातखीळ बसवणारे ठरले

आपल्याशिवायच्या त्या परस्परवाल्या
आद्य शक्यतेशिवाय
हेच ठीक स्वतःत गटांगळ्या खाणे
असाच आला विचार

जे घडतेय ते घडतेय
हे तरी कळत राहतेय
हेच समाधानाचे मानत मग
दुःखाची कळी खुलू दिली
--- ००० ---

प्रेमकविता

काय करताय ?
प्रेमकविता लिहितोय
या वयात ?
ब्रेन-डेड होईपर्यंत लिहीन
बापरे –
नंतर माझे हृदय हवे तर तुम्हाला दान करेन
कशाला ?
अहो किती प्रचंड प्रेमाचा आनंद असेल त्यात जो तुम्हाला आयता मिळेल
तुम्हाला डिस्टर्ब नाही ना होत ?

अहो तिच्याशी लिंक माझी भर बाजारातही चालू राहते
म्हणजे पूर्ण अनुभव की बोलणे फक्त ?
अहो सहवास असला की झाले वह सब कुछ होता है
म्हणजे प्रेयसी आहे ? या वयात ?
आता तिला नाहीय काही प्रॉब्लेम
तुम्ही प्रसिद्धही करणार का ही प्रेमकविता ?
नक्कीच फक्त नावे नसतील
पण म्हणजे खरीच आहे की काल्पनिक ?
मी काल्पनिक आणि ती खरी किंवा मी सत्य आणि ती आभासी
कमाल आहे ! लोक तर खरेच धरून चालणार !
अर्थात कवितेत खरेच ना सगळे
म्हणजे मिठ्या, चुंबने असे सगळे ?
अहो नुसत्या हं किंवा हो अशा एका अक्षरातसुद्धा असते सगळे
सुरुवात कशी काय होते ?
बहुतेक सुरुवातीलाच होते अर्थात आधी मला कळत असावे
आणि पुढे ?
पुढे काय पुढे ती रागावत नाही
--- ००० ---

' आठवणीत -- ' हा फोटो नीट क्रॉप झाला नाही म्हणून पूर्ण दिलाय --
-- हे नाव का दिलेय ते येतेय ना लक्षात ?

धारातीर्थीचा धैर्यधर --

आठवणीत -- ( क्लिक करून पाहा -- )

हजारो

हजारो कंगोरे
असल्याप्रमाणे
घटनांचे जगणे
खरखरत चालू राहते
कधी धडधडत
आणि कधी आपटत

कपडे पिळणे
आणि दुःखाचे प्रसंग

वेगळे राहायला हवेत
अडेलतट्टू असेल घोडे
तर आपलेच चाबूक
आपल्याच पाठीवर
असे होत राहते
अगदी टापटीप
उत्साहातही

यावर एकच उपाय
हजार कंगवे घेऊन
विंचरून काढायची
स्मरणगाथा

हाच एक असावा उपाय
असे वाटते खरे
--- ००० ---

## नियती

नियतीचे मला नाही काही समजत
पण मला अमुक ठिकाणी तीळ आहे
हे बरोबर ओळखणारा मला भेटला होता

त्याचे म्हणणे असे की मी पाणी
फार पिणार म्हणजे पिणारच
आणि हेही बरोबर होते की
मला भाषेचे प्रेम असणारच

मी त्याची फी देऊन टाकली
पण प्रॉब्लेम पुढेच आला
जेव्हा मला म्हणू लागले लोक
की मीच बदलायला हवे माझे शरीर
जे शेकडो वर्षांत जडतघडत आलेय

माझ्या पूर्वजांनी त्यांच्या
असंख्य पूर्वजांचा
छळ केला होता
त्यामुळे त्या त्यांच्या पूर्वजांतून

उगवत आल्याप्रमाणे
मी व्हायला हवे
अन्यथा मी दुष्ट
आणि आपमतलबी आणि सुखवस्तू
असे ते म्हणाले कारण अजूनही
ते नव्हते सुटत
तयार होत आलेल्या भाषेतून
कितीही राग आला आणि कितीही
गुलामगिरी वाटली तरी

मग तुम्ही दाखवा ना बदलून तुमची शरीरे
असे माझे म्हणणे रास्त असले तरी
सात्त्विक संताप त्यांच्या बाजूला होता

पण बदल तर घडतच असतात ना
हे तर सर्वांनाच दिसत होते
पण न्याय हवा शिक्षा हवी हेही होते हट्टाचे
सत्वर जरी क्रांती तर नव्हती दिसत शक्य

सर्वांनी अदृश्य व्हावे हा एक होता उपाय
त्या दिशेने समन्वयाचे प्रयत्नही झाले
अन्याय करणारे आणि अन्याय सहन केल्याचा भूतकाळ
असलेली मने हे सर्वच नष्ट व्हावे म्हणून
सर्वांच्या पूर्वजांचे सर्व फोटो आणि नोंदी
नष्ट करण्याचे ठरले पण मग उरणार काय
या प्रश्नाला उत्तर नसल्याने
पुन्हा समजत नसलेली नियतीच स्वीकारून
हळूहळू बदल करावे हेच बरे असे ठरले
आणि शालेय शिक्षणात त्यासाठी
सुधारणा करायचे ठरले

सगळ्यांना एकदम भूतकाळमुक्त होऊन
आजचे नवीन जगता येण्यासाठी
काय करता येईल असा एक प्रश्न समोर आला

सगळे म्हणाले जाऊ दे आध्यात्मिक काही नको
--- ००० ---

साम्राज्य

काहीच कारण नसताना
कुणी नोकरी नाही सोडत
हे खरे असले तरी
विहिरीचे झरेच आटल्यावर
काय करणार

नको नसता उपद्व्याप
म्हणून जावे प्रदर्शनाला
तर तिथे नेमकी
नको ती माणसे भेटतात

त्याने होते जागेवर येणे
जाणवल्यामुळे सगळीकडे
प्रतिमा- प्रतिबिंबांचे
नकोसे वाटणारे पण अटळ
अनभिषिक्त साम्राज्य
--- ००० ---

हिशोब

मी अनेकदा सांगितले
पायांत घुटमळत्या
कवितेला की बाई
आपल्याला
अर्थ नकोच आहे

कोणे एके काळी म्हणे
दुपारच्या वेळी
फुटली होती
एक पाईपलाईन
तेव्हा आपसूक
कळले होते
की आपले प्राक्तन
आपल्याला हिशोबच
नाही लागू देणार

जिंदगीचा

एरवी तरी कोण
बोंबलायला जाणार होते
राणीच्या बागेत
--- ००० ---

गुलाल

रुसवेफुगवे नकोत
म्हणून सरळ
मॉलच गाठला
आणि अभ्यासाऐवजी
जयंती साजरी करायचे ठरवले

जे घडूनच गेले होते
त्याला चालते
जरा तिखटमीठ
कमीजास्त झाले तरी

शास्त्रज्ञ कलावंत
यांच्यावर आनंदाने
गुलाल उधळला
--- ००० ---

पिकासो

पिकासो म्हणाला
आधी सुरुवात करा
आणि मग ठरवा
तुम्हाला डावे व्हायचेय की उजवे
आणि मग उडवून टाका
तुम्हाला नको असलेले
पुलाचे कपचे

राजकारण शिकतो
म्हणजे काय करतो आपण

आपल्याला आवडलेला सिनेमा
अनेकांच्या खिशांत कोंबतो
ते नको नको म्हणत असताना

नियम आणि शिस्त
यांची पुस्तके घेतो आपण
आठवडे बाजारातून
जिथे पतिपत्नींना एकत्र पाहून
फिसकन हसतात लोक

लपवाछपवी तर असणारच ना आयुष्यात
नग्न फिरणारे साधूही त्वचेच्या आत
कोणत्या बाळगतात पुराणकथा
याची थियेटर्स कशी असतील

एक एक असे खूप असते
--- ००० ---

तरीही

इतका बारीक आणि चपळ पक्षी
कशासाठी आहे या जगात
हा प्रश्न आला चर्चेला
देवेंद्र आणि उद्धव भेटले तेव्हा

देवेंद्रांनी उद्धवना विचारले
मे पुं रेगे कोण होते ते सांगा
उद्धव हसून म्हणाले
आम्हीही विकसित करत आणलाय
एक रोबो
जो धर्माच्या ऐवजी
समस्यांची उत्तरेच सांगतो

मग विषय आला
चंप्र कोण हा
दोघांनीही हात झटकले
आणि योगायोगाने दोघेही

मराठी समीक्षा
या चर्चासत्राला गेले

तिथे पुन्हा तो बारीक पक्षी दिसला
तेव्हा समीक्षक म्हणाले
हा पक्षी कुठेही आलेला नाहीय मराठीत

तरीही चंप्र कोण हा विचार
सगळीकडे चालूच राहिला
--- ००० ---

संसर्ग -- २ --

संसर्ग -- १ --

दुसऱ्याच्या भरकटलेल्या मनामुळे आपण जर त्रासत असू तर आपणही तसेच भरकटण्याच्या मार्गावर आहोत, हे समजून चालावे --

अमृततुल्य

परस्पर फसलेले
मानवी सांगाडे
आपण सभागृहात आणले
तेव्हा तिथे कुणीच नव्हते

तो काही आपला गुन्हा नसल्याने
निर्भयपणे आपण अंधाराची चव घेतली

यालाच जीवनरहस्य म्हणून
खपवायचा प्रयत्न आपण केला नाही
म्हणून आपल्याला ज्ञानपीठ जाहीर झाले

आपण नम्रपणे ते नाकारून
आपला नेहमीचा
अमृततुल्य चहा प्यायला निघून गेलो
--- ००० ---

इत्थंभूत

केळीच्या पानावर वाढलेले
ऑफीसचे घड्याळ
सप्तरंगी पाखराचे
खेळ खेळत
चक्कर येऊन पडते

याला असंबद्ध
म्हणण्यापेक्षा
असंवैधानिक म्हणू

म्हणजे आपल्याच
पोटातले आपलेच दात
वाकुल्या दाखवत
एफायआर दर्ज नाही करणार

शेवटी जगण्याचा
हेतू तरी काय
हे पाहता निष्कारणच
कशाला प्रवास

जगण्याची स्टोरी
इत्थंभूत सफळ होण्यासाठी
मी फार तर एकदा
तीन पत्ती खेळू शकेन
--- ००० ---

उपजीविकेची न-कविता

टीव्हीतून आलेला प्रवाह
युनिटीच्या खालच्या जिन्याने
डोळ्यावर साठलेला
भूतकाळाचा डिंक बनतो

आपण कधीच
बूट नसते घातले

सिनेमा पाहण्याआधी
कारण
आत्मरक्षणासाठी
आपले चष्मे
आपण वाळत टाकले असते

मतभिन्नतेसाठी
वाऱ्यावर अन्न उधळणारे
आपण नसल्याने
आपल्या घरांचे नकाशे
कधीच गायब नाही होणार

एका किसवर
माझी भागू शकेल
अनेक वर्षांची
उपजीविका तडफदार
--- ००० ---

दरवाजादर्शन --

निम्मे आयुष्य या घरात --

भवितव्य

वेडा होण्यापेक्षा कला बरी
या आत्मसंरक्षक विचाराने मी कवी झालो
आणि मग कालांतराने आले लक्षात
की इथे आपली उभे राहण्याची जागाही
नष्ट होण्याच्या मार्गावर आहे

अन्यायग्रस्तांना न्याय मिळणे
हे अग्रक्रमाचे आहे या आग्रही सत्यापायी
इथे हजारो कवितांची कत्तल होत चाललीय
त्या कवितांना निर्जीव समजून हे दिसले

थोडी जागा साफसूफ करावी म्हटले
तरी ते भडकले

काहीच हक्क नसताना या जमिनीवर
तुम्ही इथे रुजायचा प्रयत्न करताच कसे
असे म्हणत अधिकच व्यथित होत
ते अंगावर धावून आले

माझ्यासारख्या शेकडो वर्षांच्या
मनोवृत्तीमुळेच हा भेद घडल्याचे
पुनरुच्चारत माझे असणेच थांबायला हवे
असे म्हणत त्यांनी माझ्या कविता कचऱ्यात टाकल्या

मलाही आता आधार म्हणून कविता नको होती
मी तिला तिच्या भवितव्यावर सोडून दिले
--- ००० ---

गाभारा

मी शेवटचा कधी गेलो होतो देवळात
ते आता आठवूच नये इतका काळ लोटला
मनाच्या गाभाऱ्यातून
अनावश्यक अडगळ आणि अतिक्रमणवाली दुकाने
काढून टाकल्याला

नास्तिक म्हणून मिरवणे वा शौर्य दाखवणे
यातही नव्हते मला इंटरेस्ट
कारण स्त्रीचे निरर्थकत्व
अत्यंत उत्तेजक आणि अमर्याद असल्याने
कुणी त्याला माझा पर्यायही म्हणू शकले असते

दुसरे नव्हे त्याचाच एक भाग असे निरर्थकत्व
मला कवितेत सापडले
आधी शब्द आणि मग निरर्थकता असे
ती पाने फाडण्याचे व्यर्थ कष्ट न घेता
मी त्यांचे संग्रह केले आणि कवी झालो

आता आणखी कशाची गरजच नव्हती
नास्तिकही माझ्या नादी लागायचे थांबले होते
मी अमुक आहे असे काही म्हणायचेच नाही

म्हटल्यावर त्यांचे इंटरेस्टच गेले होते

ना हमरीतुमरीवर येणे ना बोटे मोडणे
याला जगण्याची निरर्थक आपमतलबी पद्धत
म्हणत सगळे नवविचारी पांगले होते
--- ००० ---

टाईल्सच्या डिझाईनसह हॉटेलशी एकरूप --

आमचे विचार वेगळे आहेत याचा अर्थ आमच्यांत मतभेद आहेत, असा मुळीच नाही !

दगडफेक

अपचनग्रस्त असतानाच
नेमके त्याचे व्याख्यान होते
जरीकाठी श्रोतृवर्गात
सेंट मारून आलेल्या

त्याने उत्तरआधुनिकतेवर
जहाल हल्ला केला
पंखे बंद झाल्यावर वीज गेल्याने
फार फार तर आधुनिक असावे माणसाने
पण उत्तरआधुनिक म्हणजे नरकच
असे म्हणत शेवटी थकून तो बसला

परतताना लोकांच्या चपला सँडल्स बूट
बदलले गेले लोकांनी वैतागून मग
रस्तेही बदलले जाऊ दे च्या बायली
आता कुठेही असे म्हणत त्यांनी
प्रदूषणविरोधी मास्क घातले

विश्वास तरी कशावर ठेवणार
मते तरी कुणाला देणार या फाटाफुटीत
या विचारात कुणी रसवंतीगृहात गेले
तर कुणी देशी दारूच्या दुकानात

काय केले पाहिजे हे त्या भोसडीच्याला

कसे काय माहीत असू शकेल असे म्हणत मग
कुठेही दगडफेक करू लागले लोक
--- ००० ---

भीतीचा कण

तुम्ही चकचकीत जमिनीवर
उभे असता सुखासीन
आणि तरीही मनात उमटतो
भीतीचा एक कण
आणि तो घालवतो
तुमचा शारीरिक तोल

यावर ताबा राहायलाच हवा
या विचाराने
भीतीचा कण उमटताच
उपटून पाहता तुम्ही
तुमचे विचारयंत्र
ताब्याच्या खात्रीसाठी

तेव्हा कळते
ताब्याचा मार्गच चुकीचा आहे
अधिकच बिघडवणारा
खरे तर नुसतेच असायला हवे
ताब्याची इच्छा न धरता

असे असे अमुक अमुक
व्हायला हवे माझे इष्ट
यातूनच तर उमटतो
भीतीचा कण

म्हणजे मृत्यू पावायचे की काय
--- ००० ---

वास्तव

पूर्ण वास्तवात राहणारी कविता

अर्थपूर्ण नाही असू शकत
कारण ना दगडाला अर्थ असतो
ना आकाशाला
ना प्रेमाला ना द्वेषाला

जे आहे त्याच्या बाहेर
कुठला अर्थ

आणि दगडाने पालीचा
अर्थ लावणे हे निरर्थकच तर असणार

किंचित स्मिताची अर्थप्रतिमा
पाहणाऱ्याच्या बुद्धीत
सापडू लागली
की समज गैरसमज राग सूड
प्रेम संशय हिंसा
या सर्वच अर्थांच्या शक्यता
मेंदूत गरगरू लागणार

जाणवलेला अपमान
हा फक्त निरर्थक
अपमानच राहिला पाहिजे

अपमानाचे अर्थपूर्ण पंख
जिंदगी हराम करणार हे नक्की
--- ००० ---

Ravindra Damodar Lakhe यांच्या पोस्टवर दिलेली एक कॉमेंट -- पटवून देण्यासाठी नसून फक्त विचारासाठी सादर --

रूप, घाट, रूपबंध यांच्या अर्थांत फारसे फरक करता येतील असे मला वाटत नाही. यांतला कोणताही एक शब्द संपर्कासाठी ठरवून आपण वापरू शकतो. ही साहित्यकृतीची रचना असते. त्यात शब्द, भाषा, विरामचिन्हे, विचार, भावना, मूडस, आठवणी, प्रतिक्रिया, स्वप्ने, भास, संज्ञाप्रवाह, गती, लय वगैरे सगळे येते. या सगळ्यांच्या रचनात्मक माध्यमातून साहित्यकृती घडते. यांतल्या कोणत्याही भागाला ' आशय ' म्हणता येत नाही. बरेच लोक, ' आशय ' म्हणजे काही भावनिक अनुभूती वा वैचारिक कॅप्सूल, असे समजतात. त्यामुळे, गोंधळ होतो. रडू आले, हसू आले, वैचारिक प्रबोधन झाले -- असे असण्याला लोक आशय समजतात. साहित्यकृतीतून काही ' हाताला लागायला ' हवे, ' नाट्यात्म विधान ' हवे, ' भूमिका ' पोचायला हवी -- असल्या बोलण्यातून ते व्यक्त होते. पण, आशय असा मर्यादित वा बौद्धिक नसतो. आशय म्हणजे

शहाणपण, भान, परिपक्वता -- wisdom, awareness, maturity. कोणतीही कलाकृती ही त्या आशयाला पोचणारी असायला हवी. बाकी सगळे माध्यम असते. माध्यमाच्या कौशल्यपूर्ण रचनेतून लेखक आशयाकडे जात असतो. फक्त भावना वा विचार एवढ्याच क्षेत्रात आशय असतो, असे मानले तर त्यांची मूल्यात्मकता सतत विवाद्य राहील. घाट वा रूपबंध हा माध्यमाचा असतो, आशय हा अमर्याद असतो. सर्व मौल्यवान साहित्यकृती या आशयाची कास धरणाऱ्या असतात -- एखाद्या मानसिक पवित्र्याची नव्हे.

--- ००० ---

मला उमजलेला गालिब

आजच्या मटामध्ये गालिबवर एक लेख आलेला आहे. त्याच्या मृत्यूला १५० वर्षे झाल्याच्या निमित्ताने. तो जर १५ फेब्रुवारी १८६९ ला गेला असेल तर १५१ वर्षे झाली, १५० कशी ? पण, जाने दो – असल्या हिशोबांच्या पलिकडचा हा कवी आहे. हल्ली काहीही नुसते मोठे नसते – महा असते. हा तर खरोखरचा महाग्रेट कवी !

सुमारे ४५ वर्षांपूर्वी मी गालिब, सेतूमाधवराव पगडी यांच्या पुस्तकावरून समजून घेतला. त्या वेळी मी त्यातच बुडून गेलो होतो. इतके अर्थस्फोटक काही वाचण्याचा आनंद किती विलक्षण असतो ते मी अनुभवत होतो. मला उर्दूचा गंधही नाहीय. आता म्हणाल तर पुन्हा गालिबचा एकही शेर मला मुळातून समजणार नाही. पण, त्या वेळी, पगडींच्या कृपेने मी तो कण न कण समजून घेतला होता. त्यानंतर मी ‘ माझ्या गालिबच्या कविता ‘ या १४ कविता लिहिल्या. पूर्वी कुमार गंधर्वांनी ‘ मला उमजलेले बालगंधर्व ‘ असा एक कार्यक्रम घडवला होता. तसेच या माझ्या कवितांचे स्वरूप होते. मला गालिब कसा समजला त्याला मी अभिव्यक्ती दिली होती. गजलांचे पूर्ण व्याकरण न पाळता सैलसरपणे तो फॉर्म घेतला होता. त्या कविता नंतर ‘ सत्यकथे ‘ च्या एका दिवाळी अंकात आल्या होत्या. माझ्या ‘ कोरी कविता ‘ या संग्रहात शेवटी या कविता आहेत. तो संग्रह माझ्या www.champralekhan.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. नमून्यादाखल त्यांतली ही एक छोटी कविता –

कविता आणि प्रिया सारख्याच आहेत
तुमच्या देण्याइतकीच परतफेड त्या करतात.

तुमच्या सर्वस्वाला त्यांचे सर्वस्व मिळते,
मग देण्याघेण्याच्या पद्धती काहीही असोत.

कविता आणि प्रिया सत्याचे सार आहेत, खरेच गालिब,
दोघींनाही खोटेपणा अजिबात खपत नाही.

ज्यांना उत्सुकता असेल त्यांनी त्या माझ्या कविता जरूर वाचा.

माझ्या या गालिबदोस्तीमुळे घडलेले दोन किस्से सांगतो –

१. कवी अरुण म्हात्रे यांचा कवितांचा काही कार्यक्रम पुण्यात होता. मला निमंत्रण होते म्हणून मी गेलो होतो. मला तिथे पोचायला जरा उशीर झाला होता. मी गेलो तेव्हा कार्यक्रम चालू होता. मी सुमपणे जाऊन मागे एका खुर्चीवर बसलो. ते अरुणने पाहिले. आणि त्याने कमालच केली ! ‘ माझ्या गालिबच्या कविता ‘ मधल्या काही ओळी त्याला पाठ होत्या, त्या त्याने म्हणायला सुरुवात केली ! “ तर, या ओळी लिहिणारे कवी चं. प्र. देशपांडे आत्ताच आलेले आहेत, त्यांचे स्वागत ! “ असे तो म्हणाला. श्रोत्यांनी टाळ्या वाजवल्या !

२. एकदा एका रात्री गिरीश पतके आणि मी पार्ले पूर्वला होतो. वाटेत आम्ही एका बारमध्ये शिरलो. तर काय आश्चर्य ! मराठीतले तीन दिग्गज तिथे होते – सचिन खेडेकर, नलेश पाटील आणि किशोर कदम. मग आम्हीही त्यांच्यांतच गप्पा मारत बसलो. किशोरने माझा गालिब वाचलेला होता आणि तो त्या कवितांच्या बेहद्द प्रेमात होता. त्यावरच तो बोलत होता. ( त्या मैफलीत मी उगीचच नलेश पाटलांशी वाद घातला होता – ते आता नाहीत – त्याची मला खरेच खंत वाटते ! ) आम्ही बाहेर पडलो तेव्हा थोडा पाऊस सुरू झाला होता. किशोर म्हणाला, “ या गालिबच्या दोस्ताबरोबर मला पावसात भिजायचेय – “ आणि खरेच त्याने मला त्याच्याबरोबर भिजायला लावले !

३. तिसरा किस्सा नंतर आठवला -- आणखी एक किस्सा नंतर आठवला, तोही सांगतो. तिकडे इंदूर-भोपाळकडे दोन गालिबप्रेमी मित्र होते. त्यांचे मला पत्र आले होते की माझ्या या गालिब-कविता वाचून त्यांना गालिब जसा समजला तसा पूर्वी समजला नव्हता ! मला हे महाप्रचंड वाटले ! माझे ज्ञानपीठच ते ! गालिब समजायला आपण उपयोगी पडणे !

“ मै तो कुछ भी नही हूँ मालिक, मगर मै गालिबका दोस्त हूँ, ये ही मेरे लिये काफी है ! “ असा एक नाट्यमय संवाद मी इथे म्हणेन. नुसता गालिबच नाही – गालिब आणि तुकाराम ! इथे मी हेही सुचवेन की माझ्या वरील संकेतस्थळावरच ‘ पहाट आणि तुकाराम ‘ या माझ्या ५० कवितांचा एक संग्रह आहे, तो अवश्य वाचा.

चला, या निमित्ताने माझा एक कवीपरमेश्वर आठवणीत आला ! गालिब समजून न घेता जे मरतील त्यांनी या पृथ्वीवरचा त्यांचा सगळा वेळ वाया घालवला, असे मी म्हणेन !

--- ००० ---

मस्त

आयुष्याचा सगळ्यात
धोक्याचा डाव असतो
भविष्यातल्या सुखाच्या
स्पष्ट शक्यता आज समोर ठेवणे

अडकूनच जाते मन
त्याच भविष्यात बुचकळ्या मारत
आणि एकेक टाका
उसवत जातो हृदयाचा
तीव्र इच्छेने काळाशी भांडण्यात

जे घडते ते चांगल्यासाठी

म्हणजे आयुष्याने सुखासुखी
हा धोका समजायची संधी देणे

हाच असतो
जगण्याचे गूढ समजण्याचा क्षण
पूर्ण उत्तेजक भविष्य समोर
पण ते माझे नाहीच
असे लक्षात येण्यातच जगणे शक्य असणे

सुख येईल तेव्हा येवो
पण ती नसेल एक घटना
मी आज स्वीकारलेली

मी किती विरळ विरळ होत चाललोय मस्त
--- ००० ---

पत्ता

मी पूर्ण प्रयत्नच थांबवले
आणि निवांत रमलो बाजारात
किरकोळ देवघेवींत
आणि कळले तुला
की आता मी
धडपडणारच नाही
तेव्हा आपोआप
तुझा पत्ता हाती आला

काहीच नव्हते अंतर
म्हणजे खरेच
शिकस्तीची गरजच नव्हती

तुझा पत्ता मिळणे
हे घडणारच होते
तुलाही तेच हवे होते
हे तुझ्या स्मितावरून समजले

मनाने तुला टाकूनच देणे

हेच आहे आपल्या
मीलनाचे रहस्य

आता मी निर्धास्त आहे
तुला टाकून तुझ्या सोबत
--- ००० ---

टीव्ही वादासाठी मेंदूतली समृद्धी --

पुन्हा

एकटीच खिडकी
हळूच बोलकी होत
जणू रहस्यच उच्चारते
स्वतःशीच
की तिची काच
विमनस्क होते तेव्हा
वारा पडलेला असतो

पानमळ्याच्या गारव्यात
पडलेल्या वाऱ्याचे गीत
आठवत राहते तिला

खरे तर ही असते
प्रेमाची पुनरुक्तीच
मन कसेही असले तरी
सत्य कवेत घेणारी

खिडकी दारे लावून घेते
तिच्या प्रेमाच्या रहस्यात
पुन्हा अबोल होत
--- ००० ---

अडथळा

जे व्हायला हवेय
ते का नाही होत

या विचारामुळे
सर्वच विचारांना
वाव मिळतो
आणि पुन्हा
जे व्हायला हवेय
ते मागे पडते

न होण्याची भीती
पकडते काळ
आणि कळते
आपणच आहोत
अडथळा

काहीही व्हायची
गरज नाही
हे सत्य मला
खिन्न करते

घ्या आता
हा अडथळा
खिन्नतेचा
--- ००० ---

आराम करणारे मन --

प्रख्यात दादाइस्ट मॅन रे ( Man Ray ). चित्रकार होण्याचा एक वेगळाच मार्ग.

राजकीय विचारसरणी --

विटंबना

महाराजांचे शौर्य आणि महात्म्याची अहिंसा
असा मिलाफ तुम्हाला जगात कुठेच नाही सापडणार
या मिलाफासाठी आपण
कृष्णाने अर्जुनाला सांगितलेली गीता वापरतो
हाण आणि तू हाणतोयस असे समजूच नकोस

समतेसाठी आपण जीव खाऊन आंदोलने करतो
आपला साहेबाकडे वशिला आहे
जरा उशिरा गेले कमी काम केले
चालतेय आपण स्पेशल आहोत

प्लॅटॉनिक की काय म्हणतात ना
तशा प्रेमाचे आपण पुरस्कर्ते आहोत
रोज आपले कुणीतरी आवडतच असले तरी
आपण आसक्ती न ठेवण्याचा
आटोकाट प्रयत्न करतो

कुठे कुठल्या वस्तूची किती आहे गरज
त्यावर आपण नफ्याचे प्रमाण ठरवतो
जास्तीत जास्त नफा नसेल मिळवायचा
तर धंदा करायचाच कशाला पूर्ण समाजवाद
आणून याला कुणीतरी शिस्त आणली पाहिजे

आपण आहोत नास्तिकच पण अमुक-तमुक
पुतळ्याची विटंबना आपण कदापि सहन नाही करणार
--- ००० ---

जाऊ दे

यांनी त्यांना माफी मागायला सांगितलेय
ते अजून अर्धवटच पडलेय
आजचा मोर्चा उद्याचे आंदोलन आणि परवाचा
एल्गार यांनी ट्रॅफिकची वाट लागणार आहे
शिवाय एकदा यांचे बरोबर वाटतेय
तर एकदा त्यांचे आणि घरात आजारी माणूस
इस्पितळात न्यायची वेळ आली तर

सत्तेवर असू देत सध्या हे
पण लौकरच आपल्याला हवे ते घडेल
ट्रंप आल्यामुळे काय काय होईल
नोकऱ्या नसलेल्यांना मिळेल का दिलासा
कोण जाणे पण साली अस्वस्थता वाढतेय
चिडचिड होतेय थोडे काही खाल्ले

तरी पित्त होतेय या सगळ्याला
तेच सगळे जबाबदार आहेत साले

महाराजांच्या पुतळ्याचा एक झालाय
प्रॉब्लेम आणि घरातही सगळेच
त्यांच्या त्यांच्या कारणांनी अस्वस्थ

घुसखोर नकोतच म्हणतोय आपण
पण आपल्याला तरी इथे कोण
आपले मानतेय

जाऊ दे गटारात मरू दे सगळे
--- ००० ---

## परिणाम

प्रत्येकजण आपापल्या
मूडमधून पाहतो
गेट वे ऑफ इंडिया
पण हे मूडस खूप तटस्थ असणार
अन्यथा त्यांच्या परिणामांनी
भुगा झाला असता त्या दगडांचा

माझ्या असण्यातूनच कळतो
एखाद्या व्यक्तीला परकेपणा माझ्यातला
आणि त्यातून वर्षानुवर्षे टिकणारा
तयार होतो दुरावा खरे तर दगडाहून अभेद्य

डोक्यावरचे छत पडणार तर नाही
एखादा अपघात तर नाही घडणार
असे काय काय चालू असते सगळीकडे
निरनिराळ्या आणि स्वतःच्या अणूरेणूंत
पडतही असतील फरक न जाणो त्यामुळे
या भीतीने भिंती थरथरत राहतात

ताप आल्यासारखे वाटतेय
असे म्हणता म्हणता ताप येतो

आता प्रतिजैविके घ्यावी लागणार बहुतेक
म्हटले की ती लागतातच घ्यावी

अशा कल्पना नसलेले जगणे झाले तर
परिणामहीन म्हणजे कसे असेल सगळे कोण जाणे

--- ००० ---

The Never-ending Battle For The Pakistan Narrative | Adab Festival 2020 | Eqbal Ahmad Centre for Public Education

eacpe.org

राजकारण, परराष्ट्र धोरण वगैरेंतले बारकावे मला समजत नाहीत आणि त्या बाबतींतला प्रचंड अभ्यास करण्यात मला इंटरेस्टही नाही. कदाचित ती माझी कुवतही नसेल. मला महत्त्वाच्या वाटणाऱ्या साहित्याच्या क्षेत्रात माझ्या मगदूराप्रमाणे मी कार्यरत असतो आणि राजकारणाचाच अभ्यास केला पाहिजे असे नैतिक बंधन मी घेत नाही. तरीही, मानवी जगण्याबाबत मात्र माझी काही चिंतनप्रक्रिया नक्कीच चालू असते आणि ती व्यक्त करण्यासाठीच तर मी साहित्य निर्मिती करत आलेलो आहे. हे सगळे सांगायचे कारण म्हणजे, यू ट्यूबवर, पाकिस्तानातल्या आदब महोत्सवातली एक चर्चा ऐकली आणि ती मला खूपच उद्बोधक वाटली. त्या चर्चेबाबत मला जाणवलेले काही महत्त्वाचे --

१ एकजण बोलत असताना दुसरा कुणी ना मधे बोलतो ना कुत्सित हसतो.

२ द्वेषावर आधारित राष्ट्र उभे राहू शकत नाही. तुमची एक संकुचित ओळख तुम्ही पक्की केलीत तर तुमच्यांत फूट पडत जाते -- त्या विभागणीला अंतच राहात नाही.

३ राष्ट्राला अमुक अशा विचारसरणीची ( ideology ) गरज नसते तर जनहिताच्या व्यवहारवादाची गरज असते.

४ देशातले सर्व नागरीक समान असायला हवेत.

५ सैन्याचे काम फक्त देशाचे संरक्षण हेच असायला हवे.

कुणाला काही मुद्दे पटतील वा न पटतील पण, ही चर्चा जरूर ऐकावी अशी आहे. आपल्याकडच्या हिरिरीवाल्या असंख्य विद्वानांना यातून शिकण्यासारखे बरेच आहे.

यू ट्यूबवरच आहे -- त्याची लिंक --

अंधार

रात्री लांब दिसणारे ते लाल दिवे
कुणी म्हणत आकाशवाणीचे आहेत
तर कुणी म्हणत विमानांचे सिग्नल्स

आम्ही नव्यानेच राहायला आलेल्या
घराच्या भिंती अनेक ठिकाणी
जणू तेल लागल्याप्रमाणे होत्या

चकचकीत तांबूस
आणि वीज नसल्याने कंदिल
वापरावे लागत दारे लावून वाऱ्यामुळे

जग याहून वेगळे असू शकते
ते माहीतच नव्हते मला

मध्यरात्री गजर लावून
आई वा वडील पाणी भरत
सकाळी सगळे छान रेडी

त्या आठवणींपासून
आज शेकडो किमी दूर आलोय
पण कधीतरी निघतातच
अंधाराचे टवके

तोच अंधार आजही पडतोच ना
प्रकाशमान का असे ना --
उद्याचा अंधार आणखीही वेगळा असेल --
--- ००० ---

बाद पण तेजस्वी --

कचरा झालेले कालचक्र --

सुपारी

आता सुपारी नको म्हणतात दात
कारण कालच त्यांनी
या ओढ्याच्या पाण्यात
सहज घातली होती त्यांची दुचाकी
पण आज पाणी जास्त असल्याने ती
पाण्यातून आणि चढावरून माघारी
ढकलत बाहेर काढावी लागली

त्यांनी ज्या अन्नाचे आभार मानले
त्याचे सगळे भक्त जमले

आणि बंधुतेच्या गौरवी प्रेमात
सद्गदित होत त्यांनी
रेचक गोळ्या घेतल्या

भावना दुखावण्याचे उद्योग
टाळत हे असे भावनिक
संमीलित होणे हेच
पोटदुखीपासून मुक्ती देऊ शकते
हेच मुखशुद्धी म्हणून
अधिक टिकाऊ सत्य असते
म्हणून दातांचे उन्मळणे थांबते
हे समजणे हेच महत्त्वाचे ठरले

म्हणून वदनि कवळ घेता मरेस्तोवर
जप करावा आपल्या भावनिक एकोप्याचा
बास
--- ००० ---

श्री हनुमानजींकडून श्री श्रीरामजींचा
पराभव !

आपल्याच सोसायटीकडे जरा लांबून पाहणे --

चर्चेसाठी नाही -- फक्त माहितीसाठी -- आणि ज्याचा त्याने, वाटल्यास, विचार करण्यासाठी --ऑस्कर विजेत्या ' पॅरासाईट ' ( बांडगुळ ) या चित्रपटाचा दिग्दर्शक काय म्हणतो ते पाहा --

"There are people who are fighting hard to change society. I like those people, and I'm always rooting for them, but making the audience feel something naked and raw is one of the greatest powers of cinema," he says. "I'm not making a documentary or propaganda here. It's not about telling you how to change the world or how you should act because something is bad, but rather showing you the terrible, explosive weight of reality. That's what I believe is the beauty of cinema."

-- Bong Joon-ho

काही मित्रांनी मागितल्यामुळे अनुवाद --

" काही लोक सामाजिक परिवर्तनासाठी नेटाने लढा देणारे असतात. मला ते आवडतात आणि माझा नेहमीच त्यांना नैतिक पाठिंबा असतो. पण, प्रेक्षकांना काही नग्न आणि खडतर याची अनुभूती देणे ही सिनेमाची एक मोठी शक्ती आहे, " तो म्हणतो, " मी एखादा माहितिपट वा प्रचारपट करत नाहीय. तुम्ही जग कसे बदलावे किंवा अमुक एक काही वाईट आहे म्हणून तुम्ही कोणती कृती करावी, हे सांगण्यासाठी नाही मी करत चित्रपट. उलट तुम्हाला वास्तवाचे भयानक आणि स्फोटक दडपण जाणवावे, हा माझा हेतू असतो. आणि हेच सिनेमाचे सौंदर्य असते, असे मी समजतो. " ( यातल्या शेवटच्या वाक्यात ' सौंदर्य ' ऐवजी शान, गुणवत्ता, वैभव, महत्त्वलक्षण, आशयघनता -- असे अर्थही घेता येतील. )

-- बाँग जून-हो ( दक्षिण कोरिया. )

दुरुस्त्या करत करतच तर चालणार जगणे --

प्रत्येक संबंधात संघर्ष का आहे, या प्रश्नाकडे लक्ष न देता, माणुसकीच्या गप्पा मारणे व्यर्थ आहे --

एकमत

झाडे दिसावीत म्हणून आकाश असते की
आकाश दिसावे म्हणून झाडे असतात
हा प्रश्न समोर येताच कळते
ना हिंदू आद्यतायुक्त असतो ना मुसलमान
खरे तर ना विचार असतात ना बाजू
असतात फक्त वेगवेगळ्या सवयी
आधीच्यांनी नंतरच्यांना लावलेल्या
शौर्याच्या आवडीसह

झाडे आकाशाविरुद्ध
पुकारतात एल्गार
आणि आकाश ढिम्म हलत नाही
तेही शूर असल्याने

पक्षी म्हणतात प्लीज
आमचे पंख घ्या कापून हवे तर
पण आम्हाला तुम्ही दोघेही हवे आहात

मरू देत साले हे नुसते
आपला फायदा घेतात
देतात काय भोसडीचे आपल्याला

दोघेही म्हणतात

विरोध आहेच मनात
तर बंधुत्व कसले
यावर शत्रूंचे एकमत होते
--- ००० ---

प्रयोग पुणे निर्मित
येते आई !
( मार्शा नॉर्मन यांच्या ‘ नाईट मदर ‘ या मूळ नाटकावर आधारित. )
ले० डॉ. चंद्रशेखर फणसाळकर, दिग्द० सुबोध पंडे, संगीत – राहुल रानडे,
कलाकार – सुजाता देशपांडे आणि ऋता पंडित.

हे मुख्यतः संवादांचे आणि संवादफेकींचे नाटक आहे. डॉ. फणसाळकरांचे संवाद उत्तमच आहेत. नाटक बसवताना सुबोध पंडे यांनी ते सहज, अन्वर्थक हालचालींत छानच बांधलेले आहे. नाटक दोन अंकी आहे आणि यात फक्त दोनच पात्रे आहेत. या नाटकात कुठेही ढील नाही. प्रत्येक शब्द आणि प्रत्येक वाक्य लक्षपूर्वक ऐकले गेलेच पाहिजे. अशा प्रकारच्या या नाटकात वाचिक अभिनय अर्थातच खूप महत्त्वाचा ठरतो. सुजाता देशपांडे आणि ऋता पंडित यांनी ते काम समर्थपणे केलेले आहे. त्या दोघींच्या उत्तम संवादफेकीसाठीही हे नाटक पाहायला हरकत नाही. ऋता पंडित यांना एकदोनदा मोठ्या आवाजात बोलायचे संवाद आहेत. त्या वेळी मात्र त्या अचानक, चाललेल्या आवाज संगतींशी बरेच विसंगत वाटेल असे ओरडतात, तेव्हा ‘ भो ‘ केल्यासारखे दचकायला होते. तसे होऊ नये.

आई-मुलगी हे या दोघींतले नाते आणि त्यांची इतरही नाती खतम झाली आहेत वा होत आहेत, असा एकूण माहोल. यातल्या नाशाचा अनुभव देणे हा आहे नाटकाचा आशय. सुरुवातीला सहज चाललेल्या संवादांत पिस्तूल हा शब्द येऊ लागला तर मला वाटले की कृष्णसुखनाट्य ( ब्लॅक कॉमेडी ) आहे की काय. पण तसे नाहीय. सरळ वास्तववादाच्या अंगाने जाणारे हे एक नात्यांच्या नाशाचे नाटक आहे. कदाचित, ही एक नाशजंतूनाशक लस ठरू शकेल. असेही घडू शकते – असेही वाट्याला येऊ शकते – हे भान प्रेक्षकांना येऊ शकते. पण, याहून अधिक या नाटकाची पोच नाही. “ हे बघा, कसे घडले – “ – असा एकूण प्रकार. अशा घटना आणि आयुष्यचित्रे हल्ली माध्यमांमुळे अनेक प्रकारे लोकांच्या मनांवर आदळत असतात. त्यामुळे, नाटकाचा आशय, ‘ अरेरे ‘ म्हणून संपू शकतो. तो नाशप्रक्रियेच्या खोलात जात नाही.

हे नाटक पाहावे ते उत्तम संवाद, उत्तम अभिनय, उत्तम तंत्र आणि मुख्य म्हणजे उत्तम बांधणी, यांसाठी. पूर्ण नाटक दोन तास प्रेक्षकांना खिळवून ठेवते. दोन्ही अभिनेत्रींनी या नाटकाचे आव्हान चांगले पेललेले आहे.

‘ येते आई ! ‘ हे शीर्षक जरा गैरसमज निर्माण करणारे वाटले. आईचे भव्य प्रेम आणि प्रभुत्व हे जर असेल तर यात तसे एखाद्या स्टार अभिनेत्रीचे नाव दिसत नाही ! आणि काही वेगळ्या प्रकारच्या नाटकांची अपेक्षा असलेल्या लोकांना वाटणार, “ हं, हं, ते आई वगैरे – “ ! दोन्ही प्रेक्षक दुरावू नयेत म्हणजे झाले. तेवढे सोडले तर, अवश्य बघावे असे उत्तम नाटक. फार ग्रेट वगैरे नाही, पण, दर्जेदार !

--- 000 ---

बदल

आता काय कसे शक्य होईल
या विचारात तेच शरीर तेच मन
अशीच सगळी गर्दी
घराणे जपणारी आणि फॅशनप्रिय
आधुनिक उपचारांनी कॅन्सरमुक्ती
शक्य असल्याचे माहीत असलेली
आणि तरीही संघर्षमुक्तीची
शून्य माहिती असलेली

त्रास कशाकशाचा होतो
हे मोजून माणुसकीचे उपाय
कसे कसे आचरून
आहे यात
कशा दुरुस्त्या करता येतील
याचे विचार करत
लेखक-कवींनी
आम्हाला कसे घडवावे
हे सांगणारी भासमय
आहे ती सदोष निस्सारणयंत्रणा
हळूहळू सुधारत राहणारी
‘ आपण करू शकतो ‘ अशी घोषणा देत
आपापले स्वभाव सुसंस्कृत समजणारी
भूतकाळमय

बदल तर हवेतच म्हणणारी
--- ००० ---

छायाप्रकाश आणि रंग यांचे सौंदर्य तुलनात्मक नसते -- जे असते ते पूर्णच असते --
( फोटो काढणे, डाऊनलोड करणे, क्रॉप करणे आणि मग एफबीवर देणे याचे स्वशिक्षण चालू आहे -- )

दारे बंद होत जातात

आस्वाद म्हणून पापण्यांवर
तोललेले सूर्याचे बालपण

अद्वितीय वळणे घेत
शेवटी मिठागरात पोचते
निसर्गात
कुणाचीच कोणतीही
तक्रार नसते कुणाही विरुद्ध
मिळेल त्या जागेतून
मार्ग काढत वाढतात
पाण्यासारखी झाडे

स्मरण आणि भाषा
विषारी करतात
प्रचंड हलता समुद्र
आणि सावध राहायला
भागच पाडतात क्षणोक्षणी
चंद्रावर हल्ला
होण्याची शक्यता गृहीत धरून

रस्त्यावर मंत्रून टाकलेला
लालबुंद भात
आणि अवयवांच्या लैंगिक आठवणी
पुन्हा पुन्हा हेच सांगतात
की तुटलेली आहेत
आकाशाची बटणे आणि
भंगलेल्या आहेत भावना
कुणीतरी अन्याय केल्याप्रमाणे
आणि एकच विषय चालतोय
सगळ्याच परिसंवादांत
की श्वास घेणे हे सहज सोपे
होण्यात कोण आहेत
झारीतले शुक्राचार्य

एवढ्यावरही नाही संपत
हे जीवजंतूंचे जन्मरहस्य
छोटे कीटक आणि मोठे प्राणी
यांना लागणारे अधिवास
वेगवेगळे असूनही
मनांची पृथ्वी तर

एकच असते अलंघ्य

हे पाहून आणि असे आहे म्हणून
आरशांचा वापर नाही थांबू शकत
तिथली संभोगदृश्ये
खरी की आभासी
हे ठरवणारे मनच तर
असते गुंगलेले उत्तेजनेत आणि मधेच
उतावीळ होत पांढऱ्या प्रार्थनेत

निवेदक कुणीही असो
कथा खरीच असते

एवढ्यातेवढ्याने हळवे होता होतानाच
थकून जात दारे बंद होत जातात
आणि धुकट होत भावनिक झोप लागते
--- ००० ---

मुतारी

जे घडले तसे लिहून काय व्यक्त होईल
माहीत नाही पण करून पाहतोय

रेल्वेचा परिसर आणि तीन प्रश्न
एक म्हणजे दोन कागदांच्या तिकिटातला
एक भाग हरवलेला दुसरे म्हणजे
सोबत असलेले नातेवाईक कुठे गेले
आणि तिसरे म्हणजे फलाट
क्रमांक पंचेचाळीस कुठे आहे
यांची धावपळ आणि आता तर
लेट झालेली गाडीही येतेय

पथारीवरचा एक माणूस म्हणतो
हा घ्या तुमच्या तिकिटाचा तुकडा
तरी अजून दोन आहेत प्रश्न
तो फलाट तर टीसीलाही माहीत नाहीय

पुलावरून खाली पाहतो तर
खूप दिसताहेत रेल्वे लाईन्स
म्हणजे असणार तो फलाट
कुठल्या दिशेला जावे

तेवढ्यात गरज निर्माण होते
मुतारीची पण ती कुठे असेल

अरे वा सापडली
--- ००० ---

सर्व दुखणे

कधी कधी
अमुक विषयावर
अशी नसतेच कविता
ती असते आणि तिच्यात
एक वा अनेक विषय येतात
मोकळ्या मैदानात
जसे खेळाडू

मग घडून गेलेली चिंतने
आपोआप उमटतात
आणि गती देतात वस्तूंना
त्यांना नंतरच्या म्हणून पाहात

माझ्या पोटात काय बिघडलेय
हे कळत नसणेही येते कवितेत

कविता ही काही औषधी गोळी नसते
पण ती सामावून घेऊ शकते

जगण्याचे सर्व दुखणे
--- ००० ---

तीन गुच्छे -- जो देखेगा उसका भी भला और जो ना देखेगा उसका भी भला --

माणसाने काटलेला, सूर्यप्रकाश मिळवण्याचा मार्ग पुनरुज्जीवित करण्याचे प्रयत्न --

बेकेट

बेकेट माहीत असण्यानसण्याशी
घटनादुरुस्तीचा काय संबंध
उद्या कुणी म्हणेल
माणसाच्या हाडातून
कोकिळेचा आवाज यायला हवा

जपून कधी वापरलीच नव्हती भाषा
तर आता अचानक हे अति-उंची कपडे
आणि अत्तरांचे रीतिरिवाज यांसह
हालचाली तरी कशा जमणार

सुखदुःखांच्या त्वचेखाली
इतकी वर्षे जगल्यावर
आता टाईल्सचा दर्जा गेला तेल लावत
घसरून पडणे होऊ नये
पुन्हा त्याच भूतकाळात
म्हणजे झाले

असू दे एखाद्या खुन्याचा बधीरपणा
पण मैफिलीत पहिली रांग
आणि मटणाआधी चिकनपायसूप
आणि पोराटोरांना उंची जुहू चौपाटी
हे असले की बास

मुंबई मुंबई म्हणजे तरी काय
घामच तर असतो
--- ००० ---

दोघीही

एकीचे रूप असणे
दुसरीचे नसणे
दोघीही

नष्ट करण्यात पटाईत

पायांची बोटेही
कार्यमग्न असणे
ही आठवण
कधीही जिवंत

दुसरीला मात्र
आठवण नाही चालत
आधीच नष्ट व्हावे लागते
तिच्या नसण्यात

शरीराने नष्ट होणे
हे अत्युच्च टोक
ओलांडणेच असते
असण्यानसण्याचे

आधी असणे बरे
मग नसणे बेश्ट
हे माझे डाव
दोघीही हसून चालू देतात
--- ००० ---

कुणालाही बिनडोक म्हणणे हे बऱ्याचदा तो काय म्हणतोय त्यापासून पळून जाणे असते !

क्रांती

नुसतेच कुणाचेतरी भक्ष्य म्हणून
मरण्यात काहीच नसते समस्या
ती येते जेव्हा
अन्याय करा वा सहन करा
या घुसमटीच्या खेळात
सक्तीने सहभागी व्हावे लागते तेव्हा

किती वर्षांनी मृत्यू येईल
याचा झाड नाही विचार करत
सापाचे भक्ष्य होणारा उंदीरही

क्षणभरच होतो विचलित
जखमी वा आजारी झालेले
प्राणी पक्षी आपोआप यथाशक्ती
सहन करत गाठतात अंत

माणसाच्या मनाचे क्रूर खेळ
व्हायला हवेत अन्नासारखे नैसर्गिक
लुटणे ओरबाडणे हवे तसे उपभोगणे
सामर्थ्यवानाचे
स्वीकारले जावे सहज अटळ म्हणून

मग ना कायद्याची गरज ना शिक्षेची
ना न्यायाची ना क्रांतीची
म्हणजे निश्चितपणे जगतील माणसे

पण क्रांती ही सामर्थ्यवान होण्यासाठीच तर असते
--- ००० ---

हजेरी

मी चौकशी नाही करत
की का बाबा हे केस विस्कटलेले झाड
त्या मरतुकड्या कुत्र्याकडे पाहात आहे
कारण प्रत्येक गोष्टीचे कारण आणि हेतू
यांच्या जंजाळात गुरफटले की मूळ मुद्दा
न चावता नुसताच गिळला जातो आणि मग
नंतरची सगळी दुःखपरंपरा ओढवते
हा माझा अनुभव आहे

एका बिंदूपाशी थांबून
तिथेच पूर्ण कविता लिहिता यायला हवी
असा विचार येतो तेव्हा
मी सभेला जमलेल्या गर्दीकडे दुर्लक्ष करतो
आणि कोण निवडून येईल याची काळजीच
देतो टाकून सहज जाता जाता पुलावरून
श्राद्धाचे निर्माल्यच असल्यासारखी खाली

वास्तवाचे पदर मला मनाने दिसतात
दगड हे खरे तर असतात
पृथ्वीच्या आठवणींचे पिकलेले घट्ट फोड

कवितेने अमुकच काही सांगायला हवे
असे मुळीच नाही – उलट न सांगताच
ती हजेरी घेऊ शकते हजर नसलेल्या मुलांची
म्हणजे खडसावून म्हणू शकते वाचकांना
की बाबांनो भांग पाडून जरा इथेच सूर्य उधळा
--- ००० ---

भूतकाळाच्या स्मारकाच्या आठवणींचा कचरा --

इनपुटस

जातायेता पाहिलेले
घाटातले किरकोळ सोडले तर
मी धबधबे फक्त चित्रांतच पाहिलेत
तसेच गाईला फक्त खालचे दात असतात
हे मी नेटवर पाहून लक्षात ठेवलेय
सीरिया आणि इराण यांच्याबाबत वाचून
माझ्या सामान्य ज्ञानाने
ते मी समजून घेतलेय
आणि त्यांवरचे माझे भाष्य
भारताच्या अर्थकारणावरील परिणामांसह
मी मित्रांच्या आमसभेत सांगू शकतो

पाणी वाचवण्याचे महत्त्व
आणि लैंगिक शिक्षण हे मस्टच आहे
हे मी नेहमीच सांगतो

हा आख्खा देहच निसर्गातूनच जमवून
वापरात ठेवलाय
तर माहितीचे ते काय विशेष

अनेक विद्वानांच्याही मी चुका काढतो
इकडून-तिकडूनच पण काय कसे

जमवायचे ते त्यांना समजत नाही
ते चुकीचे इनपुटस घेतात

मला दांडगा आत्मविश्वास असतो
--- ००० ---

वर्ज्यच

ठीक आहे अमुक एका काळात
मी असणार आहे पण मला
मृत्यूचे अवडंबर नको आहे
विचारांचे उपरेपण नको आहे
मतांचा वेडेपणा नको आहे
प्रेम हवे माणुसकी हवी
वगैरे हवेतल्या गप्पाही नको आहेत

मी नसेन तेव्हा
हे झाड असेल नदी असेल
समुद्र आणि आकाश असेल
हेही नको आहे -- नुसती
आहे ते सुटण्याची भीती

कोण सत्य कोण न्यायाचे
कोण सात्त्विक संतापी
कोण समर्थनीय हिंसक
हे ठरवण्याची
माझी ना कुवत ना लायकी

माझा अभ्यास तर नाहीच
शिवाय आता कसे होतील बदल
याचे मला अंदाजही नाहीत

विवेक तत्त्वज्ञान अध्यात्म
मला वर्ज्यच करायचेयत – नुसते मानसिक सगळे
--- ००० ---

इतिहास कवटाळत जगणे --

शिशिरदर्शन --

शेवाळ्यात

बहुसंख्याकांचा इतिहास
मी घोटत राहिलो
शेवाळ्यात घसरल्याप्रमाणे
मी नगण्य बेडूक असल्याने
मी सोडली नाहीत कधी
माझ्या अभिमानाची वलये
धूम्रपान शिदोरीतच नसल्याने
मी माजवू नाही शकलो
दहशत माझ्या वैभवाची
मी आत्मतुष्टपणे
राहू नाही शकलो हीरो
चमकावत
माझ्या हातातल्या उद्दाम साखळ्या
मी झालो नाही कधीच
दारू-मटण-पानयुक्त सफेद तेज

ना भांडण ना तंटा असा सभ्य
सौजन्यशील राहिलो
कष्टाळू अभ्यासू किडा
पुस्तकातला रीसेलच्या

यात माझे काय होते
या विचारात माझ्या
हुशारीपासून तर झालोच मी परका
पण जगणेही उपरेच वाटत राहिले मला
--- ००० ---

येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांवर भुंकणे, त्यांचा पाठलाग करणे, जमल्यास एखादा अपघात घडवणे -- ही सर्व रात्रपाळी निरलसपणे पूर्ण केल्यावर सकाळचा आराम --

माझ्याच घामातून

काहीही बोलण्यासाठी मला
या जगाचाच उपयोग करावा लागतो
माझ्या मेंदूच्या कडेकडेने
जात अंधारात
एखाद्या वासनांध कुत्र्याप्रमाणे

माझ्या आयुष्यातल्या वस्तू
प्रेयसी आणि घटना
ल्हा ल्हा करणाऱ्या
वापराव्या लागतात मला
माझीच समज घडवल्याप्रमाणे

माझी भाषा माझ्याबरोबरच
भोगत आलेली
जगाचे टक्केटोणपे
संपर्काला ओपन
एखाद्या वेश्येप्रमाणे

तरीही मला प्रेम हवेच असते
प्रमोशन हवेच असते
टाळ्या हव्याच असतात
माझी सर्जकता म्हणून
माझ्याच घामातून उगवल्याप्रमाणे
--- ००० ---

पाब्लो सॅबोरियो ची मला आवडलेली एक कविता –

काहीच नसण्याबाबत

माझ्या त्या अवजड टेबलावर
मी पुनरावृत्ती करतो
फळाच्या त्या चवीची

ही खोली आहे लहान
किंवा असे म्हणू की जग
दुर्लक्ष करते स्वतःकडे
या क्षणापुरते

त्याला फारसा
नसतो अर्थ

हा परीघ
हा छोटासा भाग
असण्याचा

ही खोली असते मला
जिभेसारखी

स्वतःच्या पृष्ठभागाहून
फारशी अधिक
चव न घेणारी

कुठेतरी
कशाची तरी
होते सुरुवात
कुणासाठी तरी

पण माझा विश्वास असतो
न्यूनतमावर

आणि मी पुनरावृत्ती करतो
माझ्या कल्पनेची
काहीच नसण्याच्या

खूपच आधीपासून
ही खोली
सुरू होण्याच्या
--- ००० ---

January 2020
January 31

उकळते

आधी त्वचा पराभूत होते
आणि मग नखे कडवट होतात
आणि त्यानंतर मात्र
डोळ्यांना आकाशही
वाटते विरोधक

त्यांच्या पावलांचे ठसे
उपरोधामुळे वाकडे उमटतात
आणि त्यांचे आवाज
घोगरे झालेले असतात
सततच्या त्वेषाने

ते खूप अभ्यास करतात
आणि जगाची सगळी रहस्ये
समजल्याप्रमाणे
थुंकत राहतात प्रत्येकाच्या खिशात

ते भयभीत असल्याने
शूर असतात टोळ्या करून
आणि हल्ले करतात
सगळीकडे न्यायासाठी
मोहल्ले स्वतःचे न सोडता
तिथूनच उदारपणे

ते मानवतावादी आणि शांततावादी
असून उकळते हिंसक असतात
--- ००० ---

अन्यथा

तुम्हाला दिसलेला असू शकतो
संबंध अस्तित्ववाद साम्यवाद
आणि रोज सकाळी
दहाला येणारी कचरा गाडी यांत
-- तुम्ही लिहू शकता एक कविता
विश्वाचे मूळ शोधणारी

पण तुम्हाला अडथळे असतात --
कुणी तुम्हाला क्षुद्र लेखलेले असते
कुणी तुम्हाला फसवलेले असते
किंवा कुणी गायलेले असतात
तुमच्या घराण्याचे गोडवे

तुम्हाला गोठवून टाकण्यासाठी
खूप मोठे कारस्थान चालू असते
त्याच लोकांकडून
ज्यांना नको असतो तुमच्या कवितेचा धोका

इतिहासात रमलेले आणि अपमान
होताच उसळून येणारे लोक
मुळीच सोडू इच्छित नाहीत
त्यांच्या सवयी

हे ओलांडायचे असेल तर
त्यांची कारस्थाने आधी ओलांडावी लागतील
अन्यथा विसरा ती कविता
--- ००० ---

एक सत्ताधीश म्हणाला, कसली पुस्तके आहेत या वाचनालयात ? जर ती आपल्या धर्मग्रंथाच्या विरोधी असतील तर ती नष्टच करायला हवीत आणि जर ती आपल्या धर्मग्रंथातलेच सांगणारी असतील तर त्यांची गरज नाही, कारण, आहेच ते सगळे धर्मग्रंथात. त्यामुळे, हे पूर्ण वाचनालय जाळून नष्ट करा !

त्याच पद्धतीने इथल्या एफबीवरच्या राजकीय वादांबद्दल म्हणता येईल -- विरोधी लोकांचे मतपरिवर्तन होत नाही, नुसत्याच शिव्या होतात, त्यामुळे, तसले बंदच करावे -- आणि जे आपल्याच मतांचे आहेत त्यांच्याशी तेच तेच पुन्हा पुन्हा बोलत बसण्यात अर्थच काय -- म्हणून तेही बंद करावे ! सारांश, इथले सगळेच राजकीय वाद वा चर्चा या बंदच करणे शहाणपणाचे होईल, असे म्हणावे का ?

विद्याताई

बी. ए. झाल्यावर मी नोकरीकडेच वळलो. सुरुवातीला मला किर्लोस्कर प्रेसमधून कामे मिळू लागली. शिक्षण, चित्रपट अशा क्षेत्रांतल्या लोकांच्या मुलाखती घेणे, वगैरे. ते एक प्रकारे घरून काम करणे होते. नंतर मला सांगण्यात आले की मी यापुढे ऑफिसात येत जावे आणि तिथून काम करावे. पहिल्या दिवशी मी हजर झालो तर पहिले काम कोणते आले असेल माझ्याकडे ? विद्याताई ' स्त्री ' मासिकाचे काम पाहात. त्यांनी, ' प्रथमच आई झाल्यावर ' या विषयावर स्त्रियांची पत्रे मागवली होती. सुमारे अडीचशे पत्रे आलेली होती. विद्याताई होत्या रजेवर. तर ती पत्रे वाचून, त्यांचे संपादन करून एक

लेख तयार करायचा, असे ते काम होते. ते मला देण्यात आले. मी ते वेळेत पूर्ण केले आणि ते ' स्त्री ' त प्रसिद्धही झाले. आणि नंतर विद्याताईसह सर्वांना आवडलेही. ' प्रथमच संपादकीय विभागात काम करताना ' असे ते माझे समाधानकारक झाले होते ! या प्रकारे, विद्याताई ठरल्या माझ्या पहिल्या बॉस -- बॉसिंग मुळीच न करणाऱ्या ! हे सगळे मला आज आठवणे साहजिकच आहे. विद्याताईंच्या स्मृतीला माझे विनम्र अभिवादन !

--- ००० ---

द्वेष हा द्वेषपात्राला जाळेल वा न जाळेल पण द्वेषकर्त्याला मात्र तो नक्कीच जाळत राहतो --

सत्य शोधा

हळूहळू ते
माझ्यापर्यंत येऊन ठेपते
-- अमेरिका काय करू शकेल
आणि त्याने माझे काय होईल

सगळा अभ्यास करणे
मला शक्य नाही
अगदी मीही असलो
याचा गुन्हेगार एकत्रितपणे तरीही

कायदा अर्थशास्त्र
आणि विषमतेची कारणे
हे सगळे जमवत
बसू की काय

आणि बलात्कार
आणि भ्रष्टाचाराच्या केसेस
यांचे सर्व टप्पे आणि एकूण अद्ययावत
माहिती ठेवणे नाहीच जमणार मला

मी आत्ममग्न संवेदनाहीन संकुचित
निर्दय आणि अन्यायी का झालोय
याचे तुम्हीच जमवा कारणांचे तपशील जमेल तितके
आणि लावून टाका निकाल

माझा राग मनात न धरता सत्य शोधा म्हणजे झाले

--- ००० ---

थंडीसाठी त्यातल्या त्यात बुद्धिमान सोय --

January 28

Champra Deshpande added a new video.

Champra and Abhiram are celebrating 10 years of friendship on Facebook!
या मैत्रीस खूप खूप शुभेच्छा ! — with Abhiram Bhadkamkar.

ऊन फुकट

आजच्या दिवसावर सरळ एक श्रीमंती कळसच चढला. आमच्या भागात ब्राम्हण-मराठा अशी मालक भागिदारी असलेले दोन मित्रांचे एक छोटे हॉटेल होते. एक इंजिनियर आणि दुसरा हॉटेल मॅनेजमेंटवाला आणि मुंबईच्या ओबेरॉय हॉटेलमधला कामाचा अनुभव असलेला. उत्तम चालवायचे ते हॉटेल. छान स्वच्छता आणि चवदार दर्जेदार पदार्थ. आमच्या चहा-ग्रुपची रोज तिथे भेट असे. त्या दोन्ही मुलांशी आमचा छान स्नेह जमला होता. त्यांनाही आमच्याबद्दल खूप प्रेम आणि आदर वाटे. नंतर त्या जागेच्या मालकाने भाडे प्रचंड वाढवून मागितल्याने, ते परवडणार नाही म्हणून त्यांनी ते हॉटेल बंद केले. त्यांतला इंजिनियर इथे कुठेतरी नोकरी करू लागला आणि कुक असलेला एका परदेशातल्या हॉटेलात गेला नोकरीला. नंतर तो भारतात परत आला आणि इथल्या एका शहरातल्या एका अति-श्रीमंती हॉटेलात ( त्याला हॉटेल रिसॉर्ट म्हणतात वाटते ) नोकरीला लागला. तो आज संध्याकाळी भेटला. आमच्या कल्पनेच्या आणि एकूणच डोक्याच्या बाहेरच्या गोष्टी त्याने सांगितल्या.

प्रचंड जागेत मोजक्याच खोल्या. प्रत्येक खोलीला वेगळा स्विमिंग पूल. रोजी भाडे अडीच लाखांच्या पुढे ! मोठमोठ्या कंपन्यांचे मालक, काही राज्यांचे मुख्यमंत्री, परदेशी पाहुणे अशी गिऱ्हाइके. एकेका खोलीला सरासरी चार एवढा स्टाफ. उत्तम सेवा द्यावी लागतेच, पण, त्यांतले काही श्रीमंत माजुर्डे असतात, ते वाईट प्रकारे अपमानही करतात -- ते सहन करायची तयारी लागते. पण, अर्थातच. ते सज्जन जाताना जी टिप देऊन जातात ती सरासरी माणशी पंचवीस हजार येते ! त्याने एका देशातल्या एका राणीचा किस्सा सांगितला. सकाळी सूर्योदय झाल्यावर तिच्या अंगावर ऊन पडायला हवे. बाहेर माणूस उभा हवा. मग, तिने बोलावल्यावर आत येऊन त्याने तिला कॉफी द्यायची. ती जा म्हणेस्तोवर वा दुसरे काही सांगेस्तोवर तिथे खोलीत कोपऱ्यात उभे राहायचे. मी म्हणालो, " बाकीचे ठीक आहे -- पैशांसाठी अपमान खूपजण सहन करतात. पण, तुम्ही च्यायला, उन्हाचे पैसे फुकट घेता. नुसत्या त्या उन्हाचेच तुम्हाला पंचवीस हजार मिळत असतील ! "

मग, घरी येता येता स्वतःला म्हणालो, " दुनिया बहुत बडी है बेटा, तुम्हे कुछ नही मालूम ! " पण, काही का असे ना, हवे तेवढे मुबलक ऊन खाण्याइतके तरी आपण नक्कीच श्रीमंत आहोत, हे समजून आले ! शिवाय इतके ग्रेट लोक ज्याच्या हातचे खातात तो माणूस आमचा प्रेमळ मित्र असणे !

अर्थातच आमचे नेहमीच्या ग्रुपचे संध्याकाळचे फिरणे चालू होते. पुढे चालता चालता आम्ही त्या एकूण श्रीमंतीची चेष्टा केली -- थोडे अश्लीलही बोललो आणि ( आमच्या एका मिनि-हॉटेलमध्ये चहा पिऊन ) समृद्ध होत्साते घरी परतलो. ( आपल्याकडे हॉटेल हा शब्द चुकीच्या अर्थाने रूढ झालेला आहे, त्याला आता इलाज नाही. )

--- ००० ---

जिलबी

सकाळची चक्कर आणि जातायेताची किरकोळ कामे, हे चालू होते. एका गल्लीतल्या रस्त्यावर अचानक ' ठप्प ' असा आवाज झाला म्हणून वळून पाहिले तर नारळाच्या झाडावरून एक वाळलेला छोटा नारळ रस्त्यावर पडला होता. तिथून चाललेल्या एका सायकलस्वाराच्या डोक्याला लागून तो खाली पडला होता. मी तर ऐकून होती की नारळ कधी कुणाच्या डोक्यात पडत नाही आणि तो नेहमी काळजीपूर्वक दुसरीकडे वा बाजूला पडतो. पण ते या नारळाला माहीत नसावे. सायकलस्वार पाय टेकवून थांबलेला होता. म्हटले, काय, लागले काय ? तर म्हणाला, होय तर, माझ्या डोक्याला लागूनच पडला ! आणा इकडे, म्हणाला. मी मागे जाऊन उचलून तो त्याला दिला. नशीब, म्हणाला, मोठा नाही पडला आणि डायरेक्ट डोक्यावर नाही पडला ! गणपतीची कृपाच आहे, म्हणाला, ही ! मी मनात म्हटले असू दे, त्याची आहे श्रद्धा ! पुढे तो म्हणाला की गणपतीने मला काहीतरी संदेश दिलाय यातून -- आता घरी जाऊन विचार करतो. तो अर्थातच घरी जाऊन त्याच्या बायकोशी चर्चा करून तो संदेश डीकोड करून त्याचा अर्थ लावेल. नसतील त्याच्याकडे कुणी बाबा वा महाराज, पण, गणपती तर आहे !

मग मी पुढे गेलो. येताना विचार आला की बरेच दिवसांत नातींना काही खाऊ नेला नाहीय, तर आज घेऊन जाऊ. म्हणून जिलबी घेतली. घरी आल्यावर बायकोला म्हटले, सहज खाऊ म्हणून ही जिलबी आणलीय. तर ती म्हणाली, बरे झाले ! मी विचारले, म्हणजे ? तर ती म्हणाली की आज गणेश जयंती आहे, नैवेद्याला होईल ! बेश्ट ! म्हणजे एकाच फेरीत बॅलन्स शीट टॅलीच झाला म्हणायचा !

मी फक्त एक काम केले -- जिलबी की जिलेबी याबाबत मला शंका होती, ते पाहून घेतले. जिलबीच बरोबर आहे मराठीत. हिंदीत जलेबी म्हणत असले तरी !

--- ००० ---

खिडकीच्या अगदी जवळून साळुंकीचा आवाज आला. पाहायला गेलो. खिडकीखालच्या लॉफ्टवर ती बसलेली होती. मजेत मधेच आवाज काढत. तिला माझी चाहूल लागली. मी काचेच्या अलिकडून पाहात होतो. तिने मान वेळावून अंदाज घेतला. काही धोका तर वाटत नाहीय म्हणून ती बसून राहिली. पण, तरीही, धोका तर नाहीय, धोका तर नाहीय, हे मधून मधून पाहात राहिली. पण, शेवटी, नसला तर नसू दे धोका, पण, ते सारखे पाहात बसणे नको, मजेत व्यत्यय आणत -- या विचाराने ती उडून गेली. नाही तरी तिथे ती किती वेळ बसणार होती ? पण, मला उगीचच जरा अपराधी वाटले. तरीही, तिने बरेच क्षण आपण तिथे असूनही, आपला काहीही धोका मानला नाही, याचा आनंदही वाटला ! धन्यवाद साळुंकी महाशया -- मजेमें रहो !

--- ००० ---

धर्म जात भाषा आणि मते यांच्यांतल्या वेगळेपणामुळे इतरांना तुच्छ लेखणारे सगळेच स्वतःला सत्याचे पाईक समजतात !

पलायन

होय
माझ्या कल्पनेनेच
अस्तित्वात आणता येतो
मला तो पक्षी
जो मी होऊ शकतो
आणि उडूही शकतो
त्याच्या पंखांनी

पण हे क्वचितच
कधीतरी घडते --
हट्टाने तर नाहीच घडत

मलाच अजून
तुझी आसक्ती सुटत नाहीय
तर मी तुला काय सांगू
त्या पक्ष्याचे जगणे

तुझ्या जाळ्यातून
सुटायचेच नाहीय मला
जरी चोरून घडते क्वचित
ते छोटेसे पलायन

तूच आहेस खरे तर
त्या पक्ष्यापासून सततचे
माझे कल्पनाहीन पलायन
सावयव तीव्र आणि आभासी
--- ००० ---

कवितेतला ' मी '

माझ्या एका कवितेत मधुमेह आणि रक्तदाब यांचे उल्लेख आल्याने माझ्या काही मित्रांना वाटले की मलाच हे आजार आहेत. अजून तरी माझ्यावर त्या आजारांचा हल्ला झालेला नाही. माझ्या कवितेतला ' मी ' हा मीच असतो असे नाही --

अनेकदा नसतोच. काही वेळी एखाद्या व्यक्तिगत अनुभवाचे कवितेला निमित्त होऊ शकते पण सहसा कविता हे हुबेहूब आत्मचरित्र नसते. कवीची सुखदुःखे वाचकाच्या डोक्यात घालणे मला तथ्यहीन वाटते. असंख्य निमित्तांनी कविता निर्माण होऊ शकते -- तिचा मूलाधार मात्र मानवी अनुभव ' पाहण्याची ' वा ' ' समजून घेण्याची ' माझ्यातून येणारी प्रक्रिया असते. पण, व्यक्तिगत प्रतिक्रिया अशा स्वरूपात ती नसते.

हेच काही वेगळ्या प्रकारे आधीही कुठे कुठे बोलले गेलेले आहे. त्यांतले नेटवर सापडलेले काही उद्गार --

Persona refers to the voice a writer creates to tell a story or to define the speaker in a poem. Sometimes the writer may share real-life experience or feelings in autobiographical writing. Or he may write as a detached observer, keeping a distance from events in the poem, or an imaginary character.

Persona, plural personae, in literature, the person who is understood to be speaking (or thinking or writing) a particular work. The persona is almost invariably distinct from the author; it is the voice chosen by the author for a particular artistic purpose. The persona may be a character in the work or merely an unnamed narrator; but, insofar as the manner and style of expression in the work exhibit taste, prejudice, emotion, or other characteristics of a human personality, the work may be said to be in the voice of a persona.

The term derives from the Latin persona, meaning an actor’s mask, and is thus etymologically related to the term dramatis personae, designating the characters in a drama.

Now the second important point T.S Eliot is trying to get across is that poetry should be as he calls it “impersonal”. What he means by that is that in order for a writer to reach the kind of success he desires he must first learn how to separate his or her personality or perhaps personal experiences with their writing For T.S Eliot real art has nothing to do with a writers personal experiences rather than his ability to do the opposite.

फर्नांडो पेसोआने ७२ टोपण नावांनी वेगवेगळ्या कविता का लिहिल्या असाव्यात याचाही या संदर्भात विचार करावा.
--- ००० ---

‘ अध्यात मी, सध्यात तू, मध्यात म कुणी नाही ‘ ( दीर्घांक ) – निर्मिती – महाराष्ट्र कल्चरल सेंटर, पुणे,
ले० स्वप्नील चव्हाण, दिग्द० अपूर्व साठे, गीते० प्रमोद काळे आणि संगीत० चैतन्य आडकर.
-- स्त्रीपात्रविरहित अनेक पुरुषपात्रांचे दंगानाट्य.

स्वप्नील हा एक आजचा महत्त्वाचा नाटककार आहे. त्यामुळे, परतताना रिक्षा मिळायला कितीही त्रास होवो, हे बघणे तर भागच होते. शिवाय पावसाळाही संपलेला दिसतोय. हे सर्व विचारात घेऊन जाऊन पाहून आलो हे नाटक.

हे नाटक सुरू होण्यापूर्वी खाली एक १५ मि०चे अंगणनाटक होते. स्त्री-भ्रूणहत्या आणि बलात्कार यांवरचे. ते अर्थातच स्त्री-समस्या जोरकसपणे मांडणारे होते. प्रभावी होते. अनेक तरुण-तरुणी होत्या. त्यात, मधून मधून, परेड अमुक करेगा, परेड तमुक करेगा अशा जोरकस ऑर्डर्स होत्या – त्यांतली एक होती, ‘ परेऽऽड – सोचना बंद ! ‘ जोरदार परिणामकारक !
समस्या काय आहेत आणि काय घडायला हवेय याचे हे नाटक पाहिल्यावर मग, ‘ अध्यात मी --- ‘ पाहिले !

स्वप्नीलच्या नाटकात समस्या शेकड्यांनी आहेत पण त्या निरुत्तर करणाऱ्या, बौद्धिक निराकरणे नसलेल्या आहेत. कारण त्या जगण्यातल्या मूलभूत म्हणता येतील अशा समस्या आहेत. क्रौर्य, भीती, सेक्स या सर्वच बाबतींत एका ब्लॅक वॉलपाशी ( कृष्णसीमेशी ) इथे जाऊन धडकणे आहे. कुणी मारत असताना मरणाऱ्याला घाम फुटतो आणि ते घाम फुटणे त्याच्या ताब्यात नसणे – अशा म्हटल्या तर लहान समस्यांपासून ते हस्तमैथुनापर्यंत सर्व जगणे या नाटकात आहे. कमोडवर बसणे आणि हस्तमैथून करणे या कृतीही बिनदिक्कतपणे इथे एकूण जगण्याचा भाग म्हणून येतात. आजच्या जगण्यातल्या तुकड्यांप्रमाणेच नाटकाची रचना आहे. एका माणसाचे जगणे जसे फुटलेले आहे तसेच समाजाचेही असंख्य घटनांनी फुटलेले आहे. धर्म, भाषा, विचार हे सगळेच निरर्थक ठरते आहे. आणि तरीही मन मूलभूत समस्यांकडे वळतेच आहे. उत्तर-आधुनिक नाटकाची सर्वच वैशिष्ट्ये या नाटकात आहेत.

सगळे बोंबललेलेच आहे तर मग जे आहे ते साजरे करत जगा – हे उत्तर-आधुनिकतेचे अंतिम उत्तर या नाटकातल्या गाण्यांनी अधोरेखित होते. जगणे बोंबललेला भंगार आशय, नांदी, पोवाडा, नाट्यगीत, भजन, भैरवी अशा प्रकारांतून इथे उत्सवीपणे सादर होत राहतो. प्रमोद काळ्यांची गाणी आणि चैतन्य आडकरांचे संगीत हा ‘ आनंदी उपरोध ‘ जोरकसपणे हाणतात.

हा सगळा डोलारा अपूर्व साठे यांनी समर्थपणे दिग्दर्शित केलेला असून सर्व कलाकार आणि तंत्रज्ञांनी त्यांना उत्तम साथ दिलेली आहे.

उत्तर-आधुनिक आशयाचे, त्याच प्रकारच्या शैलीतले हे एक महत्त्वाचे नाटक आहे. विशेष म्हणजे यात निरर्थकाचा दंगा असूनही जगण्यातला meditative असण्याचा – चिंतनात्मकतेचा धागा हे नाटक सोडत नाही. हा या नाटकाचा उत्तर-उत्तर-आधुनिक विशेष म्हणता येतो. हे असे सगळे ठरवून – चिकित्सेने नाही घडत – ती भट्टी जमून यावी लागते.

मला हे एक, भट्टी जमून आलेले, मराठी नाट्यसृष्टीत हलचल निर्माण करू शकेल असे छान नाटक वाटले !
सर्व टीमला उत्तरोत्तर अधिकच आधुनिकता लाभो हीच सदिच्छा !
--- ००० ---

ऍब्सर्डिटी ( अतर्कता – म्हणजे तर्कविहीनता – अतर्क्यता नव्हे ).

चांगले-वाईट, स्वार्थी-निस्वार्थी, नैतिक-अनैतिक, विवेकी-अविवेकी असे मूल्यात्मक भेद आपल्या बोलण्यात असतात. काहींना वाटते की यांतले ‘ वाईट ‘ ते अतर्क म्हणावे आणि चांगले ते अतर्क म्हणू नये. आणखी काहींचे मत पाहिले तर

अतर्क काहीच नाही. आपण कशासाठी काय करतोय हे माणसाला समजत असते. त्यामुळे, सगळेच तर्कयुक्त, ‘ सार्थ ‘ असते. ऍब्सर्डिटी मधली जी अतर्कता आहे ती अशी द्वंद्वात्मक नसते. ती सर्वसमावेशक अतर्कता वा निरर्थता असते, हे लक्षात घ्यायला हवे. ऍब्सर्डिटीमध्ये म्हणजे अतर्कतेत ही असली द्वंद्वात्मकताही ऍब्सर्डच असते, हे पाहायला हवे. यालाच असंगतता, विसंगतता, व्यस्तता वगैरे म्हटले जाते. पूर्ण मानवी जगण्यातली निरर्थता हा त्याचा अर्थ असतो. निवडक निरर्थता नव्हे. ऍब्सर्डिटीला आपण आपल्या आवडत्या सुबुद्धतेत वा निर्बुद्धतेत बसवणे म्हणजे तीच निरर्थक द्वंद्वात्मकता गृहीत धरणे ठरते. तोच निरर्थक आदर्शवाद गिरवणे ठरते. ऍब्सर्डिटीचे पूर्ण आकलन म्हणजे नथिंगनेस म्हणजे ‘ नसणेपण ‘ म्हणजेच अस्तित्ववादाची पूर्णावस्था, हे लक्षात घ्यायला हवे. ऍब्सर्डिटी वा नथिंगनेस या तत्त्वज्ञानात्मक / आध्यात्मिक संकल्पना आहेत. त्यांचा आता काळ संपलेला आहे, त्या काळापुरते ते होते, असे म्हणण्यात अर्थ नाही. या आकलनाला काळाची ऍब्सर्ड कुंपणे नसतात, हेही समजून घ्यायला हवे. ( आदर्शांचे ढाचे वा भ्रम कोसळणे वा दुसऱ्या एखाद्या आकर्षक कारणाने टाकले जाणे यालाही कधी कधी मी बोलण्याच्या ओघात ऍब्सर्डिटीचे भान येणे म्हणतो – पण ते पूर्ण नव्हे. ते डोलारे कोसळण्या वा टाकण्यापूर्वीचेही ऍब्सर्डच असते, हे विसरू नये. ) इथे हे पाहावे --

"Absurd" originally means "out of harmony," in a musical context. Hence its dictionary definition: "out of harmony with reason or propriety; incongruous, unreasonable, illogical." In common usage, "absurd" may simply mean "ridiculous," but this is not the sense in which Camus uses the word, and in which it is used when we speak of the Theatre of the Absurd. In an essay on Kafka, Ionesco defined his understanding of the term as follows: "Absurd is that which is devoid of purpose.... Cut from his religious, metaphysical, and transcendental roots, man is lost; all his actions become senseless, absurd, useless." -- Martin Esslin.

तसेच हेही पाहा --

In one of the great seminal heart searchings of our time, The Myth of Sisyphus , Albert Camus tried to diagnose the human situation in a world of shattered beliefs. Thus, “... But in a universe that is suddenly deprived of illusions and of light , man feels a stranger. He is in irremediable exile.. .This divorce between man and his life, the actor and his setting, truly constitutes the feeling of Absurdity.”

--- 000 ---

ताबा

वारा कुठून किती किती वेगात
यावा याला हजारो असतील कारणे
गरज काय प्रत्येक वेळी
उकरत बसायची
-- जेव्हा नदी कोरडी पडत गेल्याने
शहरात घुसतात मगरी
तेव्हा कोण चिंता करते की बाबा
त्यांच्यासाठी कसा हवा अधिवास

मनात येणारे मूडस
आणि कंटाळा आणि क्रोध
यांची कारणमीमांसा
कोणत्या मार्गदर्शिकेत तपासणार
रक्तदाब आणि मधुमेह संभाळत
आणि ते आहेत हे मान्य करत
सदोदित उचंबळणारे
कणांच्या लाटांचे प्रवाह जणू

जे आहे ते सगळे
गृहीतच धरले जाणार
जशा घटना आणि संघर्ष

याच्यापुढे मात्र खूप झाले
आता ताबा ठेवावाच लागेल
हे ठरवणेही असेल असंख्य कारणांनी युक्त
--- ००० ---

आजकी बात

बहुधा मी बाळगत नाही माझी मते
काही तासांहून अधिक काळ

-- या ओळी ५० वर्षांपूर्वीच लिहून गेलेला पीटर शेल्डाल हा कवी हा काळाच्या खूपच पुढची समज असलेला एक महान अक्कलवान माणूस म्हणावा लागतो. मतांची सतत विल्हेवाट लागत राहण्याचा काळ आधीच दिसणे ! याला पूरक असा जागतिक वा भारतीय कचरा खूप आहे. तो सगळा डोक्यात साठवणे शक्य नाही. पण, नुसता महाराष्ट्र घेतला तरी आपल्या तीन थोर पक्षांनी एकत्र येऊन इथे जी प्रणाल्यांची वस्त्रगाळ पेस्ट तयार केलीय ती नक्कीच कौतुकास्पद आहे. त्याच प्रक्रियेला आणखी बळ देण्याचे काम चौथ्यानेही आता उत्साहाने सुरू केलेले आहे. त्यामुळे, " लाव रे तो व्हिडियो ", हे कुणीही कुणाहीबद्दल म्हणावे, अशी समावेशक स्थिती तयार झालेली आहे. त्यात आता काही तथ्य राहिलेले नाही. लोकांनाही आता सारखा तो भूतकाळातला कचरा डोक्यात साठवणे, त्याच्या कुबट वासात जगणे वा तो जाळत त्याच्या विषारी धुरात घुसमटत राहणे याचा उबग आलेला आहे. ते भूतकाळातले आदर्श आणि तडजोडी यांचा आता फक्त टीव्ही चर्चांच्या आरडाओरडीपुरता नगण्य उपयोग राहिलेला आहे. सोडा ते सगळे -- ' आज की करो बात ', हा मंत्र झालाय. काय केले म्हणजे यश मिळेल, असा हा आता मॅनेजमेंटचा विषय झालाय. तत्त्वशील विचारांनी या सर्व परिस्थितीवर चर्चा करणारे काळाच्या शतयोजने मागे राहिलेत. ती पिढीही आता संपत आलीय आणि त्यांना कुणी गंभीरपणे घेतही नाही.

ॲब्सर्ड ( अतर्क ) रंगभूमी ही जगातली सर्वश्रेष्ठ रंगभूमी आहे, असे मला वाटते. माझ्या या मताला पुष्टी देण्यासाठी इतके लोक अथक परिश्रम करतात याचा मला खूप आनंद वाटतो.

--- ००० ---

नाइलाज

हे तर निव्वळ तुझे
वेड पांघरणे मुद्दाम उत्तेजक
-- माझ्या मनात दिसू शकते
तुझ्या मनाला तुझी पूर्ण दुनिया
हे तुला माहीत नाही
हे कसे शक्य आहे –
छे छे मला कसे असणार माहीत
तुझ्या दुनियेचे तपशील –
मी विश्लेषक विचारांनी थोडेच
मानलेय तुला माझे –

पण तुझ्या या नकळत डावाला
मी बळी पडतोय
समजून-उमजून
आक्रमण हाच बचाव
अशा नाइलाजाने

मीलनाचा क्षण म्हणजे
तपशीलांची गरजच नसणे
आणि तू
तुझा विजय मला अर्पण करणे
--- ००० ---

एक वेगळा कोन --

आम्ही माजी बँक सहकारी -- रोज संध्याकाळी फिरणे-गप्पा-चहा वाले -- काल सहभोजनासाठी एकत्र -- — with Subhash Khalde.

प्रत्येक कविता

प्रत्येक कविता
अशी ना तशी
कडेलोटाला यायला हवी

तसे न घडल्यास
तिच्यातली
वेडाची झाक दिसायला हवी
--- ००० ---

त्याच खोलीत

सत्कारांचे डोसे आणि झेंड्यांची चटणी
आणि आवाजांचे वेफर्स
खात मी बसून एका खोलीत
सर्व गोंगाट उत्साही मधमाशांचा
पूर्ण दुर्लक्ष करत

खूप झाले
आता थांबताच नाही येणार
घडावीच लागेल ती घटना
चुंबनाची
सर्व वास्तव आणि सर्व सत्ये
त्याच गर्दीत फेकून

हा उतावीळपणा
की अधीरपणा
की शीघ्र आच
की अनावर तातडी

हे काहीच विचारात न घेता
हा इथला एकाकीपणा
ओसंडतो खोलीबाहेरही

आता आत आणि बाहेर
हा फरकच संपलेला
त्याच असोबत खोलीत
--- ००० ---

ना मेडिकलला गेलो ना डॉक्टरेट केली, तरीही, माझे सहकारी मला डॉक्टर म्हणत, माझ्या अक्षरामुळे !

गांधींचे हस्ताक्षर वाईट होते, असे म्हणतात. टिळकांचेही तसेच म्हणतात. सखोल विचारवंतांचे वाईटच असते. माझेही वाईट आहे.

एवढेच नसते

जागे होताच
येणारे पक्ष्यांचे आवाज
सांगतात सगळे नॉर्मल आहे

हे एवढेच मी कुणाला
सांगून काय उपयोग

जागे होणे पक्ष्यांचे आवाज
आणि नॉर्मल असणे हे
एवढेच नसते मला सांगायचे

यासहची पोकळी सांगता आली
तर कविता पुन्हा लिहावी-वाचावी
लागणारच नाही कोणतीही
--- ०oo ---

माझे शैक्षणिक कारनामे

त्या वेळी एस एस सी म्हणजे ११ वी होते. बोर्डात मेरिट लिस्टमध्ये त्या वेळी ८२ टक्के वाला पहिला असे. त्या वेळी मला एस एस सी ला ७७ टक्के होते. आणि आपले आपलेच कौतुक म्हणून मी अंधेरी ते विरार एवढ्या केंद्रांत पहिला होतो. मला प्रवेश कुठेही मिळाला असता. पण, ' सत्यकथे ' चा एक वाचक या नात्याने, मला वाङ्मयाची आवड आहे अशी एक माझी गौरवप्रतिमा माझ्या डोक्यात होती. त्यामुळे, ( आणि तब्येतीची कारणेही जोडीला घेऊन ) मी कला शाखेकडे जायचा निर्णय घेतला. आम्ही मालाडला राहात होतो. तिथून फक्त दोनच स्टेशनांवर असलेल्या जोगेश्वरीला इस्माईल युसुफ कॉलेज या ( मुंबईवरून ओवाळून टाकलेल्या ) कॉलेजात प्रा. होमाई जे. श्रॉफ या ऑक्सफर्डच्या इंग्लिश एम ए असलेल्या बाई इंग्लिश विभागप्रमुख आहेत, त्यामुळे मी तिथे जावे, असा सल्ला मिळाला. प्राध्यापक व्हायचेच माझ्या डोक्यात होते, मग मराठी कशाला, इंग्लिशचेच होऊ, असे ते होते. त्यामुळे मी तिथे गेलो.

त्या वेळी कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला इंटर म्हणत. म्हणजे, माझे इंटर आर्टस. तिथे आला एक मोठा राक्षसी अडथळा ! त्या वर्षी तिथे ' वर्ल्ड हिस्टरी ' म्हणजे ' जगाचा इतिहास ' हा विषय होता. आणि मला तर त्या विषयाचा तिरस्कारच आहे. आपण इथेच लटकणार असे मी मनोमन धरूनच चाललो होतो. पण एक जुगारी उपाय म्हणून आधी, आधीच्या काही प्रश्नपत्रिकांचा अभ्यास करून १५ निवडक अपेक्षित प्रश्न काढले आणि तेवढेच चक्क पाठांतर करून तयार ठेवले ! सुदैवाने त्यांतले साडेतीन प्रश्न आले आणि त्या विषयातून माझी नैया पार झाली !

पुढे अर्थात अटळपणे दुसरा अडथळा आला ! इंग्लिश ! बी ए च्या अंतिम परीक्षेला बरेच संबंधित वाचत बसलो आणि मार्चला परीक्षा सोडून द्यावी लागली ! कारण त्या विषयाच्या बाकी विभागांतले काहीच नव्हते झाले वाचन ! मग शहाणा होऊन तिथेही शॉर्ट कट मारले आणि कसाबसा बी ए झालो ! पुढे आयुष्यात कधी कोणत्याही परीक्षेचे नावही काढायचे नाही, असे ठरवून टाकले !

हे सगळे आठवायचे कारण म्हणजे, ' तान्हाजी ' या चित्रपटावर इथे चालणाऱ्या चर्चा.

हिंदी सिनेमांतले दोन ठिकाणचे संवाद माझ्या टॉप वाल्या आठवणींत आहेत. एक म्हणजे ' मिस्टर अँड मिसेस ५५ ' मधला -- " पांच मिनिट रुको, मै शादी करके आती हूँ " -- हा आणि दुसरा, " इतिहास मत पूछो ! " -- हा. हा दुसरा बहुतेक, परेश रावलचा असावा -- चित्रपट आठवत नाहीय. कुणाला आठवला तर सांगा.

--- ००० ---

आपल्या आजूबाजूला, देशात आणि जगात असंख्य प्रश्न आणि समस्या आहेत. त्या सर्व अशा ना तशा आपल्या जगण्याशी जोडलेल्या असून त्यावर भलेबुरे परिणाम करणाऱ्याही आहेत. याचा अर्थ असा नाही की त्यांचा कसून अभ्यास करत आणि पूर्ण वा अपूर्ण समजुतीने त्यांवर साररख्या प्रतिक्रिया देतच आपण जगले पाहिजे. पण, थोड्याफार प्रमाणात सर्वांचा प्रयत्न तोच दिसतो. सर्वांच्या प्रतिक्रियांमधून समस्या अधिकच वाढतात, तीव्र होतात, रूपे बदलतात वा आणखी वेगळ्याच समस्या निर्माण करतात, हे लक्षात आले तर काय असू शकते आपली जगण्याची कृती ? की अशा ' मानवी हक्क ' टाईप वा आपल्याला ' श्रेयस्कर ' वाटणाऱ्या प्रतिक्रियांतूनच इथे पृथ्वीवर स्वर्ग अवतरणार आहे ?

उपटसुंभ

काळोख असतो मूळ
आणि उजेड असतो उपटसुंभ
कारण नसणेच असते मूळ
आणि असणे असते उपरे

आपापल्या आठवणी
समजा वाळत टाकल्या
किल्ल्याच्या काठावर
तरी शेवटी त्या वातड होणारच

आपलेपणाने कितीही
समजा गोंजारले रस्त्यावरचे दिवे
तरी त्यांच्या किरणांची धार
रक्त काढत राहणारच

म्हणून असण्याला रामराम
ठोकून निवांत असावे नसण्यात
स्वतःच उपटसुंभ असल्याचे
एकदा डोळे भरून पाहून घेत
--- ००० ---

सारांश

खरे तर त्यांनी माफी मागायला हवी
पण यापूर्वी तीनदा त्यांना स्वतःला माफी मागायची होती त्याचे काय
ते जाऊ द्या ही ताजी आहे
ही काय ताजी म्हणजे हेयर कटिंग आहे का
तुम्ही असंसदीय भाषेवर नका उतरू
पण मुळात असे बोलावेच कशाला
अहो नाही इतके लक्षात राहात खरे बोलून जातो माणूस
म्हणजे तुम्ही तेवढे खरे आणि बाकी सगळे बिनखरे असे का
खरे कुणाला म्हणायचे ते तुम्ही सांगा ना मग
जरा एक मिनिट मी दोघांनाही थांबवतोय
खरे कोण हा आपला आजचा विषय नाहीय
अहो आम्ही जन्मभर माफी मागत आलोय आम्ही भिणारे नाही
खरे म्हणजे काय ते आम्हाला कुणी शिकवू नये
विचाराने प्रश्न सुटला नाही तर रस्त्यावर उतरणाऱ्यांची आम्ही औलाद आहोत
आम्हाला कुणी धमक्या देऊ नयेत ही लोकशाही आहे
तुमचे बोलायचे तर १९४९ ला तुम्ही काय केले होते हे सर्वांना माहीत आहे
मग ७७ ला तुम्ही काय केलेत हे आम्ही बोलू का
नीतीचा टेंभा कुणीच मिरवू नये
त्यांनी माफी मागून विषय मिटवायला हवा
भावना दुखवण्यासारखे काही नव्हतेच त्यात
भावना तुमच्या की आमच्या
अहो भावना सगळ्यांना असतात कधी तुमच्या कधी आमच्या

चला वेळ संपलीय मान्यवरांचे आभार
बोलणाऱ्यांनी आणि ऐकणाऱ्यांनी दोघांनीही भावनांना आवर घालावा
आणि लोकशाही अबाधित राखावी हाच याचा सारांश
--- ००० ---

चुका

तुम्ही असे कसे घालता कपडे
निळ्या पँटवर पांढरा शर्ट
हे अगदीच शाळकरी नाही दिसत का

तुम्ही आकाशाकडे एकटक पाहता तेव्हा
डोंगराकडे शाळेच्या इमारतीकडे निष्कारणच
तुम्ही दुर्लक्ष करता असे नाही वाटत का

इतके दिवस तुम्ही शाकाहारीच खाताय
त्यामुळे तुमची नीट टिकवायलाच हवी अशी
मांसाहारीची सवय जाणार नाही का

राजकीय भांडणात तुम्ही निकराने
काहीच नाही मांडत उसळ्या मारत यावरून
तुम्ही पळपुटे असल्याचे सिद्ध नाही होत का

अरे बाबू मोशाय डोंट वरी
मी जे जे वागतो जगतो भोगतो ते ते सगळेच
मी समजून-उमजून चुकीचे करतो असे नाही कळत का

तुम्हाला जगात सगळीकडे इतक्या चुका दिसतात
याचा अर्थच तुम्हाला कधी ना कधी शांत
झोपायला हवे असे नाही वाटत का
--- ००० ---

सैफ म्हणतो -- मला ( ' तान्हाजी ' मधली ) भूमिका सोडायची नव्हती म्हणून मी ( त्यातल्या चुकीच्या इतिहासाबद्दल ) भूमिका घेतली नाही !

कवितालेखनातला एक प्रयोग

https://www.facebook.com/aksharnama/posts/2418156568495414

३४ वे अस्मितादर्श साहित्य संमेलन १४-१५ जानेवारी दरम्यान प्रसिद्ध कवयित्री प्रज्ञा दया पवार यांच्या अध्यक्षतेखाली लातूर येथे पार पडले. समकालीन प्रश्नांना भिडणारे, त्यांचा सविस्तर आढावा घेणारे उदबोधक भाषण पवार यांनी केले. त्यांच्या प्रदीर्घ अध्यक्षीय भाषणाचा हा संपादित अंश...

हा संपादित अंश असला तरी हे संपादन मूळ भाषणाला नीट न्याय देणारेच असणार असे मला वाटते. २०१७ चे भाषण मी अलिकडे म्हणजे बरेच उशिरा वाचले त्यामुळे आता त्यावर बोलत आहे. हे भाषण तीन वर्षांपूर्वीचे असले तरी ' शिळे ' झालेले नाही. आजही यातले वाक्य न वाक्य हळूहळू समजून घेत ते लक्षपूर्वक वाचले पाहिजे असे आहे. हे भाषण पूर्णांशाने मला समजलेले आहे, असे मी मुळीच म्हणणार नाही. स्वतःच्या अनुभवातून आणि चिंतनातून आलेली अशी भाषणे क्वचितच आपल्या समोर येत असतात. त्यांतलेच हे एक अपवादात्मक भाषण आहे. सामान्यतः पुरोगामी व्यक्तीचे भाषण हे अ चे भाषण ब ही कुठेही हाणू शकेल, असे असते. हे भाषण तसे नाही. पुरोगामी भाषणाचा एक उत्तम नमूना म्हणून याकडे पाहिले पाहिजे. या सर्व बाबींमुळे, प्रथमतः, या भाषणाला सलाम !

हे भाषण म्हणजे एक जबरदस्त वैचारिक कॅप्सूल तर आहेच पण ती एक एक आशयगर्भ कविताही आहे, असे माझ्या लक्षात आले. त्यामुळे, मला ' दिसणारी ' कविता मी लिहून काढली. आता ही कविता मी लिहीत असल्याने एक एकसंध कलाकृती म्हणून तिचे अस्तित्व साकारणे हे माझे काम होते. आणि या कवितेतल्या आशयाची जबाबदारी घेणेही. कारण आता फक्त प्रज्ञाच्या भाषणाचाच आशय ही कविता व्यक्त करत असेल, असे नाही. आणि एक टोकाची शक्यता अशीही असू शकते की हा पूर्णतः वेगळाच आशय आहे. त्यामुळे, प्रज्ञाला ही कविता आवडणे-नावडणे हे तिचे तिच्या भाषणनिरपेक्षच असावे लागेल. इतरांचे तर ते तसे असावे लागेलच.

अशी ही कविता तुमच्यासमोर जाहीरपणे सादर करणे, याला अर्थातच भाषणकर्तीची पूर्वानुमती मी घेतलेली आहे. कवितालेखनाचा मराठीतला एक वेगळा प्रयोग म्हणूनही या उपक्रमाकडे पाहता येईल, असे वाटते.

Pradnya Daya Pawar च्या २०१७ च्या भाषणात मला सापडलेली

प्रज्ञाची कविता

होय होय तीच मी
एक स्त्री एक दलित
एक दलितवादी एक स्त्रीवादी
एक दलित स्त्रीवादी
आणि तरीही दलित हिताचे आयाम
तुम्ही म्हणता तेवढेच न मानणारी
मी बौद्ध मी आंबेडकरवादी
आणि हो एक कवयित्री आणि एक साधी
मराठीची प्राध्यापिका
ना खगोलशास्त्राची ना गणिताची

असेच माझे अधिकाधिक विशेष सांगत
मला अधिकाधिक मर्यादित करण्याचे
तुमचे डाव मी जाणते बाळांनो
तुम्ही जसे म्हणता ना रिश्तेमे

हम तुम्हारे बाप लगते हैं
त्याच अर्थाने मी तुमची आई आहे

जातीय पुरोगामी आणि ब्राम्हणी दलित
येताहेत का लक्षात
स्त्रीला जातीचे प्रवेशद्वार मानणारे
कोण कोण आहेत ते पाहा ना
स्त्रीस्वातंत्र्य हे जातीजातीत
वेगवेगळे का लागणार आहे तेही बघा
-- मी मनूविरोधी असले की वाह छान
आंबेडकरवादी -- आणि दलित पुरुषाची
दडपशाही झुगारणार म्हटले की
पाश्च्यात्य पंखांची बेगडी कशी
खाजगी आणि सार्वजनिक स्वातंत्र्यात
भेद कोण का करते आणि यातून शेवटी
आम्हाला एकाकी पाडायचा आहे का डाव याचे काय

कायद्यात सामावेल का
सगळ्यांसाठी सगळा न्याय
की येतील त्यात संघर्षमय
आंतरविरोधी कलमे --
दलितांचा न्याय स्त्रियांचा न्याय
मराठ्यांचा वा ब्राम्हणांचा न्याय
होऊ शकतील का समावेशक आणि एकरूप

हे सगळे प्रश्न इतके एकत्र
की एक धागा ओढला तर
तिसरीकडेच ताण वाढावा

यावर फक्त एकच --
द गूझ इज आऊट
हे झेन सत्य क्षणात उजळणे

जेव्हा सगळेच दिसते
तेव्हा काहीच नाही उरत
हे येतेय का तुमच्या ध्यानात

माझ्या तरी कुठे येतेय

--- ००० ---

ओस

विरुद्ध लोकांना आम्ही काळोख म्हटले
पण आम्ही तर स्मारकांत लुप्त झालो आहोत
हे फार उशिरा कळले

आमचे चिलखती व्यक्तिमत्व
आम्ही मिरवत राहिलो
अनावश्यक शौर्याने
जरी हळूहळू बरेच लोक
आम्हाला नगण्य समजू लागले
पुतळे बेदखल करत

पुतळ्याने उगारलेली तलवार
ही आमची मनःस्थिती
अप्रस्तुत आहे हे समजत असूनही
आम्ही ती रेटत राहिलो
शक्य तितकी दहशत टिकवत

याद राखा आम्हाला शिकवू नका
आम्ही सूर्याची औलाद आहोत
असे आत्मविश्वासाने म्हणत
आम्ही स्वतःच पुतळे झालो

इथे प्रेमाची शक्यताच नाही हे पाहून
आमची झाडे ओस पडली

--- ००० ---

राडा

कुणाकडे खोड असेल
तर कुणाकडे चमचा

माझ्या धुराने कॅन्सर होतो

तर तुझ्याने काय स्वर्ग

सर्वांचे असंबद्ध वस्तूंचे जगणे
उदबत्ती कचरापेटी सगळेच समर्थनीय

साम्य एकच की फक्त हेच शक्य
हे सर्वमान्य डबक्यातल्या शेवाळ्यासारखे

पर्यावरणाच्या नावाने रडा
पण अस्मितांचा राडा चालूच राहायला हवा
--- ००० ---

२९ षटके, २६ निर्धाव, ३ धावा, ० बळी !
-- असे अचूक बापू नाडकर्णी गेले !
-- स्मृतीस अभिवादन !

गुरु-शिष्य

जॅक्सन पोलॉक हा जगातला कृतिचित्र ( action painting ) कलेतला एक महान कलावंत समजला जातो. तो जे. कृष्णमूर्तींची प्रवचने ऐकत असे, असे ' ऐकून ' आहे. पंडित जवाहरलाल नेहरूही त्यांची प्रवचने ऐकत. आपल्यामुळे त्या प्रवचनाच्या वातावरणात चलबिचल होऊ नये म्हणून, प्रवचन सुरू झाल्यानंतर हळूच ते शेवटच्या रांगेत येऊन बसत, असे म्हणतात. पुपुल जयकर यांनी लिहिलेल्या इंदिरा गांधी यांच्या चरित्रात असे लिहिलेले आहे की आणीबाणी उठवण्याचा निर्णय त्यांनी कृष्णमूर्तींशी चर्चा झाल्यानंतर घेतला. अरे बाप रे ! एवढी मोठी माणसे जेकेंचे ऐकत असत म्हणजे जेके किती मोठे, असे काही नसते. जेके ठरलेल्या वेळेला येऊन व्याख्यान देत आणि जात. ते स्वतः गुरु-शिष्य हा प्रकारच पूर्णतः नाकारतात. " मी चुकीचे बोलत असण्याची शक्यता आहे – स्वतःच्या जगण्यात ते पडताळून पाहा – " असे ते सांगतात. ' गुरुशिष्यपण । हे तो अधमलक्षण ' हे तुकारामाने म्हटल्याचेही इथे लक्षात घ्यावे. तरीही, एकूणात, जेकेंबाबत सगळेच स्तुतिपाठक होते का तर नाही. माझे स्वतःचे तर्कशास्त्राचे प्राध्यापक त्यांच्याबाबत शिव्या देत बोलत. " हा काय सांगतो *** जे गीतेत सांगितलेय तेच हा स्वतःचे म्हणून सांगतो ! " असे ते म्हणत.

आणखी एक गोष्ट ऐकिवात आहे, ती सांगतो. राहुल गांधींना विचारण्यात आले होते म्हणे की मोदींना दोन पुस्तके भेट द्यायची झाली तर तुम्ही कोणती द्याल ? त्यांचे उत्तर होते – भगवद्गीता आणि निसर्गदत्त महाराजांचे पुस्तक. आता कोण हे महाराज हेच बऱ्याचजणांना माहीत नसेल. अध्यात्माचे क्षेत्र म्हणजे बुद्धिवाद विरुद्ध श्रद्धावाद असे समजणारे बरेच ' शहाणे ' आपल्याकडे आहेत. ती दोन्ही क्षेत्रे बुद्धीच्याच पिंजऱ्यात म्हणजे सुखदुःखाच्याच पिंजऱ्यात अडकलेली असतात, या आध्यात्मिक सत्याबाबत ते अजाण असतात. या महाराजांच्या प्रवचनांचे पुस्तक प्रथम मॉरिस फ्रीडमन या पोलिश लेखकाने इंग्रजीत लिहिले आणि नंतर त्याचा मराठीत अनुवाद झाला ! मुंबईतल्या एका भुक्कड चाळीत ते राहात असत. ऐकायला कोण येते, वगैरेचे त्यांना काही घेणे नसे. यायचे त्यांनी या नाही तर नका येऊ, असा खाक्या होता. एखादा मनुष्य उगीचच

येऊन बसला असेल तर थोड्या वेळाने " या आता तुम्ही – " असा ते त्याला निरोपही देत. जगभर त्यांचे वाचक आहेत. सारांश, राहुल गांधी त्यांचे वाचतात म्हणून ते महत्त्वाचे ठरतात, असे काही नसते. माणसाच्या जगण्यात येणाऱ्या समस्या, त्याची सुखदुःखे यांबाबत त्यांच्या लेखनातून ज्ञान मिळते, असे ज्यांना वाटते त्यांना ते महत्त्वाचे वाटतात. राहुलना निसर्गदत्तांचे शिष्य म्हणावे का या प्रश्नाचे उत्तर, तसे म्हणायची काहीच गरज नाही, हेच असते.

ही सर्व सुरुवात करायचे कारण म्हणजे सध्या रंगात असलेला रामदास-शिवाजी हा विषय. ऐतिहासिक पुराव्यांवरून ते गुरुशिष्य होते की नव्हते यात मला शून्य इंटरेस्ट आहे. आपण या विषयाकडे एका वेगळ्या कारणाने पाहतोय. या बाबतीत मला आपल्याकडचे दोन प्रकार जाणवतात. एक म्हणजे, " शिवाजीमहाराज कितीही मोठे असू द्यात हो त्यांचे गुरू शेवटी ब्राम्हणच होते – " असे ब्राम्हणश्रेष्ठत्व ठसवणारे मूर्ख आणि, " काहीही होवो महाराजांच्या मोठेपणाचे महत्त्व या बामण स्वामीला मिळता कामा नये -- " असे वाटणारे दुसरे मूर्ख. आपल्याकडे दीक्षा देऊन घडणारी गुरुशिष्य परंपरा एक असते आणि दुसरे एक हेही सत्य असते की अनेक व्यक्तींकडून आपण शिकत असतो. त्या सर्व व्यक्ती, जगातले सर्व ग्रेट लेखक, कवी हे या अर्थाने आपले गुरूच असतात. गुरुशिष्य असे नाते प्रस्थापित व्हायची गरज नसते. त्या नात्यात थोडा जरी शोषणाचा अंश आला तरी ते तुकारामाच्या सांगण्याप्रमाणे ' अधमलक्षण ' होते. दोन्ही बाजूंनी हे लक्षात घ्यायला हवे की महाराज त्या स्वामींचे शिष्य असण्यानसण्यामुळे दोघांच्याही योग्यतेत कवडीचाही फरक पडत नाही.

माझ्या दृष्टीने ज्ञानेश्वरांनी शुद्ध अध्यात्माचीच भाषा व माध्यम घेतले, तुकारामांनी संसारी माणसाच्या सुखदुःखांच्या माध्यमातून अध्यात्म सांगितले आणि रामदासांनी व्यावहारिक शहाणपणाच्या माध्यमातून ते सांगितले. त्या त्या काळानुरूप असणारे भेदाभेद त्या लेखनात सापडतही असतील पण आज वाचताना लोक ते नाही लक्षात घेत. आज आपण जे लिहितो त्यात स्त्री-पुरुष किंवा कामामुळे होणारे भेदभाव ( अमुक मुख्यमंत्री आहे, तमुक चपराशी आहे ) हे गृहीतच धरलेले असतात, हे विसरता येत नाही. त्यामुळे, बाकीच्या संकुचित गोष्टी सोडून शक्य तर सर्वांनीच या मराठी खजिन्याचा लाभ घेतला पाहिजे, असे मला वाटते.

सारांश, रामदास स्वामी हे शिवाजी महाराजांचे गुरू होते की नव्हते हा एक क्षुद्र, फडतूस विषय आहे. सामान्यतःच माझ्या पोस्ट या काही ' पटवून ' देण्यासाठी नसतात. तशीच हीही नाही. पटवून देणे, मी म्हणतो तेच सत्य असे गळी उतरवणे वा वादात जिंकणे यात मला इंटरेस्ट नाही. त्यामुळे, मी एखादी बाजू मांडतोय असे समजून माझ्या अंगावर धावून येण्याचा वेडपटपणा कुणी करू नये, ही नम्र विनंती.

--- ००० ---

वेडा

आमच्या घराण्यात प्रत्येक पिढीत
एक वेडा असत आलेला आहे
असे आमच्या एका नातेवाईकाने सांगितले
आणि या सध्याच्या पिढीत तर
अकेला हूँ मैं

आमचा तो नातेवाईक लोकांना नेहमीच

फ्लेक्समधून दर्शन देतो
किंवा मग गणपतिविसर्जनाला
गुलाल उधळताना

मी त्याला म्हणालो तूच वेडा आहेस
फालतू जयंत्या उत्सव गुलाल फ्लेक्स
करण्यात आयुष्य संपवत राहतोस

यावर चारपाचजणांनी सौम्य मला पिटून काढले
वेडा आहे उगीच जास्त नका मारू
हे त्याने त्यांना माझ्यासमोरच सांगितले होते

आता मी शहाणा आहे की नाही माहीत नाही
पण वेड्याला वेडा नाही म्हणायचे
हे मी पक्के ठरवले आहे
--- ००० ---

शिवाजी, मोदी, शिवाजी पुतळा, आंबेडकर पुतळा, साईबाबांचे जन्मस्थळ पाथरी की शिर्डी, जिजामाता, वंशज, रामदास, दादोजी कोंडदेव, पेशवे, सावरकर -- हे सगळे विषय चर्चेत आहेत. एक वेळ या सर्वांबद्दल मी आपुलकी आणि प्रेम व्यक्त करू शकतो, पण, यांतले कुणीही वा काहीही मी माझे अस्मिताकेंद्र म्हणून माझ्या जगण्यात स्वीकारत नाही. मला तसे करण्याची गरज वाटत नाही. त्यामुळे, या विषयांवर कितीही गदारोळ झाला तरीही माझे मनःस्वास्थ्य बिघडत नाही.

कोणत्याही अस्मितावाल्याशी सहज, स्नेहशील गप्पा मारायला मी कधीही तयार असतो.

--- ००० ---

विभूती, नावे, भाषा, आदर्श, अस्मिता आणि वर्तन

शिवाजी, ज्ञानेश्वर, तुकाराम, कृष्ण, राम ही नावे नवजात अर्भकांना त्यांचे आईवडील प्रेमाने ठेवतात. कारण आता ती नुसती नावे वा शब्द राहिलेले नसतात. अतीव प्रेमामुळे ते शब्द आता भाषा झालेले असतात. तीच प्रेमाची, आदराची, उत्तुंगतेची वलये असलेले. अशा प्रकारे भाषेत समाविष्ट झालेल्या शब्दांवर कुणाचा व्यक्तिगत वा सामूहिक अधिकार राहात नाही. या बाळाची ' कृष्ण ' म्हणवून घ्यायची लायकी तरी आहे का, याचा तुम्ही काय विचार केला होता, असले गधडे प्रश्न कुणी विचारत नाही. तशा ग्रेट विभूतींना ग्रेट मानण्याचे प्रकारही माणसागणिक वेगळे असतात. त्या त्या आदर्शाचे ' पूर्णत्व ' आपल्या आवाक्यात येणे शक्यच नाही, असा नम्रपणा सर्वांतच असतो, आणि तरीही एखाद्या वा काही आवडत्या वैशिष्ट्यांशामुळे त्या त्या आदर्शाची तुलना, आज एखाद्या व्यक्तीला वा समूहाला आदरणीय वाटणाऱ्या व्यक्तीशी केली जाऊ शकते. त्यातही गृहीत हेच असते की ती आदर्श व्यक्तीच खरी ग्रेट पण हा एक तिथे पोचण्याचा बराचसा यशस्वी प्रयत्न. याच भावनेने अशी तुलना अनेक प्रकारे होऊ शकते. प्रत्येक वेळी ' लायकी तरी आहे का ' असे दुसऱ्या एका व्यक्तीने वा समूहाने

विचारण्यात अर्थ नसतो. कारण तो आदर्श आता निव्वळ एक प्रतिमा राहिलेला नसून भाषेत समाविष्ट झालेला एक ( पण अनेक छटा असलेला ) अर्थ झालेला असतो. तसे नसते तर सर्वांनाच सर्वांचीच लायकी काढायची वेळ येऊ शकते. ‘ तुझ्यासारख्या भ्रष्टाचाऱ्याची लायकी तरी आहे का ते नाव घेण्याची ‘ असे होत राहू शकते. ‘ लायकी असणे ‘ ही अट ठेवली तर ते नाव वा तो शब्द उच्चारणेही बंद करून, हळूहळू विस्मृतीत घालवून नष्टच करणे योग्य, असे होऊ शकते. त्या आदर्शवादाचे आम्हीच खरे जाणकार आणि हकदार असे समजणारे लोक तार्किक दृष्ट्या तो आदर्श, अशा प्रकारे, नष्टच करण्याची प्रक्रिया राबवत असतात ! सगळ्यांनीच एकमेकांवर आदर्शाच्या गैरवापराचे आरोप करणे एकूणात वेडेपणाचे ठरते. ‘ अमुक एकजण आमच्या टीमचा सचिन आहे ‘ असे कुणी म्हणाले तर ‘ त्याच्या बॅटिंगला सचिनच्या बॅटिंगच्या नखाची तरी सर आहे का ‘ असे विचारणे वेडेपणाचे असते. उलट, आपल्या प्रेमाचा सचिन आता भाषेत समाविष्ट होतो आहे याचे समाधान मानणेच इष्ट ठरू शकते. सारांश, विभूतींच्या विषारी अस्मिता होण्यात आपण त्या विभूतींच्या विभूतिमत्वाचेच नुकसान करत असतो, हे लक्षात घ्यायला हवे.

हे झाले काही व्यावहारिक विचार. पण, आदर्श आणि आपण यांतल्या अंतरासह सतत फाटलेल्या पद्धतीने जगायची सवय सुरक्षित वाटणे, हा आहे खरा मूलभूत प्रश्न ! यात कोण घेणार हो इंटरेस्ट ?

--- ००० ---

तळपाय

आपले काहीतरी हरवलेय
अशा विचारात आख्खी इमारत
पडायच्या बेतात उभी असते
धोक्याची म्हणून घोषित केलेली

तिचे लक्ष असते
स्वतःला अबाधित समजणाऱ्या
घड्याळे खुर्च्या टेबले यांच्याकडे

आपण स्वतःच अनिश्चित आहोत
तर आपण शोधणार काय
या विचारात तो काढतो तंबाखूची पुडी
गायवासरूवाली – तो म्हणजे मीच

मी टाळतो पण समज
एके दिवशी तुटले आपले संबंध
माझ्या तंबाखू खाण्याच्या कारणाने

तर मी काय पाऊस
पडला म्हणून तुझा खून करू की काय

तसे तर कधी कधी तळपाय
खाजला म्हणून वाकतो तर अचानक कंबरेत
आलेल्या गोळ्यामुळे
रजाच घ्यावी लागते मला – म्हणजे त्याला

पाहू आता किती चालतेय आयुष्य ते असे
--- ००० ---
फक्त लोकसत्ता

' -- दिब्रिटो यांचा निर्धार -- सत्य बोलतच राहणार ! ' अरे बापरे -- म्हटले, कालच ते दबाव वाढतोय, असे म्हणाले होते, तसे काही झाले की काय ! पण बातमीच्या पहिल्याच वाक्यात कळले की ते टीकेला घाबरणार नाही, असे म्हणत आहेत. टीकेला न घाबरणारे आता शेकडो लोक आहेत -- इथे फेसबुकवरही आहेत -- त्याला एवढी शीर्ष-ओळ बातमी करण्याइतके काही शौर्य लागत नाही. आणि याच बाबतीत आणखी एक प्रश्न येतोच. अध्यक्षपदाची झूल मिळाल्यानंतर ते शूर होताहेत, असे असणे शक्यच नाही. आणि ' बोलतच राहणार ' याचा अर्थच ते आधीपासून कायमच सत्य बोलतच आलेले आहेत. आणि थोडीफार टीका होण्यापलिकडे, सरकारी दमननीतीचा वगैरे त्यांना त्रास झालेला नसावा. त्यामुळे, एकूणात फार शौर्याची गरज नाही.

आता याच पुणे लोकसत्ताच्या पान ५ वर जाऊ. तिथल्या बातमीत खालील मजकूर आहे -- " साहित्य संमेलनात एका वक्त्याने देश हिटलरशाहीच्या उंबरठ्यावर असल्याचे विधान केले. तर, देश हिटलरशाहीच्या उंबरठ्यावर नाही, असे विधान दुसऱ्या एका वक्त्याने केले. परंतु, हा देश हिटलरशाहीच्या नाही तर गांधी विचारांच्या उंबरठ्यावर आहे, अशी भूमिका माजी संमेलनाध्यक्ष वसंत आबाजी डहाके यांनी रविवारी मांडली. " याच बातमीत शेवटी असेही म्हटले आहे की, " दडपशाही, लोकशाहीहनन होण्यापासून वाचविण्यासाठी कार्य करणाऱ्या युवकांमुळे आता भीतीचे वातावरण दूर झाले आहे." -- हे अरुणा रॉय म्हणाल्या म्हणे !

देशातील निदान महाराष्ट्रातील आम्हा सर्व सामान्यांतर्फे या सर्व विद्वानांकडे एक निवेदन देण्याची गरज वाटतेय. बाप हो, आम्हाला खरेच काही कळत नाही. आम्ही, तुम्ही काय बोलताय याकडे आशेने डोळे लावून बसलेलो असतो. आधीच महागाई, बेरोजगारी यांनी आम्ही त्रस्त आहोत. हे लक्षात घ्या आणि असे वेगवेगळे मौल्यवान बोलून आम्हाला वेडे तरी नका करू ! त्यातल्या त्यात मानसिक तोल संभाळत आम्हाला जगू द्या --
--- ००० ---

याच विषयावर साहित्य व कला यांच्या संदर्भात मी लिहिलेला एक लेख ' खेळ ' मध्ये आला होता, हे मित्रांना आठवत असेल.

विवेकवादी आणि पुरोगामी

साहित्यसंमेलनाचे निर्वाचित अध्यक्ष विवेकवादी आणि पुरोगामी आहेत, हे कळले की मुख्यतः हे धरूनच चालावे की आज लिहिणाऱ्या साहित्यिकांशी यांना काही देणेघेणे नाही. तरीही ते त्या अध्यक्षपदाच्या खुर्चीवर बसायला तयार होतात, याला अर्थातच विवेकवाद म्हणता येणार नाही. असे घडते कारण निर्वाचन प्रक्रियेत असणारा पुरोगाम्यांचा प्रभाव. यांना साहित्याशी काही कर्तव्यच नसते, याचे कारण म्हणजे, विवेकवादी आणि पुरोगामी आकलन व्यक्त करणे एवढेच काम साहित्याने केले पाहिजे, या बाबतीत ते कट्टर असल्याने इतर सर्व प्रकारच्या साहित्याबाबत ते असंवेदनशील असतात आणि स्वागतशील नसतात. ( काही पुरोगामी लेखक, हा असा परिवर्तनवाद हेच एकमेव साहित्याचे उद्दिष्ट असले पाहिजे, असे मानणारे नसतात. त्यांच्या लेखनातून ती ' भेसळ ' व्यक्तही होत असते, हा भाग वेगळा. )

अशा लोकांत कम्युनिस्टही असू शकतात. त्यांचे वर्चस्व असलेल्या ठिकाणी त्यांना एकही वेगळ्या विचाराचा माणूस चालत नाही, पण, इथल्या लोकशाहीत निर्वेधपणे ते आपले विचारस्वातंत्र्य वापरत असतात आणि लोकशाही मूल्यांचे गुणगान करत असतात. बऱ्याच वेळा एकूणच पुरोगाम्यांचे वर्तनही असेच दिसते. इथले सत्ताधारी हुकुमशहा आहेत, हिटलर आहेत, वगैरे सर्व बोलण्याचे स्वातंत्र्य वापरून लगेच पुढच्या वाक्यात ते म्हणतात की स्वातंत्र्य नाहीय आणि दबाव वाढतोय !

बाकी हे लोक स्पष्टवक्ते वगैरे असतात, पण कसे तर जे भाषण इतर कोणत्याही ठिकाणी करायचे स्वातंत्र्य त्यांना असते, तेच भाषण ते साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाच्या सिंहासनावरूनही हाणतात. त्यात त्यांचे स्वतःचे म्हणावे असे कवडीचे काही चिंतन नसते. इतर कोणतेही पुरोगामी जे भाषण करतील तेच सगळे ते इथेही ठोकतात. अशा या सगळ्या विपर्यस्त कार्यक्रमाचे काही परखड साहित्यिक तोंड भरून कौतुक करताना दिसतात !

अशा लोकांमुळे साहित्यसंमेलनाचे व्यासपीठ, जे मुख्यतः साहित्यासाठी वापरले गेले पाहिजे त्याचा हे लोक राजकीय आखाडा करतात. साहित्यात राजकारण वर्ज्य नसते, असे म्हणत भाषणात हे शिताफीने साहित्यालाच वर्ज्य करतात !

एक परिवर्तनवादी साहित्य सोडले तर बाकी सर्व साहित्याच्या बाबतीत यांची वृत्ती ही हुकुमशाहीची, हेकेखोर, कट्टर आणि तालिबानी असते. कारण, मर्यादा आखून घेतलेल्या असल्यामुळे काही कळतच नाही !

--- ००० ---

कॅन्सरवाले

ते एकत्र जमत आणि हिरीरीने पाहात
डोंगराच्या उजव्या बाजूची गाठ
आणि तिला ते कॅन्सर म्हणत
पण दुसरेही लोक येत दुसरीकडून

ते म्हणत मुळात ती गाठच नाहीय
उलट डोंगरावर उगवत असलेली
विषारी झाडे नष्ट करायला हवीत

दोघांनाही वाटे आपले इतके स्पष्ट
साधे सरळ खरे असून वाद का होताहेत
नक्कीच हे नुसतेच क्षुद्र स्वार्थासाठी चाललेय

सगळेच सगळ्यांना खऱ्याची आणि न्यायाची
बाजू घ्या तटस्थ नका राहू असे म्हणत
संधी मिळाल्यास आम्ही तुम्हाला नीट करू
अशी अध्याहृत धमकीही त्यात असे

काहीजण म्हणत की आधी आपण
ट्रंपविषयी भूमिका घ्यायला हवी
तिथे तर जगच नष्ट होण्याचा धोका आहे

विचारस्वातंत्र्य मग वाढत जाई
आता केलेय ना मतदान
बघतील ते काय करायचे ते असे काही म्हणत

विषारीवाले प्रबळ झाल्याने कॅन्सरवाले जळफळत राहात

--- ००० ---

चित्रकार, लेखक, कवी, प्रेक्षक, रसिक, वाचक, समीक्षक या सर्वांच्याच विचारांना चालना देऊ शकेल असे हे एक वाक्य वाचनात आल्याने इथे देत आहे --

"There is no abstract art. You must always start with something. Afterward you can remove all traces of reality."
— Pablo Picasso

-- " अमूर्त कला असे काही नसते. तुम्ही नेहमीच कशापासून तरी सुरुवात केली पाहिजे. नंतर तुम्ही त्यातल्या वास्तवाच्या सर्व खुणा नष्ट करू शकता. "
-- पाब्लो पिकासो.

घड्याळाखाली

घड्याळाखाली वाट पाहायचे ठरले होते

त्या वेळी डोक्यात रहदारी कोणती असावी
हे ठरूच नाही ना शकत

गच्च भरलेल्या माणूसगाड्या
आणि दारांतून बाहेर ओसंडते
थकव्याचे घामट पूर

पाहात आणि पाहात अधीर
अत्यंत हपापलेल्या ब्रीफकेसेस
आणि नुक्त्याच मारलेल्या सेंटच्या काळज्या

असा खूप वेळ झाल्यावर शेवटी
जायला निघणार इतक्यात धावतपळत
काही घडल्याचा भास

ना फोन ना काही त्याच घड्याळाखाली
कधी काय ठरले होते मनातल्या रहदारीसह
याच आयुष्यात घडायचे

रहदारी थांबवायचे प्रयत्न चालू
पण गर्दी आहे तशीच थकावू
आणि हो की नाही याची अर्जंट असह्य वेळ
--- ००० ---

झाडाची ताकद

आपले शत्रू चुकीचे आहेत
ही मनोमन खात्री असणे
म्हणजेच प्रामाणिकपणा

मातीचे मुद्दे वेगळे
दगडाचे वेगळे
पण निकाल उपलब्ध
कायद्याप्रमाणेच होणार

कायद्याचा अर्थ लावणार
स्वतंत्र स्वयंभू झाड

म्हणून मुख्य म्हणजे
झाडाची ताकद हवी

प्रामाणिकपणा
कसाही वळवता येतो
--- ००० ---
ऑक्सिजन सिलिंडर

तुला जिथे धोंडा दिसतो
तिथे मला फुलपाखरू दिसते
आणि तुला वाटते की
मी तो उचलून का नाही फेकत
वा तुला त्यासाठी हात देत

मला सगळे वेगळे दिसते
ते जाऊ दे – सध्या एक मार्ग म्हणून
तू मला त्या फुलपाखराचा
पूर्ण आणि खरा इतिहास सांग
तरच मी तुझ्याबरोबर येईन

तुला फुलपाखरात इंटरेस्टच नाही
हा माझ्या समजुतीचा अपमान नाही का होत

तू तुझे सगळे सोपे सरळ सत्य
आणि अटळ धरून चालतोस
आणि मला वेगळे काही दिसणे
म्हणजे माझा दुष्टपणा म्हणतोस

निकाल देण्यासाठी
ज्याला तिथे तुझ्यामाझ्यापेक्षा
काही वेगळेच म्हणजे समज
ऑक्सिजन सिलिंडर दिसतेय
असा कुणी पाहून त्याला विचारू
-- होऊ दे आणखी गोंधळ
--- ००० ---

विचाराचा मुकाबला विचारानेच केला पाहिजे, हे बरोबरच आहे, पण, १५ साली जाणवलेल्या अडचणी अजून तशाच की हो आहेत !

सुचताहेत का कुणाला काही उपाय यांवर ?

सतत कोणत्या ना कोणत्या मूडमध्ये राहायच्या मनाच्या सवयीमुळे कुणाचेच कुणाशीही मनापासून नीट जुळत नसावे --

एकमेकांना दूषणे देणे हा
आशावाद जोपासण्याचा
एक लोकप्रिय राजमार्ग आहे --

भूमिगत

धरणातून सुटलेले
राजकारणाचे पाणी असो
की उपटसुंभांनी केलेले
धर्मनिरूपण
त्यांचा माझ्या जगण्यावर
का व्हावा परिणाम
माझ्या परवानगीशिवाय

याचे एक उत्तर मला पटते
आमची मने वेगवेगळी असली
तरी आहेत सारखीच

या भूमिगत कारणाने
आमचे एकमेकांना
प्रोत्साहनच तर असते
--- ००० ---
सूर्य

रात्रीत उगवलेला मासा
नहात राहिला अंधारात
त्याच्या खवल्यांवर तोलत
पृथ्वीचे अवघे स्वप्न

कोणत्याही क्षणी
गळणारी पाने

त्यांच्या रंगांनी
पिकवत राहिली
आशावादी अफवांचे पीक

आता खरेच हाऊसफुल
झालेले दुकान
त्याच्यावरील
अनुभवाच्या बोज्याने वाकलेले
झाडाच्या जवळ सरकत राहिले

निष्पाप मनाने स्मित देणारी स्त्री
क्षणभर तरी पापी व्हावी
असे वाटणारा नाकतोड्या
आयुष्यच कमी असल्याने
एकदाच डसणारा
काजवा पाहून स्तिमित झाला

अशातच पहाट झाली
आणि सूर्य ओला झाला
--- ००० ---
रहस्य

माझा अश्रू मला होऊ द्यायचा नाहीय
माझ्या विश्वासाचे प्रतीक
माझी वाढती नखे मी वापरणार नाही
विज्ञानाचा पुरावा म्हणून
भाषांचे अवडंबर आणि संघर्ष
मी म्हणणार नाही उत्क्रांती
आणि मनाला म्हणणार नाही सत्य

जे जे बुद्धीने कळते
ते ते चमत्कार नाही
बुद्धीचे रहस्यही
कळेलच की बुद्धीला
सत्याला कशाला हवेय दुसरे सत्य

--- ००० ---

शेकोटी

नुसती इच्छा होण्याचा अवकाश
इच्छित मन सर्वस्वाने हजर
ना शब्दांची गरज ना स्वरांची

सर्व वस्त्रे अधीन
स्वतःचे मनच वारा
मनांना ना आगापिछा
ना आडपडदा

आपोआप समजण्याचे
आणि बेशुद्ध होण्याचे
लाल सोनेरी आकाश

हे सुख की वर्तमान
की एकांत की नृत्य
औदासीन्य की उत्सुकता
स्पर्श की विस्मृती

विरुद्ध अर्थांचे शब्द
बरेचसे गायब झालेले गाव

जिथे फक्त एक शेकोटी
हिंदी सिनेमातली
--- ००० ---

एडिपस

आपल्या खिशात काही
समुद्राचा आवाज नाही असू शकत
तरीही आपण फुशारक्या मारतो
हजारो आरसे फोडून
तितक्याच सौंदर्यवतींना वश केल्याच्या

आपल्या दुचाक्या पाण्यात

वा वाळूवरून घसरतात
त्याचा दोष आपण
आकाशातल्या शेवाळ्याला देतो

आणि आपण म्हणतो की हळूहळू
पूर्ण कंट्रोलच स्थापित होतोय आपला
दंगली आंदोलने जाळपोळ दगडफेक
यांच्या मानवी प्रक्रियांवर

तसे अवघड काहीच नसते
कारण आपल्याच मनांच्या
जाळ्यांत सापडणाऱ्या
सर्व पक्ष्यांवर विश्वास ठेवला
की झाले

इतरांचे आणि सर्वांचेच तेच चालू असते
कर्मकांड यज्ञयाग
यांकडे पाहताना मात्र मात्रागमन झालेल्या
एडिपससारखे डोळे फोडून घ्यायचे की झाले
--- ००० ---

विदुर ( कादंबरी ) – ले० डॉ. कमलेश सोमण

या कादंबरीच्या प्रकाशनाला जाऊन आलो. आम्ही पुण्यात ' अवकाश कलामंच ' नामक एक नाट्यसंस्था काढली होती तेव्हापासून कमलेश मित्र आहेत. त्यांचा प्रबंध महेश एलकुंचवारांच्या नाटकांवर असून त्याचेही एक दर्जेदार पुस्तक निघालेले आहे. या प्रकाशनाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने या कादंबरीतल्या दोन प्रकरणांचे अभिवाचन आयोजित केलेले होते. अभिवाचक होते, स्वतः कमलेश आणि गौरी लागू. पार्श्वसंगीत होते अक्षय सोमण आणि त्यांचा चमू यांचे. ( नंतर प्रमुख वक्ते होते श्री. श्री. वा. कुलकर्णी आणि प्रमुख पाहुणे होते कलर्सवरील ' स्वामिनी ' फेम अभिनेते गुरुराज अवधानी. त्या दोघांच्या भाषणांना मी थांबू शकलो नाही कारण मला ८ वाजता माझ्या धाकट्या नातीला तिच्या क्लासवरून घरी घेऊन जायचे होते. )

दोघेही अभिवाचक अत्युत्तम असल्याने सुमारे ६०-७० श्रोते पूर्ण मग्न होऊन ऐकत होते. कमलेशांनी ही कादंबरी, महाभारतातले तत्त्वचिंतन स्वतःत पूर्ण मुरवून लिहिलेली आहे, हे जाणवले. युद्धातला सगळा संहार होऊन गेल्यानंतर पांडव आणि श्रीकृष्ण, धृतराष्ट्र आणि गांधारी यांना भेटायला येतात, तो कथाभाग होता. ते येण्यापूर्वी विदुर धृतराष्ट्राशी बोलतो आणि नंतर तसेच गांधारीशीही बोलतो. पांडव आणि कृष्ण यांना क्षमा करावी आणि त्यांच्याबरोबर पुढे आनंदात राहावे, असे त्याचे सांगणे असते. धृतराष्ट्रही त्याचा राग आवरू शकत नाही आणि नंतर गांधारीही. ते सर्व मुळातूनच ऐकण्या-वाचण्यासारखे आहे.

एवढ्या कथाभागातही हे व्यक्त झालेले आहे की मनाने घडलेली कोणतीच कृती ही पूर्ण बरोबर वा पूर्ण चूक अशी नसते. पांडवांच्या बाजूने सगळे समर्थनीय असले तरी धृतराष्ट्र आणि गांधारी यांचा क्रोधही समर्थनीय असतो. दोन्ही बाजूंनी काही ना काही चुकाही झालेल्या असतात. मानवी जगण्यातल्या या गुंतागुंतीचे आणि सर्वतः अमुकच बाजू घ्यावी असे काही नसते, याचे उत्तम भान या अभिवाचनाने दिले. इतका मोठा संहार घडून गेल्यानंतर क्षमेचा विषय समोर येणे हे जगण्यातले प्रतिक्रियेचे सातत्य तोडण्याचे तत्त्वज्ञान असते. अशा पद्धतीने पाहिल्यास नुसतेच या कादंबरीचे महाभारताचा कथाभाग म्हणून उदात्तीकरण करावे लागणार नाही. शेवटी जगण्याचे सार्थक घटनांच्या बाहेर आणि प्रतिक्रियांच्या बाहेर असल्याचे हे तत्त्वचिंतन हीच या कादंबरीची मूल्यात्मकता आहे.

मला खरे तर ऐतिहासिक वा पौराणिक असल्या प्रकारांची मानसिक ॲलर्जीच आहे. मी या प्रकारांच्या फंदातच पडत नाही. पण कमलेशांच्या मैत्रीमुळे गेलो आणि जाऊन येण्याचे पूर्ण सार्थक झाले.

सर्व संबंधितांचे अभिनंदन !

--- 000 ---

औरंगजेब काही छोटे शिवणटिपण स्वतःचे स्वतः करत असे म्हणे -- मीही करतो -- प्रत्येकात काही चांगले असतेच !

निर्बुद्धता ( Absurdity )

निर्बुद्धता आहेच ना
जगण्याच्या मुळाशी
चिडून उपयोग काय
किंवा ती नाहीच आहे
असे म्हणून तरी

माहीत नसलेले माहीत
होत जाईल हो खूप खूप
पण बुद्धीची ही सवय
संपणारच नाही

आणि माझीच बाग
नेणार मी विस्तारत
या बुद्धीला तीव्र
कसे नाकारणार

माहिती जमवत
चला बोंबलत

आणि डोकी फोडत
समता आणण्यासाठी

माहिती जमवण्याच्या मार्गात
बसवता यायला हवे वैज्ञानिक
संशयाने पत्नीचा छळ करणे

आज ना उद्या होईल बाबा सगळे प्रेममय
--- ००० ---

थंड वारे

नाही तरी हवा दूर दूरच
ढकलत चाललीय
हळूहळू वाढवत थंड वारे
स्मृती अंधुक करत जाणारे

उत्तेजक आठवणी
तासंतास प्रवासाच्या
काव्यशास्त्रविनोद होत
लुप्त होताहेत

संपर्क नकोसेच होताहेत की काय
प्रेरक झाडांचे शेडिंग
फक्त ठसे म्हणून
विहरावे पक्ष्यांऐवजी तसे

उद्यावर गेलेल्या पापण्या
आणि न सोलण्याची संत्री
अशी वस्त्रे
जणू हुतात्मा स्मारकाशी फेडलेली

आता कारणेही नकोत
हजार मैलांवर आपापली कॉफी
पिऊन कामाला लागता येईल
आठवणी विसरत

एकत्रितपणे

--- ००० ---

समाजात

एका कवितेने
उघडला रस्ता
थांबवत बंदपणा

मी एका बंदिस्त खोलीत
बाहेर न जाण्याच्या बोलीवर
एकटा पण खूप
आठवणींसह

कोणताही समूह सोबत नसताना
जयंती पुण्यतिथी नसताना
त्या कवितेला
ती व्हायला हवीय माझी प्रेरणा

जिच्या सन्मानासाठी मी दंगल करेन
मनातल्या मनात कृतज्ञता म्हणून
माझ्या मनाला
नेमका धक्का दिल्याबद्दल

माझे एकट्याचेच दैवत होईल
ती एकच कविता कुठूनही आलेली
जरी ती ठार केली जात राहिली
अनुल्लेखाने इतरत्र

माझ्या मनाच्या समाजात मात्र
सळसळती नेमकी आणि बिनचूक

--- ००० ---

अस्पष्ट

धुक्यामुळे डोंगर
दिसायचा थांबतो

तसेच माझे अबोध मन
आणि थोडेफार सबोध मनही

कोणतेही विचार म्हणजे
मला अस्पष्ट फडतूस मतेच वाटतात
व्यक्त होताच कुणी
विरोधकाने अंगावर यावे अशी

शक्ती एकवटायची जिद्द
असलेलेच मिळवतात
जग सुधारायची संधी
आमच्या सर्वांच्या एकत्रित मनाचा
एक भाग असलेले

धोका एकच असतो
त्या एकत्रित मनाचे ऑपरेशन करून
माझे मन म्हणावे असा
हा अनावश्यक भाग
ते कापून फेकणार तर नाहीत

समाधानासाठी मी निरीक्षण करतो
मी तरी माझ्या मनाचा कोणताही भाग
असा फेकलेला नसावा बहुतेक
--- ००० ---

## खुर्चीवर

तसा तो सतत बसून असे
खिडकीशेजारच्या खुर्चीवर
आणि वाचत राही
खूप जगत राहण्याबरोबरच
एकामागोमाग एक पुस्तके

महायुद्धे कुणाकुणात का झाली
इथपासून ते रशियातले आणि फ्रान्समधले
आजचे कवी आणि जगातली
बेस्ट सेलर पुस्तके तो वाचे

आणि तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्र
आणि दहशतवादी कारवायांचा इतिहास

घरचे लोक अभिमानाने त्याला सर्व सेवा देत
चार लोक कधी भोवती जमले तर
तो समृद्ध ज्ञानपूर्ण बोले
कशालाही जोडून काहीही आठवत

आणि मग शेवटी सांगे
हे सगळे माझे बोलणे म्हणजे
समजा एक आजची
अतिवास्तववादी कविताच

आणि रूटीन वापरायच्या भाषेतले
अर्थ नका लावत बसू
--- ००० ---

नितीन वैद्य

एखाद्या महत्त्वाच्या मराठी लेखकाच्या बाबतीत, त्याच्या मृत्यूनंतर, त्याच्या अप्रकाशित साहित्याचा असा पाठपुरावा करून, मागोवा घेऊन आणि संपादन करून ते लोकांपुढे आणण्याच्या कामाचे हे एक मौलिक उदाहरण म्हणावे लागेल -- नितीन वैद्य यांनी त्र्यं. वि. सरदेशमुखांच्या लेखनाबाबत केलेले काम ! त्यातलेच एक पुस्तक, ' त्र्यं. वि. सरदेशमुख -- साहित्य -- संदर्भसाहित्य ः सूची आणि चरित्रपट ' हे आहे. पुस्तक माहितिपूर्ण तर आहेच, पण, त्याचबरोबर निशिकांत ठकार यांनी सरदेशमुखांशी मारलेल्या गप्पांच्या साक्षात्काराचे परिशिष्टही वाचनीय आहे. व्यक्तिगत जीवनात अनेक संकटांशी सामना करत सरदेशमुखांनी केलेले वाचन-चिंतन-लेखन पाहून थक्क व्हायला होते !
हा एक महत्त्वाचा साहित्य-ऐवज प्रकाशित केल्याबद्दल सुविद्या प्रकाशनाचे अभिनंदन !

कसदार, आशयपूर्ण लिखाणासाठी प्रतिक्रियावादी होणे टाळले पाहिजे.
-- भारत सासणे ( पुणे मटा -- पान ३ -- ०२-०१-२०२०. )

भ्रम

अप्रूप असे काही नसतेच मला
नष्ट होतात माझी स्वप्ने
पाहून होताक्षणी
आणि लोक ज्याला म्हणतात वास्तव
ते तर मी जागा असतानाच खोटे पडते

कारण खूप मने दिसतात मला
आपापल्या प्रेयसींसाठी अनेक दिशांनी
जिवाचे रान करणारी

एका चाळीतल्या अंधाऱ्या जिन्याची
एक पायरी तुटलेल्या आठवण
आजही आहे माझ्या संग्रही
पण तो संग्रह आणि मी
राहतो घराबाहेर

मी सिगरेट ओढतच नाही
असे खूप आहे
जे अस्तित्वातच नाही आले

माझा आग्रह नसतो
कुणी खूप हट्टाने सूडाचे बोलतो
तेव्हा मी नसतोच तिथे
तर काय बदल घडवणार

घटना नाहीच घडत कधी
हा भ्रम मला सत्य वाटतो
--- ००० ---